# अनुक्रमणिका.


कवि, विषय व पद्यसंख्या. पृष्ठांक.

१ श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए. ( कविता ९३७ )

श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य. सर्ग १ ते १२. पृष्ठें १, २५, ४९, ७३, ९७, १२१, १४५, १६९, १९३, २१७, २४१, २६७.

२ चंद्रकांत. ( कविता २७० )

आर्यभूदेवीमहिमा. उद्गार १ ते ४. पृष्ठें १९९, २२४, २५५, २८०.

३ अनंततनय. ( कविता १३९ )

१०१ सद्बोध शतक. ३४, ९६, १०७, १६०.

३८ भ्रमरसी नरजाति जगीं भली. १७६

४ माधवानुज. ( कविता ११६ )

१०७ मेघनादवधकाव्य. सर्ग ५ वा. ८५

९ प्रियेचे अश्रू ११९

५ श्रीनिवास नारायण शिंदे. ( कविता १०९ )

ऋतुसौंदर्य सर्ग १ ते ४ पृष्ठें १२८, १७९, २०६, २३०.

६ बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए. ( कविता ७३ )

५३ इंधनाचा अधःपात. १०[illegible]

२० शेतकऱ्याचे उद्गार.

७ राजहंस कवि. ( कविता ४६ )

४ [illegible]क[illegible]णाचे तीळ.

७ गृ[illegible]चे अलंकार.

२३ मधुप. ( कविता १४ )

१४ मंदोदरीविज्ञापना. १८७

२४ गोविंद पांडुरंग देवधर बी. ए. ( कविता १२ )

१२ कोकिलान्योक्ती. ९९

२५ विष्णु बळवंत थोरात. ( कविता १० )

१० हंत हः १२९

२६ मार्गण. ( कविता ९ )

९ केशवसुतनिधन. ४१

२७ क्ष कवी. ( कविता ९ )

९ हा—तो ७०

२८ मल्हार खंडेराव चिटणीस बी. ए. एल. एल. बी. [ क. ९ ]

९ जें जें असे तेंचि यथार्थ आहे. ११८

२९ गणेश हरी मोकाशी. [ कविता ८ ]

८ मायाजाळ. २१४

३० विद्यावनविहारी. [ कविता ७ ]

७ कवि आणि पक्षी. २१५

३१ वनवासी. [ कविता ७ ]

७ काव्यमय सृष्टी. २२४

३२ नारायण. [ कविता ६ ]

६ ओवाळणी. १४१

दंडी. [ कविता ६ ]

६ व्यवहारनीति. २१६

# काव्यरत्नावलि.

सं.भा.४०११

## अंक १ ला.

## मंगलाचरण.

सर्व प्रकारें उन्नतीस प्रतिकूल व अवनतीस अनुकूल अशी परिस्थिति असतांनाही ज्या मंगलमयजगच्चालकाच्या कृपावलोकनानें आजपर्यंत पूर्ण सतरा वर्षें ' काव्यरत्नावलि ' आश्रयदाते व साहाय्यकर्ते यांच्या सेवेला शक्यनुसार प्रतिमासीं सादर होत आहे, त्या परमेश्वरास नूतनवर्षारंभीं शरण जाणें हें प्रकाशकाचें कर्तव्य—नव्हे आद्यकर्तव्य—आहे; तसेंच ज्या कविमंडळानें रत्नावलीस आजवर साहाय्य करून, ती सुंदर व्हावी ह्मणून बरीच मेहनत घेतली, व आपल्या स्वभावसुंदरवाणीनें कवितादेवीला अलंकृत करून, तिच्या सौंदर्यानें रसिकवर्गास तल्लीन करून सोडिलें, त्या कविवृंदाचा, व या कर्तव्यास स्वतां आश्रय देणाऱ्या आश्रयदात्या रसिकजनांचाही रत्नावलीचा संपादक फार फार ऋणी आहे; हा या दोनवर्गांचा झालेला अनुग्रह तो संतोषानें कबूल करीत आहे. हे दोन शब्द प्रकाशकाच्या वतीनें अन्यरीतीनें बोलून दाखवावे, असा उद्देश मनांत योजून यथामति पुढील पद्यें केलीं आहेत.

( श्लोक—माल्यभारा. )

प्रभुजी ! तुझिया पदांबुजांतें— । नमितों, वंदिति संतवृंद ज्यांतें;
रत तेथचि चित्तभृंग व्हावा; । वर द्यावा मज हाचि देवदेवा ! १
तव नाम मुखीं सदा स्वभावें— । मज यावें, मन तेथ मग्न व्हावें;
विनती इतुकीच एक भावें; । जडजीवा मग अन्य काय व्हावें ? २

भवसागर हा गरागरा या- । मतिमंदाप्रति लावितो फिराया;
ह्मणुनी विनती असे तराया- । क्षमता दे विनतास देवराया ! ३
मति संसृतिला मुळीं न सोडी, । उदराच्या व्यवसायिं तीस गोडी;
षडरातिसमूह देइ पीडा, । रघुराया ! बनलों खराच वेडा. ४
विषयामिष या विषें भ्रमोनी, । हरि ! गेलों बहु त्यांत मी रमोनी;
करिं त्यांतुनि मुक्त शीघ्र याला- । तव नामामृत पाजुनी दयाला ! ५
धनदारसुतादि सौख्य खोटें, । परिणामीं फसवील सत्य वाटे;
कळतें जरि यांत फार तोटे, । परि होतां रत मात्र सौख्य मोठें ! ६
कळतें ह्मणिजे तरी कळेना, । कळुनीही मग वृत्ति कां वळेना !
नकळे ह्मटलें तरी प्रतीती- । तव भक्तां; हितबोध ते कथीती !-- ७
" धरितां प्रभुरामनामसंगा,- । षडरींचाहि शमेल घोर दंगा;--
क्रमितां मग संसृतिप्रसंगा,-- । नच दुःखा शिववेल युष्मदंगा. " ८
धरिला मनिं मार्ग हा सुखाचा,-- । सुजनीं जो कथिला मला फुकाचा,--
जनिता जनिं जो सुखादिकांचा,-- । मणि तो त्याविण अन्यमार्ग काचा. ९
' स्वमुखीं तव कीर्ति ये दयाला ! । अघ जावो स्वयमेव तें लयाला; '
हृदिं हेतु असा धरोनि रामा ! । कविता संग्रहितों मनोभिरामा. १०
तरि यास सहाय हो समर्था ! । शरणाच्या पुरवीं शरण्य ! अर्था;
हरि ! या करिं देइजे स्वसेवा; । फिरुनि प्रार्थितसें असेंच देवा ! ११
खचिलीं बहु जींत काव्यरत्नें,-- । अजि रत्नावलि ती तुझ्या कृपेनें--
युवतीपदवीस पावलीसे; । अठरावें तिस वर्ष लागलेंसे. १२
अज ! अव्यय ! लोकनाथ ! तूतें-- । मम रत्नावलि अर्पिते वपूतें;
तरि घे पदरीं हिला सभाग्या ! । नसलीही जरि सर्वथैव योग्या. १३
प्रभुराय ! अगा ! सरोरुहाक्षा ! । वरदा ! स्वाश्रितकामकल्पवृक्षा !
निरखोनि सदा कृपाकटाक्षीं, । प्रभु ! रत्नावलिमासिकास रक्षीं. १४
कविवृंद असो चिरायु सारा-- । झटणारा कवितेचिया प्रसारा;

कथुनीहि हितोपदेश साचा,-- । निधि अर्पी रसिकां नवांरसांचा. १५
धन ओपुनि आश्रयास देतो, । कविता आदरुनी करांत घेतो,--
असला जगिं जो सुकार्यदक्ष-- । जनसंघात विभो ! तयास रक्ष. १६
" सुख, कीर्ति, चिरायु, आणि ऋद्धि,-- । निजकार्यी रतशी तशी सुबुद्धि,--
सकलांत सदा वसेल; " ऐशा-- । मज आशीर्वचनास दे परेशा ! १७
करुणावरुणालया ! प्रसादें-- । तुझिया बोलतसें अजाण मोदें;
निजभक्तिपुरःसरा उदारा ! । नत अर्पी पदपाद्मिं माल्यभारा. १८

भृंग.

# श्री छत्रपति शिवाजी महाराजकाव्य.

## सर्ग १ ला.

जगदंबा--प्रार्थना. कविस्तुति. पुष्पपुरीवर्णन. तेथील राजा विश्वासराय याचें वर्णन. राजपत्नीवर्णन. त्यांची अनपत्यता व त्यामुळें राणीची खिन्नता व शोक. राजा राणीचें सांत्वन करितो. राणी दृढभक्तीनें ईशसेवा करिते. राणी गर्भवती होते. ती कन्या प्रसवते. प्रजेचा आनंद.

आर्या.

कार्यारंभीं नमितों अघहरणा अंबिका जगज्जननी,
जीच्या पदप्रसादें करि कविता--बंध मंदबुद्धि जनीं. १
देवो ती जगदंबा नव काव्य रचावया मला स्फूर्ति;
कोण समर्थ तिच्याविण करण्या दुष्प्राप्य कामनापूर्ति ? २
नच काव्यशक्ति अंगीं, मी अति निर्बुद्ध, परिमित ज्ञान,
लंघाया गगनतला हृदयीं इच्छील कोण सज्ञान ? ३
सत्कवि--संत--महज्जन--चरणीं शिर केंवि नम्र न करीन;
श्रेष्ठ--प्रसाद--विमुखा उन्मत्त--जना कधीं यश वरी न. ४

धर्मोद्धार कराया अवतरला देवदेव जो जगतीं,
दुस्तर संसृतिसागरिं जो पतित जनास होय सत्य गति. ५
गीताभाष्य करुनिया ज्यानें अघनिधि अपार उद्धरिले,
नमिला ज्ञानेश्वर तो; ज्यानें त्रैलोक्य निजयशें भरिलें. ६
वेदान्तनभस्तरणी अमृतानुभवा रची विशाल–मति,
नमिलें मुकुंदराया; मन्मन तत्पदिं वरो अखंड रति. ७
भगवद्भक्त जनार्दनशिष्य ज्ञानार्क एकनाथाला--
नमितों आदरपूर्वक; जो सेतु भवार्णवीं अनाथाला. ८
ज्याची प्राकृत कविता देते संतोष बहु मुमुक्षु–वरां;
जीच्या श्रवणें होई दुस्तर संसृतितरंगिणी सुतरा; ९
त्या श्रीधर कविवर्या आदरपूर्वक करीतसें नमन;
त्याच्या चरणसरोजीं लीन सदा हो ढळो कधीं न मन. १०
पावति अभंगवाणी ज्याची ऐकून भक्त आरामा,
त्या भक्तश्रेष्ठा मी नमितों अत्यादरें तुकारामा. ११
त्रिभुवनमहितशिवमहीनाथगुरु समर्थ रामदासाची,--
स्मृति होईल न कैशी ? मूढ कविजनास कामदा साची. १२
सुखवी विश्वा सर्वा करुनी सुश्लोकमय सुरस कविता,
नमिला कवि वामन तो; अवतरला लोकिं काय जो सविता. १३
वाग्देवीकंठस्थित--कविमालागतमहार्हमध्यमणी,--
ज्याच्या काव्ययशानें भरुनी गेली समस्त ही धरणी; १४
त्या श्री मयूरकविच्या कैशी स्मृति मज न होय पायांची,
नवकाव्यविरचनीं या सादर मी मूढ तत्कृपा याचीं. १५
भक्तश्रेष्ठ--महीपतिपद मी अत्यादरें मनीं स्मरतों,
काव्यग्रंथ विलोकुनि ज्याचे भवसागरीं विनत तरतो. १६
पुष्पपुरी नांवाची विलसे कृष्णा--नदीतटीं नगरी,

सं.भा.-५५/१८



उन्नत--विस्तृत--मंदिर--शत--शोभित जी दिसे सुरम्य खरी. १७
उपवन--परंपरांहीं आली शोभा अपार नगरीतें,
निवती घ्राणनयनमन पाहुनि कुसुमित--लतातरुश्रीतें. १८
वसती आनंदानें धन--धान्य--विभूतिमान् जन सकलही,
प्रेम परस्पर धरिती, कधींहि रमती न अल्पही कलहीं. १९
अमृतोपम--मधुर--जला कृष्णातटिनी वहात मंदगती;
पीन--पयोधर--विनता अधिगत--नवयौवना जशी युवती. २०
कृष्णातीरीं विलसे प्रस्तरमय घाट विस्तृत विशाल;
जेथें संध्यासमयीं बसुनी जन लोटिती सुखें काल. २१
त्या नगरीचा अधिपति होता विश्वासराय परम हित,--
सत्कुलसंभव, धर्मन्यायपरायण, दयालु, परमहित. २२
भीति तया अरि थरथर, मदमत्त करी जसे मृगपतीतें,
विध्वस्त--धैर्य होउनि, सोडुनि समरास दूर पळती ते. २३
संरक्षी लोकांतें पुत्रांपरि विमल भाव मनिं धरुनी,
संकटपंक्ति निवारी, लवितसे सत्पथा तयां जपुनी. २४
अगणित धन देउनिया तुष्ट करी तो महीसुरां सकलां,
सुखवी जीवां सर्वां, ज्यापरि घन वर्षुनी अपार जलां. २५
जो जो दुर्मार्गानें वागे अन्तक गमे तया हृदयीं;
शत्रु असो मित्र असो, समभाव धरी मनीं तयाविषयीं. २६
पाहुनि दीन जनातें अनलें नवनीतसें हृदय वितळे,
तद्दुःख हरी वेगें, नच दुखवी अल्पही कुणांस बळें. २७
" परधन--परदारनिरत जन पावतसे विनाश; सबल जरी--
पडले व्यसनीं दशमुख, शक्र, शशी; मर्त्य--गोष्टि काय तरी ! " २८

हें तत्व धरुनि हृदयीं धर्मात्मा करितसे सदाचरणा,
पूजुनि अनन्यभावें द्विज, त्यांच्या सेवि तो सदा चरणां. २९
विश्वासराय विश्वासास्पद तो होय सकल लोकांतें;
तातासमान सादर त्यातें सन्मानितील नच कां ते ? ३०
गुणकुलसौंदर्ययुता असे खरी तदनुरूप तद्भार्या;
नामें सीताबाई, सीतेसम जी असे विमल आर्या. ३१
मानून देवतेसम पतितें सेवी सदा सती भावें;
लाजावें श्रीनें तिस, तद्वर्णनिं चित्त कां न लोभावें ? ३२
श्रान्तपतिस शान्त करी बोलुनि मधुरा सुधसमा वाणी,
तत्कोप न मनिं आणी, पतिचरणीं सतत लीन गुणखाणी. ३३
वाखाणी विश्व तिला तिजसम दुसरी पतिव्रता न कुणी;
निर्मल जीची करणी, शोभे स्त्रीवर्गि नम्रतादिगुणीं. ३४
अप्रिय जें निजपतितें साध्वी तें आचरी नच कदा ही,
भर्त्यातें जें जें प्रिय तदन्य तिजला नसे सुखद कांहीं. ३५
स्वसुख--निरभिलाषा ती, परोपकारीं सदा निमग्न असे;
दुःखितदुःखनिवारण हेंच तिला मुख्य सौख्य वाटतसे. ३६
दक्ष सदाही गुरुजनपदसेवनिं, कधिं न वीट ती मानी;
ब्राह्मण--सुवासिनींतें धनदानें सर्वकाल सन्मानी. ३७
विश्वासराय यापरि पत्नीसह सुचिरकाल राज्य करी;
इंद्रशचीसह जैसा त्याची अन्या नृपा नसेच सरी. ३८
होण्या कुलप्रतिष्ठा अपत्य कांहीं नसे परि तयास;
ह्मणुनी रात्रंदिन तो झुरे सतीसह मनांत विश्वास. ३९
पूजिति गोविप्रांतें सुतवांच्छा धरुनि मानसीं सतत,
करिती व्रतोपवासां द्विजचरणीं होउनी परम विनत. ४०
न परि अपत्यदानें ईश्वर त्यावरि करी कृपेला हो,

यास्तव खिन्न सदाही असती तीं; नच तयांस सुख--लाहो. ४१
अस्तंगत पूर्णपणें होई आनंदसूर्य सत्य तयां,
दुर्धर नैराश्यतम व्यापी संपूर्ण या जगद्वलया. ४२
एके दिवशीं सायंकालीं बसली सती विषण्णमुखी,
तत्खेदहेतु जाणुनि राव जहाला मनीं बहुत दुःखी. ४३
बोले " सुहास्यवदने ! खेद असा हा नसे तुला उचित,
झालें दैव पराङ्मुख, आह्मांवरि ईश कोपला खचित. ४४
ह्मणुनि न आह्मांकडुनी तो घडवी पुत्रमुखसुधापान,
लिहिलें विधिनें भाळीं, कीं भोगा सतत दुःख--संतान. ४५
झाले कपोल पांडुर, निष्प्रभ वदनेंदु जाहला फार,
जाळितसे अन्तर तव अग्निपरी गुप्त शोक अनिवार ! ४६
शोक--दिवाकर--दुर्धर--करपीडित तनुलता तुझी विकला,
क्षीण प्रतिदिनिं होई निदाघसरितेसमान ही सकला ! ४७
शिणले कमलनयन तव सखि ! अविरत बाष्पसलिलसेकानें,
कोमल तव बिंबाधर झाले गे ! कृष्णवर्ण शोकानें ! ४८
शोकानुबंध सोडीं, कां करिशी व्यर्थ अश्रुपात सती ?
काय करावें येथें, गे ! दैवाधीन गोष्टि या असती. ४९
आचरिलें सखि ! आपण सुकृत खचित पूर्वजन्मिं नच कांहीं,
ह्मणुनी दुःखावस्था भोगितसों ही अशी सदा पाहीं. ५०
लिहिलें दैवें सदसत् मनुज्याच्या एकवार जें भाळीं,
केले प्रयत्न तरि तें शुभशीले ! नच टळे कदा काळीं. ५१
प्रबल सुरासुरगणही सर्वंकषनियतिचा असे दास,
सोडुनि राज्यसुखातें भोगी रघुकुलललाम वनवास. ५२
यापरि दैवदशा ही आहे सखये ! जरी महा प्रबल,
तरि मानवें करावे यत्न सदा शक्य तेवढे सकल. ५३

हें तत्व धरुनि हृदयीं धर्मात्मा करितसे सदाचरणा,
पूजुनि अनन्यभावें द्विज, त्यांच्या सेवि तो सदा चरणां. २९
विश्वासराय विश्वासास्पद तो होय सकल लोकांतें;
तातासमान सादर त्यातें सन्मानितील नच कां ते? ३०
गुणकुलसौंदर्ययुता असे खरी तदनुरूप तद्भार्या;
नामें सीताबाई, सीतेसम जी असे विमल आर्या. ३१
मानून देवतेसम पतितें सेवी सदा सती भावें;
लाजावें श्रीनें तिस, तद्वर्णनिं चित्त कां न लोभावें? ३२
श्रान्तपतिस शान्त करी बोलुनि मधुरा सुधसमा वाणी,
तत्कोप न मनिं आणी, पतिचरणीं सतत लीन गुणखाणी. ३३
वाखाणी विश्व तिला तिजसम दुसरी पतिव्रता न कुणी;
निर्मल जीची करणी, शोभे स्त्रीवर्गिं नम्रतादिगुणीं. ३४
अप्रिय जें निजपतितें साध्वी तें आचरी नच कदा ही,
भर्त्यातें जें जें प्रिय तदन्य तिजला नसे सुखद कांहीं. ३५
स्वसुख--निरभिलाषा ती, परोपकारीं सदा निमग्न असे;
दुःखितदुःखनिवारण हेंच तिला मुख्य सौख्य वाटतसे. ३६
दक्ष सदाही गुरुजनपदसेवनिं, कधिं न वीट ती मानी;
ब्राह्मण--सुवासिनींतें धनदानें सर्वकाल सन्मानी. ३७
विश्वासराय यापरि पत्नीसह सुचिरकाल राज्य करी;
इंद्रशचीसह जैसा त्याची अन्या नृपा नसेच सरी. ३८
होण्या कुलप्रतिष्ठा अपत्य कांहीं नसे परि तयास;
ह्मणुनी रात्रंदिन तो झुरे सतीसह मनांत विश्वास. ३९
पूजिति गोविप्रांतें सुतवांच्छा धरुनि मानसीं सतत,
करिती व्रतोपवासां द्विजचरणीं होउनी परम विनत. ४०
न परी अपत्यदानें ईश्वर त्यावरि करी कृपेला हो,

यास्तव खिन्न सदाही असती तीं; नच तयांस सुख--लाहो. ४१
अस्तंगत पूर्णपणें होई आनंदसूर्य सत्य तयां,
दुर्धर नैराश्यतम व्यापी संपूर्ण या जगद्वलया. ४२
एके दिवशीं सायंकालीं बसली सती विषण्णमुखी,
तत्खेदहेतु जाणुनि राव जहाला मनीं बहुत दुःखी. ४३
बोले "सुहास्यवदने ! खेद असा हा नसे तुला उचित,
झालें दैव पराङ्मुख, आह्मांवरि ईश कोपला खचित. ४४
ह्मणुनि न आह्मांकडुनी तो घडवी पुत्रमुखसुधापान,
लिहिलें विधिनें भाळीं, कीं भोगा सतत दुःख--संतान. ४५
झाले कपोल पांडुर, निष्प्रभ वदनेंदु जाहला फार,
जाळितसे अन्तर तव अग्निपरी गुप्त शोक अनिवार ! ४६
शोक--दिवाकर--दुर्धर--करपीडित तनुलता तुझी विकला,
क्षीण प्रतिदिनिं होई निदाघसरितेसमान ही सकला ! ४७
शिणले कमलनयन तव सखि ! अविरत बाष्पसलिलसेकानें,
कोमल तव बिंबाधर झाले गे ! कृष्णवर्ण शोकानें ! ४८
शोकानुबंध सोडीं, कां करिशी व्यर्थ अश्रुपात सती ?
काय करावें येथें, गे ! दैवाधीन गोष्टि या असती. ४९
आचरिलें सखि ! आपण सुकृत खचित पूर्वजन्मिं नच कांहीं,
ह्मणुनी दुःखावस्था भोगितसों ही अशी सदा पाहीं. ५०
लिहिलें दैवें सदसत् मनुज्याच्या एकवार जें भाळीं,
केले प्रयत्न तरि तें शुभशीले ! नच टळे कदा काळीं. ५१
प्रबल सुरासुरगणही सर्वंकषनियतिचा असे दास,
सोडुनि राज्यसुखातें भोगी रघुकुलललाम वनवास. ५२
यापरि दैवदशा ही आहे सखये ! जरी महा प्रबल,
तरि मानवें करावे यत्न सदा शक्य तेवढे सकल. ५३

विश्वास देवतांवरि ठेवुनि निरपेक्ष सेविं तूं त्यांस,
होतां प्रसाद त्यांचा दुर्लभ जगिं काय सांग मनुजास ! ५४
धनदानें शुद्धमनें सेवावे विप्रवर्य हे भावें,
भूभागीं विचरति हे सुर निःसंशय सखे ! मनिं गणावें. ५५
विप्र--प्रसाद--महती वर्णूं मी केंवि एक वदनानें,
तारिति मारिति दुर्लभ वांच्छित ते पुरविती निज बलानें. ५६
शृंगर्षि--वरें वृद्धहि दशरथ भूपाल पावला चार--
गुणनिधिसुत, तद्वंशीं येई क्षीराब्धिवास साचार. ५७
घेऊन पुत्र अंकीं स्नेहें बसशील सुंदरी ! केव्हां,
क्रीडासक्त तयातें पाहुनि होईन धन्य मी केव्हां. ५८
पाहुनि मुग्ध मुखातें ऐकुनिया बोबडे वच रसाळ,
केव्हां सुखनिर्भर मी त्यासह नेईन सर्वही काल ? ५९
ऐशी विचारमाला करिते कल्लोळ हृदयिं बहुसाल,
निद्रा नच येई मज, होई रजनी युगासम विशाल. ६०
अनपत्यता--समुद्भव तुजपरि जाळी मलाहि हा शोक,
जीवित निष्फळ वाटे, गमतें मज शून्य हें जग विलोक. ६१
परि काय करावें गे ! याला कांहीं उपाय नच रमणी !
दैवीं असेल जें जें भोगावें सर्व तें निमूटपणीं. ६२
ठेवुनि देवावरती धर्मावरती तसाच विश्वास,
धैर्यें वर्तत जावें, पुरविल हरि खचित आपुली आस. ६३
शोकावेगा टाकुनि यास्तव मनिं चारुगात्रि ! धीर धरीं,
सकल मनोरथ अपुले निःसंशय करिल पूर्ण सदय हरी." ६४
झाला यापरि वदुनी निजदयिता--सांत्वनास तो करितां;
वसनांचलें स्वयें तो सुकवी तल्लोचनाश्रुजलसरिता. ६५
त्या दिवसापासुनि ती साध्वी सोडून शोक अववाही,

सं.भा.२५०१९८



उत्साह धरुनि हृदयीं, देवद्विजसेवनीं निरत राही. ६६
देवावरि भाव विमल निजपति--वचनानुवर्तिनी ठेवी,
कोमल तनुलतिकेतें विगणुनि नानाविध व्रतें सेवी. ६७
धनदानें पूजितस विप्रातें देवरूप गणुनि मनीं,
नेई शुचिष्मती ती सती सकल काल सत्कथा--श्रवणीं. ६८
यापरि अनन्य भावें सेवा करितांचि देवविप्रांची,
भक्ति तिची पाहुनि हरि अनुकंपा तिजवरी करी साची. ६९
जातां कांहीं दिन ती धारण करि गर्भलक्षण स्पष्ट,
सहपरिवार नृपाचें बघुनी तें होय दुःखतम नष्ट. ७०
पांडुरता अंगावरि पसरुनि मुख दिसत धूसरेंदुपरी,
मृगलोललोचना ती जड--दृष्टि--प्रसर बहुत होय खरी. ७१
वाढे गर्भ जसजसा वाढे आनंदही तसा त्याचा;
पत्नीदेह दिसतसे सतेज, त्यापरि मुखेंदु रायाचा. ७२
ऐसे क्रमाक्रमानें जातां दिन लागला नवम मास;
पाहीन पुत्र केव्हां रायातें हाच सर्वदा ध्यास. ७३
शुक्लाष्टमी तिथि बरी निरसुनिया सकलही तमःप्रकर,
विलसे नभोंगणिं विधू, झालासे एक यामिनी--प्रहर. ७४
रमणीय सुतारत्ना ती साध्वी प्रसवली तया समया,
ऐकून ती सुवार्ता कवळी आनंद सकलजनहृदया. ७५
राव स्तिमितनयन तो, अवलोकी रुचिर कन्यकावदना,
मोद मनांत न माये टाकी व्यापून सर्वही गगना. ७६
पुत्रेच्छा वसत मनीं, तरिही पाहून कन्यकामुख तें,--
आनंद फार वाटे; पुत्राहुनि दे तया सुता सुख ते. ७७
कन्यारत्न सुभग तें दिधलें विश्वंभरें करून दया,
म्हणुनी कृतज्ञ चित्तें नृप स्तवी विश्वपालका सदया. ७८

[library stamps]

श्लोक.

जयास अनपत्यता--प्रभव शोक जाळी सदा,
मनीं विकल फार जो अनुभवी दशा दुःखदा;
गमे विजन काननापरि मही अशेषा जयां,
नितान्त सुख पावती जन अपत्य होतां तयां. ७९
परोपरि महोत्सवां करिति सर्व आनंदुनी,
पुरी सजविती स्वयें धन अपार तें वेंचुनी;
पथीं सदनिं शोभती परम रम्य दीपावली,
गमे सकळिकांस ती खचित अन्य दीपावली. ८०

———— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## श्येनाचा अधःपात.

श्लोक.

ऐका बुधांनो ! कथितों तुह्मांप्रत-- । मी आपुलें चित्र चरित्र सांप्रत;
वाटेल कष्टप्रद मानसा जरी, । सारांशरीती बहुमान साजरी. १
जें रान भव्याद्भुत सृष्टिदेवते-- । नानाविधैश्वर्यभरांत सेवतें;
जेथें दिसे बिंबित सर्वतोपरी-- । भयाण मायाळुहि रूप ईश्वरी. २
कोठें लता प्रेमळ पादपावरी, । तोही तिला प्रेमभरांत सांवरी;
असे असेल प्रणयाढ्य दंपती-- । भवव्यथा कां प्रखरा न संपती ? ३
कोठें तरूला करि वेंघ ती लता-- । वृक्षादिनी जीप्रति नाम तत्वतां;
वारांगनेच्या सम रीति घे खरी, । चोखोनिया सत्व तरूस पोखरी. ४
कोठें फुलांचा शुभरम्य सौरभ-- । सुटे, असे जो बहुधा सुदुर्लभ.
कोठें परी आत्मदरी करी हरी, । मेदोस्थिमांसोद्भवपूति जी वरी. ५
कोठें घुमे हें खगगान साजिरें, । जयांत वृत्ती सह मानसा जिरे.

सं.भा ५५/१८



तें नादवोनी सुर--निर्मलाजिरें-- । करीत गंधर्वगणास लाजिरें. ६
एक्या स्थळीं हा खळ आंधळा, खुळा, । न पाहतो जो निधडा कडा सुळा,
उन्मादवृत्ती जलपात आफळी; । साची नभाची जणुं भेदितो फळी. ७
दुज्या स्थळीं सुंदर मंजुळ--स्वर-- । हा संचरे शीतल मंद निर्झर;
वज्रोपलांनीं घडिलें यदंतर-- । फुटे जणों त्या अचळास पाझर ! ८
एकीकडे ही सरिता मदोत्करीं-- । झोंकी नभीं वारितुषार नाचरी;
देवेश्वराही भ्रमवोनि ती जणूं-- । त्याचें हरी चित्रविचित्र हें धनू. ९
एकीकडे हा तरुला तरू भिडे, । आलिंगिती स्नेहरसार्द्र सौंगडे;
पहा, करायास तयांस वेगळे, । चंडांशुचाही मद यासवें गळे. १०
येथें अहा ! शैल महाप्रताप हा-- । उत्तुंग शृंगास उभारिता पहा,--
वाटे जणू या गगनद्विपां कुशीं-- । हाणीतसे घाय विशाळ अंकुशीं. ११
तेथें परी कालपुरीसखी दरी-- । दिसे, घुसे खोलचि खोल भूदरीं,
या ग्रावदंष्ट्रा विवराद्भुताननीं-- । घेरीत घेरी निरखोनिया मनीं. १२
येथें मृगांना बघ सौम्यमुद्र या, । जे धांवती दाखवुनी मरुद्दया;
मारी उडी हा झुडुपांतुनी ससा, । पळे बळें; भ्याड वळे न साहसा ! १३
तेथें सदा सात्विक सत्वभक्षक-- । मृगेंद्र, शार्दूल, तरक्ष, ऋक्षक,--
संचारती हीं दिनरात सावजें; । येथें न येतात नरांत साव जे. १४
येथें हरीच्या दणग्यांत गावली, । ही हंबरे विव्हळ दीन गावली;
गजेंद्रशद्धा करुणार्त धांवली, । ती मूर्ति कां आजि करी न सावली ? १५
सलील जेथें गुलजार पाडसें-- । हीं खेळती, आपदही न ज्या डसे;
प्रेमोत्सवें वृत्ति यदीय दाटती, । त्या ह्या मृगी वत्सतनूंस चाटती. १६
एवं प्रकारें घनघोर जंगलीं, । जयांत सृष्टिप्रियवृत्ति रंगली--
स्वगोत्रजांच्या हृदया विदारक-- । मी जन्मलों श्येनकुळांत दारक ! १७
पुराण--मेघप्रिय--वृक्षशेखरीं-- । जें मत्सरा कारण बंधुपाखरीं--
रचून साचें घरटें तयावरी-- । मत्तात जाणों सुरमित्रता वरी. १८

आकाशरूपी छत नील चारु तें, । त्या ढाळिलें सद्व्यजनास मारुतें,
रात्रीं लसत्तारकपुंज झुंबरें-- । चंद्रासवें देति सुधासवा बरें. १९
सुस्वाद ताजें फलखंड साधुनी, । प्रेमामृतीं वाहवुनी महाधुनी,
खंडूनि शौर्यें अरिच्या असन्मदा, । करीत मद्रक्षण भद्र जन्मदा. २०
जपे प्रयत्नीं जनिता अपारची, । महामहा मन्मनिं तत्कृपा रची;
त्रासें न, दुःखें न, कधींहि नासले; । म्यां चाखले प्रेमविनोदमासले. २१
फुटोनिया पंख चिमूकले क्रमें, । सोत्साह मी जैं भंवता भ्रमें, रमें;
करी तदा कौतुक काय माय ते ! । न सौख्य तीचें गगनांत माय तें. २२
" काळक्रमें बाळ बलाढ्य वाढता, । प्रदर्शवीता धृतिशौर्यगाढता;
होईल जैं सर्वससाणझोरका, । टिकेल तैं अंतकही समोर का ? २३
एतत्प्रकारें पुढल्या उड्या किती-- । प्रेमाभिमानें जननीस मोहिती !
तुफान भावी परि सर्व वेगळें, । आशाद्रुमारण्य जयापुढें गळे ! २४
एके दिनीं रव्युदयास पारधी-- । कोदंडपाणी, दृढवज्रसारधी--
वनामधें त्या घुसला ससंभ्रम; । खगां मृगां तो गमला दुजा यम. २५
होऊनिया मानस घाबरें बरें, । त्वरें दिगंतीं पळतात सांबरें;
अंभोधर श्याम, न कृष्णसार तो, । ज्या बाणवायू रभसार्त सारतो. २६
वृक्षीं खगांचीं बवुनी तया कुळें, । झालीं मनीं भांबवुनी भयाकुळें;
घारी, ससाणे, बक, हंस, पारवे, । नभीं उडोनी रटती महारवें. २७
भयार्त नष्टप्रतिभा लहान मी-- । झालों पहा या विषमीं श्रमी भ्रमी;
कंपायमाना तनुला कसा तरी-- । मी मायपंखीं मग आसरा करीं. २८
किंचित् पुढें होउनिया समाहित, । व्हाया विपद्धेतु मनास माहित--
डोकावुनी तेथुनि भीत भीत मी-- । पाहें, जसा संसृतिसंभ्रमा शमी. २९
टंकार कानीं, शर जन्मदे कुशीं, । माझ्यासवें ती तरुच्या तळीं कुशीं,
मच्चित्तवृत्तीहि तमोधबंधनीं, । पडे अकस्मात् समकाल ते क्षणीं ! ३०
निवूनिया कश्मळसिंधुच्याकडे-- । मी चक्षु जेव्हां फिरवीं चहूंकडे--

सभानही भ्रांतिस पात्र जाहलों, । आश्चर्यभीतिज्वलनांत काहलों. ३१
दिसे न कोठें मजला अरण्य ! । न माय माझी विषमीं शरण्य !
न तें सरिद्ध्वान, न वन्य वायु ते-- । श्रांतास यत्संगति दे नवायुतें. ३२
कोठें असे नीडतरू जुनाट तो ? । कां बांधवांचा न समूह थाटतो ?
माता पिता कां त्यजिती अशीं मला ? । कां प्रेमरीती स्मरती न निर्मला ? ३३
नसे नदी शीतल रम्य वांकडी, । आला जलद्रोण कुठोन लांकडी ?
नसे नभाचें छत चित्र नील कीं, । परी फळ्या या धृत लोहकीलकीं ! ३४
दिसे न झाडी मति जींत रातते, । घाली सभोतीं गरडा गरात ते !
खालीं नसे कां गवताळ मेदिनी ? । ही कुट्टिमाभा परि चित्तभेदिनी ! ३५
अनेक शंका हृदयास या अशा-- । त्या वेंघल्या, व्याधि तनुप्रती जशा;
शक्ती नसे हालविण्या पदा मला, । तशांत कारागृहवास लाभला ! ३६
स्वातंत्र्य देई मज पूर्ण अंतर, । वाटे जहालें मम चूर्ण अंतर !
विखार तीक्ष्णाशुग शोकसायक-- । झोंबे मनाला पविदण्डनायक ! ३७
हा ! हा ! परी ही चिर धी न राहिली-- । जी माखली मत्तनु या हलाहलीं;
निर्जीव ती हाय ! तदा न जाहली, । हळू हळू ओसरलीच काहली ! ३८
कालें रुचे या हृदयास दासता, । जी मृत्युतुल्या गमते सदा सतां;
स्वमातृहन्ता गणिला सखापरी, । कंठीं धरी रत्न ह्मणून खापरी ! ३९
जो सर्वदा मूढ अफूस खातसे, । गणी तिला तो स्वरिपू सखातसें;
ह्मणे सुरामत्त सुवास वातरी; । कारा जरी ते सुखवास वा तरी. ४०
जारींच सौख्यें असतीस वाटती. । माझ्या रुचे हीनमतीस वाट ती !
निसर्गलक्ष्मीप्रति चित्त आंचवे, । भिकेस ओशाळगतीस लांचवे ! ४१
दास्यत्व जेव्हां हृदयास मानवे, । विचार झाले बदलोनिया नवे !
स्वमान गेला विघरून सर्वथा, । सहर्ष साहें अपमानपर्वता ! ४२
जें मांस देई मज जन्मदान्तक, । तें खादिलें म्यां रुचिनें निरान्तक !
सांभाळिला म्यां पळदानकाळ तो, । श्ववृत्तिला यापरि नीच भाळतो ! ४३

द्रोणांबुही गोड सुधासवासरें, । मी तुच्छ लेखीं सुरधेनु वासरें !
ह्मणें " तुझा गर्वच वासवा सरे-- । मत्सौख्यलाभार्थ मुखास वास रे ! " ४४
न मातृमृत्यू हृदयांत आणला, । स्वामी--कृपेचा उपकार जाणला,
आज्ञा तयाची धरुनी शिरावरी, । झालों मऊ मी जणुं पाद सांवरी ! ४५
नाकांत घाली मम जी धनी नथ, । ती भूषणाचा नव भासला पथ !
बांधी पदीं थोर मदीय दोर कीं, । तो नाळ लेखी मन पादकोरकीं ! ४६
देतां पुढें स्वामिकिरात शिक्षण, । थरारत्री अंग तदीय वीक्षण;
न नाच केला नुसता परोपरी, । मी टांच ती दे निजमस्तकोपरी ! ४७
मनीचतेची मग हो परावधी, । स्वगोत्रजांच्या सजलों खरा वधीं !
कुठारदंडोपम गोतघातकी-- । होवोनि गेलों रत मी अघांत कीं ! ४८
व्याधासवें जाउनिया वनामधीं, । श्येनालिला वंचुनि मी सदा वधीं;
लावोनि अग्नी स्वकुलास मी खल । दुष्पूर पाहें भरुं जाठरोखल !! ४९
परोपरी मीं स्वजनांस वंचिलें, । एवं प्रकारें अघराशि संचिले,
त्याचेंच आजी फल हें मला भलें, । गोत्राकरीं मृत्युमिषेंच लाभलें. ! ५०
पाहूनि माझें खल कृत्य बांधवीं, । जें मृत्युपाशीं स्वजनास बांधवी--
टपूनि, घाला सहसा करूनिया-- । मुक्त्यर्थ ते पाठविती यमालया. ५१
जरी बुधांनो ! कुपथीं न रंगलो, । न स्वाभिमानाभिधदुर्ग भंगला,
गोत्रावरी घाव न घातिला जरी, । न नीच बुद्धी रुचली निलाजरी. ५२
मृत्यू जरी तो गणिलात चांगला, । न दास्य--पाशीं परि जीव टांगला;
माझा जरी हें घडवील दाखला, । ससाण हा व्यर्थ अघें न माखला. ५३

——— बाळकृष्ण अनंत भिडे. बी. ए.

## प्रतिभाराधन

गाणें.

स्फूर्तिदेवि ! ह्मणि धांव, गडे ! । तुजविण पळहि न चैन पडे ॥ ध्रु. ॥

श्री वसते जलकमलांत । तूंहि सुकविहृत्कमलांत.
चंचलता तव तिच्यापरी । सुजनहृदय बहु खिन्न करी.
सौदामिनिपरि दावुन भा । पळांत पळसी त्यजुनि नभा.
पळ परिचय परि आणि रडें । तुजविण पळहि न चैन पडे. १

श्री विष्णूचा अंश जशी । भुवनमोहिनी तूंहि तशी.
दर्शनमात्रें मोहुनिया । विरहिं लोटिशी जन वायां.
येउनि जीवित सफल करीं । किंवा दे तरि कालकरीं.
कुठें सये ! तव दया अडे । तुजविण पळहि न चैन पडे. २

तव संगें मज घनतमिंही । प्रकाशमय ही निखिल मही.
विरहिं तुझ्या मज गृहहि निकें । रविहि न किरणीं दावुं शके.
प्रवाह, वल्लरि, पवन कळे, । यांची भाषा आजि न कळे.
निशिदिनिं चित्तीं भ्रांति जडे । तुजविण पळहि न चैन पडे ३

वास येइना कुसुमांचा । घेउनि गेलिस तूं साचा.
तरिच सुगंध तुझ्यापाशीं । गुंतवि जो रसिका पाशीं.
सकलेंद्रियवृत्ती हरुनी । करिशि तयांचा पट विणुनी.
तोचि ध्वज तव शिरिं फडफडे । तुजविण पळहि न चैन पडे. ४

उपवनिं तरुंचीं चल पानें । बोलाविति या भ्रांतीनें
गेलों. शोध तिथें केला । शोक मनाचा नच गेला.
खगकुलकलरव तव वार्ता । कथि, गमलें, शोकद वार्ता,
परि न कळे किमपी तिकडे । तुजविण पळहि न चैन पडे. ५

जललहरिसवें खेळसि तूं । दिससी तेथहि न परंतू.
लतापल्लवीं वायुसवें । नाचसि मोदें मज ठावें.
भास तुझा सर्वत्र दिसे । वास कळे नच कोठ असे.
लीलांनीं तव मोह पडे । तुजविण पळहि न चैन पडे. ६

हळु हळु येउनिया मागें । नयन धरिसि मम अनुरागें.
परि न करीं मम सांपडसी । नर्म करुनि मज कां छळिसी ?
अंत नको बघुं धांवत ये । आलिंगन दे दृढ सखये !
कळिकाळा मग चारुं खडे । तुजविण पळहि न चैन पडे. ७

तुजविण माझे शद्ब फिके । विरस विचेतन मृताचि निके.
स्पर्श तुझा त्यां सुधेपरी । सरस सचेतन जितें करी.
त्रिभुवन गुंगचि करितिल ते । तव विभवें कविकल्पलते !
सांग कधीं तव संग घडे । तुजविण पळहि न चैन पडे. ८

कल्पवल्लिचा रस पिळुनी । झरझर गरगर घुसळूनी
दरदर फेंस झणी काढूं । रसिकजनापुढतीं वाढूं.
फणफण दर्प भरुनि नाकीं । धुंदचि होतिल सुर नाकीं.
प्रेमरसाचे उडवुं सडे । तुजविण पळहि न चैन पडे. ९

झोंकुनि पेल्यावर पेले । खोंवुनि सुमनांचे झेले
प्रावृड्धारांतें धरुनी । चढुनि जाउं सरसर गगनीं.
स्वार घनावर होउनिया । जाउं भुवन अवलोकाया.
तव संगें बिनपंख उडे । तुजविण पळहि न चैन पडे. १०

ऐहिक दुःखें पेटवुनी । प्रीति रसातें आटवुनी
आनंदार्णामधिं मिसळूं । भक्तिसुधेसह सर्व गिळूं.
चंद्रधवलता चित्तिं भरूं । परमेशाचें चरण धरूं.
भवचिंतेचें जाळुं मढें । तुजविण पळहि न चैन पडे. ११

विहंगम

---

## संक्रमणाचें तीळ.

कवीनें आपल्या एका प्रिय भागिनीला तीळगुळ ह्मणून संक्रांतीच्या

दिवशीं रा. खंडो कृष्ण कृष्ण गर्देकृत ' गीतामृत शतपदीं ' पाठविली. तिजवर पुढील कविता त्यानें हेमाक्षरांनीं मुद्रित केली आहे.

चाल—नीरक्षीरालिंगन.

मंगलदिन हा आज उदेला
    दिनमणि येई मकरेला,
द्वैत विसरुनी सुहृद रिझविती
    मधुरवचें अजी सुहृदांला !
भगिनी माझी प्रेमाची तू
    स्नेह अकृत्रिम तव जडला,
पवित्रतम तव सानिध्यानें
    पदोपदीं जो वाढविला !
--नव्हे रविपरी उज्ज्वलता ये
    पावित्र्यानें गे ज्याला,
नत बंधूच्या तुझ्या ह्मणुनि या
    राशीला तो बघ आला ! १
स्मरणीय तया कसें करावें
    विचार होता हा पडला,
परी पूर्वजें रूढिद्वारें
    सर्वोत्तम पथ सुचवीला !
भक्तियुक्त जीं भगवद्वचनें,
    घेउनि त्या सस्नेह तिला,
पुराण मुनिन प्रसाद—हस्तें
    ' हलवा ' त्यांचा बनवीला !
कृष्णसुतानें गीतकेशरा
    लावुनि सुगंध ज्या अणिला,

राजहंस ' कवि ' हेम करंडकीं
घालुनि अर्पी ते तुजला ! २
ग्रहण करितां शततिल हे तूं
अक्षयिची चवि वदनाला
येउनि, होशिल चिरायु बाई,
भोगिशील चिर विभवाला !
मनस्तुष्टि आणि मोक्षपुष्टि हे
देतिल इहपर बघ तुजला,
प्रेमा तुजवरि ह्मणुनि आजचा
मुहूर्त यांहीं साधियला !
कृष्णव्यासापरी विभूती
श्रमल्या करितांना ज्यांला,
कुणी धजावें वद भगिनी तूं
मोल तयाचें करण्याला ! ३
असो. देखुनी पराग मधुकर,
बघुनी चकोर चंद्रकला,
अधीरपणें परि मृदुल मनानें
सेविलि तद्गत अमृताला;
तीच पद्धती आदरुनीया
सेवि एकदां तूं याला
क्षुधा तृषेच्या आणुं नको मग
मानसिं कदापि शंकेला !
एकदांच हे दिला तुला मीं
नको पुनरपि द्यायाला,
आला कितीक वेळां भास्कर

फिरुनी जरि या राशीला ! ४

——————— राजहंस उर्फ एंजिनियर वावीकर.

## जोहार.

लढाईला जाण्यापूर्वी, पाठीमागें पाश न राहिला, तर युद्धास विशेष स्फुरण चढेल किंवा दुर्दैवानें प्राणांत झाला, तर बायकामुलांची शत्रूंच्या हातीं पडून विटंबना होईल ह्मणून रजपूत त्यांचा प्रथम निकाल करून नंतर युद्धाला जात. तशा एका प्रसंगाचें हें शब्दचित्र आहे. जोहार ह्मणजे शेवटचा निरोप.

पद.

चाल– " प्रिये पहा रात्रींचा "

विलासिनी रमणीसह सुमनाच्या शय्येवर पहुडला. ॥ धृ ॥

हृदयाशीं हृदय मिळे
अधराशीं अधर जुळे
करपाशीं कंठ दिले– भिन्नभाव लोपला. १
स्वप्नसुखीं चित्त दंग
स्वैर करी रंग रंग
सर्व परी होय भंग– दुंदुभिरव ऐकिला. २
निद्रानिमिषीं उतरे
जागृति देहांत शिरे
ललनेपासून त्वरें– दूर वीर जाहला. ३
घेउनि तलवार वळी
गेला शेजेजवळी
प्रेमाची ती पुतळी– भंगाया सजला. ४

बघतां ती मूर्तिपरी
धडकी भरली तदुरीं
धैर्य गळे; कंपभरीं-- खड्ग पडे भूतला. ५
एक चित्त जाय रणीं
एक न सोडी रमणी
एका प्रिय कीर्ति जनीं-- एका स्त्री प्रेमला. ६
एकच घेईन मुका
केला निर्धार निका
दश--शत घेऊन मुका-- तो मुकाच राहिला. ७
आंवरून मोह धरी
घेई खड्गास करीं
जागृत ललनेस करी-- भाव तिला समजला. ८
धैर्यदेवता नवरी
उठे, मनीं भय न धरी
पतिपुढें मान करी--सिद्ध उभी मृत्युला. ९
खड्गाचा हात फिरे
पडला मृदुदेह धरे
पतिवधित स्त्रीरुधिरें-- भूमिभाग रंगला. १०
सौख्यशांति समाधान
विषयविलासस्थान
होय तें क्षणीं स्मशान-- अंधकार पसरला. ११
प्रेमाच्या हेतुविणें
शून्य दिशा--शून्य मनें
भारभूत होय जिणें-- मृत्यु प्रिय एकला. १२

मरणाला जो तयार
तोच अरी करिल ठार
रणदेवी विजयहार— घाली त्याच्या गळां. १३
यास्तव रजपूतकुळीं
देती क्षीतनय बळी
धन्य तेच भूमितलीं-- पाश जयीं तोडिला. १४

विनायक.

## कविरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले.

### श्लोक.

कृष्णा तृष्णा पुनरपि करी जीव हा घाबरा रे !
ह्या लोकींचे अमृतनिधि हे आटले आज सारे.
लाही झाली ! तळमळ करीं दूर ये ऐक अर्जा
सोडीं पाहूं पुनरपि गड्या ! गोड तूझा " झपूर्झा " १
झालीं आतां हळु हळु तया पूर्ण तेवीस वर्षें,
जेव्हां तूं मी बसुन कविता गायिल्या रम्य हर्षें.
भासे आतां परि जणुं सख्या ! काल ती मौज केली ! !
जेणें झाली फिरुनि मति ही आज भारी भुकेली. २
ये ये कृष्णा ! चढव अपुला सूर जो भौतिकाला,
विंधी जाई वरति वरतीं भेदुनी अंतराला.
टाकीं मागें मज बघुं सख्या गाउं ये एकवार,
नाहीं माझी तुजविण कुणी हौस ही फेडणार. ३
जें जें कांहीं दिसत मजला भूतलीं व्योममार्गी,
तें तें सारें दिसत मजला आज मित्रा अभागी;

भाषा ह्याची विशद करुनी कोण आतां कथील.
आतां ह्याला तुजविण कवी कोणता गौरवील. ४
कृष्णा भिक्षा इतुकि तरि तूं घाल आह्मास आतां,
ह्या हृत्कोशीं वसुन अपुलें गान हो नित्य गाता.
आली आतां कळुन पुरती ती तुझी वृत्ति सारी,
मारूं देतो कवण तुजला येथुनीया भरारी ! ५

टिळक.

## कोकिलान्योक्ति.

### श्लोक.

अये सुभग कोकिले रुचिरकुञ्जवासप्रिये,
सखे सुरभिदूतिके सुचरिते मनोज्ञ सये;
करी भवन रम्य तें तवहि विश्वकर्मा स्वयें,
मनुष्यकृतिला अहा कधिं सरी तयाची न ये. १
सुरम्यवचनामृतें उपवनें तुला बोधिती
करीति अभिनंदना सुखित होति चित्तीं अती
रसालकुसुमप्रिया मधुरगानलीलावती
समस्त विहगांमधें प्रमुखची तुला मानिती. २
निवास करण्या सदा क्षितिं वसंत ये सुंदर
करें बहुनतां लता हरित नेसवी अंबर
तशीं कुसुमभूषणें रुचिर लेववोनी बळें
करी मग तयासवें ललित खेळ ते आगळे. ३
सुरम्य दंवबिन्दु ते बहु लतासुगात्रांवरी
विलाससुरतश्रमें गमति घर्मबिन्दूपरी

सुगंधिसुखदानिला रुचिर वीजना वारुनी
वसंत रमवी प्रिया विविध केलि त्यां दावुनी. ४

सुमावरुनि हिंडती मधुप गुंग चित्तीं अती
पिऊनि कुसुमासवा मदभरें बहू डोलती
नवीन बघुनी बळें सुम पुनः पुनश्चुंबिती
विलोकुनि ससाध्वसा मनिं, लता बहू कांपती. ५

सुरम्य समयीं अशा विहरण्यासि येशी गडे
कुहूकुहुकुहूकुहू रव ललाम कानीं पडे
तया परिसुनी हृदीं सुखद वृत्ति त्या दाटती
थरारत शरीर हें नयनही मुदें मीटती. ६

वदे कवण गे तुला रुचिर मार्ग तो दाखवी
'अजीं शिशिर संपला,' कवण हें तुला सूचवी
नभीं ध्रुव किं होतसे रुचिर मार्गदर्शी तव
वसंत अथवा तुला कळवि– 'काळ आला नव' ? ७

प्रशांत हृदयें असे पहुडलों लतामंडपीं
लतावरण रम्य हें हरित कृष्ण शय्या निकी
अशा समयिं येतसे मधुर राग धीर ध्वनि
क्षणीं जवळ वाटतो, उठत कीं नभीं तो क्षणीं. ८

गमे मजसि सत्य तूं वदत सृष्टिशीं गूढ गे,
कळे न मनुजा अह्मां मुळिंच त्यांतलें सार गे.
त्रिवार करितों नती, खग न तूं असें वाटतें,
नभध्वनिच, गूढ वा अससि सृष्टिचें रम्य तें. ९

अये ! रव तुझा मला स्मरण शैशवाचें करी,
यदा बहुत ऐकिलें बसुनि त्यासि चित्रापरी.

निनाद जयिं कर्णि ये मन सुखा बहू पावलें
नभीं तरुलतान्तरीं बहुतची तुला धुंडिलें. १०

सदैव सखये तुझें हरित गेह राहातसें
कधीं न तव अंबरीं जलद ही मुळीं येतसे
तुझ्या कुणि न ऐकिला कधिं हि गानिं दुःखस्वर
बिनाशिशिर तें असें तवाचि कोकिले वत्सर. ११

सशक्त मजला करीं तव सवें उडाया जरा,
क्रमूं भुवनसुंदरे, सुपथ अंबरीं तो खरा.
पिऊं मधुरशा जला, रुचिर गे करूं गायन;
परस्पर सुसंगतीं मुदित घालवूं ते दिन. १२

———— गोविंद पांडुरंग देवधर, बी. ए.

## सुभाषित.

### श्लोक.

बा रे ! हंस सुशुभ्र रम्य रचिले जेणें करोनी दया,
कीरांना बघ निर्मिलें हरितसें वर्णें विराजावया,
लीलेनें बहु चित्रवर्ण दिधला जेणें मयूरां बरा,
तो वृत्ती तव राम चालविल-- ही चिंता कशाला नरा ! १

भागीदार धनास चार असती साचार हें जाणपां,
धर्माग्निप्रभुतस्कर, प्रथम जो संपादिजे तत्कृपा;
धर्माला स्वविभाग तो न मिळतां ते सर्वही कोपती,
नेती सर्व हिरावुनी ह्मणुनि बा ! धर्मीं असावी रती. २

———— भृंग.

# काव्यरत्नावलि.

अंक २ रा.

## श्री छत्रपति शिवाजी महाराजकाव्य.

### सर्ग २ रा.

अपराण्ह वर्णन. सुशीलाजन्ममहोत्साह. स्त्रिया जमून सुशीलेच्या नामकरणविधि करितात. सुशीलेचें बालपण. तिच्या बालपणींच्या लीला व क्रीडा यांचें वर्णन. राजदंपतीचा आनंद.

श्लोक.

दिवाकर स्वच्छ नभोध्वगामी । प्राणप्रियादर्शन सौख्यकामी;
होऊनिया श्रान्त बहु प्रवासें । प्रतीक्पथें सत्वर चाललासे. १
संताप–मालाकुल काय सारा । तनूवरी लोटति घर्म–धारा;
सूर्यातपां वारि समीर मंद । घ्राणेंद्रियां तोषवि पुष्पगंध. २
छायातलीं घेउनि विश्रमातें । जाती वनीं धेनु चरावयातें;
सेवून तेथें मृदु गोड पाला । निवारिती त्या सकलातपाला. ३
संतापयुक्ता रविच्या करांहीं । जाई सरा पांथ परंपराही;
पिऊनिया निर्मल गोड वारी । छायातलीं आतप ती निवारी. ४
खरातपें विव्हल अन्तरांत । विश्रान्ति घेती खग कोटरांत;
संताप आतां सरतां क्रमानें । बाहेर येती रमती सुखानें. ५
संताप होतां गिरिकंदरांत । जे बैसले व्याघ्रहरी नितांत;
बाहेर ते येउनिया विशाळ । महास्वनें गाजविती निराळ. ६
सेवूनिया अब्जमृणालबंधा । सुधेपरी प्राशुनि तन्मरंदा;

सलील पद्माकर–वारिमाजी । क्रीडा करी सारस–भृंगराजी. ७
देई रवी ताप शिखा–शतांहीं । न कोणिही संचरती पथांहीं;
होतां कमी ताप मग क्रमानें । जाती स्वकर्मा जन संभ्रमानें. ८
त्या कालिं विश्वास–गृहास रामा । मिळोन येती नयनाभिरामा;
सानंदचित्ता रमणीय लीला । अपार त्या दाखविती सुशीला. ९
करीतसे उत्सव राव थोर । कमान केली सदनासमोर;
वितान शोभे वरती विचित्र । येती पहाया जन इष्टमित्र. १०
नृपाल तेव्हां बहु वित्तराशी । अर्पी द्विजांशीं करुणाकरांशीं;
समर्पुनी वस्त्र विभूषणातें । तो गौरवी सर्व सुहृद्गणातें. ११
समर्पुनी षड्रसयुक्त अन्न । केले तयानें जन सुप्रसन्न;
संतोषवी विप्रजनांगनांतें । अर्पून नाना वसनां धनातें. १२
रात्रंदिवा मंगलवाद्यघोष । देई बहू बालजनांस तोष;
करून वेश्याहि सुनर्तनातें । मनोज्ञ–वेषा हरिती मनातें. १३
पुरांगना सर्वहि तेथ आल्या । पाहून तो उत्सव तुष्ट झाल्या;
साध्वीसवें त्या करिती विनोद । तो ऐकुनी माजतसे प्रमोद. १४
पाहूनिया मुग्ध सुताननातें । संतोष वाटे बहु तन्मनांतें;
होओ सुता तत्सम आपणांस । मनीं असें वाटतसे तयांस. १५
अंकावरी घेउनि बाळिकेतें । कोणी सुगात्री रमवी तियेतें;
विलोकुनी सस्मित तन्मुखातें । अत्यंत चित्तीं वरितें सुखातें. १६
अन्या कृशांगी तरुणी सुकेशी । घेई निजांकीं मग बालिकेशी;
अशीच होओ तुजलाहि कन्या । वदे विनोदें तव कोणि अन्या ! १७
ऐकून ती गोड विनोदवाणी । मंदस्मिता ते करि रूपखाणी;
निषेधि वेगें तंव तीस माता । पुरे करा हा परिहास आतां. १८
तें ऐकुनी राहति त्या प्रशान्त । घालून तीतें नव पाळण्यांत;
जो जो करूनी मग हालवीती । पिकस्वरा सुस्वर गाति गीती. १९

होईल ही स्त्रीजनिं शुद्धशीला । त्या ठेविती नाम तिला सुशीला;
करोनिया यापरि उत्सवातें । जाती शुभांगी निजमंदिरांतें. २०
शुक्लेंदु लेखे–सम ती सुजाता । वाढे क्रमानें सुखवी स्वतातां;
हास्यानना शान्तवि ती जनांतें । जशी चकोरां नव चंद्रिकाते. २१
विलोकुनी तद्ग्रहलक्षणातें । दैवज्ञ सारे कथिती नृपातें;
होईल साध्वीजनरत्नभूषा । जगीं जशी बाणनृपालभूषा. २२
छळील ईतें कुदशा अपार । पीडा इला देतिल दुष्ट फार;
धैर्योत्सवें संकटसागरांही । जाईल वेगें उतरोनि पाहीं. २३
पतीसवें होउनि मान्य लोकीं । भोगील ऐश्वर्यसुखां विलोकीं;
सत्कीर्तिनें व्यापिल ही जगास । कुलप्रतिष्ठा तव हीच खास. २४
ऐकूनिया यापरि सर्व भावी । आनंद चित्तीं बहु राय भावी;
नराधिनाथें बहु वित्त–दानें । केले सुखी ते बहु वित्तदानें. २५
मरीचि अस्तंगत आज झाला । येई उद्यां तो उदयाचलाला;
येती क्रमानें दिनरात्र पाहीं । या कालचक्रा खळ अल्प नाहीं. २६
होई सुशीलेप्रति एक वर्ष । माता तिला पाहुनिया सहर्ष;
अंकीं बसे घेवुनि नित्य तीतें । तिच्याविणें चैन नसे सतीतें. २७
आनंददात्री बहु ती पित्याला । कादंबिनी ज्यापरि चातकांला;
विलोकुनी तद्रुचिराननातें । आतृप्ति वाटे न कधीं मनातें. २८
ताता–सुखातें हरि बालिका ती । गृहांधकारा जशि दीपकान्ति;
प्रफुल्ल वेगें करि खिन्न चित्तें । जोत्स्ना जशी निद्रित कैरवातें. २९
गृहांगणीं रांगत जाय बाला । धूलीमधें धूसुर काय झाला;
पाहोनि एका मृगशावकाला । वेगें निघे त्यास धरावयाला. ३०
सवेग तो पोत दुरी पळाला । करी महाकान्त ह्मणून बाला;
ऐकूनिया धांवुनि ये सती ते । केली सुशद्बें मग शान्त तीतें. ३१
स्तंभाश्रयें राहतसे उभी ती । चित्तीं न वाटे लवपातभीती;

धरूनिया धातृकरास हातें । चालावयातें शिकली अहा ! ते. ३२
बाला रडे इच्छुनिया शुकातें । चित्रार्पितां त्यापरि हंसकातें;
रविप्रभाबिंब जलांत पाहे । वदे “ मला काढुनि शीघ्र द्या हें ” ३३
ऐकोनि वेगें जनकोदितातें । बोलावयातें शिकली सुता ते;
रसाळ अव्यक्त वदून वाचा । संताप सारा निववी तयाचा. ३४
सुतातनुस्पर्श करून तात । आनंद पावे हृदयीं नितान्त;
अंगीं सुधासेचन होय काय । ज्योत्स्नाच किंवा करि शान्त काय. ३५
अंकावरी घेउनि रम्य बाला । पुन्हःपुन्हा चुंबुनिया मुखाला;
ऐकून अव्यक्तगिरा रसाळ । जे धन्य ते तोषति सर्वकाळ. ३६
सुताविणें शून्यवनासमान । घोरांधकारावृत वा स्मशान;
नृपालचित्ता गृह जें गमें तें । स्वर्गाहुनी सौख्य विशेष देतें. ३७
हांसे कधीं ज्यापरि पद्मसृष्टी । वर्षे कधीं जेंवि अकालवृष्टि;
तडित्समा दावि विलास–लीला । गानें पिकां लाजविते सुशीला. ३८
मुलींसवें क्रीडतसे सुशीला । निसर्गरम्या बहु दावि लीला;
तारांगणीं जेंवि शशांकलेखा । बालाजनीं तेंवि तिलाहि लेखा. ३९
नवे नवे खेळत खेळ रोज । माता सुतेचें करि फार चोज;
आधारभूता पितृजीवनाला । प्राणापरी वाटतसे मनाला. ४०
गमे प्रिया ती सकलांस बाला । लावी लळा फार सुहृज्जनांला;
मुग्धाननां पाहुनि बालकांस । न प्रेम दाटे कवणा जनास. ४१
ती पंचवर्षा जइं हो सुशीला । माता लिहाया शिकवी मुलीला;
बघून लोकोत्तर बुद्धि फार । आश्चर्य वाटे सुहृदां अपार. ४२
तातास ती वाचुनि दावि बाला । गमे तदा कौतुक फार त्याला;
अंकावरीं सत्वर घेत तीतें । सहर्ष चुंबी मग धीमतीतें. ४३
पित्यासवें जात मनोहरातें । पुष्पप्रिया ती कुसुमाकरातें;
गंधोत्कटा चंपककुंदजाती– । माला नृपां अर्पि नृपात्मजा ती. ४४

क्रीडामयूरास धरून आणी । करीं तया नाचवि रूपखाणी;
ऐकूनिया मंजुल कीर वाणी । घाली तयाच्या वदनीं स्वपाणी. ४५
जेव्हां सती प्रेमळ गीत गात । होई तदा निश्चळ ती प्रशान्त;
सतीचरित्रें अमृतासमान । सद्भक्तिनें ऐकत सावधान. ४६
सतीचरित्रें कथुनी रसाळ । सद्भक्तिभावान्वित सर्वकाळ;
सन्मार्ग—माहात्म्य अगाधचित्तीं । संपूर्ण तीच्या ठसवी सती ती. ४७
येतां परि श्रान्त पिता गृहास । सद्गीतिका गात सुता सहास;
वदून ती मंजुळ शब्द गोड । मातापित्याचें पुरवीत कोड. ४८
लावी सुतेतें गृहकर्मशिक्षा । सती सदा कार्य—अकार्य—दक्षा;
कार्यप्रिया होय सुतास्वभावें । आलस्य तीतें न कधींच ठावें. ४९
सदा वरी निर्मलवर्तनातें । होई प्रिया सर्व सखीजनांतें;
गर्वोद्धता आदरि तीन वृत्ति । मानी वरिष्ठा विनयप्रवृत्ति. ५०

सुचरित तिचें तूह्मां आतां कथीन सविस्तर,
रसिकजन हो ऐका प्रेमें करून मन स्थिर;
असति बहु मी अंगीं माझ्या कवित्व न किंचन,
तरिहि न तुह्मी हें धिःकारा करा सदयेक्षण. ५१

सर्ग २ रा समाप्त.

————— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## कुंजकूजन.

श्लोक.

" वाणी ममैव सरसा यदि रंजयित्री
न प्रार्थये रसविदामवधानदानम्
सायंतनीषु मकरंदवतीषु भृङ्गाः
किं मल्लिकासु परमंत्रणमारभन्ते "

## दिंड्या.

कृष्णपक्षींचा चंद्र कलाहीन । पश्चिमेच्या क्षितिजांत होय लीन;
भागलेला जणुं जरठसा प्रवासी, । लागलाहे खालती बसायासी. १
दीर्घसूत्री ती रात्र चंद्रजाया, । पूर्व गोलातें त्यजुनि निघे जाया;
उदयसंधी येतांच आळशातें, । स्वयें तंद्रा सोडोनि जशी जाते. २
बाल दिनकर तो उदयगिरि--शिराला । प्रयासानें आरूढ जणों झाला;
मृदुल दुलईसम धवल धुकें त्यानें । निजकरांहीं सारिलें आळसानें. ३
अरुण किरणें मंदोष्ण तयाचीं तीं । पडुनि, आकाशीं लाल छटा देती;
प्रेमरंगें जणुं बाळ–रवि–चितारी । किरणकलमांनीं गगनपट चितारी. ४
सुखद त्याचें तें उष्ण पसरताहे, । तरिहि कमती हेमंतशीत नोहे;
असुनि अर्थोष्मा, जेंवि लोभियाचें । दैन्य ह्मणुनी कधिंही न जावयाचें ! ५
अझुनि ठेवुनि निज गाल गालुशीतें । बिछान्यांतचि असतील आळशी ते;
अशा समयीं मधुमधुर ह्या रवानें । आळवितसे हा कोण गौरवानें ? ६
कुठुनि येते ही शद्बसुधाधारा ? । हिनें भरिला कीं निकट भाग सारा !
अहो ! बघताहे चकित लोचनांहीं । उगम हीचा तरि दिसत मला नाहीं ! ७
'कोण तूं गा ! कोठील कवणियाचा ?' । कुठें आहे तव वास वसायाचा ?
कुठें केला अभ्यास गायनाचा ? । कोण झाला गुरुराय तुज, तयाचा ? ८
असिसि कलरव कीं काय सतारीचा ? । दिव्य सुस्वर कीं अमर–सुंदरीचा ?
मूर्तिमंतचि कीं सामवेद साचा ? । सांग मजला तें सांग सुधावाचा ! ९
जिच्यामाजी प्रतिबिंब तुझें राहे । वस्तु लोकीं कोणती अशी आहे ?
सरसहृदयीं मेघ तो स्वातिचाही । तुझ्या सरिचा जरि ह्मणूं, तरी नाहीं ! १०
कर्णरूपी उघडल्या शिंपल्यांत । वचनबिंदू जे तुझे उतरतात,
अमित सोज्वलसें तयांचिये पाणी । रुचिर मोत्यांसहि गौणताच आणी ! ११
वेणुनादें माधवें मधुवनांत । ब्रह्म बिंबवुनी प्रणयिजनमनांत,
परम हर्षाचा परम लाभ त्यांतें । करुनि दिधला ऐकोनि ठाउकें तें. १२

परी त्याची अनुभूति मला नाहीं ! । न हो किंबहुना मना कल्पनाही !
आजि तुझ्या परिसोनि गायनातें, । किमपि त्याचें अनुमान मला होतें ! १३
काळसर्पाहुनि जे महा बिखारी, । असे दुर्जन, त्यांनाहि जिंकणारी,
चंद्रमणिसम रसिकांस झरविणारी, । होय वाणी तव अमृतगर्वहारी. १४
पहा विस्मय चहुंकडे प्रसारीत, । गाढ जिज्ञासा रसिक मनिं भरीत,
उष्णसंगें अनुराग संचरीत, । गिरा विचरे ही पवन—लकेरींत. १५
उदासांचें औदास्यतम हरोनी, । निराशांचें नैराश्य निवारोनी,
व्यथित हृदयांची व्यथा शांतवोनी, । विलसते ते उल्हास उपजवोनी. १६
तरी अद्भुतरस असा निर्मिणारा, । सरस मानस उचमळुनि आणणारा,
हेंच नन्दनवन करुनि दाविणारा, । कोण अससी तूं दिव्य गुणागारा ? १७
गुच्छ जैसा काश्मीर—गुलाबाचा । हरितपर्णामधिं गुप्त असे साचा,
तरी परिमल चहुंकडे तयाचा तो । दरवळोनी रसिकांस मोहवीतो; १८
लपुनि कोठें तरि बिहंगमा ! तैसा । नादसंगम वितरोनि मधुर ऐसा,
गड्या ! मजला तूं वेड लावियेलें ! । तरी सांगें त्वां गेह कुठें केलें ! १९.
असाधारण गुण असुनि असा अंगीं । कासया तूं बैससी गूढ जागीं ?
वसत असतां कीं नित्य विजन--वासीं । येत आहे थोरवी गुणिजनांसी ? २०
दिव्य तेजोवलयांत विचारांच्या । लीन होउनिया कवी, सुधावाचा,
वदे नैसर्गिक काव्य, तसा तूंही । गासि गायन हें विस्मयप्रवाही ! २१
काव्य तूझें ज्यांतोनि उगम पावे । विषय लोकीं ते कोणते असावे ?
लोल सलिलें, कोणतीं उपवनें तीं ? । माळ, किंवा कोणत्या शैलपंक्ती ? २२
रम्य देखावे नभोमंडलाचे, । प्रेम किंवा तूझिया प्रियजनाचें ?
अपरिचय कीं संसार विपत्तींचा । उगम आहे ह्या काव्यनिर्झरीचा ? २३
अगा गंधर्वा ! अगा विहगराया ! । चित्तचातक हा आत्मवश कराया,
तुझ्या हृदयीं कोणते तरि विचार । असति हृदयंगम जेहि काव्यसार ? ! २४
ठाउका जो आनंद तव मनाला । लेश त्याचा देशील काय याला ?

शिकविं शिकवीं तव शब्दमोहिनी ते । ह्याहि जिव्हेतें सहज कर्कशतें ! २५
अरे ! इतुक्यांतचि मौन असें कां हें ? । तुवां वरिलें ? हें उचित तुला नोहे !
असुनि कवि मी तुज करित विनंती ही । अविनयें कां अवमानितोस तीही ! २६
होय तूझा व्यवसायबंधु गा मी; । सतनुवाङ्मन मी रसिक--जन--लगामीं
बघुनि तूझा गुण दिव्य निरभिमानीं । करी विनती, ती सुजनपणें मानीं ! २७
गुणविहीना गुणमणी गमति कांचा, । गुणी हेवा करितात गुणिजनांचा;
परी गुणवान् गुणिगणाचा चहाता । विरल विरलचि तो सरलजन पहातां ! २८
लक्ष पक्षी लक्षिले आजवेरी, । रंगरूपें शद्वेंहि मनोहारी;
परी करणारा यापरी बहारी । नाहिं नाहीं कुणी कुंजवनविहारी ! २९
अगा गंधर्वा ! तरी लताऽगारीं । छेडिं छेडीं तूं फिरुनि रागदारी !
तिच्या श्रवणाचा, तुझ्या दर्शनाचा, । लाभ झाल्याविण मी न हलायाचा ! ३०
हाच वाङ्मधु हृदयांत सांठवीन, । काव्यरूपें रसिकांस पाठवीन;
तरी तव ते बहुमोल बोल बोल ! । देइं दर्शन दृष्टीस या विलोल ! ३१
अहो ! परि हा भ्रम काय मला झाला ! । प्रार्थिताहें मी काय हें ? कुणाला ?
वनेचर जो स्वातंत्र्यसुधास्वादी । कासया तो साहील मम उपाधी ? ३२
काय ह्मणुनी शिकवील मला हो ! तो ? । आणि शिकवोनी काय कवी होतो ?
कदा नोहे !--रस सिद्ध कवी जो कीं । स्वयंभू तो अवतरत असे लोकीं. ३३
स्वयं काव्यस्फूर्तीस पावणारा, । स्वयं नादब्रह्मांत गुंगणारा,
शब्दसृष्टीचा चतुर विधाता तो । जगन्मोहन या खगापरी गातो. ३४
कुठें वाणी या कुंजकूजनाची ! । कुठें माझी वैखरी खरतराची !
कुठें निर्मल जीवंत झरा तीचा ! । कुठें कर्दम मत्काव्यपल्वलींचा ! ३५
कुठें त्याचें निश्चिंत अंतरंग ! । कुठें माझें दुर्मनो--मनोभंग !
कुठें त्याचा स्वातंत्र्य वनविहार ! । कुठें जीवित परतंत्र हें असार ! ३६
निराशेनें जाहलों उदासीन ! । कवित्वाचा मद होय मनीं लीन;
गमे सारें जग जीर्णवन मला हें; । त्यांत एकचि मी जीव वृथा आहे ! ३७

अहो ! इतुक्यामधिं काय नवल झालें । प्रेम--बिंबचि कीं भानुचें--उदेलें !
आणि तेणें निमिषांत उपवनाला-- । नव्हे !--आलें चैतन्य या जगाला ! ३८

हृदयरूपी जो प्रेमकोश त्यातें । व्यक्त करुनी जणु सर्व सहृदयांतें,
जडांलाही चैतन्य द्यावयाला । कुंजकूजन लागला गावयाला ! ३९

जसा त्याचा रव कर्णमनोहारी, । तसा होई प्रतिरवहि सभोंवारीं;
जणों उपवनही कुंजकूजनाचे । असुनि नादब्रह्मांत लीन, नाचे ! ४०

धन्य अससी तूं कुंजकूजना गा ! । गाइं गाईं निजगान महाभागा !
तुझ्या गानें होईल खलभुजंग । वशहि तरि तो मग कां न रमारंग ? ४१

पंचमांतिल आलाप कोकिलांचे, । नादसंयोगहि तंतुवादनांचे,
काव्यमकरंदहि महाकविजनांचे, । वृथा ! येथें जाहले वृथा साचे ! ४२

परमसीमा ही दिव्यमाधुरीची, । मनुज वार्णानें कधिं न कळायाची.
स्वाद हीचा रसिकांस जरी व्हावा, । तरी त्यांनीं रव हाच आयकावा ! ४३

## समर्पण.

जें जें निसर्गरमणीय ह्मणोनि कांहीं,
निर्माण होउनि जगीं विलसोनि राही;
सौंदर्य तें नयनगोचर होय साचें,
अज्ञेयशा भुवनसुंदर ईश्वराचें ! ४४

विश्वास ठेवुनि मनांत असा विवेकें,
विश्वास जे निरखिति प्रणयातिरेकें,
तद्वैभवीं असति लीनहि कौतुकानें,
त्यांनांच ही कृति समर्पण आदरानें. ४५

चंद्रशेखर.

## सद्बोधशतक.

### श्लोक.

होता जसा अरुण हा रवि बा प्रभातीं
अस्तीं तसाच पसरी रुचिरा प्रभा तीं
धैर्यास तो त्यजिन सौख्यकलाप--दात्या
आली जरी असुखदा अतुलाऽपदा त्या
यत्नशील थोर सखया रविशी तयाची
रीती; जुळोनि करतो विपदीं न याची
वागे समान असुखीं सुख ही न मोजी
तो साधु सत्य सखया; समुदें नमो जी
येवो सुखें सुखद वा अतिदुःखकाल
भीयी न ही उतरतां तळिं चंड काल
जो दे धडा अतुलसा सविता म्हा हा
कैसी स्वयें कृति करी विपरीत हा ! हा !
तापोनि चंडकिरणीं छळिलें जनातें
नामेंहि मित्र असुनी त्यजि सर्व नातें
तत्क्षालनार्थ उडि सूर्य निधींत टाकी
वाटे उले गगन--कांति तटा तटा कीं
येतां स्ववल्लभगृहीं झणिं पश्चिमा ती
आनंदली परि सुखांतहि झालि माती
" हा ! हा ! कसा बुडवि हा निधि मज्जनास
झाला मदीय करण्या खल सज्ज नास "
दिक्सुंदरी वदुनि हें बहु लाल झाली
पाहोनि तें जलधि--कृत्रिम ती बुझाली

नोहे उपाय करि काय चिडे उमोप
सामर्थ्य अंगिं नसतां विफल--प्रकोप ६

वेळीं अशा ससख मी तटिनी--तिराशीं
गेलों बघोनि रमलों अतितोयराशी
प्रख्यात पुण्यसरिता शिव--जाहि भीमा
उत्पन्न आद्यति करी वद कां ? न भीमा ७

वाटे कसें विमल हें जल शांत राया
वाटे मला सुगम ही भव हा तराया
प्रक्षाळितां सुजलिं या अघयुक्त काय
होईल पूत वद हें नच सत्य काय ? ८

ऐकोन मूढ असले मम ते विचार
अज्ञान--जन्य बघुनी मग तेंवि चार
'मत्शद्ध' मित्र वदला 'तरि सेवि चार
ते सत्य वा अनृत हें स्वमना विचार' ९

"नोहे सख्या विमल रे जरि अंतरंग
वेगें तयांत उठती जलसे तरंग
आलाबु कटु असुनी सुपयामृतांत
प्रक्षाळिला; मधुर कां ? तरि होय तात ! १०

पाजीयलें पय जरी धरणी--धरा हे
मित्रापरी शुचि न हो विषयुक्त राहे
तीर्थोदकांत धुतलें जरि गर्दभास
होई न शुद्ध तव हा किति गर्द भास ११

श्वा--पुच्छ कां सरलता कधिं बोल पावे
साधुत्व आड करुनी उगि कां ? लपावें

[library stamp]

दावोनि एक जन साधिति आत्म डावा
ऐसा विचार तव आज नसोहि डावा १२

नाहीं जरी मन शुची तरि फायदा रे
होईल काय ? नव हीं नर--काय दारें
चित्तांतरीं जमविती किति पापराशी
जातील हे नर कसे वद पां पराशीं १३

जें वाहतें जल सख्या तव अग्र--भागीं
तें काय दाखवि पहा नच हो अभागी
व्हावें सदा विकृति--हीन क शीकवीतें
हें ज्ञान कां ? नच सख्या तुजशीं कवीतें १४

सांभाळितें जल जसें जगिं सज्जनांस
होई न तें विष तसें कधिं दुर्जनांस
न ज्ञात त्यास सखया बघ घातपात
दे तुष्टि ही झिजवुनी स्वतनू तपांत १५

ठेवा सदैव समदृष्टिच सर्व--भूतीं
पाळी जशी सुजन दुर्जन धन्य भू ती
हा पाठ हें सुजल दे मनिं बाळगावें
दंभा त्यजून हरितें नित बाळ गावें १६

मोदें कसें शफर हे जळिं खेळतात
शैवाल ईशकृत हें बघ खाति तात
देती न दुःख इतरां नच त्यांशि कावे
ठावे; तयांजवळ हें सखया शिकावें १७

ही धेनु जी तुजसमोरहि जीवनातें
प्राशावया परतली; बघ जीवनातें

ती चालवी न करितां कधिं घात राया
हें कां ? गुरू गुरु नसे भव हा तराया १८

हा उच्चकंठ बगळा वरि पूर्ण साधू
स्वांतीं परी कुटिल तो निज--कार्य साधू
नेत्रें मिटी तप करी जणुं एक पायीं
लक्षोनि मीन गिळितोचि अशा उपायीं १९

कैसा दिसे वरुनि हा बघ शुभ्रकाय
स्नाना तसें न करि बोल भिमंत काय ?
झाला न पालट परी लवही तदंतीं
लोळे पुन्हां धुळिमधें जरि धौत दंती २०

आहेत दांभिक जगीं बघ लोक सारे
मित्रा पडे अमित मोह तुला कसा रे
जे सोंवळे वरिवरी बहु दावितातो
ते ओंवळे; कुटिलता बहुधा वितातो २१

रुद्राक्ष घालुनि गळां करिं मंत्र--माळा
भस्में सुशोभविति जे अपुल्या कपाळा
ते नीच काक--हृदयांतरिं पूर्ण खोल
हें हा पहा शिकवितो बक; नेत्र खोल २२

ही सुंदरा दुजि चमत्कृति गा विलोकीं
यत्कीर्ति संतत गड्या अति गावि लोकीं
यावीचि बा उसळुनी प्रसहें वहातां
वाटें भयें लहु जणूं जुळितााति हातां २३

येतांहि लाट वरुनी लहु हे शिरा या
पाही कसें लवविती बघती शिराया

त्यामाजि कीं जणुं गमे विगताभिमान
झाले ह्मणोनि जगले वच पूर्ण मान २४

गर्वांध रावण पडे रघुराजहस्तीं
जैसा हरींद्रनखराग्रजिं राज--हस्ती
तद्बंधु जो रघुपदीं विनत--स्वभावें
झाला चिरंजिव जनीं तुज कां न ठावें २५

अनंततनय.

---

अपूर्ण.

## कवींस इषारत.

श्लोक.

गेले राज्यधुरंधर प्रभु तसे स्वातंत्र्य गेलें लया,
भोगायास सदा असह्य विपदा आली असे स्वालया.
ऐशा या समया तुह्मी रसिक हो ज्ञाते मराठी कवी,
गा हो गीत असेंच अल्प तरि जें राष्ट्रोन्नती दाखवी. १

जी जी सांप्रत दृष्टिला पडतसे सद्यः कवींची कृती,
गात्री केवळ ती विलास--भुवनीं नारीजनांसंगतीं.
या दोषा अपवाद सत्कवि कुणी आहेत लोकीं तरी,
त्यांची मागुनिया क्षमा तदितरां संप्रार्थितों द्व्यक्षरीं. २

जें कर्णीं पडतां स्वदेशजनता देशाभिमानें स्फुरे,
बंधुद्रोह--विनाश, ऐक्यकरणीं संचार अंगीं भरे.
ऐसें गीत न ये श्रुतीवरि, जरी आलें तरी थोडकें;
कां औदास्य असें वसे कविजनीं पाहूं जरा कौतुकें. ३

कोणी चुंबन वर्णितो, रचितसे गाणें कुणी प्रीतिचें;
झाली जी गतभर्तृका वदतसे उद्गार कोणी तिचे,
कोणी गाउनि गीत गोधडिवरी काव्यप्रभा फांकवी,
कां ऐशी स्थिति शोचनीय तुमची सांगा मराठी कवी. ४

कोणी गात असे स्वयंवरकथा, कोणी फुलां, पांखरां,
कोणी ' मांजर लाडकी ' विषय हा काव्यीं नियोजी खरा.
कोणी कोकिळ, काकवर्णन करी, काव्यीं तृषा भागवी;
कां ऐशी स्थिति शोचनीय तुमची सांगा मराठी कवी. ५

ऐशा काव्यकृती जरी रिझविती कांहीं रसज्ञांप्रती,
दुःखाची सरते स्मृती क्षणभरी अल्हाद पावे मती.
काव्यानंद खरा न हा, किमपि हें नोहे मनोरंजन;
पावे अक्षरता स्वराविण कसें तें पांगुळें व्यंजन ? ६

देती स्फूर्ति मना असद्विषय हे काव्यें रचाया जरी,
वाहे तद्वर्णनेंहि लोकहृदयीं हर्षामृताची झरी.
नाहीं प्रस्तुत पात्रता अमृत तें सेवावया आपणां,
शीतार्तप्रिय होय वन्हि तरि तो मानेल कैसा तृणा ? ७

केलें भक्षण षड्रसान्न, विटुनी जिव्हा यदा जाय ती;
होतीं इष्ट तदा रुचिप्रद अशीं कोशींबिरी रायतीं.
झालीं इष्ट ह्मणोनि तींच भरितां, पोटीं उपाधी जडे;
तैसें वाङ्मय दूषणोचित अशा या हीन काव्यें घडे. ८

देशा उत्तमता अशा रडकथा देतील हें अन्यथा.
यासाठीं विपदस्थितींत अपुल्या पूर्वेतिहासा कथा.
सिंधूते तरण्यास नावचि बरी, वाजी, करी, कासया ?
गाणें योग्यचि पूर्व--विक्रमधृती सद्यःप्रसंगास या. ९

केली पूर्वयुगांत काव्यरचना. ती वाउगी कां बरें ?
व्यासें भारत, वाल्मिकें विरचिलें रामायणा आदरें.
ज्यामाजीं रणधीरवीरचरितें युद्धादिकें हीं महा--
केलीं वर्णन, तत्व त्यांतिल जरा सोत्साहचित्तें पहा. १०
म्लेच्छें जिंकुनि आर्यदेश अवघा आक्रांत केला जनीं,
गोरक्तें द्विज न्हाणिले परिणिल्या आर्यस्त्रिया सद्गुणी.
वाराया व्यसना सुकाव्यरचना केली समर्थें तधीं,
त्यायोगें निजदेशभक्ति ठसली श्रीमच्छिवाच्या हृदीं. ११
' शद्बसृष्टिपती ' कवींस अभिधा श्रीरामदासें दिली,
वाग्बाणेंकरुनी असंख्य कविंनीं लोकांतरें विंधिलीं.
राष्ट्रोत्कर्ष घडावया कवि कवीं होतात ते कारण,
कां हो स्वस्थ तुह्मींच आज बसलां दुःखालयीं दारुण १२
व्हा रे सिद्ध समस्त हो उजळुनी वाग्बाण आपापले,
राष्ट्रीं दुर्गुण रान जें पसरलें तें पाहिजे कापलें.
द्या फेंकोनि उदासताऽवरण त्या कोणी न हापापलें,
शद्बास्त्रें हलवोनि जागृत करा बंधूजनां आपले. १३
झाला शुष्क निजाभिमान तरु, त्या यावी नवी पालवी;
दास्यत्वाभिरुची तसेंच विलया औदास्य जी घालवी.
व्हावी ओळख आपणांस अपुली जी नित्य वाटे नवी,
ऐशी गा कविता स्वभाग्य--सविता तेणें जगा द्योतवी. १४
सांगाया नलगे कवींस परि हें सांगीतलें आग्रहें
या कार्यास अपात्र मी परि कवी मानोनि घ्या साग्र हें.
वाटे इष्ट तरी स्वकाव्यरचना ठेवा अशा रीतिनें,
नम्रत्वें दिधली इशारत तरी इच्छा पुरावी तिनें. १५

---

नंदकुमार.

## पां. गो. शा. पारखी यांचा संक्रांतीचा तिळगुळ.

श्लोक.

" स्नेहें असे मी परिपूर्ण जैसा
प्रकाशहेतू हि जगांत तैसा
तेवीं तुह्मी व्हा, " करि तीळ लोका--
सुबोध कीं, संक्रमणीं विलोका ? १

तिळगुळ शिकवी हा बोलण्या गोड गोड
पुरवि पुरुषनारीबालकांचें हि कोड
स्वपरजनविरोधा भेटतां घालवीतो
सुजनसम गमे हा, आदरा, मोद देतो ! २

गुड धड रमणीनां तो न वाटे ह्मणूनी
मलरहित करूनी शर्करापाक त्यानीं--
हलवुनि हलवा त्या तीळ घालूनि आंत--
करिति जपुनि रामा जीव त्यांचा तयांत ? ३

मायाळू त्या बहुत बघुनी शीतपीडार्दितांते--
पात्रीं अग्नीवरति सुदती घालिती हो तिळांतें
लागूने त्या प्रखर ह्मणुनी दाह त्या हालवीती
हातांनीं कीं विणुनि वसना शुभ्र त्या घालिताती ? ४

कौशल्यानें करुनिच तनूरक्षणा योग्य साची
नागारंगां करुनि हि पुढें देति हौशी मजेचीं
ऐशा रीतीं करुनि हलवा दाविती एकिमेकीं--
ईर्ष्येनें त्या वदति हसती धन्य होतात लोकीं. ५

खेळाडू तो मदन मजला वाटतो लोकिं खास
रामाहस्तीं करवि हलवा मोहण्या कीं नरांस.

ऐसें नाहीं जरि, तरि तिळीं शर्करेच्यामधें ही--
पूर्वी ऐशी कधिं न कत्रणा भासली मोहनी ही ! ६

ती शर्करारसमिषें स्वकरामृतातें--
घालून कीं करितसे रमणी तयातें
नोहे तरी अति रुची हलव्यांत कैची ?
जी शर्करेंत असते न शतांश साची ! ७

निर्माण तूज कारेतां स्वकरांगुलींनीं--
त्या सुंदरी बहुत लालनपालनांनीं
नातें मनीं न धरितां हलव्या ! स्वदेहीं--
रोमांच तूं प्रकटिशी किति नीचता ही ! ८

मुक्ताफलापरि जरि हलवा सुरेख--
वाटेच हीन मजला उपमान देख
क्षारोदकोद्भव तया मधुरत्व कैचें ?
स्वादूदकोद्भव हि हे सुमुखी--कराचें ! ९

राशीला लागला हा रवि जरि तरि तो मित्र आहे न खोटें
राशीला लागला हा करि बहुत इजा प्लेग वैरीच वाटे
सूर्याच्या संक्रमीं हा तिळगुळ अपुणा सौख्य देईच मोठें
प्लेगाच्या संक्रमीं हे तिळ करिति नरा दुःख अत्यंत दाटे १०

रात्रीं प्रकाशीं विलसे विशेष
स्वच्छीं सुपात्रीं हलवा अशेष
श्वेतांबुजीं कीं जलबिंदु नामी
कीं मल्लिकेच्या कलिका सुधामी ! ११

घ्या देशबंधुजन हो हलवा स्वदेशी
निःशंक यांत किमपी न असे विदेशी

घेऊनि गोड वदुनीच तुह्मी न थांबा–
साधूनि देशहित नित्य तयांत राबा १२
वृद्धीस पावत असे तिळ तीळ लोकीं--
मित्राचिया सतत संगतिनें अहा कीं--
पाहा सदा दिवस; यापरि अल्प नित्य–
सन्मित्रसंग धरुनीच करा सुकृत्य. १३
स्नेहामुळें घडुनि येति अनेक काजें
येतें न संकट, अशापरि वागती जे
सद्भावयुक्तमधुरोक्तिमुळें जगांत--
सिद्धीस जाति बहु सत्वर थोर बेत. १४

दिंडी.

द्वैत होतें तें नष्ट तिळगुळानें--
संक्रमणिं कीं सत्तीर्थ सेवनानें
महावाक्यें शिवजीव--योग होतां
वंगभंगीं ही शांतिनष्ट होतां ! १५

———— पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

## केशवसुतनिधन

I sometimes hold it half a sin
To put in words the grief I feel
For words like nature half reveal
And half conceal the soul within.

Tennyson.

श्लोक.

जन्मे जो जो नर खचित त्या मृत्यु ही ठाम आहे,
नाहीं कोणी अमर जगतीं जाणतों तत्त्व मी हें.

दुःखावेगें परि हृदय तें तप्त होऊनि जातां,
तत्वज्ञाना विसर पडुनी मूढता येत चित्ता १

गेला गेला कविवर अह्मां सोडुनी दूर गेला
वार्ता दुष्टा परिसुनि सुहृन्मंडळा खेद झाला !
नाहीं झालीं जगतितलिं या पूर्ण चाळीस वर्षे
तोंच स्वर्गातुनि झडकरी धाडिला मृत्यु ईशें २

ज्या प्लेगानें अवचट जगीं घोर संहार केला
' त्राही त्राही ' सकल जगता लाविलें बोलण्याला
ज्यानें केलीं अमित नगरें पूर्ण उध्वस्त रागें
त्यानें नेला कविवर अतां वाग्वधू दीन मागें ३

होती त्याची सरस रुचिरा कल्पनाशक्ति दिव्या
भव्य व्योमीं विचरुनि जिनें निर्मिलें रम्य काव्या
झाले मोठे कवि जरि महाराष्ट्रभाषेंत अन्य
हा स्वातंत्र्यप्रिय ह्मणुनिया थोर गाजेल धन्य ४

लीलामात्रें सहज कविताशद्व त्यानें वदावे
त्यांच्यायोगें रसिकजन ते थक्क होऊन जावे
वाग्देवीचा वरदकर तो मस्तकीं पूर्ण होता
ऐसा भ्राता मम हरपला खिन्नता येत चित्ता ५

संसारीं या क्षणभरिं न तें लक्ष त्याचें कधींही
गेलें योग्यापरि सतत तो मुक्त जैसा विदेही
ऐसा मानी कवि हरपला; ज्ञात जो वाचकांतें
नामानें ' केशवसुत ' तया अर्पितों या वचांतें ६

जैसे आंग्लीं कविवर शले बर्न्स कीट्सादि नांवें
ज्यांची वाणी सहृदयजनां डोलवी स्वप्रभावें

तैसा मोठा कवि निपजला या महाराष्ट्रभागीं
ईशक्रोधें परि हरपला सत्य आह्मी अभागी ७

जे जे मोठे गुणिजन जगीं काळ ओढून त्यांनां
नेई स्वर्गी गुणपरिमळें तोषवाया सुरांनां
ऐकोनी जी सुरस कविता धन्यता थोर लोकीं
वाटे तैशी सुरवरसभा तृप्त होईल नाकीं ८

कां शोकानें सतत झुरुनी मानवानें झिजावें
ईशाज्ञेनें सकळ घडतें हें मनीं वागवावें
त्याच्या हस्तें अणुभरि कधीं होत अन्याय नाहीं
हें जाणोनी मनुजहृदया शांतता प्राप्त होई ९

मार्गण.

---

## तान्हुला.

तान्हुला निजला असून झोंपेंत स्वप्न पाहत आहे; जवळच त्याची आई बसली असून प्रेमपूर्ण वात्सल्यनयनानीं त्याला अवलोकन करीत आहे. तान्हुला झोंपेंत दचकतो, रडवें तोंड करतो, रागाचा आविर्भाव दाखवितो व शेवटीं गालांतल्या गालांत हांसतो त्यास उद्देशून आई:—

पद.

तान्हुल्या !
वाटतें तुला
काय तरि बाळा !
झोंपेंत दचकसी काय असा ? वेल्हाळा ! १
जग कसें
ठाउकें नसे

मुळीं तुज कांहीं
तुज ' आजउद्यांचा ' विचारही पण नाहीं. २

कठिणता
मूर्त ती स्वता
जगीं या भरली
झुळुकही तिची परि नाहीं तूं अनुभविली. ३

बाधिती
पडरि गांजिती
अह्माला बाळा !
परि दूर पळति तव भिउनि शुद्ध आत्म्याला. ४

कां बरें
हृदयिं मग भरे
भयाची धडकी
चिमुकल्या ! तुझ्या ही ? काळिज मम तुटतें कीं. ५

तुज असें
काय तरि दिसे
ह्मणुनि मुख रडवें
जाहलें तुझें हें ? नयनीं मज नच बघवे. ६

कल्पना
तुझ्या नच मना
मुळीं दुःखाची
कां भीसि, काढिसी ओंठ, काय तुज बोंची ? ७

संसृति
दुःख–पूर्ण ती

मनुज रडण्याला
जन्मला जगीं; परि बाळपणीं सुख त्याला. ८

तूं जाण
सुखाची खाण
पूर्ण ती असुनी
झोंपेंत दुःख तुज दुःख देत कोठोनी ? ९

वळविल्या
मुठी; चढविल्या
भृकुटि कां भाळीं ?
हा राग कशाचा तुला तरी या काळीं ? १०

कोंवळी
स्मिताची कळी
कोंवळ्या गालीं
विकसली; कपोलीं खळीं गोड किति पडलीं ! ११

कुणिकडे
लपवुं या गडे
जगापासोनी ?
फाडुनी हृदय कां ठेवुं आंत नेवोनी ? १२

———— नरहर शंकर रहाळकर बी. ए.

## आह्मी फुलांतले भ्रमर.

श्लोक.

आकाशांत फुलें ! धरेवर फुलें ! वाऱ्यावरीही फुलें !
माझ्या गेहिं फुलें ! मनीं मम फुलें ! भूगर्भिं सारीं फुलें !

माझें चित्त भुले सुगंधित भलें हें विश्व हो जाहलें !
कोणाला कळलें किती पसरलें उद्यान हें शोभलें ! १

नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी हीं जरी
नांवें भिन्न, तरी फुलें सकलहीं रूपें निराळीं तरी.
घेतों ह्यांतुन थोडका रस पुन्हा त्याच्याकडे धावतों !
देवाला स्तवितों सदा भ्रमर मी पुष्पांमधें राहतों २

जातीच्या भ्रमरास " सोडुन फुलें ये फोड हीं लांकडें "
ऐसें कोण ह्मणेल ? कोण भलतें घालील हें सांकडें ?
देवानेंच जयास पुष्पहृदयीं खेळावया निर्मिलें
त्याला अन्य कृती रुचेल कुठुनी प्राणा जरी घेतलें ! ३

बोला " चंचल हा क्षणांत गगनीं धांवे क्षणें भूवरी
ठायीं एक कदापि हा न गवसे ही वृत्ति नाहीं बरी; "
हासा मानुनिया निरर्थ मम हो ह्या गोड गुंजारवा
विश्वेशा स्मरुनी फुलांत रमतों भीतों न मी मानवा ४

फुलवितो अवघ्या जगताप्रती
मज गमे मजसाठिं जगत्पती
मजसमान रसज्ञ नसे कुणी
भ्रमर मी रस सांठवि चाखुनी ५

जाइन सोडुन ह्या जगताला
ठेवुनि हा मधुकोश तुह्मांला
स्वर्गि मला भ्रमरा सुविलोला
दिव्य मिळेल नवी सुममाला ६

टिळक.

[library stamp]

# काव्यरत्नावलि.

## अंक ३ रा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ३ रा.

सुशीलातारुण्यवर्णन. तिचा स्वभाव. दुर्मतिस्वभाववर्णन. दुर्मति व सुशील मृगयेला जातात. थकून एका निर्झराच्या कांठीं बसतात. निर्झराला उद्देशून सुशीलेचें गायन. दुर्मतीचा दुराचार. सुशीला त्याचा धिःकार करिते. व्याघ्रक्रीडावर्णन. व्याघ्रवध. दुर्मतिपलायन. सुशीला विवाहोत्सव.

दिंडी.

जाति येती दिनयामिनी क्रमानें, । ग्रीष्मवर्षादिक ऋतुहि, त्याप्रमाणें--
काल सत्वरगति जातसे सदाही; । कधीं तद्गति कुंठिता होत नाहीं. १
चारुगात्री विश्वास–जा सुशीला– । होय षोडशवार्षिकी साधुशीला;
करुनि मुग्धदशात्याग सावकाश, । करी यौवनवैभवीं ती विलास. २
सकल अवयवगण पावला प्रसार, । अंगिं यौवनभर दाटला अपार;
जणों अभिनव ती मदनवैजयन्ती– । रूपगर्वित–सुर–सुंदरी--जयन्ती. ३
रूपसीमा ती असितलोलदृष्टी-- । आद्यविधिची जणुं युवतिरत्नसृष्टी,
रमासीतारतिशैलजाभिरामा-- । मदनजीवितसर्वस्वभूत रामा. ४
करुनि सुंदर मृगनाभितिलक भालीं, । सौधशिखरीं बैसतां निशाकालीं,
हर्ष होई अत्यन्त चकोरांतें; । गमे ओषधिपति उगवला नरांतें. ५
त्रस्तहरिणीपरि दृष्टि तिची लोला, । नसे कांहीं उपमेय तत्कपोलां,
सोनचांफ्याची कळी सरळ नासा, । मलयमारुत लाजतो तिच्या श्वासा ! ६

पक्वबिंबासम दिसे अधरदेश, । रुळति वदनावरि कृष्ण कुरळ केश;
कुंदकलिकेसम दिसति रदन तीचे, । बघुन त्यांतें हतगर्व मन रतीचें ! ७
भुजंगासम दिसतसे कुटिलवेणी, । गमे चित्ता वा काय ती त्रिवेणी !
विततभाला लंघुनी, वरुनि भीती. । दूर जाउनियां नासिका उभी ती. ८
हेमकुंभापरि शोभती उरोज, । असति कोमल बहु जेंवि नवसरोज;
तिची बघुनी कटि सिंह वरी रान, । ऊरु कोमल अति कदलिकेसमान. ९
असे केतकसम वर्ण गुणवतीचा, । मत्तकरिणीसम गति--विलास तीचा,
कमलदंडासम असे मृदुलपाणी, । कोकिलेसम मधुमधुर तिची वाणी; १०
जरी झाला विस्तार अवयवांचा, । ठसा उठला तनुवरी अनंगाचा,
असे निर्मल बहु शुद्ध हृदय तीचें, । तिला व्यापार न विदित रतिपतीचे. ११
तिचे हृदयीं माहात्म्य सद्गुणांचें-- । असे ठसलें शैशवीं पूर्ण साचें;
कुशंकांचा लागला नच कलंक, । नसे शिवला तिस कधीं गर्वपंक-- १२
सदा रामायणभारतादि वाची, । तिला आवड बहु सतीचरित्रांची,
सद्गुणांचा मनिं होतसे विकास, । तिच्या हृदयीं करि शुद्धशील वास. १३
भूमिबाळा, नलसती, शेषकन्या, । उमा, सावित्री, ब्रह्मसुता धन्या,
द्रुपद--कन्या, मंदोदरी, सतींचें-- । चरित पूर्णपणें मनीं वसे तीचे. १४
गमे कन्येतें माय जशी देवी, । सदा जनकातें शुद्धमनें सेवी,
रूपगर्वानें दुखविना कुणाला, । प्रिया होई ती सर्वही जनांला. १५
असे हौस तिला बहुत तरुलतांची, । गृहासन्निध लाविली बाग साची,
कुंद केतक मोगरी जुईजाई, । आवडीनें लाविले निजकरांहीं. १६
भक्तिनिरता ती उठुनि उषःकालीं, । गीत गाउनिया स्तवी भद्रकाली.
जनक--जननीतें नमुनि शुद्धशीला, । नित्य कर्मातें लागते सुशीला. १७
उषःकालीं जाउनी उपवनातें, । सुरभि कुसुमांची रची मालिका ते.
समर्पाया ती वंद्य शिवपदातें, । देइ जनकातें आपल्याचि हातें. १८
घरीं कामाची हौस तिला फार, । मातृसाहाय्या सर्वदा तयार,

सेवकांचा कधिं न करि तिरस्कार, । लोभ सकलांचा तिजवरी अपार. १९
जनकभगिनीसुत करी गृहीं वास, । असे दुर्मति अभिधान हें तयास;
सार्थ अभिधा ती सत्य सत्य त्याची, । त्यास आवड सर्वदा अक्रुयांची. २०
जनक--जननींशीं कलह करी दुष्ट, । सर्व आप्तांशीं वाढवी वितुष्ट.
सदय मातुल विश्वासराय त्यास--। त्वरित समजाउनि आणि निजगृहास. २१
असे दुष्ट खरा महाखलश्रेष्ठ, । करी दुर्वर्तन सर्वदा यथेष्ट;
कलह माजविण्या सर्वदा तयार, । मनीं घोळति अत्यन्त दुर्विचार. २२
करी सकलांचा दुष्टमती हेवा, । गोड वाटे बहु तया यवनसेवा,
जरी भीरु असे खल स्त्रीसमान, । तरी शौर्याचा धरि महाभिमान. २३
चारुगात्री गुणवती पुण्यशीला-- । प्राप्त व्हावी आपणा ती सुशीला.
अशी आकांक्षा अन्तरीं धरीतो, । तिचें हरण्या मन यत्न बहु करीतो; २४
विदित दुर्वर्तन मातुलास त्याचें, । तरि न धिःकारी कधिंहि तया वाचे.
परी दुहितेचें हित कळे तयास, । ह्मणुनि नेच्छी त्यास ती द्यावयास. २५
असे अक्षरशून्य तो दुःस्वभाव, । विदित ज्याला नच किमपि विमलभाव.
कोण इच्छिल आपुली प्रियाबाला. । अशा नरपशुला सुखें द्यावयाला ? २६
सहोदरसम समजुनी मनीं त्याला, । प्रेम त्याच्यावरि बहुत धरी बाला,
अनभ्यस्ता ती मदनगत--विकारां, । हेतु त्याचा नच कळे तिला सारा. २७
असे दुर्मति तो महा दुराचार, । नसे तीतें अल्पही हा विचार.
सद्गुणांची जी मूस असे खास, । करिल दुष्टासह काय ती निवास. २८
बघुनि नैसर्गिक भाव गुणवतीचे, । गमे त्याला तें प्रेमचिन्ह तीचें,
जात वाढत अनुदिनीं स्मराविकार, । होय कधिं ती प्राप्त हा मनिं विचार. २९
जरी सुकुमारा, शौर्य--धैर्य--शीला, । कुशल अश्वारोहणीं ही सुशीला.
निघे मृगयेतें वनां पित्यासंगें, । घोर समयींहि न धैर्य तिचें भंगे. ३०
पुरुषवेषां परिधान करी तन्वी, । दिसे धैर्यवती जसा शूरधन्वी,
होय लज्जित पाहुनी रूप काम, । तिला शोभे नरवेश तो निकाम ? ३१

प्रवेशुनिया कान्तार परम घोर-- । शूर जेथें पावती भीति थोर,--
चारुगात्री ती अचुक सोडि बाण; । व्याघ्रसिंहादिक पडति गतप्राण. ३२
एकदा ती दुर्मती--सवें बाला-- । निघे मृगया करण्यास काननाला;
मंदमति तो आवेश फार दावी; । काय त्याची वाचालता वदावी !! ३३
घोर कान्तारीं करिति ते प्रवेश, । दूर मागें राहिले जन अशेष;
वाट सोडुनि सेविती आड वाट, । जाय लागुनि तरुलतावली दाट ! ३४
ताल चंपक अश्वत्थ देवदार, । शाल जंबू वट नीप कोविदार,
नभो--मंडळ भेदिती निजशिरांनीं; । सदा वास करी अंधकार रानीं ! ३५
अध्वखेदें जाहले परिश्रान्त, । पथीं स्खलती अश्वही तृषाक्रान्त;
ह्मणुनि वृक्षतलीं सोडिती तयांनें, । बघुनि एका विमलांभ निर्झरातें. ३६
करुनि अमृतोपम मधुर सलिलपान, । सकल निरसुनिया परिश्रमवितान,
तरुच्छायातल सेवुनी निवान्त, । अप्सरेपरि ती मधुर गीत गात. ३७

" निर्झरास "

" तुझें ऐकुनि हें मधुरगान कानीं; । अहा ! लाजावें दिव्य गायकांनीं !
कुठें गायन शिकलास निर्झरा ! तें ? । सदा मोहित जें करितसे नरांतें, ३८
काय करिते मधुगान ऊर्वशी ते, । निबिड वनिं या वश कराया वशीतें.
गान गायन--विद्या--विशारदानें-- । काय अथवा मांडिलें नारदानें ! ३९
काय दिव्यस्त्री वादन--प्रवीणा-- । वाजवीते अनुपमा दिव्य वीणा ?
काय सुस्वरता मूर्तिमती रानीं-- । वाजवी ही स्वर्गीय सुस्वरांनीं ? ४०
मोह पाडी स्वर्गस्थ देवतांतें, । तेंवि सर्वहि विपिनस्थ तरुलतांतें,
रमे गानप्रिय हृदय कुरंगांचें, । डोलती हे गण तेंवि भुजंगांचे. ४१
स्वरब्रह्मीं खगसंघ लीन सारा, । जाय जगताचा विसरुनी पसारा !
खचित मोठें भाग्य या तरुवरांचें ! । घडे ज्यास सदा श्रवण सुस्वरांचें. " ४२
ऐकुनी हें मधुमधुर गीत कानीं, । रम्य मूर्ति तिची बघुनि लोचनांनीं,
होय चंचलवृत्ति तो दुष्ट फार, । जाइ विसरुनि सर्वही नयाचार. ४३

करूं लागे तन्मूर्ति मनिं विहार, । कुसुमसायक तो करितसे प्रहार,
सोडुनीया सर्वही सद्विचार, । वचन बोलतसे नीच दुराचार. ४४
" परम सुंदर तव पाहुनियां काय, । मदनतापार्ता तनु न होय काय ?
सुरतवारिदवर्षाव करुनि बाले ! । शान्त करिं गे ! तो सुतनु ! अचिरकालें. ४५
असे निर्जन एकान्त वन सुरेख, । सर्व परिजन राहिले दूर देख,
करुनि नानापरि शशिमुखी ! विहार, । शान्त करुं या प्रबल हा स्मरविकार. ४६
तुला तातानें योजिलें मदर्थ, । धरिशि शंका मग मनीं तूं किमर्थ ?
पाप नाहीं यामध्यें लेशमात्र; । तव प्रेमातें काय मी न पात्र ? " ४७
ऐकुनी ती अविनयान्विता वाणी, । होय विस्मित अत्यन्त रूपखाणी;
मनीं सुमतीतें बहुत कोप आला; । किमपि बाहेर न दावि परि तयाला. ४८
महा कुमती हा श्रेष्ठ दुर्जनांत, । असें हरिणाक्षी समजली मनांत;
देइ उत्तर बोलुनी मधुर वाणी, । खलातेंही दुखविना रूपखाणी. ४९
" काय वदसी हें सोडुनी नयातें ? । कसें कथिसी दुष्कृत्य करायातें ?
असें भगिनी मी तुझी बंधुराया ! । कसें कथिसी दुष्कृत्य मज कराया ! ! ५०
शील नाजुक युवतिचें फार आहे, । भिदुर ज्यापरि बिसतंतु सख्या ! पाहें;
भ्रष्ट होतां तें पहा एकवार, । फिरुनि त्याची दुर्लभा प्राप्ति फार ! ५१
करी एकान्तीं जन अकार्य लोकीं, । सर्वसाक्षी परि ईश तें विलोकीं;
बंधुराया ! अविचार सर्व सोडीं, । दुष्ट मदनाचा पाशबंध तोडीं. ५२
असे रात्रिचरी कामवासना ही, । दुष्ट लोकीं इजपरी अन्य नाहीं !
सुरां असुरां ही घालि मोहपाश, । धैर्य--शस्त्रें तूं करिं तिचा विनाश. ५३
श्रेष्ठ मनुजातें जगीं शुद्धशील, । न तें प्राणान्तीं साधु सोडितील;
तरी कथितें तुज सोडिं दुष्पथातें, । कुधी अविचारें जाति विनाशातें. " ५४
गमे वच तें विषतुल्य तन्मनाला, । बोध करणें व्यर्थ हो ! दुर्जनाला;
खलाचा स्त्री धिःकार जरि करीत, । तरी कामेच्छा अधिक तो वरीत, ५५
करायातें इच्छि तो बलात्कार; । काय झाला इतुक्यांत चमत्कार !

घोर त्याच्या गर्जना पडे कानीं, । उठे घोरतम प्रतिनिनाद रानीं. ५६
वसति यन्नेत्रं प्रखर शिखिज्वाला, । अन्तकापरि यन्मुखदरी विशाला,
निशितदंष्ट्रा अशनीस लाजवीत, । दिसे जिव्हा आरक्त लळलळीत ! ५७
नखाघातें करि महाशिला चूर्ण, । पुच्छ हलवी उभवुनी सटा पूर्ण;
अन्तकोपम गर्जना करुनि थोर, । व्याघ्र नगिं करि उत्पात केलि घोर ! ५८
बघुनि त्यातें तो भीरु करी काय-- । उच्चवृक्षशिरीं त्वरित चढुनि जाय !
व्याघ्र वळवुनिया दृष्टि जों पहात, । चारुगात्री ती पडे दृक्पथांत. ५९
भीतिविरहित ती पाहतसे बाला, । अंगिं तीच्या आवेश फार आला;
क्षणामध्यें ती सज्ज करी चाप, । दावि धैर्यवती अपूर्व प्रताप ! ! ६०
व्याघ्र कोपें तिजवरी उडी घाली, । परी सुमुखी ती नाहिं मनीं भ्याली;
त्वरित सोडुनि त्यावरी प्रखर बाण, । क्षणामध्यें करि तया गतप्राण. ६१
होय लज्जित निस्तेज मुख खलाचें, । शद्व अझुनीही वदवती न वाचे;
सर्व परिजन इतुक्यांत तेथ आले, । व्याघ्र बघुनी आश्चर्यचकित झाले. ६२
दुर्मती तो ओशाळला मनांत, । हंसे परिजनही त्यास आपसांत,
गृहा सर्वहि ते चालले मिळून, । दूर राहे तो कांहिं मिष करून. ६३
होय लज्जाकुल दुष्टबुद्धि फार, । यवनदेशा चालला दुराचार;
बरी वाटतसे तया यवन-सेवा; । कशाला हे जन्मले दुष्ट? देवा ! ६४
पाहुनीया तो व्याघ्र महा घोर, । राव मानी आश्चर्य मनीं थोर;
दुर्मतीचा ऐकुनी दुराचार, । कृतान्तापरि कोपला राव फार. ६५
" दुग्ध घालुनिया वाढविला साप, । तसा वाटे तो मला महा-पाप,
करिन शासन मी घोर दुर्जनास, । उचित त्याचा मद्गृहीं नच निवास. ६६
परी दुष्टें नच वदन दावियेलें, । यवनदेशा तत्काळ गमन केलें,
असे रायाचा दुर्निवार कोप, । तरी पावतसे क्रमेंक्रमें लोप. ६७
वदे एकान्तीं सती नृपवरातें, । " असे झाली कन्यका उपवरा ते--
पहावा वर अनुरूप गुणवतीस; " । विनति यापरि ती करी प्रियपतीस. ६८

प्राप्त होइल वर योग्य कसा तीतें ! । हीच चिन्ता सर्वदा नरपतीतें;
भूप धाडी वर शोधण्या जनांस, । फिरे चोहिंकडे स्वयें आसमास. ६९
दैवयोगें नृप ये कुशावतीस, । तिथें सांपडला योग्य नाथ तीस;
असे अधिपति तेथील बहु कुलीन, । तरुण सुंदर भूदेवचरण–लीन. ७०
सुधी गुणशाली धैर्यवान् नितान्त, । गमे शत्रूतें रणीं जणुं कृतान्त;
विलोकुनिया तत्तनु मनोहरा ते, । गमे लज्जा बहु अन्तरीं स्मरातें. ७१
नाम भूपा त्या शोभले प्रताप, । गमे लोकांतें मूर्त तो प्रताप;
सुपथवर्ती तो सकल गुणनिधान, । प्रजा पाळितसे स्वप्रजेसमान. ७२
पाहुनी त्या भूपति प्रतापातें, । होय चित्तीं संतोष बहु नृपातें;
तोच समजुनि अनुरूप कन्यकेला, । लग्ननिश्चय सत्वरीं नृपें केला. ७३
नगर सारें भूषवी भूप–राय, । गमे भूवरि पातलें स्वर्ग काय !
विवाहोत्साहीं भूप–सत्तमानें, । आप्तइष्टांतें निमंत्रिलें मानें. ७४
राव तेव्हां करि थोर उत्सवातें, । आप्त आले सर्वही पहायातें;
कुबेरासम वेंचुनी द्रव्य भारी, । राव लग्नाची करितसे तयारी. ७५
विवाहोत्सव होतसे शुभमुहूर्तीं, । बघुनि पतिची गंभीर रम्य मूर्ति,--
सौख्यनिर्भर जाहली मनीं बाला, । तुष्ट माताही बघुनि जांवयाला. ७६
करी पत्नीसह राय सुतादान, । गळे नयनीं जल, होय मुख म्लान;
कंठ शोकानें जातसे भरून, । शब्द मुळिंही नच निघे मुखांतून ! ७७
निवारुनिया बाष्पोद्गम–प्रवृत्ति, । विवेकानें आवरी शोकवृत्ति;
सुशीलाकर घालुनी तत्करांत, । वदे राव तया बाष्परुद्धकंठ. ७८
“ अहो तुह्मीं सुज्ञ प्रतापराय ? । करूं तुह्मां मी सदुपदेश काय ?
सुताप्रेमास्तव न राहवे स्तब्ध-- । ह्मणुनि कथितों हे तुह्मां चार शब्द. ७९
प्रिया मजला जी जीवितासमान, । असे माझा जी बहिश्चर प्राण,
आज दिधली तूमच्या करीं तीतें; । जपा जीवापरि सदा गुणवतीतें. ८०
प्रीति वाढो जशि शुक्लचंद्रलेखा, । आजपासुनि अर्धांग इला लेखा;

स्वधर्मी रत राहुनी सर्वकाळ, । सद्गुणांहीं यश मेळवा विशाल. ८१
अंधकारीं ज्यापरी दीपकान्ति, । जेवि नौका ती घोर सागरान्ति,
जमुनि येतां रिपु त्रिविधशक्ति जैशी, । तुह्मां होवो ही भवार्णवीं तैशी. ८२
जगन्नायक दीर्घायु तुह्मां देवो, । अशिव संतत सर्वही लया नेवो,
पुत्र जन्मुनिया वंश उदय पावो, । विमल तुमचें यश दिगंतरीं जावो. " ८३
होय लज्जाकुल तो प्रतापराय, । स्तब्ध राहे नच वचन वदे काय;
प्रफुल्लानन पाहुनी जांवयातें, । समाधान मनीं होय राजयातें. ८४
तरुण सुंदर पाहुनी जांवयाला, । आप्तइष्टां आनंद फार झाला.
सुशीलेचें वर्णिती भाग्य सर्व, । सर्व लोकांतें होय हर्ष–पर्व. ८५
करी त्याकाळीं महोत्साह भूप; । दान देई याचकांतें अमूप;
आप्त--इष्टा तोषवी वसन--दानें, । मुदुक्तीनें, त्यापरी षड्रसान्नें. ८६
देइ जामाता बहुत आंदणातें; । देशपट्टनभूषणां कंकणातें,
पुत्रभूता एकली प्रियसुता ते; । राज्य सारें अर्पिलें तिला तातें. ८७

श्लोक.

होत उत्सव असा दिन चार,
वेंचिलें धनदसें धनपार;
तोषवी नरपती सकलांला,
वर्णिती सकलही नरपाला. ८८

सर्ग तिसरा समाप्त.

——————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## सद्बोधशतक.

श्लोक.

गर्वाढ्य--मागध–धराधर--दीप--पात्र,
आयुष्य तैल असु पंचहि ज्योति पात्र,

भीम--प्रभंजन हरि--व्यजनें प्रदीप्त,--
पाडी बळें उलथुनी; " व्यसनीं न आप्त. " २६

" शालीनता जगतिं भूषण बा नरांशीं--
देते. अमूप, तितकें न सुवर्ण--राशी;
यासाठिं रे ! सतत तूं विनतासु राहें;
बा ! मानिता निजमनीं गणिं कीं सुरा हे. " २७

एकाकि पुष्ट बहु थोर किती विशाल,
तुंगाग्र यद्गगनचुंबित हा रसाल.
वात्याबळें खिळखिळा परि केंवि झाला ?
हा जीवदीपक जणूं गमतें विझाला ! २८

गेली विरोनि तळिची जळिं मृत्तिका ही,
नाहीं तयांत उरला बघ राम कांहीं;
पाळें मुळें जलरयें उघडीं कसा ही,
आघात हा तरु गमे लवही न साही. २९

झाला किती विकल हा नुरला अवांका,
नेणार या न वद ही सरिता अवा कां ?
बा ! प्रावृटीं सुसरिता जधिं कीं फुगे हीं,
जाईल या तरु--तरींत बसूनि गेहीं. ३०

धिःकारुनी निजजनां तरु येथ राही,--
गर्वें, ह्मणोनि बघ या स्थिति ये थरा ही;
येतील ओखट अतां दिन भूमिजास,
याची टिकेल वद कां मग ही मिजास ? ३१

एकी वरा तरु खरा अभिमान--राशी,--
बेकी नको असुखदा; शिकवी नरांशीं.

पाहीं सख्या ! तुजसमोरहि शिक्षणास--
दे तो, मनीं धरिं न घालविं बा ! क्षणास. ३२

केली सुखी भरत--भू--जननी शिवा जी,
म्लेंच्छासि मारुनि जयें नृप तो शिवाजी,--
एकीबळेंचि चढला सुयशोनगातें;
कीर्ति प्रचंड जग आज ह्मणोन गातें. ३३

आला स--सैन्य गिजनी--नृपराज घोरी,
केला विडंब न मिती अति तो अघोरी !
आलें मुळीं न यश तैं नृप--पृथ्विराजा.
एकीविना विफलता जगिं जाण काजा. ३४

पाणीपताख्य--समरांत सदाशिवानें--
आली अकीर्ति जगतींत सदाऽशिवा ते;
होता न भ्याड भट तो समरीं खचीत,--
केलें न कां मग तयें यवनांस चीत ? ३५

बेबंद सैनिक जरी जय सांग राया--
लाभेल केंवि ? युवती मग गांगराया--
लावील त्यांस; तरु हा शिकवी जनांस;
एवंच ऐक्य नसतां जगिं सर्व नास. ३६

तैसाच आम्रतरु हा बघ बा ! कसा ही--
शीतोष्ण वा सलिलवृष्टि अनेक साही,
छायाबळें पथिक--दुःखद--ताप सारे--
वारी क्षणांत न सख्या जुळितां पसा रे ! ३७

राहोनि निश्चल उभा पुलिनीं तपाया,
बाहे जनांस गमतें नर हो ! तपा या;

'आहेत दुःखद जगीं सगळे पसारे;'
हें तूं नरां शिकविसी तरु--तापसा रे ! ३८

पाहीं परार्थ तरु हा झिजवी वपूस;
लाभे तयास सुख कां ? लव यांत पूस.
भासे गड्या ! सुजन हा मजला वदान्य;
ऐसा जगांत असल्यासहि तूं वदान्य. ३९

अन्यार्थ हा निज--सुजीवित हीन लेखी,
त्याचें चरित्र लिहवे मजही न लेखीं;
वृक्षादनी नवलता मिरवून देहीं,
पोशी तिला निजरसें; सुख त्या न दे ही. ४०

पाहीं नवीन दुसरी इकडे मजा बा !
कां गुंग त्यांत इतुका वद कांहि जाबा.
ज्यातें दिलें निजतळीं विटपें सहाय,
तो पांथ हा कृति करी विपरीत हाय ! ४१

नाहीं दया लवहि कां ? वद त्या कसाबा,
हाणी फलार्थ तरुतें स्वकरें कसा बा !--
पाषाण; रीत असली बहु उत्तमा ही !
हा ! हंत ! आवृत धरा बनली तमांहीं ! ! ४२

निर्लज्ज पांथ जरि हा सुतरूपकारा--
फेडी गड्या ! करुनिया उलट्या प्रकारा,
मारी वरी उपलही तरि हा रसाल--
देई तयास बघ कीं सुफलें रसाल. ४३

हा आम्र जें शिकवि तें पुढतीं असों दे,
सर्वत्र कीं पसरले जगिं लोक सोदे,

फेडीं गड्या ! सतत ते अपकार; बाकी--
ठेवीं न तूं; करुनिया उपकार बा ! कीं. ४४

व्यापार--हेतु पुढतीं करुनी जधीं रे !
ते म्लेंच्छ कीं प्रकटले बघ येथ धीरे;
आतिथ्य--तत्पर--नृपें दिधला तदा त्या--
आधार; हेंच नच कां ? वद योग्य दात्या. ४५

पांथासमा मग तयें करणीस सांग,
केलें न काय कथि हें इतिहास सांग;
ज्यानें दिलें सदन तो नृप मोकलीला--
म्लेंच्छें; कसा सुनय ! पाहिं नमो कलीला ! ! ४६

तात्पर्य हा तुज धडा विटपें दिला जो--
होता स्मृती--विगत तो तव चित्त लाजो,
केला अपाय जरि कोणि तुला न ज्याला,
फेडीं करोनि तरुशी उपकार--माला. ४७

तैशीच ही नव--लता नयनाभिरामा,
भासे मला न लतिका परि रम्य रामा;
शाखा न या परि सुकोमल बाहु दोन,
आरक्त विद्रुम न हे परि ओष्ठ जाण. ४८

हे रम्य पल्लव गड्या ! दिसती तुला जे,
ज्यातें बघोनि गमतें शुक चित्तिं लाजे;
तीं हीं दलें न हिरव्या परि पाटवातें--
नेसोनि बा ! युवति ही भुलवी धवातें. ४९

हे ! मित्र ! तूं सितसुमें ह्मणसी जयांसी,
तैसीं न तीं दिसति रे ! बघ आज वासी;

शालूवरी विणियला कशिदा नवा ही-
वाटे न लभ्य असला सुरदानवांही १०

———————— अनंततनय.

## समुद्र.

### श्लोक.

विस्ताराला बघुनि तुझिया बा! समुद्रा! अपारा!
आनंदानें मनिं नर करूं जाय जों जों विचारा,
तों तों वाढे अधिक हृदयीं कल्पनेचा पसारा;
बुद्धी होते चकित, कुतुकें गुंगतो तो बिचारा. १

जन्मा येती प्रथम जगतीं वंश जे मानवाचे,
यत्नें होती प्रथित, चढती पर्वतीं वैभवाचे.
कालें तेही पवति विलया होउनी नामशेष;
वास्तव्याचें नच उरतसे चिन्ह त्यांच्या विशेष. २

अब्धे! तैशा अमितलहरी त्वज्जलीं जन्मताती,
वाढोनी त्या द्रुततर नरा भीतितें अर्पिताती.
जाती त्याही सकल विलया; अल्पकाळें तयांची-
राहेना हे मग जलनिधे! एकही खूण साची. ३

होते जेव्हां निकट वसती वैर तेव्हां करीती,
देशांची ही समजुनि मनीं अंबुधे! दुष्टरीती,
त्यांमध्यें तूं वसुनि करिशी त्यांजला दूरदूर.
त्यामाजीही किति तरि तुझा बा! असे सद्विचार! ४

ज्या ज्या देशीं रुचिर, बहुसे होति जे जे पदार्थ,
ते ते नेती इतर विषयीं आपुलाल्या सुखार्थ.

त्यायोगानें अखिलभुवनाला कलाकौशलाची,–
संपत्तीची, भरभर तशी ठेव लाभे सुखाची. ५

हेतू बा ! तूं खचित असशी आमुच्या या सुखाचा;
साहाय्या तूं मुळिंच नसतां लाभ होता कशाचा ?
जावें नावेवरि बसुनिया उद्यमा अन्य देशीं–
भो ! अंभोधे ! तुजमधुनिया तेधवां सौख्य देशी. ६

सांठा मोठा असशि उदधे ! तूं जलाचा अहाहा !
चंडांशू तो दशशतकरीं तीव्र तापोनि पाहा,–
आकर्षीतो तव पय; पुढें मेघ होती तयाचे,
वर्षोनी ते दिवस सकलां दाखवीती सुखाचे. ७

बा ! वाराशे ! दिसति तुझिया पृष्ठभागावरील–
देखावे जे विविध; गणती कोण त्यांची करील ?
त्वद्वैचित्र्या कथन करितां गीष्पती तोहि मूक–
व्हावा. तेव्हां किति जडमती तेथ हा एक रंक ? ८

केव्हां केव्हां अवचित निधे ! बंद होऊन वारा,--
विस्ताराचा अविचल तुझ्या होतसे प्रांत सारा.
तेव्हां तेव्हां दिसशि जलधे ! शांत योग्यासमान.
शांतीचें तें तुजविण नसे वाटतें स्थान आन ! ९

रौप्याचेंची जणुं कवच तें लेवुनीया शुभांगीं,
भानू जेव्हां उदयगिरिच्या वेंघतां होय शृंगीं;
तेव्हांचें तें क्षितिज तुझिया बिंबुनीया पयांत--
शोभा ये, ते नच वदवते मी असें अज्ञ यांत. १०

अस्ता जाई दिनकर जईं स्वर्णवर्णी दिनांतीं,
कांती त्याची रुचिरतरशी अंबरा भूषवी ती;

बिंबोनी तें त्वदचल जल स्वीकरी रम्यवर्णा;
त्या वर्णानें वद सुखविलें बा ! नसे सांग कोणा ? ११

सान्या ऐशा लखवुनि कधीं अर्णवा ! सौम्यरूपां,
उग्रा रूपा धरिशि; कथवे दुःस्थिती ती न बापा !
तेव्हां मृत्यू तुजवरि बळें गाजवी आधिपत्य;
देखायाला तुज भयकरा कोणता मर्त्य शक्त ? १२

जेव्हां काळे ढग पसरुनी गाढ अंधार होतो;
सोसाट्याचा प्रबळ सुटतो वायु जेव्हां अहो ! तो;
होऊं पाहे त्वदुदधि जई हे ! पयोधे ! तुफान;
प्राण्यांचें तैं नवल न हरे बा ! जरी देहभान. १३

सिंधो ! येती तुजसि लहरी जेधवां कां विशाला ?
भेटों जाती सहजचि जणों त्या नभोमंडलाला;
तेव्हां वाटे अजि खवळला सिंधुरूपें कृतांत;
त्यावांचोनी कुठुनि तुज ये शक्ति ऐशी नितांत ? १४

ऐशा वेळीं प्रतिहत असा दैवयोगें खलाशी—
सोडोनी ये तुजमधिं गृहीं अंगनेशी मुलाशी;
यत्ना योजी बहुपरि, परी सर्व तज्जीवनाशा--
नाशा पावे, प्रभुसि ह्मणुनी तो स्मरे विघ्ननाशा. १५

पूर्वी जें जें सुख वितरिलें त्यास तूं आज तें तें--
ध्यानीं आणी, पुनरपि करी शोक तो भग्नचेतें;
आप्तेष्टादी गृहिं समजुनी त्याचिया संकटानें--
हा ! हा ! हा ! या भरविति मही दुःखदायी रवानें. १६

याहूनीया कठिनतर ती कल्पनातीत वेळ--
कल्पांतांची मनसि गमतें घोर भारी असेल !

तेव्हां सीमा, उदक, लहरी यांजमध्यें प्रमाण--
राहे कैसें ? कळतचि नसे त्यांत आह्मी अजाण. १७

त्या काळाचें स्मरण करणेंही मना आवडेना,
नोहे ! नोहे ! पण शुभ तसा काळही सांपडेना !
सर्वांचाही लय करितसे एकदा काळ जेव्हां--
तेव्हां कैसा असुखद मना सांग कल्पांत व्हावा ? १८

अब्धे ! पृष्ठावरिलचि तुझ्या हे चमत्कार होत;
जाणूं केवी विपुल असती वस्तु ज्या ज्या तुझ्यांत !
बा रे ! आहे तव तळवटीं राज्य विस्तीर्ण भारी;
तेथींची जी स्थिति खचित ती जाण अज्ञेय सारी. १९

तेथें कोठें गुरुतरशिला, कंदरें भव्य कोठें,
त्यामाझारीं असतिल कुठें यादही मोठमोठे;
उद्भिज्जेंही असतिल; असे हे चमत्कार नाना--
जाणायाचें बल लव तरी सागरा ! सांग कोणा ? २०

रत्नांचा तूं असशि जनिता, यामुळें तूंत देख--
रत्नागारा ! रुचिर असल्या वस्तु होती कितीक;
त्यांची कोणासहि न गणना होय रत्नाकरा ! हे !
पाहे सारें तव तल असा भूतलीं कोण आहे ? २१

या रीतीनें पुढतपुढतीं चालवीतां विचार--
कुंठे बुद्धी, जणु तिजपुढें दाटला अंधकार;
नाना गोष्टींतुनि पण तझ्या सागरा ! सार एक--
हातां येतें सहज भरतीओहटींचा विवेक. २२

येती अब्धे ! तुजसि भरती ओहटी योग्यकालीं;
होतीना त्या बदलुनि कधीं आजवेरी अकालीं;

नाहीं पाहीं खळहि पडला आजवेरी तयांला;
ही मर्यादा तुज जलनिधे ! राम देता जहाला. २३

मोठा उच्छृंखळ सबळही भूवरी वारिधे ! तूं;
वर्त्तायाला नियमित तुला राम लावी परंतु.
निर्मोनीया तुज भुजबलें बद्ध केलें जयानें,
त्या श्रीरामा प्रणति करितों पातकां जो लया ने. २४

कर्ता आहे विदित सकलां जो समुद्रादिकांला,
यद्भक्तीचा सुलभ कथिला मार्ग संसारिकांला,
त्याचें वाचे अघहर सदा नाम यो राघवाचें;
तद्भक्तीनें सुखद तरणें हो भवा अर्णवाचें. २५

भृंग.

---

Mrs. Browning's
Sonnets from the Portuguese.

## फिरंग्यांचें संगीत.

"I thought once how Theocritus had sung
Of the sweet years, the dear and wished-for years."

साक्या.

वृद्ध असो वा तरुण असो त्या मर्त्यालागीं अर्पी
उदार हस्तें नित्य नवीनें उपायनें संतर्पी १
ज्याला त्याला हवेंहवेंसें वाटे वय जें त्याचें
वर्णन केलें कविनें एका दिसलें तें मज साचें २
त्या कविच्या ह्या सरस गायनें नादविलें मज होतें
उभें राहिलें माझ्यापुढतीं माझेंही वय हो तें ३
वर्षामागुन वर्ष तयाचें मधुर परी कोमजल्या

फुलाप्रमाणें पुढें पाहुनी माझ्या वृत्ती थिजल्या ४
अश्रुपूर्ण मम नयनांना त्या जशा सावल्या दिसल्या
एकामागुन एक हृदीं मम जाउन साऱ्या वुसल्या ५
प्रकाश तेथिल मावळला मग अंधकार हो सारा
झाला मजला हा विश्वाचा अवघा शून्य पसारा ६
रडूं कोसळे मला तों पहा कुणी तरी मागोनी
हळूच येउन मला ओढिलें धरून माझी वेणी ७
दचकुन आतां सुटावयाचा प्रयत्न मी करणार
इतुक्यामध्यें शब्द ऐकिले कोमल मोहक फार ८
" सांग बघूं तुज कोणीं धरिलें ? " " मृत्यूनें ! " मीं वदलें
" नाहीं वेड्ये ! प्रेमें धरिलें ! " ऐसें उत्तर आलें ! ९

टिळक.

---

## विरहो.

पद.

चाल-- " कधिं करिती लग्न० "

वदवेना मला लागे हुरहुर जी तुजमुळें ॥ ध्रु० ॥
चालतों बोलतों घरीं
हासतों वरी-- अंतरीं परी
अश्रु वेल्हाळे ! विरहानें तव गळे. १

तव सहवासीं जे दिन
वाटले क्षण, ते युगाहुन
दीर्घतर झाले. नवल असें वर्तलें. २

नाहींस रूपशालिनी

परी गुणखनी प्रेमरूपिणी
गुणें प्रिय झालें, रूप तुझें सावळें. ३
तव अकपट प्रेमळ हसें
अंतरीं ठसे. बोल गोडसे
श्रुतीचीं पाळें, होउनिया बैसले. ४
तव हालचाल लाडकी
आठवुनि सखी एकसारखी
जड क्षण झाले, कंठितसें प्रेमळे ! ५
होईल कधीं दर्शन
दृढालिंगन प्रेमचुंबन
चिंतनीं दोले-- मन घेऊं लागलें. ६
अलि असतों तर बैसुनी
वायुवाहनीं, गात येउनी
तुला वनमाळे ! असतें मीं चुंबिलें. ७
परी दुबळी मानवकुडी
व्यर्थ बापडी तियेची उडी
बेत केलेले, सर्व कुणा साधले. ८

विनायक.

---

## माझीं फुलें काय झालीं.

श्लोक.

माझा मान, मदीय कीर्ति, मम हा संसार, हें जीवित,
विद्या, विक्रम, सर्व शर्म, जगतीं ज्यांच्याच हस्तंगत
त्यांच्या पूज्य पदारविंदयुगलीं भूदैवतांच्या मम
माझीं मीं निवडून अर्पिलिं फुलें अत्यंत चित्तंगम. १

खालीं जीं उरलीं तयांतुन भलीं वेंचून मीं घेतलीं
गात्रें हार तुरे करून अपुलीं सानंद शृंगारिलीं;
झालीं सर्व फुलें; उगाच उरला जो गाळ हो खालतीं
त्यानें मीं समजाविले न गणती ते भीक मागे किती ! २

झालीं कांहिं विशीर्ण, कीं हरवलीं, चोरीस गेलीं किती,
कांहीं मूर्खपणें दिलीं अरसिकां साक्षाद्विनाशांप्रती !
कांहीं मत्सररौरवांत पडलीं तद्रूपता पावलीं
देवा ! त्वच्चरणांस वाहुं कुठलीं ? झालीं, फुलें संपलीं ! ३

झालों वृद्ध, अतां कसा फिरुं कुठें आणूं फुलें कोठुनी.
अर्पाया तुज ईश्वरा ? विसरलों पापी तुला यौवनीं !
घे ! घे ! एक मनःप्रसून उरलें ह्या देहपात्रासह !
वाटो हें तुज वत्सला ! प्रभुवरा ! अत्यंत सौख्यावह. ४

टिळक.

---

## विलक्षण भांडण.

### श्लोक.

मित्रास एक मुलगा वदतो " पहा रे !
आकाश शाद्वल जरी मम होय सारें
मी केवढा तरि धनी जगतांत व्हावें
कोण्या नृपें मग मला सरिसा गणावें ? " १

ऐकून हें वचन अन्य कुमार बोले--
" तारे जरी वृषभ हे मम सर्व झाले
होईन मी तुजहुनी बहु थोर लोकीं
आधीं मला मग तुला जग हें विलोकी " २

" कोठें परंतु चरतील पशु त्वदीय
ठेवूं न देइन तया तृणभूत पाय
अंतीं मलाच सखया ! विकशील बैल
कां तूं उगाच वदशी तरि फोल बोल ?" ३

बोले असें तृणधरेश वृषाधिपाला
ऐकून तें सहज त्याप्रति कोप आला
माजे महा कलह हो अपशद्ववृष्टी
ते लागले वितरण्या घनघोर मुष्टी ! ४

टिळक.

---

## देह-तरी

### श्लोक.

अमित दुःखद हा भवसागर । गमतसे सकलां बहु दुस्तर
मगरि षड्रिपु हेच भयंकर । सतत संचरतात गरागर १
खडक अद्रिसमान मधें उभे । बघुनि ज्यांप्रति वाटत फार भें
बहुपरी व्यसनें भवि पातती । खडक तीं समजो तुमची मती २
विषयनीर अपार उचंबळे । उठति पर्वतशा लहरी बळें
करिति तेंवि भयंकर गर्जना । भिववि रूप भयानक तें जनां ३
गमनहेतु दुज्या तिरिं अंतरीं । धरुनि, मानवदेहचि ही तरी
ढकलली भयदा भवसागरीं । परतिरा कशि गांठिल ती परी ४
बसुनि मानव-देह-तरींत हा । गमन जीव करीत असे पहा
विषयनीर तयाप्रति भीति दे । तरुनि जाइन केंवि असें वदे ५
भवजलीं जरि नाव अशी फिरे । परि समर्थ न ती तरण्या बरें !
खचित कर्म-मरुत् भव-जीवनीं । तिज बळें बुडवील पहा क्षणीं ६
खालतीं तिज पहा नउ छिद्रें । थोरलीं असति जाण अभद्रें

आंत येइल तयांतुनि नीर । सां । गांठिल कशी पर तीर ७
नासिका श्रवण नेत्र मुखादि । इंद्रियें नउ पहा मनिं आधीं
हीं नऊ नरतरूप्रति छिद्रें । हींच आणिति सदैव अभद्रें ८
आंत ये विषयनीर अपार । जाय नाव कशि यांतुनि पार
बंद सत्वर करा नउ भोंकें । दूर होतिल तरी मग धोके ९
इंद्रियें विषयलंपट हो तीं । दुःखमूल मनुजाप्रति होती
आवरी सकल इंद्रियवृंद । संयमें जगिं तुटे भवबंध १०
स्पर्श शद्ब रस रूपहि गंध । जीं नरा करिति सत्वर अंध
तीं जरी क्षणिक देति सुखातें । दुःखदायक अनित्य पहा तें ११
इंद्रियें विषयभोग करीती । त्यांत सौख्य नच; दुःखचि अंतीं
त्यांत सौख्य जवमात्र नरास । कोंसळे व्यसनपर्वत खास १२
इंद्रियें सकलही मनुजा रे ! । आवरीं; हरिपदाप्रति जा रे !
अंतरीं दृढ धरीं प्रभु--मूर्ती । भक्तिनें प्रभुसि आळविं चित्तीं १३
तरावयातें भवसागराला । प्रार्थीं सदा त्या करुणाकराला
तो सच्चिदानंद करी कृपेतें । नारायणातें करिं वंदनातें १४

भ्रमर.

---

## हा-तो.

### श्लोक.

हा श्रीविलासांत सदैव लोळे, । तो नित्य दारिद्र्यदशाच सोशी;
हा या जगीं मात्र खरा दरिद्री; । तो ?— तो सदा श्रीसुख भोगणारा ! १
हा मानपानांत निमग्न लोकीं, । तो मात्र निर्माल्य जसा जगांत;
हा मान पावे न कधीं खराच, । तो मान्य, तो पूज्य जगांत होई. २
हा राहतो भीम अशा उन्हांत, । तो राहतो शांत घनांधकारीं;
हा राहतो घोर घनांधकारीं, । तो ?— तो सदा दिव्य अशा प्रकाशीं. ३

हा केंद्र जेथें मिळतात सौख्यें, । तो केंद्र तीं जेथुनि फांकतात;
हा केंद्रबिंदूकृत सौख्य, दुःखी । तो ?—वोपुनी तीं सुख नित्य भोगी. ४
हा वांचतो शंभर पूर्ण वर्षें, । तो वांचतो मात्र दहाच सारीं;
हा वांचतो शंभरही पळें न, । तो वांचतो कोटि दहाहि वर्षें. ५
हा तातदारापरिवारयुक्त ! । तो एकला, कोण जगीं तयास ?
हा एकला, या घर कोठचें तें ? । तो ? मग्न गेहीं—वसुधाकुटुंबी. ६
हा पाहतो दूर सभोंवतालीं, । तो ?--तो स्वतालाच सदैव पाही;
हा पाहतां सन्निधही बघेना, । तो पार पाही क्षितिजाचियेही ! ७
हा जिंकितो दुर्बलशा सहस्रां, । तो जिंकितोही !—प्रबलास एक्या;
हा सर्व जिंकोनिहि जिंकिलेला, । तो जिंकुनी एक, सदा यशस्वी. ८
हा कोण ? तो कोण ? कळे तुला का ? । कळावयाची तरि काय इच्छा ?
याला महालांत पहा नृपाच्या, । जा—शोध त्यालाहि कुठें दऱ्यांत ! ९

क्ष--कवि.

---

## गृहिणीचे अलंकार.

### पद.

[ चाल--दांडगी झाल्यें० ]

भूषणें ल्याली इतुकी संपन्न
म्हणतो कवण तिला दीन ?
अंगभर शालू बघतां विनयाचा
फिटतसे पांग नयनाचा ! १
स्वाभिमानाची नथ सरजेदार
साजे नाकीं अनिवार !
पातिव्रत्याचें गळां पहा तेजें
मंगळसूत्र झळाळे जें ! २

भोंवतीं त्याच्या सुजन भीतीची
लढशी सरी खुले साची !
शीरोभागातें सुजविती रुचिर
सत्कीर्तिचे अलंकार ! ३

तळपती कर्णीं कर्णफुलें छान
सतीचरितामृतश्रवण !
कतिरतसे हृदय--देशीं वास्तव्य
तन्मणि प्रीतीचा दिव्य ! ४

धवल भुजदंड वेष्टिले दोन्ही
यशाच्या बाजूबंदांनीं !
मनगटीं तळपे कंकणसंभार
औदार्याचा तेजदार ! ५

अंगुलीवरची कुशलता पूर्ण
मुद्रिका निववितें स्वमन !
कटितटीं शोभे पट्टा धैर्याचा
दैदिप्यमान जो साचा ! ६

रुळति स्वच्छंद उभय चरणीं तैशा
संसारशृंखला जडशा !
हेच अलंकार गृहिणिला उचित
इहपरीं त्यावया सत्य !
लोभ त्या धरुनी व्यर्थ नश्वरांचा
वाहती भार ओझ्यांचा. ७

—————— राजहंस ऊर्फ एंजिनियर वावीकर.

# काव्यरत्नावलि.

अंक ४ था.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ४ था.

प्राचीन आर्यवैभवाचें वर्णन. यवन आर्यभूमींत घुसतात. यवनांनीं केलेला प्रलय. शिवजन्मोत्साह. शिवाजीचें बालपण. शिवाजीचे बालपणीचे विचार. शिवाजी मावळे लोक जमवितो. शिवाजी तोरणा किल्ला घेतो. अफजुल्लखान चाल करून येतो. शिवाजी व अफजुल्लखान यांची भेट. अफजुल्लखानाचा वध. श्लोक.

वर्णूं किती भरतभूगतवैभवातें,
वाटे परा कनकरत्न वसुंधरा ते;
विद्याकलाविभवमंदिर हें विशाल,
आनंदयुक्त वसती जन सर्वकाळ. १

ईक्ष्याकु--जन्हु--ऋतुपर्ण--दिलीप--राम,
दुष्यन्त--पूरु--नल--शन्तनु पुण्यधाम;
भूपाल धर्मनयतत्पर शूर धीर,
निर्वीर भूमितल शासिति ते प्रवीर. २

तारामती नलसती फणिराजकन्या,
तारा विदेहतनया दमयन्ति धन्या;
ऐशा सती निवसती शुचि पुण्यराशी,
यत्कीर्ति पावन करी अधमानरांशीं. ३

आद्यर्षि गाधिज वशिष्ट अगस्त्य अत्रि,
ऐसे महामुनि विभूषविती धरित्री.
शापें शरें नियमुनी खल दुर्जनांतें,
दुष्टाधमा सुपथ दाखविती मदातें. ४

दारिद्र्यदुःख न वसें तिळमात्र येथें,
भोगी प्रजा सकलही सुखसंपदेतें;
पर्जन्य वारि बहु वर्षितसे सुकाळीं,
होई सदैव धरणी फलपाकशाली. ५

लोकांत ऐक्य बहु वास करी सदाही,
कोणी परां न अपकार करी कदाही;
धर्मावरी परम भक्ति सदा तयांची,
सर्वांस आवड खरी बहुधा नयाची. ६

न्यायें प्रजेस परिपाळिति भूमिपाळ,
धर्म–प्रसक्त जन त्यापरि सर्वकाळ;
आत्मप्रजेपरि नृपास गमे प्रजा ते,
त्यांच्या हितां बहुपरी जपती सदा ते. ७

त्यांना नसे विदित पीडनवंचकत्व,
लोकोपकार करणें प्रिय हेंच तत्व;
लोष्ठासमान गणिती परवित्तराशी,
संपत्तिमान् सकलही न उणें कुणाशी. ८

उद्योगसक्त जन सर्व कला–प्रवीण,
नाना प्रयत्न करिती गणिती न शीण;
लोकोत्तरा कृति करून समस्त लोकां,
ते दाविती कुशलता अपुली विलोका. ९

स्त्रीजातिही परम सद्गुणशुद्धशीला,
देवापरी परम पूज्य गणी पतीला;
नानाकला-निपुण ती पुरुषासमान,
अत्यन्त सर्व जन देति तयास मान. १०

तो काल हाय ! सुखदायक जाय सर्व,
आर्यप्रजेस छळि संतत दुःखपर्व;
शौर्यें असंख्य वधिते परकीय वीर,
ते लोपले सुत तिचे रणशूर धीर. ११

देशांत या घुसुनिया यवनौघ हाय !
पीडी जनांस जणु तो सलिलौघ काय.
दाऊन विक्रम महा रणरंग-धीर,
ते ठेविती तनु रणांगणिं आर्यवीर. १२

केली स्वहस्तगत भू सकला तयांनीं,
आर्यप्रजा पळतसे अति घोर रानीं;
उन्मत्त ते बहुपरी छळिती जनातें,
कोणी नसे शरण दुःख हरावयातें. १३

सारी प्रजा बहुपरी अपकार साही,
कोणीहि रक्षक विपत्सम यांस नाहीं;
नेल्या समस्त लुटुनी धनधान्यराशी.
अन्नाविणें सकलही मरती उपाशी. १४

संहारिती उरग ज्यापरि दीन भेकां,
तैसे जनांस खल ते त्यजुनी विवेकां;
रक्तप्रवाह करि हाय ! महीस लाल,
दुःखीं निमग्न जन दुर्धर येइ काल. १५

त्यांच्या मनीं वसतसे बहु धर्मवेडे,
सद्धर्म अप्रिय जसा उलुकां उजेड;
देवालयें अमित मोडुनि पापराशी,
फोडून मूर्ति छळिती खल भूसुरांशीं. १६

मिथ्या असे सकल हें तुमचें पुराण,
सेवा महत्तम असे अमचें कुराण,
ऐसें वदून बहु निंदिति आर्यधर्म,
देती द्विजा कुमति बाटवुनी स्वधर्म. १७

गोविप्रपालक असा भरतांत नाही,
ते दीन सर्व बुडती व्यसन-प्रवाहीं;
म्लेच्छां भिऊन करिती किति आत्मघात,
आसें त्यजून नगरें लपती वनांत. १८

यज्ञोपवीत लपवून निजांबरांत,
भीतीमुळें विचरती गिरिकंदरांत;
संध्यादि कर्महि गमे भय आचराया,
येईल धैर्य हवनादि कसें कराया. ? १९

पाहोनिया नववधू हरिती तयांतें,
त्यांच्यासवें विहरती त्यजुनी नयातें;
त्यांच्या पतीस वधुनी रुधिरें धरा ही,
ते न्हाणिती खल दया न तया जराही. २०

प्रख्यात आर्यभुवनीं रजपूत थोर,
तेही शिरें लववितो यवनांसमोर;
देऊनिया यवनभूपवरा सुतांतें,
त्यांच्यासवें अहह ! जोडिति निंद्य नातें. २१

संहारिती अधम ते निज सोदरांहीं,
तैसेच दुष्ट वधिती जनकांकरांहीं;
वैरानला अधम पेटविती प्रभूत,
लोकक्षया प्रकटले जणुं कालदूत. २२

गोमांसलुब्ध चिरिती किति दीन गाई,
चित्तीं दया न वधिती द्विजबालकांही,
द्वापारिंचे असुर संहरिले रमेशें,
ते काय हो प्रकटले जगिं दुष्ट-वेषें. २३

झाले महाविभव सर्व अहा विनष्ट !
आर्यप्रजा सतत भोगि अपार कष्ट.
पावे स्वधर्म लय होय अपार पाप,
गोविप्र संतत अहा ! करिती विलाप. २४

आली महावनति यापरि आर्यधर्मा,
आपद्गतद्विज न आचरिती स्वकर्मा;
तेव्हां स्वयेंच हर सज्जन उद्धराया,
भूमीवरी अवतरे खल संहराया. २५

श्रीभोसले-कुलकलानिधि जो शहाजी,
त्याची जिजा गुणवती प्रथिता प्रिया जी;
दैवें उमारमण येत तिच्या कुशीला,
केला पवित्र जननें शिवनेरि किल्ला. २६

उत्साह फार जन त्या समयीं करीती,
अत्यन्त तोष निजमानसिं ते वरीती;
धर्मोन्नती करिल हा नरपाल-बाल,
होईल दुष्ट यवनांस रणांत काल. २७

दावीतसे शिशुपणीं बहु बाललीला,
अत्यन्त कौतुक करी जननी सुशीला;
म्लेच्छांस पाहुनि चढे बहु त्यास कोप,
बोले कधीं समरिं देइन यास ताप, २८

गो–विप्र--रक्षण करीन निजप्रतापें,
जे तापले परम अंतरिं दुष्ट--तापें;
नेईन उन्नतिस मी निज आर्यधर्म,
मारीन दुष्ट करुनी रणिं घोर कर्म. २९

रामायणा परिसतां सुख होय त्यातें,
आवेश येत बहु ऐकुनि भारतातें;
रामें रणीं निवटिले असुरोत्तमांतें,
तैसेच मी चिरिन या यवनाधमांतें. ३०

होतांच अष्ट वरुषें तनया तयांस,
नेई पिता निजसमीप विजापुरास;
म्लेच्छाधिपा निकट घेउनि जाइ त्याला,
तों बाल सत्य नें करी मुजरा तयाला; ३१

" हे दुष्ट नीच वधिती बहु गोद्विजातें,
मी निश्चयें नच करी मुजरा तयातें;
यांना वधून रणभूमि करीन लाल, "
बोले असे त्वरित तो जनकास बाल. ३२

ऐकून तें यवनभूप सकोप झाला,
तेणें नृपाळ निज अन्तरिं फार भ्याला;
देतील दुष्ट खल ते बहु ताप त्यास,
ऐसें मनीं गणुनि पाठविलें पुण्यास. ३३

सांगावयास सुविचार--कथा सुतातें,
दादोजितें कथियलें मग शीघ्र ततें;
सद्बोध तो करि सदा बहु राजयास,
जैसा वशिष्ठ मुनि रामरघूत्तमास. ३४

" होईल मुक्त कधिं ही मम आर्यमाता,
हें दैन्य जाइल कधीं विलयास आतां;
केव्हां स्वधर्म परमोन्नतितें वरील, "
ऐसा विचार करि संतत पुण्यशील. ३५

" यद्गर्जितें मृग--समूह मरून जाती,
ज्याला विलोकुनि पळे वनिं भद्रजाती;
ऐसा सदा वसतसे मृगराज जेथें,
हा ! हा ! शिवा कलकला करितात तेथें. ३६

जेथें नृपाल रघुनाथ दिलीप धर्म,
नेती सदाहि परमोन्नतितें स्वधर्म;
युद्धांगणीं प्रकटवून महाप्रताप,
दुष्टां वधून हरिती द्विज--धेनुताप; ३७

तेथेंच हाय ! छळिती खल हे द्विजातें,
उच्छेदिती सकल धर्मपरप्रजांतें.
मी सूर्यवंश्य अवलोकिं सुखें तयातें,
धि:कार सत्य मज धर्मपराङ्मुखातें; ३८

उच्छेदिती सतत हे निजधर्मपाप,
तें पाहुनी किमपि आर्यनृपां न ताप.
होते मृगेशसम जे रणशूर गाजी,
झाले तदीय अजि वंशज षंढ कां जी ? ३९

केला मनांत दृढ निश्चय हाच आतां,
जेव्हां करीन खलमुक्त निजार्यमाता,
जेव्हां चिरीन यवनां रणि वीर्यशाली,
तेव्हांच हें खचित ठेविन शस्त्र खालीं; " ४०

तो मावळ्यांशि करि सख्य महानुभाव,
ज्यांचा असे सरळ निष्कपट स्वभाव.
त्याचा प्रभाव बघुनी समरीं नितान्त,
भीतीमुळें स्वहृदयीं दचके कृतान्त; ४१

कांठी करांत बरि लंगुटि ढुंगणास,
पाठीस घोंगडि न अन्नहि भक्षणास.
बर्च्या करीं प्रखर घेउनि ते सुवीर,
गांठावया रिपुस नित्य रणीं अधीर. ४२

ते वीर सर्व जमवी रणधीर राव,
ज्यांच्यापुढें रिपु रणीं धरिती न हाव;
ज्यांना न दुर्गम पथीं लवही भयाचा,
धर्माभिमान करि जागृत तो तयांचा. ४३

प्राणांस मानुनि रणांत तृणा--समान,
ते धांवती स्वरिपुची चिरण्यास मान;
धांवे मृगेंद्र बघुनी मदमत्त हस्ती,
ते मांडिती रिपुबरोबर तेवि मस्ती. ४४

सेना अशी जमविली रणशूर थोर,
शत्रू पळे बघुनि तीस रणीं समोर;
बर्च्या कट्यार फरशी तरवार भाले,
घेऊन ते रिपुसवे लढण्या निघाले. ४५

तो तोरणागड करी सर आधि राव,
दावी खळांस समरांत असिप्रभाव;
तेथें अपार धन देइ तयास देवी,
जी त्यावरी सदय दृष्टि सदाहि ठेवी. ४६

तें द्रव्य वेंचुनि सर्वेच तया--समीप,
भूपाल राजगड बांधि कुलप्रदीप;
जेथें न होय अरिचा मुळिंही रिघाव,
तेथें रणोपकरणां जमवीत राव. ४७

कल्याण चाकण सुपें शिवराय जिंकी,
म्लेच्छां रणांत ढकली अति दैन्यपंकीं.
म्लेच्छांगना गवसली रणिं रूपखाणी,
ती धाडिली नृपतिसन्निध सेवकांनीं; ४८

पाहून ती कुलवती अतिरम्य बाला,
अत्यल्पही नृपमना न विकार झाला.
तो गौरवी तिज पटादि--विभूषणांहीं,
दुर्वासनामल नृपा शिवलाच नाहीं. ४९

पाहून यौवनवती परकीय बाला,
होई विकार नच अल्पहि यन्मनाला;
तो धन्य ! धन्य ! जन होय खराच लोकीं,
देवांश त्यास समजे सकल त्रिलोकीं. ५०

उत्कर्ष तो बघुनि भूपतिचा अपार,
झाला अविंधनृपनाथ सकोप फार;
दंडावयास नृपनाथ महाभिमानें,
अफझुलखां निवडिला यवनाधमानें. ५१

अफ्झुल्लखां खलमती मदमत्त नीच,
बोले नृपास धरणार सजीव मीच;
घेवोनिया यवनसैन्य बहु त्वरेनें,
केली शिवाजिनृपतीवरि चाल तेणें. ९२

मार्गांतरीं बहुपरी छळुनी द्विजांतें,
उध्वस्त देश करि जाळि सुरालयांतें;
आला विनाश ह्मणुनी विपरीत बुद्धि,
झाली करी बहुत दुष्कृति दुष्टबुद्धि. ९३

पाहे पथीं अधम तो तुळजाभवानी,
जीचा प्रभाव परमाद्भुत विश्व वानी;
ती फोडिली त्वरित त्या यवनाधमानीं,
दुःचिन्ह होय परि तें न मदांध मानी. ९४

"बत्तीस दांत असती नृपते! जयास,
आला महाज तुज योग्य वधावयास;
त्याला वधून सुखवी मज शस्त्रपाणी, !"
स्वप्नीं असें कथि नृपा तुळजाभवानी. ९५

वांईस येइ मदमत्त करून चाल,
गेला प्रतापगड लक्षुनिया नृपाल;
तेव्हां मनांत खल होय हताश फार,
योजी मनीं शठमती कपटप्रकार. ९६

"देवोनिया अभयदान नरोत्तमातें,
पाचारुनी मग तया निजदर्शनातें;
विश्वास दाउनि सजीव तया धरावें,
धूर्तासवें कपट धूर्तजनीं करावें." ९७

ऐसा विचार करुनी मग दुष्टशील,
भूपाकडे त्वरित पाठवि तो वकील;
वार्ता कथी सकल तो नृपसत्तमातें,
झाला तयार नृपती खलदर्शनातें. ५८

पायीं इजार वरि बांधुनि घट्ट काचा,
अंगांत बख्तर झगा वरि लांब साचा;
डोकीस मंदिल करीं बिचवा कराल,
पंजांस वाघनख सिद्ध असा नृपाल. ५९

त्रिश्या घडी त्रिघडिही जगदंबिका जी,
जी देइ संतत नृपा यश सर्व काजीं;
तद्दर्शना नृपति सत्वर चालला हो,
तीच्या कृपेविण कसा जयकीर्ति--लाहो. ६०

प्रार्थी तिला नृपति, " भो ! जगदंबमाये, !
लोकोत्तरे ! यश तुझें जगती न माये;
प्रार्थी तुला नतशिरा तव दीनदास,
देवी ! हरीं मम करीं मळधी--मदास. ६१

गोब्राह्मणां वधुनिया खल निर्दयांनीं,
ही न्हाणिली वसुमती रुधिरें तयांनीं;
त्याचा रणांत अजि घेइन सूड माते !,
देवी ! जगत्सुखकरी ! यश देइ मातें. " ६२

साध्वीशिरोमणि खरी जननी जिजाई,
घेण्यास दर्शन तिचें मग भूप जाई;
" जोडीं महायश विमर्दुनि दुर्मदांशीं, "
देई अशी नृपवरा जननी सदाशी. ६३

तानाजि जो प्रथित मालुसरा जगांत,
ज्याचें महायश समस्तहि विश्व गात;
घेवोनिया निजसवें मग तो तयास,
जाई नृपाल खलदर्शन घ्यावयास. ६४

अफ्झुल्लखानहि सडा तंव शीघ्र आला,
आनंदला बहुपरी बघुनी नृपाला;
योजोनिया निज मनीं कपटप्रकार,
इच्छी नृपास करण्या खल विप्रकार. ६५

भेटावयास खल भूपतिसत्तमातें,
झाला तयार कवळी दृढ त्यास हातें;
काखेमधें दडपुनी मग शीघ्र मान,
पोटावरी त्वरित चालवि शस्त्र खान. ६६

अंगीं असे चिलखत प्रभु धूर्त फार,
लागू पडे न मुळिही ह्मणुनी कटार.
पाहोनिया कपट यापरि तें नृपाल,
चित्तीं बहू खवळला जणुं मृत्युकाल. ६७

होतीं नृपाल--करिं वाघनखें कराल,
त्यांचा कुबुद्धिवरि वार करी नृपाल;
पोटामधें शिरुनि तीं चरबी निघाली,
दुर्वृत्त खान पडला विगतासु खालीं. ६८

धिप्पाड तो खल तरी नृपमूर्ति सान,
चित्तीं धरी न लवही रिपुचा गुमान;
तेजोनिधी हरि जरी दिसतो लहान,
मत्तेभकुंभरुधिरेंच हरी तहान. ६९

वधुनि विक्रमें यापरी खलां,
नृपतिवर्य तो विजय पावला;
सकलही तशीं शत्रुचीं दलें,
त्वरित मर्दिलीं भूवरें बलें. ७०

सर्ग चवथा समाप्त.

——————— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## मेघनादवधकाव्य.*

### सर्ग ५ वा.

लक्ष्मणास यश कसें येईल याबद्दल इंद्राला काळजी— इंद्राची आणि मायादेवीची भेट— मायादेवी स्वर्गातून उतरतांना तिची व स्वप्नदेवतेची भेट— स्वप्नदेवतेनें सुमित्रेच्या रूपानें लक्ष्मणास सांगितलेला संदेश-- त्या संदेशानुरूप लक्ष्मणाचें वनांत चंडीपूजनार्थ गमन-- लक्ष्मणाच्या मार्गांत आलेलीं संकटें-- त्यांतून त्याची मुक्ति-- चंडीचें दर्शन व तिचा आशीर्वाद-- लक्ष्मणाचें परत श्रीरामाकडे जाणें-- इंद्रजित् सुलोचनेसह आपल्या आईचा निरोप घेण्यास जातो-- मंदोदरीचा विलाप-- इंद्रजित् तिचें सांत्वन करितो-- इंद्रजित् लक्ष्मणाशीं युद्ध करण्यास जातो मागें प्रमिला शोक करीत बसते.

आर्या.

रात्र जहाली गगनीं नक्षत्रें हांसती जणो सकळ
सुरवर सुप्त समस्तहि शक्रा चिंता परी करी विकल १
" सोडूनि पुष्पशय्या चिंतातुर बैसलांत कां नाथा
सांगा या दासीतें ठेवितसें आपुल्या पदीं माथा " २
परिसुनि वचन शचीचें बोले पुरुहूत " चिंतितों स्वमनीं

* गेल्या वर्षाच्या १२ व्या अंकांत या काव्याचा ४ था सर्ग आलेला आहे. १ इंद्र.

क्षमें[1] लक्ष्मण होय कसा वीरशिरोरत्न इंद्रजिद्दमनीं " ३
" गेली मायादेवी अस्त्रें देऊनि कार्तिकेयाचीं
त्यांयोगें अरि जिंकिल लक्ष्मण चिंता नको वृथा त्याची " ४
" वचन तुझें सत्य सखे ! सौमित्री शूरही मला ठावा
कैसा परी गजाचा सिंहा जिंकील संगरीं छावा ५
कांपे हृदय थरारा पाहुनि रणधीर मेघनादातें "
ऐसें वदुनी मघवां[2] बसला हृदयीं करीत खेदातें ६
जैसे सुधाकराचे कर कमला वेष्टिती निशाकालीं
रंभा सुचित्रलेखा बसल्या इंद्राचिया सभोंतालीं ७
वाढे रविकरसंगें कांचन–मंदार–कुसुम–कांति जशी
देवेंद्रमंदिराची मायागमनें क्षणांत होय तशी ८
बसवून आसनावर मायेतें दंपती करी प्रणति
हेतु वसे काय मनीं देवीतें इंद्र तैं करी विनति ९
" होशिल पूर्ण मनोरथ लंकेतें शीघ्र आदितेया जा
रक्षःकुलचूडामणि नाशूं समरांत योजुनी व्याजौं[3] १०
जाउनि निशा लयातें येतां मंगल उषा सुलक्षणाहे
लंकेचा भाग्यरवी मावळुनी सुख वसुंधरा लाहे ११
नेऊनि लक्ष्मणातें यज्ञागारीं पुरंधरा तारूं
पसरुनि मायाजाला करुनी बलहीन रावणी मारूं १२
खवळे दशमुख जेव्हां सुतनिधनातें करूनिया श्रवण
श्रीरामलक्ष्मणातें देवेन्द्रा तारणार वद कवण ? " १३
" लक्ष्मणशरहत होतां रावणसुत मेघनाद संग्रामीं
भीति न दशाननाची तत्संगें संगरीं लढूं आम्ही " १४

---

१ समर्थ. २ इंद्र. ३ कपट.

" परिसुनि वचना तुझिया लाधे मज अदितिनंदना तुष्टि
जातें लंकाधामा आतां होऊं नको वृथा कष्टी " १५
शिरला शयनागारीं धरुनी मग वृत्रहा[1] शचीहस्त
रंभादि अप्सराही निजल्या जाऊनि मंदिरीं स्वस्थ १६
कंकण कांची नूपुर काढुनि सुंदर समस्त मणिहार
सुमशय्येवर निजली इंद्राणी सर्वसुभगतासार १७
परिमलपूरित मारुत वाहे स्वच्छंद सुस्वना करुनी
क्रीडे मधुकर पद्मीं इंदुमुखीच्या तसा तनूवरुनी १८
स्वर्गांतूनि उतरतां पाचारी स्वप्नदेवतेस सती
होतां प्रगट वदे तिज " जागे लंकापुरीस शीघ्रगतिं १९
माय सुमित्रावेषें जा निजला त्या स्थलास सौमित्री
सांग तया " ऊठ झणीं वत्सा गेली सरूनिया रात्रि २०
उत्तरदिशेस शोभे लंकेच्या रम्य एक वनराजी
तेथें एक सरोवर जा वत्सा ! त्या स्थला त्वरें आजी २१
देवालय चंडीचें भव्य विराजे सरस्तटीं, भावें
स्नान करोनि तयांतचि देवीतें परमवंद्य पूजावें २२
होशिल तिच्या प्रसादें क्षम तूं जिंकावयास आराति[2] "
संदेश लक्ष्मणातें स्वप्नीं हा सांग देवते रात्रीं २३
उजळित नील नभःस्थल लंकेतें स्वप्नदेवता गेली
स्वप्नीं सौमित्रीतें मायासंदेश सांगती झाली २४
स्वप्नीं जननीदर्शन घडतां सौमित्रि दचकुनी उठला
स्मरुनी प्रियमातेतें बालासम रडत सारखा सुटला २५
" अंबे ! दिन बहु झाले जळतो विरहानलें तुझ्या काय

१ इंद्र. २ शत्रु.

हा ! मंदभाग्य मी मज दिसतिल केव्हां पुन्हा तुझे पाय ” २६
ऐसें वदत मुखानें नेत्रांचें निजकरें पुशित वारि
गेला लक्ष्मण जेथें होता श्रीराम दीन--कैवारी २७
स्वप्ना अद्भुत सांगे निज लक्ष्मण रामचंद्रपदनमुनी
द्यावी आज्ञा प्रभुनें स्तब्ध उभा राहिला पुढें ह्मणुनी २८
“ दुःखें त्वां मजसाठीं आजवरी सोशिलीं जगीं फार
बंधो ! ह्मणुनि न होई आज्ञा द्याया तुला मला धीर २९
काय करूं दैवाच्या निर्बंधा लंघणार जन कवण ?
जा सावधानचित्तें धर्म तुझें करिल संकटीं अवन[1] ” ३०
परिसुनि वचना रामा वंदुनि लक्ष्मण निघे कृपाणकर[2]
उत्तरदिशेस जेथें जागे सुग्रीव अग्निरूपधर ३१
तूं कोण काय हेतू येसी धरुनी मनीं करीं कथन
रामानुजास ऐसें वदला सुग्रीव वीरवर वचन ३२
“ मी दास राघवाचा माझें सौमित्रि कपिवरा ! नाम
उत्तरदिशेस जातों प्रभ्वाज्ञेनें करावया काम ” ३३
वदुनि असें सुग्रीवा गेला सौमित्रि उपवनापाशीं
तों भीमरूपधर नर एकाएकीं तदा दिसे त्याशीं ३४
जैसा महोरगाच्या[3] माणि तैशी शशिकला खुले भालीं
शीर्षीं जटा विराजे होती जी जान्हवीजलें न्हाली ३५
हस्तीं त्रिशूल शोभे धवलित भस्में यदीय वपु झालें
त्रिपुरान्तक तो साक्षात् गंगाधर लक्ष्मणा कळुनि आलें ३६
“ मी तनय दशरथाचा नमितों तुज चंद्रशेखरा ! देवा !
चंडीतें पूजाया जातों विपिनांत मार्ग मज द्यावा ३७

---

१ रक्षण. २ खड्गधारी. ३ मोठा सर्प.

रावण अधर्मकर्मी स्वमनीं त्याचा धरूनि अभिमान
येसी समर कराया आहें मीही तयार हें जाण ३८
ठेउनि साक्षी धर्मा करितों तुज मी रणास आव्हान
सत्य जरी धर्म तरी करिल मला संगरीं विजयदान " ३९
परिसुनि वचना त्र्यंबक सस्मित बोले " प्रसन्न तुज दुर्गा
वत्सा ! खुशाल जा तूं रोधावे म्यां कसें तुझ्या मार्गा " ४०
सौमित्री जों न वनीं शिरला तों सिंहनाद घोर असा
श्रवणीं पडे तयाच्या गेलें कानन दणाणुनी सहसा ४१
आस्फालित पुच्छातें रक्ताक्षी केसरी पुढें आला
पाहुनि त्यातें लक्ष्मण काढी कोषांतुनी स्वखड्गाला ४२
मायासिंह पळाला पावकतेजें जसा तिमिर दूर
विपिनाचा मार्ग धरी रामानुज सत्वरी[1] महाशूर ४३
मेघांहीं आवरिलें चंद्रातें उसळला महावात
मधुनी चमके चपला द्विगुणित अंधार काननीं होत ४४
पाडी जेवें प्रभंजन बाहुबलें भूरुहांस[2] उन्मळुनी
दावानलसंयोगें विपिनाचे प्रांत चालले जळुनी ४५
अचलासम अढळ परी राहे दावानलीं उभा शूर
दावानल तों सहसा शमला दमला समीरही घोर ४६
नक्षत्रें उदयातें येती फिरुनी शशांकही गगनीं
परिमलपूरित मारुत वाहे स्वच्छंद हर्षली धरणी ४७
मार्ग क्रमितां आला मधुर स्वर लक्ष्मणाचिया कानीं
मुरली मृदंग वीणा ऐके स्त्रीकंठसंभवा वाणी ४८
तारा भूपतित जणो वामादल त्यांपरी पुढें पाहे

---

१ वेगानें. २ वृक्षांस.

पुष्पें वेंचित कोणी कोणी हर्षें जलांत अवगाहे ४९
मानससरोवराच्या विमल जलीं स्वर्णपद्म शोभतसे
दिसती अवयव सुंदर ललनांचे त्या सरोवरांत तसे ! ५०
कामाचे पाश जणो भूषविती अलक आपुले कोणी
मणिमय फणिसम[३] कांहीं पृष्ठांवर सोडिती स्त्रिया वेणी ५१
साक्षात् यमदूतातें फणितें बघतां पळोनि जाय जन
वेणीरूप फणीतें अवलोकुनि मोहिला नसे कवण ? ५२
पीवर पयोधरांवर चमके रमणीय माळ रत्नांची
चरणीं नूपुर वाजे कटिदेशीं रम्य मेखला साची ५३
वृक्षीं पिकवर गाई सन्निध जलयंत्र चारु नृत्य करी
वाहे शीत समीरण पुष्पांतिल मधुर सौरभास हरी ५४
" प्रेमें स्वागत करितां रघुकुलचूडामणे ! तुझें आह्मी
सौख्यें येउनि राहें शूरा ! नंदनवनीं त्रिदिवधामीं ५५
यौवनपुष्पवनातें आला भर चालला असे वाया
काया अर्पियली तुज अवरसुधा मधुर चाल सेवाया ५६
घोर तपस्या करुनी लाधे जें सौख्य सोसुनी कष्ट
देऊं तुज तें आह्मीं ठेवूं तुजला सदैव संतुष्ट ५७
जे रोगशोककीटक सुकविति जीवनसुमास संसारीं
शिवतिल ते न शरीरा जातिल दुःखें तुझीं लया सारीं " ५८
परिसुनि अमरीवचना वदला सौमित्रि जोडुनी पाणि
' दासा क्षमा करा या जननीसम हा तुह्मां मनीं मानी ५९
अग्रज राघव माझा शूर रथी सर्वलोकविख्यात

१ स्नान करी. २ केश. ३ सर्पाप्रमाणें. ४ पुष्ट. ५ स्तनांवर. ६ सुगंधास. ७ फुलास. ८ हात.

भार्या सीता त्याची रावण कपटें हरूनिया नेत ६०
आणीन जानकीतें दशवदनातें वधूनि मी युद्धीं
केली मनीं प्रतिज्ञा वर द्या मज व्हावयास फलसिद्धि ' ६१
ऐसें सुरांगनांतें वदुनी नयनांस उघडुनी पाहे
तों सर्व शून्य भासे झाल्या अमरी अदृश्य लवलाहें ६२
स्वप्न जसें स्थिर नोहे सद्योजीवी[1] जशी असे छाया
क्षणभंगुर संसारीं खेळ तसे करितसे सदा माया ६३
मार्ग क्रमितां क्रमितां सन्निध लक्ष्मण सरोवरा पाहे
पाहुनि सुंदर मंदिर चंडीचें तत्तटीं उभा राहे ६४
स्नान जलीं करुनि करीं नीलोत्पलें[2] घेउनी विमल वारि[3]
भावें पद दुर्गेचे पूजी जी भक्तसंकटां वारी ६५
साष्टांगप्रणति पदीं करुनि वदे वचन अनुज रामाचा
' माते ! दशमुख नाशीं, महिमा तुझिया अतर्क्य नामाचा ' ६६
गर्जे मेघ भयंकर करि कंपित वज्रनाद लंकेला !
सहसा घोर समीरें प्रांत वनाचा दणाणुनी गेला ! ६७
पाहे सौमित्रि पुढें मूर्तिमती प्रकटली महामाया
चमकुनि विद्युत्संनिभ दिपवी तेजस्विनी तिची काया ६८
तें तेज अतुल पाहुनि चित्तीं सौमित्रि आपुल्या भ्याला
जाणुनि हें हास्य करी बोले आश्वासुनी उमा त्याला ६९
" असती प्रसन्न तुजवर शूर सुमित्रासुता ! सकल अमर
इंद्रें अस्त्रें दिधलीं साधाया रावणीसवें समर ७०
मीही येथें आलें साह्य कराया तुला शिवादेशें
घेउनि बिभीषणातें जा नगरीं जेथ रावणी बैसे ७१

---

१ क्षणभर राहणारी. २ निळें कमळ. ३ पाणी.

वत्सा ! वर मी देत्यें तुजला न शिवो पथीं कधीं भीती
जाऊनि गुप्तरूपें विध्वंसुनि अरिस मेळवीं कीर्ति " ७२
वंदुनि पद दुर्गेचे सौमित्री राघवाकडे गेला
तरुखगपवनां त्याचा मार्गीं सत्कार आदरें केला ७३
" धन्य सुमित्रा ! जननी, वदली आकाशसंभवा वाणी
तत्पुत्र धन्य तूंही ! कोण तुला या जगीं न वाखाणी ? ७४
होइल अमर तुझें यश " वाणी वदुनी असें लया जाय
कुंजवनीं मधुररवें खगगण गीतांस कौतुकें गाय ७५
कांचनशयनागारीं शय्येवर मृदुल पहुडला होता
**घननाद** होय जागा परिसुनि पक्षांचिया मधुरगीतां ७६
प्रीतिरहस्यकथा निज अलिवरें[1] नलिनीस कथितसे जैशी
प्रमिलाकरकमलातें धरुनी तिज रावणी कथी तैशी ७७
" ऊठ प्रिये ! उषा[2] ! तूं जागृत तुज पक्षि हे पहा करित
उघडीं नयनें अपुलीं प्राणसखे ! कमललोचने ! त्वरित ७८
शशि तूं कांतमणी मी, प्रेमझरी तूं अहा नयनतारे !
मिटतां नेत्र तुवां निज भासे मज तिमिरपूर्ण जग सारें ७९
चोरुनि तव कांतीनें पुष्पवनीं बघ सुमें कशीं फुललीं
माझ्या महार्हरत्ना[3] ऊठ झणी प्राग्दिशा पहा खुलली " ८०
दचकुनि उठुनी रामा[4] विनयानें प्रियपतीकडे पाहे
" चलगे घेऊं वदला जननीचा तो निरोप लवलाहें " ८१
" जननीपदांस नमुनी पूजुनि वन्हीस मिळवुनी सिद्धि "
खरशर[5] वर्षुनि रामा टाकूं संहारुनी तुमुलयुद्धीं " ८२
अरुणासह रम्य उषा येई गगनोदरांतुनी जैशी

---

१ भुंगा. २ सकाळ. ३ फार किंमतीच्या. ४ सुलोचना स्त्री. ५ तीक्ष्ण.

शयनगृहांतूनि निघे प्रमिला वामाकुलोत्तमा तैशी ८३
शिबिकासनांत बसुनी मातासदनास दंपती जाय
उभयांहीं नतभावें जननीचे विमल वंदिले पाय ८४
पाहूनि नंदनातें स्फुंदे मंदोदरी करी शोक
प्रेम खरें मातेचें, मातेविण शून्य सर्व भूलोक ! ८५
पुष्पीं जैसा परिमल मुक्ताफलवास रम्य शुक्तींत
माताहृदयीं तैशी प्रीति नसे या असत्य उक्तींत ८६
" यज्ञ पुरा करुनि ह्मणी जातों मारावयास रामातें
मातें द्यावी आज्ञा वदला **घननाद** शोकपर माते ८७
" मन्नयनपूर्णचंद्रा ! देऊं आज्ञा कशी तुला बाळा
धाडुनि संग्रामातें अर्पूं तुज काय मी अहा ! काळा ८८
तो राम शूर मोठा लक्ष्मण त्याचा पराक्रमी भाऊ
ते कालसर्प साक्षात् काय तयांच्या मुखीं तुला देऊं ? " ८९
हांसुनि घननाद वदे ' शंका धरिसी वृथा मनीं माते
मी इंद्र–जित् प्रसादें तुझिया जिंकीन सत्य रामातें ' ९०
चुंबुनि शिर तनयाचें प्रेमें मंदोदरी पुन्हा बोले
" मायावी मानव ते असुनी वश देवही तयां झाले ९१
मी ऐकिलें असे कीं, रामाज्ञेनें शिला जलीं तरती
होई शीतल पावक वृष्टीतें वारिवाह[1]ही करिती " ९२
" शोक पुरे कर जननी कष्टविसी करुनि कां विषाद मन
व्यर्थ सुखाची आशा जोंवरि झालें न शत्रुचें दमन ९३
नगरप्रांतीं उत्सुक मत्संगें अरि करावया कदना
कैसें स्वस्थ बसावें वद जननी अग्नि लागतां सदना ? ९४

---

१ मेघ.

ख्यात जगीं रक्षःकुल सुयश तयाचें कसें अहा मळवूं
घेउनि माघार रणीं स्वर्गीं पितरांस काय मी कळवूं ? ९५
हांसेल विश्व सारें, दे आज्ञा जावया कुमारा या
पूजूनि इष्ट दैवत शिरतों समरांत राम माराया ९६
दे दे जननी आज्ञा वीरा कर्तव्य योग्य साच रण
समरीं संपादुनि यश येतों पूजावया तुझे चरण " ९७
माता त्यास वदे तैं " रक्षो तुजला रणीं विरूपाक्ष
जाणार तर सुखें जा वत्सा युद्धीं रहा सदा दक्ष ९८
' चल मत्संगें बोले प्रेमें मंदोदरी स्नुषे बाळे
पुत्रवियोगीं पाहुनि तव मुखकमलास सांत्वविन डोळे " ९९
वंदुनि पद जननीचे लागे रणभूकडे बैली[2] जाया
नूपुररव तों पडला तच्छ्रूत्रणीं, अनुसरे तया जाया १००
" नाथा टाकुनि जातां दीन अनाथा असे कसे बोला ?
येतें अपुल्या संगें " वदली प्रमिला सती विनयशीला १०१
मुक्तामंडित वक्षीं तन्नेत्रांतूनि जळ गळे विमल
शोभे तें उज्ज्वलतर शिशिरकणांहीं न त्यापरी कमल १०२
वदला तैं वीरोत्तम आलिंगुनि करयुगीं प्रिया भार्या
" आर्यें स्वस्थ रहा जा येतों मी परत साधुनी कार्या " १०३
इंद्राज्ञेनें गेला मदन जसा शिवसमाधि भंगाया
वदुनि असें जाय बैली[2] टाकुनि जायाँ[3] रणांत रंगाया १०४
प्राक्तनगति दारुण अति अशुभदिनीं मेघनाद जाय रणा
रतिसम विलापमग्ना झाली प्रमिला स्वनाथपदशरणा १०५
जोडुनि करयुगुलातें भावें व्योमाकडे सती पोह

---

१ शंकर. २ इंद्रजित्. ३ आपली स्त्री.

रक्षू नाथास रणीं रात्रंदिन ह्मणुनि अंबिके बाहे ! १०६
' उद्योग ' सर्ग पंचम रचिला मधुसूदनें सुकविरत्नें
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें माधवानुजें यत्नें १०७

माधवानुज.

---

## सखि स्वतंत्रते !

पद— राग ब्याहाग, ताल दादरा.

सांग कुठें पाहुं तुला सखि स्वतंत्रते !
जनिं विजनीं सांग कुठें रमसि सुव्रते ? ॥ धृ० ॥
फिरवि मला दाहि दिशा !
कर मम अन्नान्न दशा !
कर माझ्या वृत्ति पिशा !
परि तूं हो माझि एकदा । तुजविण जग शून्य
सकल विकलें भासतें १
तूं जीवन तूंच प्राण
तूं धन मम तूंच मान
तव सूचित मज प्रमाण
अजुनि किती अंत पाहसी । हो प्रसन्न मज
प्रणता शीघ्रं अभिमते २
प्राणाहुन अधिक सत्य
सम विचार बचन कृत्य
प्रभुविण जग लघु अनित्यं

---

१ रानांत. २ सुशीले. ३ निस्तेज. ४ शरणागताला. ५ लौकर. ६ आवडते. ७ नाशवंत.

बघून उदयाचलीं रविस पूर्व दिक्सुंदरी,
सहर्षहृदया खरी परम रक्तता ही धरी;
प्रिया बघुनि कामिनी चिरवियोग—तप्ता जशी,
प्रफुल्ल नयनानना बहुत तोषते मानसीं. ४

प्रफुल्ल नलिनी किती दिसति रम्य पद्माकरीं,
मधु भ्रमरपंक्तिही कमल—कोशमुक्ता हरी;
प्रसन्न नभ ज्यापरी उदकही दिसे त्यापरी,
मरीचिकर बिंबुनी दिसत चित्रशोभा खरी. ५

गुलाब नवमाल्लिका बकुल मोगरी शेवती,
अशोक मधुमाधवी तिलक मागधी मालती;
प्रफुल्ल कुसुमानता तरुलता अशा शोभती,
समस्त धरणीतला मधुर सौरभें व्यापिती. ६

अतीव सुखदानिल प्रचुर सर्वतां वाहती,
विनम्र लतिकांगनांप्रति सकाम आलिंगिती;
हरून कुसुमां श्लथप्रसवबंधनां सत्वरी,
लतांस उपदेशिती ललित नृत्यलीला खरी. ७

प्रमत्त विहगावली करिति केलि नानापरी,
सवेंच बसती श्रमाकुल कितेक वृक्षांवरी;
सहर्ष मग नाचती सुखभरें तसें कूजती,
जगद्धितकरां जणों दिनकरास ते वानिती. ८

हरित्तृणवती मही मरकतप्रभाशालिनी,
नवांबुकण मौक्तिक—भ्रम जनांस देती मनीं;
वनोपवनिं शोभती कुसुम--पंक्ति चेतोहरा,
खरीच नटली जणों कुसुम--रत्नहारा धरा. ९

प्रभातसमयीं सती मधुर गाति गीतावली,
कितीक सदनांगणीं विरचितात रंगावली;
सुमें रुचिर वेंचिती उपवनीं कुणी जाउनी,
किती परम रंगल्या हिम--महीध्र--कन्यार्चनीं. १०

परिश्रमनिवारिणी अनुभवून निद्रा बरी,
श्रमें जन समस्तही निरत होति कर्मान्तरीं;
कितीक अवमर्षणां करुनि देवपूजारत,
प्रभात करितें अहा ! सकलही जगत् जागृत. ११

शिरीं रुचिर घेउनी घट विलासिनी सुंदरी,
नदीस जळ आणण्या जमुनि चालल्या सत्वरीं;
विहार करिती परोपरि जलान्तरीं मानिनी,
गृहास निघती सर्व तपन--ताप--भीता मनीं. १२

निघे गुरुगृहास हा शिशुसमूह विद्यार्जना,
सवत्स चरण्यास हीं निघति गोकुलें कानना;
प्रवासिक परंपरा त्वरित होय मार्गस्थही,
जहालि निशिनिद्रिता खरि सचेतन ही मही. १३

प्रभातसमयीं अशा उठुनि राय विश्वास ते,
करून अवमर्षणां नमिति वंद्य चंडांशुतें;
सुता अतितर प्रिया आजि निघालिसे सासरीं,
ह्मणून बहुतापरी विकल जाहलें अन्तरीं. १४

प्रभातसमयीं सती उठुनि सत्वरीं नाहली,
अलंकरण साधुनी अरुण चीर ती नेसली;
गमे सकळिकां जणों दिनकर--प्रभा दूसरी,
अनंग बघुनी तिला झुरतसे सदां अन्तरीं. १५

तेथें तूं ह्मणति नांदसी । येऊं का तुजसंगें
राहण्या तिथें ? ३

टिळक.

## ओसाडी दिसतें.

श्लोक.

ओसाडी दिसतें भयाण नयनां विस्तीर्ण ही प्रीतिची
झालों श्रान्त तृषार्त मी भटकतां हीचेमधें अन्तरीं
गेलों टाकित जों पुढें धरुनिया आशा जलाची पदें
तों तो दूर पळे मला भिउनिया पाण्या सुखाचा झरा १

होतां दीन असा मला गवसली काळी निराशा–शिळा
जावोनी बसलों तिच्यावर न जों विश्राम मी घ्यावया
येई संशय--भूत तें बसुनिया तों वातचक्रावर
तेणें पूर्ण मला पछाडुनि अहा ! केलें पिशाचापरी २

प्रीतीला भुलुनी पिशाच बनलों याचा मला खेद तो
होतो हें समजा मुळीं नच; गणीं धन्यत्व त्यांच्यांत मी.
प्रीतीचा चटका न ज्यास बसला तो व्यर्थ कीं जन्मला
दुःखीं या सुख जें नरा मिळत तें देवांसही दुर्लभ
त्यांची का जर कल्पनाच नुसती देवांस झाली तर
देवत्वासहि टाकुनी झणिं भुतें होतील माझेपरी ३

नरहर शंकर रहाळकर बी. ए.

# काव्यरत्नावलि.

## अंक ९ वा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ९ वा.

प्रातःकालवर्णन. सुशीला सासरीं जाण्यास निघते. विश्वासराव तिला उपदेश करितो. सख्यांचा विनोद. सुशीलेचें विरहदुःख. मातेचा उपदेश. विश्वासरावाचा प्रतापरावास निरोप. सुशीला जाते.

श्लोक.

उषःसमय जाहला, गलितकान्ति तारागण;
प्रसन्न नभ शोभलें, दशदिशा प्रफुल्लानन,
महातम दिगंतरीं अरुण सत्वरीं घालवी,
प्रफुल्ल कुसुमाकरां अनिल मंदसा पालवी. १

हरिस्मरण नाशिते त्वरित जेंवि पापावली,
तशीच गरुडाग्रजें तिमिरपंक्ति विध्वंसिली;
विवर्ण दिसती उडुग्रहशशी दिनेशोदयीं,
महामतिपुढें अहा ! अमति लोपती सर्वही. २

जगांमधिल रक्तता सकल एक झाली असे,
समस्तविधुलोचनाहृदय—रक्तिमा वा ठसे;
प्रदीप्ततर कांचनद्रवसमुद्भवा मूर्ति ती,
रवीस उदयाचलीं बघुनि तर्क हे ऊठती. ३

बघून उदयाचलीं रविस पूर्व दिक्सुंदरी,
सहर्षहृदया खरी परम रक्तता ही वरी;
प्रिया बघुनि कामिनी चिरवियोग–तप्ता जशी,
प्रफुल्ल नयनानना बहुत तोषते मानसीं. ४

प्रफुल्ल नलिनी किती दिसति रम्य पद्माकरीं,
मधु भ्रमरपंक्तिही कमल–कोशमुक्ता हरी;
प्रसन्न नभ ज्यापरी उदकही दिसें त्यापरी,
मरीचिकर बिंबुनी दिसत चित्रशोभा खरी. ५

गुलाब नवमाल्लिका बकुल मोगरी शेवती,
अशोक मधुमाधवी तिलक मागधी मालती;
प्रफुल्ल कुसुमानता तरुलता अशा शोभती,
समस्त धरणीतला मधुर सौरभें व्यापिती. ६

अतीव सुखदानिल प्रचुर सर्वतां वाहती,
विनम्र लतिकांगनांप्रति सकाम आलिंगिती;
हरून कुसुमां श्लथप्रसवबंधनां सत्वरी,
लतांस उपदेशिती ललित नृत्यलीला खरी. ७

प्रमत्त विहगावली करिति केळि नानापरी,
सवेंच बसती श्रमाकुल कितेक वृक्षांवरी;
सहर्ष मग नाचती सुखभरें तसें कूजती,
जगद्धितकरां जणों दिनकरास ते वानिती. ८

हरित्तृणवती मही मरकतप्रभाशालिनी,
नवांबुकण मौक्तिक–भ्रम जनांस देती मनीं;
वनोपवनिं शोभती कुसुम--पंक्ति चेतोहरा,
खरीच नटली जणों कुसुम--रत्नहारा धरा. ९

प्रभातसमयीं सती मधुर गाति गीतावली,
कितीक सदनांगणीं विरचितात रंगावली;
सुमें रुचिर वेंचिती उपवनीं कुणी जाउनी,
किती परम रंगल्या हिम--महीध्र--कन्यार्चनीं. १०

परिश्रमनिवारिणी अनुभवून निद्रा बरी,
श्रमें जन समस्तही निरत होति कर्मान्तरीं;
कितीक अघमर्षणां करुनि देवपूजारत,
प्रभात करितें अहा ! सकळही जगत् जागृत. ११

शिरीं रुचिर घेउनी घट विलासिनी सुंदरी,
नदीस जळ आणण्या जमुनि चालल्या सत्वरीं;
विहार करिती परोपरि जळान्तरीं मानिनी,
गृहास निघती सवें तपन--ताप--भीता मनीं. १२

निघे गुरुगृहास हा शिशुसमूह विद्यार्जना,
सवत्स चरण्यास हीं निघति गोकुळें कानना;
प्रवासिक परंपरा त्वरित होय मार्गस्थही,
जहालि निशिनिद्रिता खरि सचेतन ही मही. १३

प्रभातसमयीं अशा उठुनि राय विश्वास ते,
करून अघमर्षणां नमिति वंद्य चंडांशुतें;
सुता अतितर प्रिया आजि निघालिसे सासरीं,
ह्मणून बहुतापरी विकल जाहलें अन्तरीं. १४

प्रभातसमयीं सती उठुनि सत्वरीं नाहली,
अलंकरण साधुनी अरुण चीर ती नेसली;
गमे सकळिकां जणों दिनकर--प्रभा दूसरी,
अनंग बवुनी तिला झुरतसे सदां अन्तरीं. १५

निघालि पतिमंदिरीं प्रियतमा सुशीला सुता,
ह्मणून जननी तिची बहुत होतसे दुःखिता;
पुशी स्वनयनां सती दिसतसे विवर्णानना,
विलोकुनि तिला वदे विकळ राव या भाषणा. १६

निघे स्वपतिमंदिरीं प्रियतमा सुशीला खरी,
वहात नयनान्तरीं उदक वृत्ति हो बावरी;
गमे असुख यापरी बहुत मी विचारी जरी,
शुभांगि ! कवण्यापरी विरह सोशिशी हा तरी. १७

सुते ! करि प्रदक्षिणा त्वरित अग्निनारायणा,
रवीस करि वंदना सकलपापविध्वंसना;
तशीच शुभदेवता मम गृहीं सदा संस्थिता,
करोत तुज सर्वथा परम पावना तत्वतां. १८

सुते बहुमता प्रिया सतत होइ गे तूं तशी,
महाभिजन शाहजी नृपवरा जिजाई जशी;
जसा प्रसवली पहा शिव सुपुत्र भूपाग्रणी,
तसाच तुज पुत्र हो सकळ वीर--चूडामणी. १९

सुसंस्कृतिविभूषिते ! अवगता तुला सत्कथा,
वसे विमलशीलता स्तुतिशताई शालीनता;
तरीहि करितों तुला सदुपदेश मी अल्प हा,
मनीं धरुनि तो सदां तदनुसारिणी तूं रहा. २०

भजें गुरुजनां, धरीं प्रणय आप्तइष्टांवरी,
प्रियें दुखविलें तरी मनिं न रुष्टता आदरीं;
दया परिजनीं करीं विनय भाग्य--कालीं धरीं,
अशीच गृहिणी खरी, निज कुलाधि गे ना तरी. २१

प्रिया न दुखवी कदा विनत तूं भजें तत्पदां,
तुझां पति सुखप्रदा परम देवता सर्वदा;
असे उदकबुद्बुदासम अनिश्चला संपदा,
ह्मणून न धरीं मदा हरित जाइं दीनापदा. २२

पुरोत तव कामना नच शिरोत दुर्वासना,
गमो सुखकरा मना निजपतिव्रतोपासना,
सुकीर्ति तव पावना जगिं भरो असाधारणा,
विभूपति सतीगणां प्रकटुनी महासद्गुणां." २३

सखीजन समस्तही सुदतिचा असें पातला,
तिचा विरह त्याप्रती बहु असह्य तो वाटला;
किती उदक गाळिती दिसति शोकमग्ना किती,
विनोद करिती तशा किति निरोप घेती किती. २४

"नृपालगृहिणी--पदीं परमवैभवीं संस्थिता,
महत्तम नियोगिं तूं सतत होशिल व्यापृता;
समस्तहि तुझा सखीजन सुदीन गे! हा असे,
तुला स्वपतिमंदिरीं स्मरण होय त्यांचें कसें. २५

प्रियास बहुसंमता परिजनावली--सेविता,
प्रियानुनयतोषिता विविधरम्यलीला--रता;
समस्तजनसंस्तुता बहु विलोभनाहीं हृता,
अह्मांस परमार्थतां विसरशील तूं सर्वथा." २६

असें वचन बोलुनी सकळ शान्त त्या राहती,
तदा कमललोचना वरि मनोव्यथा ती अति;
वहात नयनांतुनी उदक--पूर गालांवरी,
दिसे परम रम्य तन्मुख विवर्ण चंद्रापरी. २७

न शब्द वदनांतुनी निघति कंठ दाटे अति,
उचंबळुनि तन्मनोजलधि जातसे निश्चिती;
क्षणैक मग सुंदरी म्हणुनि मूक ती राहिली,
पुसोनि वसनांचलें नयन यापरी बोलली. २८

" अहा ! विसर तूमचा मज पडेल कैसा तरी,
तुम्हाविण गमे घडी युगसमान दीर्घा खरी;
तुम्हासहित काळ जो सुखभरांत मी लोटिला,
न येइल तसा कधींहि हतभागिनीला मला. २९

अनेकविध शैशवीं रुचिर खेळ गे खेळलों,
समस्त भगिनीसम प्रिय परस्परां जाहलों;
तुम्हां त्यजुनि जातसें आजि सुदूरदेशां अहा !
कशी सहन होय ही विरहयातना दुःसहा. ३०

अपार ममता तुम्ही मजवरी सदा ठेविली,
न अन्तर दिलें कधीं स्वभगिनीपरी मानिली;
तरी विनति ती अशी सतत होउं वृद्धिंगता,
असेन जरि दूर मी न विसरा तरी सर्वथा. ३१

असें वचन बोलतां परम कंठ ये दाटुनी,
निघे न वच अल्पही गळति अश्रु नेत्रांतुनी;
असें बघुनि मायही गहिंवरें मनीं दाटली,
तयास निववावयां वचन यापरी बोलली. ३२

" न हो विरह--कातरा जल वहात नेत्रान्तरीं,
धरून तरि धीर तें त्वरित कन्यके ! आवरीं;
सख्या सकल या तुझ्यापरि विवाहिता होउनी,
स्वभर्तृसदनीं तुझ्यापरिच राहती जाउनी. ३३

तुला जनन देउनी अजवरी बये पाळिलें,
तसें गणुनि जीविताहुनि विशेष संरक्षिलें;
तरी पतिच तो असे खचित जीविताचा धनी,
स्त्रियांस पतिवाचुनी गति नसेच अन्या जनीं. ३४

सतीस पति होय गे परम मंगळा देवता,
स्वसा गुरुसहोदरात्मजहि तोच मातापिता;
तदीय पदसेवनीं रत असो सदा त्वन्मति,
सती हंसति मुक्तितें स्वपतिपाद ज्या पूजिती. ३५

सती समजुनी तिला प्रियसुते ! तदाज्ञा मुळीं,
सती गणिति गे तिला श्रुतिवचाहुनी आगळी;
प्रियाभिमत आचरीं कृति सदैव सर्वात्मना,
तदप्रिय करूनिया न दुखवीं कधीं तन्मना. ३६

महत्तम सुशील हेंच जगतीं असें बालिके, !
जपून बहु ते तरी विमल नित्य ठेवीं निकें;
धरीं विनय सर्वदा त्यजुनि वृत्ति गर्वोद्धता,
विभूषण न भूषवी, जशि सतीस शालीनता. ३७

करीं न रतिमात्रही गुरुजनावमाना बये, !
तयां दुखवितां सदा आशिव पाठिं लागे स्वयें;
वदून मधुरा गिरा सुमति शान्तवावें तयां,
गुरूस अवमानुनी हरिस पूजिती कासया. ३८

न सत्य वचनाहुनी किमपिही असे उत्तम,
वदे अनृत त्या जनां त्यजुनि जाय सर्वोत्तम;
सदा मित वदे बरी न युवतीस वाचालता,
असे दुरितहारिणी शुभकरी गिरा सूनृता. ३९

अशे जगतिं कन्यके ! परम कोप चांडाळ तो,
जनांस अविनीत तो व्यसनसागरीं लोटितो;
विटाळ न कधींहि हो किमपि त्या खळाचा तुला,
समस्त शिवदायिनी खचित शान्ति ती मंगला. ४०

कधीं न परनिंदनीं क्षणहि घाळवी तूं फुका,
सदुद्यम करीं सदा, न रिपु आळसासारिखा;
सतीचरित--चिंतनीं दवडिं वेळ अव्यापृता,
सुमार्गिं मति योजुनी हरि कुवासना सर्वथा. ४१

अधीर तनये ! न हो व्यसनदुर्गताही जरी,
विपत्समय सद्गुणां प्रकटवी न संपत् खरी;
धरीं स्वहृदयीं सदा विमल भाव ईशावरी,
सुमार्गनिरतां जनां नच कधीं उपेक्षी हरी. ४२

सुबोधमणि सांठवीं हृदय–कोंदणीं हे सदा;
कधीं नच उपेक्षि ही मम हितोक्ति सौख्यप्रदा;
रहा तदनुसारिणी सतत तूं न केव्हां चुके,
बरें ह्मणवुनी जगीं, तरिच घेशि गे ! कन्यके. !" ४३

वदे परिजनां तदा नृप " चला इला घेउनी,
सुरक्षितपणें वनांतुनि विमार्ग उल्लंघुनी;
नृपोत्तम–कुशावती--पतिकरीं इला अर्पुनी,
करा विदित सादरें प्रणति ही तयालागुनी. ४४

गमे मजशि जी निजोच्छ्वसित निर्विशेषा खरी,
तिला आजि समर्पितों प्रणयिनीस युष्मत्करीं;
इच्याविषयिं सर्वदा प्रणयभाव चित्तीं धरा,
त्रिवर्ग जगिं साधुनी इजसवें भवातें तरा. ४५

तमोमय वनांतरीं विमल दीपिका ज्यापरी,
समापतित--संकटीं प्रियजनोक्ति जैशी खरी;
प्रमत्तरिपु--संयमीं अविरता रमेशस्तुति,
तशीच भवसागरीं सुमति होउ तूझाप्रति. ४६

सुता परम वत्सला अहह ! होय दुःखाकुला,
चला ! झडकरी चला ! गमनकाल हा पातला;
तुह्मी स्थिर करा इला त्यजुनि शोक हा आपला,
घडी परम मंगला खचित ही न व्हा विव्हला. ४७

सखीजन तुझ्यापरी विकल हा दिसे अन्तरीं,
अहा ! सदन त्यापरी बहुत खिन्नता हे वरी;
मयूर नच नाचती, हरिण भक्ष्य ना भक्षिती,
तशी तरुलताततीं करि नवाश्रुवृष्टी अति. " ४८

" कसें मजशि राहवें जननि दूर देशान्तरीं,
समीप नसतां तुह्मी क्षणहि होय मी घाबरी;
गमेल सकलांविना मज निवास कान्तारसा,
न होइल कशी मला विजनशून्य सारी रसा. " ४९

" नृपालगृहिणीपदीं परमवैभवीं संस्थिता,
महत्तम नियोगिं तूं सतत होशिल व्यापृता;
सुते ! प्रसवुनी सुतां, रवि पवित्र पूर्वा जशी,
कदा न गणिशील हा मम वियोग तूं मानसीं. ५०

कधीं विरह--शोक हा नच शमेल वत्से ! पहा,
मदीय हृदया अहा करितसे व्यथा दुःसहा;
तुवां रुचिर मंदिरानिकट बाग हा निर्मिला,
पदोपदिं बघून तो धृति न काय सोडी मला. ५१

फळें रुचिर घालुनी शुकशिशू स्वयें पाळिला,
सुतापरि तयावरी धरिशि भाव तूं आगळा;
समीप नच देखतां तुज करील आक्रोश हा,
विदीर्ण न करील तो हृदय सांग कैसा अहा ! ५२

सुख क्षणिक हें कळें जरि मला विचारामुळें,
तरी हृदय हें जळें परम तीव्र शोकानळें;
न नेत्रजलही खळें सकल धीर माझा गळे,
सुखेंदु मम मावळे हृदयशान्तताही ढळे." ५३

"उशीर बहु जाहला परम तापला भास्कर,
पुरे विरह--शोक हा प्रियसुते ! निघे सत्वर;"
असें वदत माय तों जनक--पाद वंदी सुता,
वदे जनक "होइं गे ! सुतवती सुते ! तत्वतां." ५४

समस्तजन गौरवी मग तिला शुभाशीर्वचें,
सख्या विनविती असो स्मरण सर्वदा आमुचें;
निरोप सखिचा सवें सजल--लोचनीं घेउनी,
निघे मग कुशावती--प्रति सुखासनीं बैसुनी. ५५

बाला पहाती अनिमेषलोचना,
ती जोंवरी त्यास दिसे शुभानना;
अन्तर्हिता काननिं होय जेधवां,
दुःखाकुला जाति गृहास तेधवां. ५६

सर्ग ५ वा समाप्त.

———————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## सद्बोधशतक.

### श्लोक.

कूजी जिथें बसुनि तो सुमनोज्ञ मोर
रक्ताग्र तें दिसत जें तुझिया समोर
तें, तें नव्हे; प्रणय--रक्त--सु--कुंकुमातें
लावी स्वभालिं तरुणी गमतेंच मातें ९१

ऐशी सुरम्य रमणी सुमनोहरा ही
रूपें स्वकीय भुलवील गमे हरा ही
भासे परी न तिजला सुविचार कांहीं
नाहीं तरी करिति हे वद चार कां ? ही ९२

आलिंगुनी समुद ही तरु बम्भुलाला
हा ! हंत ! अल्लड ! खुळी ! पुरवी स्वलाला
झाला पसंत न परी सहकार तीतें
ना रूप ! ना तरुणताहि ! बघे रती ते ९३

वैगुण्य या तरुहुनी च्युत वृक्षिं काय ?
रे ! सांग तीस दिसलें ह्मणुनी स्वकाय
अर्पील कंटकधरा तुज मूक--हेतू
वल्लींत बा ! दिसति जे मज सांग हे तूं ९४

नाहीं स्वरूप न युवा नच गंध वाही
केलाहि जर्जर तसा बघ गंधवाहीं
तैशांत कृष्ण किति हा जणुं कीं तमाल
अर्पी हिऱ्याप्रति अशा ! कशि ही स्वमाल ९५

देहीं किती सुरकुत्या जणुं कीं जरा ही
आली तथा; मन परी रतियुक्त राही

लालाच जो डिक गळे; तमपुंज--राशी
नाहीं तशी सदयता मनिं कीं जराशी ५६

हे वल्लरी ! बघुनि या तुज वैभवांत
वाटे न होत तुज कां ? अयि अंत--वात
कैसी त्रिजे न अहहा ! तव जीववात
किंवा अशीच दिसणार तऱ्हा भवांत ५७

नीचासवें सुलतिके ! तुजला बघोन
सृष्टी--जनी मज गमे तळिं घालि घोण
उल्हास ना लव दिसे विटपीं तसा कीं
वल्ली ! नुरे तरुजनीं तव आज साकी ५८

ऐकोनिया मधुरशा मधुप--स्वनास
केला विमोहुनि लते ! बघ तूं स्वनास
नोहे तुझें स्तवन हें अलि जें करीती
निंदा असे ! बघ जनीं कशि लोक--रीती ५९

हा व्यर्थ दोष अथवा तिज येकलीला
सर्वत्र कीं बघ सुरू जगिं येक लीला
ही आर्यभू तिजहुनी किति ओखटा कीं
पाही कशी सकलही सुविचार टाकी ६०

एका स्वजातितरुतें स्वपतीसमान
मानी लता ह्मणुनि भूहुनि तीस मान
कैसा जरी विटप तो परि गा इमान
राखीयलें बघ तिनें सति तीस मान ६१

एकेपरी बरवि ही बघ भू--परीस
ही आर्य--भूमि न कळे परि काय रीस

ठेवी कशी रति तरी सखया ! अनेकीं
झाली इची जगतिं ही वद काय नेकी ६२

राजा दिलीप रघु वा नृप रामभद्र
ऐशा नृपां त्यजि धरा नच कां ? अभद्र
पांचाल वा कुरुप वा नृपराज धर्म
ऐशा हिनें दवडिलें बघ काय ? धर्म ६३

प्रख्यात पांडव--सखा यदुराज कृष्ण
टाकोनि केंवि करि ही मुख आज कृष्ण
शत्रूस मर्दुन इला करि जो अ--शोक
तोही कसा त्यजियला नृप रे ! अशोक ६४

यत्कीर्ति लुप्त नच हो जरि चंद्र गुप्त
झाला नभीं तरि असा नृप चंद्रगुप्त
ठावें न ज्यास समरीं कधिंही अपेश
तोही सख्या ! न पटला इजला नृपेश ६५

दावीयलें रणि जयें बहु विक्रमातें
ऐशा इनें त्यजियलें नृप विक्रमातें
स्वीकारिती न जरि ही असत्या क्रमातें
होती तिची न गमतें स्थिति वक्र मातें ६६

ज्यानें पराजित रणांत महामदातें
केलें तदीय हरुनीच महा मदातें
तो आवडे न इजला नृपराज पृथ्वी
गायी यदीय यश आजहि सर्व पृथ्वी ६७

लावीयलें निजपदीं यवना नमाया
तैसें तयांस वधिलें धरितां न माया

ज्यानें अशा शिवनृपीं रति बा ! धराया
वाटावि लाज तरि काय धरेस राया ! ६८

ऐशा गुणें उपजवी मनिं ही दरास
होईल ही भरत--भू विबुधादरास
कैशी सुपात्र न कळे मज देवराया
होवो पुन्हां अशि न धी तिज दे वरा या ६९

ऐशा हिनें वरियलें कितिकां नृपांशीं
झाली न बद्ध परि बा कधिंही नृ--पाशीं
धि:कारिलें बघ इनें बहुशा पतीस
ते देति आज सगळे बहु शाप तीस ७०

आर्यां त्यजून वरि ही मग मोंगलांस
शोभे यदीय वदनीं मदिरा गलास
शेखीं तयांसहि गड्या ! विपदीं त्यजून
रक्तास्य आंग्ल वरि ही न कथाहि जून ७१

दैवें तिला सुपति हा मिळला नय--ज्ञ
केले इच्यास्तव तयें बहुसे न यज्ञ
युद्धांगणीं; तिज पटो तरि हा अतां रे !
तोडो पुन्हां अशि न ही मतिचे कि तारे ७२

एवं गमे भरत–भूजन–योषिता कीं
टाकोनि दूध शमवी स्वतृषाहि ताकीं
नाहीं विचार लव रे, ! मनिं लाज नाहीं
वाटेल त्यास वरिते पटतां मनाही ७३

नाहीं तिनें बघियलें कधिं जात गोता
येतां सुवीट पतिचा मग त्यासि गोता

देते; कशी सु-महती; इचि व्हावि लोकीं
मूळाहुनी कृति अशी करि ही विलोकीं ७४
बा! दाविलें तुज यथामति भूमिचित्र
तैसीच जी तुजपुढें लतिका विचित्र
म्यां वर्णिली निज यथामति तीहि सांग
रे! श्रेष्ठ या उभयतीं मज कोण सांग? ७५

अनंततनय.

अपूर्ण.

## षड-रि-समर-चंपक.

### दल १ लें

आर्या.

" हें युद्ध देखिलें कां? करितां या रक्त-वास वध सेना
दिसतात काय नयनां? चित्तेंही यांत वासव धसेना! १
काय वदसि? ' हें आहे शांत जगत् उदधि-मध्य-गत-वनसें '
झालास अंध वाटे, अवलोकन--शक्ति नयन--ग तव नसे! २
घे दिव्य दृष्टि, देतों नेत्रीं अंजन तसेंचि, अ--भ्रांत
दावील जग तुला तें, सूर्यातें जेवि काय अ--भ्रा--न्त " ३
" हा! धन्य धन्य बापा अंधत्वाचा न ठेविला गंध!
परि हत--जन--गत--दुःखें झाला पहिल्यापरीस हा अंध ४
हाहाकार श्रवणीं पडती हे विद्ध--लोक--शोकाचे!
हा कांचें मन! मानो शोकाचें वनहि हें अशोकाचें! ५
हा हत, तो विद्ध, पहा झाला तो रक्त रक्त-पातानें,
हातानें हा धरिला, हरिला हो सर्व गर्व हा यानें! ६

हे ष--ड्वीर धुरंधर--हीर रहंवर अधिष्ठुनी करिती
दारुण समर, पलायन स--दुपाया या तदीय अरि वरिती ! ७

## दल २ रें.

### आर्या.

हा वीर--प्रवर पहा काम, अमित--वीर्य सर्व समरांत !
सोडी शर, तोडी शिर नुरवी चापल्य--गर्व अमरांत ! १
हा कामिनी--रथ पहा याचा चमके रणांत चपलेसा !
त्या वृत्त--स्तन--मंडल--युग--चक्रें वाहताति न कलेसा. २
हा लोल ध्वज दिसतो त्याचा हो नयन--मीन रणरंगीं
जो दर्शनेंचि अरिच्या हृदयींचे सर्व--हेतु--गण भंगी ! ३
हा त्याचा शंख पहा दिसताहे कंठ दीर्घ, तो खास
अरि भंगुनि दे त्याते, इंद्राते त्या न पवि हि तोखास ! ४
या चाप ज्यास दिसती केशा--लि--परंपरा परांस रणीं
आस्फालनें भिववितीं, अवगत यांचीं नसे परा सरणी ५
हें त्याचें कुटिल भ्रू--धनु, याच्या वीर्य--संपदेते गा
नच वर्णवे ! हिमासम कौटिल्यें अरिस कंप देते गा ! ! ६
हा पंच--बाण बाणीं वधितां रक्षील कोण ? सांग मला.
हा अरिते हि, नगाते पवि--सम, यम--चण्ड--दण्डसा गमला ! ७

## दल ३ रें.

### आर्या.

सरसावला दुजा हा, मागें त्या साहनीच पळल्यांतें
पालाणुनि युद्धाला, दावी शौर्यास अमित पळ त्याते ! १
हा लोभ ! क्षोभ जगीं याचा साहेलसा दिसे ना कीं !
भू--लोकींच न याचा, धाक परी सुर--गणीं वसे नाकीं ! २

परमे--श्वरीं विचिंतिति वैषम्या जे मलीमसा--चार
ते याचे शत्रु ! शिरीं हा त्यांच्या पाद देत साचार ३
शोक नसुनि, शोकाला लोकाला लाववी करायास !
मायावी हा भारी ! जोडी तो इंद्रही करा यास ! ४
निज--शित--शरें परांच्या उचलूनि मनो--रथास फिरवी हा;
आनंदित हत असुनी, मानी अरि पूर्ण--कल्प निज ईहा ! ५
ऐसा उंच चढवुनी पाडी त्या एकदाचि खळ हा कीं !
मग अ--सुख काय सांगों अरिचें, मग ईश्वरीं दया बाकी ! ६
ऐसा मायी शत्रू जगतीं यासम दुजा न आढळतो !
यातें देखुनि धृति--नग रिपुचा तेव्हांचि ह्मणुनि हा ढळतो ! ! ७

## दल ४ थें

### आर्या.

त्याच्या संगें दुसरा वीर पहा हा झटे रणांत कसा !
मत्सर, वाटे अरिला होतां शर--विद्ध शुद्ध अंतकसा ! १
विष--दिग्ध--पृषत्कांनीं ताडी हा शत्रु--काय, हाय ! रणीं.
झुरुनी मरती विद्विष याची इतरां कदा नये करणी ! २
हा चवथा वीर पहा क्रोध, पुढें धावला, अरिस हाय
वदवाया शर--घातीं, असला अमरेंद्र त्या जरि सहाय ! ३
ज्याचा गर्व करूनी ताडन, गुरु, लोभ--मत्सरीं हरिला;
त्याच्याचि शक्त हनना हा, न शिवे अन्यथा दुजा अरिला ! ४

## दल ५ वें.

### आर्या.

हे इकडुनि हाणिति, तों आला तिकडूनि वीर शर--धारा
वर्षत हर्ष. त्यांसम निशित खचित त्या न शस्त्र--वर--धारा ! १

दंभ असे नाम यया यानें जगतांत सोडिला न दिसे !
तो याचा परमा--री ज्याच्या सदनांत वित्त--सुख विलसे ! २
सर्वांहूनी खर--तर--शर वर्षत पातला सुभट हा हो !
आवरि याते देवा, नच संग्रामीं समग्र--भट--हा हो ! ३
अतुल प्रताप याचा माया--देवी--प्रधान हा, वमला
विष वाटे बाण--मिषें ! सोडुनि गेला बघूनि आव मला !" ४

आमोद.

' समरिं या जरि वांछिसि गा यशा
प्रभुचिया तरि नि--र्मल गा यशा
करिल मोघ तदीय--शरां जनीं
कवच हें ! वच हें धरिं बा मनीं १

पुंस्कोकिल.

Mrs. Browning's
Sonnets from the Portuguese.
II

## फिरंग्यांचें* संगीत.

" But only three in all God's universe
have heard this word Thou hast said
himself beside "

साक्या.

विश्व जयाचें तो पहिला तूं दुसरा वदणारा ती
मी तिसरी तववचनसुधेला हृदयीं ओतुन घेती १

---

* सूचना-- पहिलें संगीत लक्षांत असल्यावांचून किंवा नसलें तर पुन्हा वांचल्यावांचून हें चांगलें लक्षांत येणार नाहीं. संपादक.

तिघांवांचुनी नाहिं ऐकिली त्रिभ्वीं अवघ्या कोणी
उत्साहाची जणूं वाहिनी तव वाणी कल्याणी २
ऐकुनिया ती उत्तर देई तिघांतुनीयां एक
देवच बोले ! न तें कुणाला तुजलाही ठाऊक ३
गेली ! झाली दृष्टी माझी क्षणांत शापग्रस्त
पुढतीं माझ्या तूं तरि झाला तुझा मला जणुं अस्त ४
जातें मरुनी तरि मृत्यूच्या दुःसहही अधिकारें
केलें नसतें असें आपुल्या योगाचें मातेरें ५
जगांत अवघ्या कोणी बोलो " नको " तरी तें पुरवे
देवापासुन परि येणारें " नको " न सखया बरवें ६
सदा चालल्या कल्लोळानें मनुजाच्या अपणांला
नसतें केलें दूर साधतें नच तें महार्णवाला ७
नसतों लवलों जरी भयंकर दुर्धर वादळ सुटतें
करामधें कर पडते पर्वत जरी आडवे येते ८
अपणांमध्यें आकाशचि हें आलें असतें अंतीं
अक्षयतेच्या राज्यीं अपुली प्रीती अक्षय होती ! ९

टिळक.

---

## जीवितकर्तव्य !

( अभंग )

झाले आजवरी । बहु साधुसंत
दावाया सत्पंथ । जनालागीं,
पुस्तकविस्तार । कोट्यावधि केला
जेणें हेलावला । ज्ञाननिधी,
त्यांतील तत्वार्थ । सुचवितों दिव्य

जीवितकर्तव्य । नाम जया ! १
विवेककवच । सुदृढ लेवोनी
वावरावें जनीं । मुमुक्षूनें;
न घडे कदापी । तेणें स्तुति हेवा
जीवात्म्याशीं दावा । तैसा कधीं,
मग भवभीति । विलय पावेल
मोक्ष तो येईल । सहज हातीं ! २
मनोविकाराचें । न गणीं प्राबल्य
मानोनी दौर्बल्य । स्वतःचें
तेणें कीर्तिपाश । किंवा लोकनिंदा
करील न बाधा । लव त्यासी,
सायं मेघावरी । रंग जो सुंदर
त्यापरी अस्थीर । असतीं जीं ? ३
सत्याचें सातत्य । मनासी बाणोवे
शील तेंची व्हावें । निदानींचें;
मग मायपाश । कोठोनी जाचील
चरिता लागेल ! डाग तैसा ?
सुखदुःखादिक । इंद्रियांची सारी
फसवणूक बरी । उमगेल ! ४
रात्रंदिन भाव । ईश्वराचे पायीं
ठेवोनिया राहीं । शुद्ध पूर्ण;
तयानें होईल । फलाशेचा त्याग
तोचि सुविराग । स्तवितात,
जेणें निर्बंधत्व । येईल आत्म्यास
पुनर्जन्म खास । चुकेल तो ! ५

जन्मवरी ऐसें । राहोनिया शुद्ध
मरणासी सिद्ध । व्हावें प्रेमें;
तेंची एक आहे । सत्य दिव्य शांत
अशाश्वत अंत । करणारें,
कल्पना प्रभा ही । उजळो अंतर
ह्मणे कविश्वर । " राजहंस " ! २२

———— राजहंस ऊर्फ एंजिनियर वाघीकर.

Mrs. Browning's
Sonnets from the Portuguese.
III
" Unlike are we, unlike, o Princely Heart. "

**फिरंग्याचें संगीत.**

चाल-- " चंद्रकांत राजाची कन्या सगुण रूपखाणी. "

अणुरेणूचें साम्य न उभयीं मी न तुला योग्य
मूर्तिमंत दुर्भाग्य जगीं मी तूं रे सौभाग्य ॥ धृ० ॥
स्थिती आपुल्या भिन्न भिन्न किति भिन्न मती नियंती[1]
परमोदारा मी तव दारा ! केवळ ही भ्रांती
दिव्यदूतें[2] परि कल्पकें अपुले देवाच्या घरचे
नवल करीती पाहुन अपणा तुझिया वेडाचें १
गुणीं वैभवीं जगीं स्त्रीजनीं असेल जी राणी
ह्मणेल ती " मी धन्य जन्मुनी " रमता तव चरणीं
प्रेमाश्रूंच्या फुलमाळांची तुजला लाखोली
सहस्त्र युवती सदा वहाती खंड न कधिं कालीं २

1 Destiny. 2 Ministering angels.

हे गंधर्वा तुझ्या गायना ताल कसा देऊं ?
मी दुबळी मम हस्त धराया नको पुढें होऊं
मी अंधारीं शोकतरूच्या छायेला बसलें
गाणें कसलें ! रडगाणें मम केविं तुला रुचलें ! ३
विजयश्रीनें माळ घातली तुला पुरुषरत्ना
पहा दुर्दशापाश गळीं मम ! सोड विफल यत्ना
उगाच पाशीं गुंतुं नको ह्या जाउं नको वायां
पदर पसरितें हात जोडितें पडतें मी पायां ४

टिळक.

## जें जें असे तेंचि यथार्थ आहे.

श्लोक.

जसी जसी बुद्धि विकास पावे, । जसें जसें ज्ञानपथा क्रमावें,
तसें तसें स्पष्ट मना दिसे हें-- । " जें जें असे, तेंचि यथार्थ आहे. " १
जें भूवरी भोगिति दुःख आर्त, । आहेचि तें निश्चित तद्धितार्थ;
त्यांना कळेना जरि दुःखहेतु, । अंतीं मिळे सौख्य, न यांत किंतू. २
निसर्गदेवीकृति येथ देखा, । प्रमाद अन्याय कधीं घडे का ?
प्रभात येते सरतां निशा ही, । कोणास हा प्रत्यय येत नाहीं ? ३
भासोत अन्याय जगीं अनंत, । न्यायांत तन्मूल असे नितांत.
हा मी मनीं प्रत्यय आज पाहें-- । " जें जें असे, तेंचि यथार्थ आहे. " ४
येतां निशा होइल अंधकार, । हें सर्व ही जाणति सान थोर.
निसर्गदेवीकृति अप्रमाद । पाहोनि घ्यावा मनिं तत्वबोध. ५
अज्ञात वा ज्ञात सुदुष्टकृत्य, । आहे तयाचें फल दुःख सत्य;
विलंब लागो, युगपद् दिसो तें, । परी न कोणास कधीं चुके तें. ६
वाटे मनीं जी मनुजां अशांति, । सौख्यास ती कारण होय अंतीं.

जें दुःख तें उन्नतिमूल पाहें; । " जें जें असे, तेंचि यथार्थ आहे."
अनंतसृष्टीनियमांत दोष । न एक हा, हें कळतें कवीस.
जें जें घडे, होइल कीं तदंतीं । मनुष्यकल्याण जगांत शांति. ८
यदा सुखें ज्ञानपथा क्रमीतों, । सिंहावलोकें जग मी पहातों,
तदा मला स्पष्ट खरें दिसे हें-- । " जें जें असे, तेंचि यथार्थ आहे." ९

मल्हार खंडेराव चिटणीस बी. ए. एल्. एल्. बी.

---

## प्रियेचे अश्रु.

श्लोक.

अश्रु हे किति तरी रमणीय ! । यांस पाहुनि मना सुख होय
प्रीतिचा खवळला तव सिंधु । स्पष्ट दाविति सखे जलबिंदु १
प्रीति सत्य नसतां हृदयांत । कोठुनी जल निघे नयनांत
प्रीति अश्रुजननी मज वाटे । दाटतां जलमिषें उरफाटे २
अश्रु दुःख तव हे कथिताती । सुंदरी मज परी सुख देती
प्रीतिची उलट ही बघ रीति । भिन्नभाव हृदयीं उठवी ती ३
अश्रुनो स्थिर रहा नयनीं या । चालला त्वरित कां गळुनीया
कामिनीनयनकंजदलाची । संगति प्रिय तुह्मां नच कैची ४
दिव्य शक्ति तुमची समजें मी । टाकितां सहज भारुनि कामी
कोणता प्रणयि जो नच कांचे । अश्रु चारु बघतां ललनेचे ५
प्रीतिमुग्ध असतो जन कामी । दूषितों ह्मणवुनी न तया मी
जे परी गतविकार महन्त । तेहि पाहुनि तुह्मां द्रवतात ६
स्फूर्तिदान करुनी बहु दिव्य । सांगतां कविस गा नव काव्य
भाग्य त्यास अनुकूल न झालें । ज्यांस साह्य तुमचें न मिळालें ७
अश्रुनो स्थिर रहा नयनीं या । चाललां त्वरित का पळुनीया

हाय हाय ! परि अश्रु गळाले । स्फूर्ति सर्व मम घेउनि गेले ! ८

अश्रूंस या घन जरी करण्यास येतें
मानें अहा ! विपुल सौख्य सदैव होतें
गुंफूनि अश्रुमणिचा मग रम्य हार
कंठांत घालुनि तया करितों विहार ९

माधवानुज.

---

## सुभाषित.

### श्लोक.

होई ज्यास मुळीं विकार न कधीं ज्याची रुची पालटे;
प्याले सर्व जरी यथेच्छ न तरी जो स्वल्पही ओहटे;
वाढी जो मतिमांद्य, तृप्तहि करी, ज्यातें खरी माधुरी;
ऐसा सत्य सुभाषिताख्यरस, हा सारी सुधाही दुरी. १

भिक्षावृत्ति स्वताची वरदवर परी होय विख्यात जो कां;
राहे नित्य स्मशानीं, तरिहि शुचि बहू जो असे मान्य लोकां;
भूतांशीं स्नेह ज्याचा, अभयकर परी जो स्वभक्तां जहाला;
भावें मी वंदितों त्या अघटितचारिता विश्वनाथा शिवाला. २

अंभोधि क्षार, तापा रवि वितरि, असे चंद्रमा तो कलंकी,
विद्युत्संयोग मेघा, कनकगिरि जनां दृश्य नाहीं विलोकीं,
व्योमा शून्यत्व, पृथ्वी उरगपति-शिरीं, कामधेनू पशू कीं,
कल्पद्रू काष्ठ, चिंतामणि उपल, नसे सज्जनां साम्य लोकीं. ३

भृंग.

---

# काव्यरत्नावलि.

## अंक ६ वा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ६ वा.

शिवाजी रुस्तुमजमान व शिद्धिजोहार याचा पराभव करितो. शाहिस्तेखान शिवाजीवर चालून येतो. त्याचा पराभव. जयसिंहाशी तह. शिवाजी दिल्लीस जातो. त्याचा कारागृहवास व सुटका. दुर्मति भद्रांचलाचा सुभेदार होतो. त्याचे दुराचरण. त्याचे दुष्ट बेत.

आर्या.

अफझुलखान मरतां होय गलित धैर्य सकल कुमतीचें,
चिंता हृदयीं करिती रक्षण होई कसें वसुमतीचें. १

दिवसेंदिवस शिवाजी रिपु अपुला होत चालला प्रबल,
यवनां जिंकुनि समरीं निजकरगत करितसे मही सकल. २

रुस्तुमजमान नामक होता मिरजेस एक सरदार,
तो धाडिला नृपावरि यवनांची ज्यावरी बहु मदार. ३

त्यांतें जिंकुनि घालवि कृष्णेच्या पार सर्व यवनांतें,
लुटुनी त्यांचीं नगरें राजगडीं नेत तो बहु धनातें. ४

कर्नाटकांत होता प्रथित महाशूर शिदिजोहार,
रिपु सर्व ज्यास भीती गेला कोणासही न जो हार. ५

देउनि अपार सेना भूपति वरती तयास धाडियलें,

त्यानें पऱ्हाळदुर्गीं अवचित भूपा ससैन्य वेढियलें. ६
होई मास चतुष्टय शिवभूपति त्या गडांत सांपडला,
न सुचे उपाय कांहीं सुटण्याला घोर संकटीं पडला. ७
तेव्हां निरोप धाडी सिद्ध असें मी करावया सल्ला,
झाले सुखनिर्भर ते ह्मणती आह्मांस पावला अल्ला. ८
सांपडला भूप करीं ह्मणुनि असावध रहात दुर्जात,
तों तिमिरावृत रात्रौ गुप्तपणें रांगण्यास शिव जात. ९
प्रातःकाळीं करिती अविंध ते पाठलाग रायाचा,
बाजी गांठि रणीं त्या करीस हरि केंवि आवरायाचा. १०
करुनि पराजय हटवी यवनां कितियेक वेळ रणधीर,
ठेवी धारातीर्थीं स्वामिनियोगार्थ देह तो वीर. ११
मग गोब्राह्मणपीडक मोंगलनृप त्यावरी करी चाल,
स्वबळें झोडी यवनां बडबड करितात विफल वाचाल. १२
झाला प्रबल शिवाजी निर्भय लुटितो स्वदेश वीरगडी,
औरंगजेब ऐकुनि वचन सकल हें अधररदन रगडी. १३
होता दक्षिणदेशीं शाहिस्तेखान जो सुभेदार,
आज्ञापी त्याला तो होय शिवाजी मदांध अनिवार. १४
त्याची सेना सारी विध्वंसुनि दंड त्यास करिं थोर,
उन्मत्तास धरुनि त्या आणावें सत्वरी मजसमोर. १५
येउनि पुण्यास राहे घेउनिया खान तो महा सेना,
हें मौर्ख्य बघुनि त्याचें केविं मनीं नृप निकाम हासे ना ? १६
दुष्टाभिमान हरण्या शौर्यें चिरण्या मदांध यवनाशिरें,
परिमित सेवक घेउनि पुण्यांत तो साधुगीतकवन शिरे. १७
विश्वासराय भगिनीसुत दुर्मति यवनसेवनीं निरत,
दुष्कर्मपरायण या सैन्यासंगें असे सदा फिरत. १८

खान कदाचित् त्यातें शासन करि पाहुनी दुराचार,
ह्मणुनि कुपित दुर्मति तो इच्छी करण्यास त्यास अपकार. १९
येतांचि संधि ज्यापरि दंश करितसे अमर्षण भुजंग,
प्रत्यपकार परायण सिद्ध सदा तोहि दुर्मति अभंग. २०
जरि कपटवेषधारी तरि भूपा ओळखी दुराचार,
खाना अपकृति करण्या योग्य समय तोच मानि साचार. २१
भेटुनि भूपां सांगे नव युक्ति करावया यवन-नाश,
दुष्ट भुजंग दुखवितां पडती कंठीं स्वयेंच यमपाश. २२
अति घोर रात्रिसमयीं तिमिराकुल जाहल्या दिशा दाही,
निद्रासुख जन भोगिति चालविली अल्प वृष्टि जलदाहीं. २३
निद्राकुल यवन सकल अतिरिक्त करूनिया सुरापान,
दशदासमान पडले नाहीं देहावरी किमपि भान. २४
घेउनि निजानुचर नृप शिरला तो गुप्त यवनसेनेंत,
वातायन विवृतमुखें दुर्मति सावधपणें तया नेत. २५
शिरतां सदनीं श्रीशिव भीतीनें गलबला स्त्रिया करिती,
प्राणभयें खान पळे स्त्रिया विलापें नभस्तला भरिती. २६
गांठुनि त्यास शिवाजी हस्तीं घेऊन नग्न तलवार,
छेदी अंगुलि त्याची करुनी हस्तावरी प्रखर वार. २७
हें घोर कर्म करुनी निजलोकांसहित जाय रायगडीं,
दुसरे दिवशीं मोंगल चमूस रगडी ससैन्य राय गडी. २८
हें घोर कर्म पाहुनि झाला भयभीत तो मनीं खान,
बोले मनुष्य नच हा होय शिवाजी खराच सैतान ! २९
हतवीर्य होउनी मग सैन्यासह खान चालला देशा,
बोलावी परत तया धाडुनिया बादशाह आदेशा. ३०
दुर्मति खलमति जरि तरि झाला शिव भूमिपति कृपापात्र,

कपटपरायण रत तो नृपचित्ताकर्षणीं दिवसरात्र. ३१
कांहीं काळें श्रीमान् भूपजनक पावला शिवपदातें,
तेव्हांपासुनि नरमणि जोडी तो "भूप" या उपपदातें. ३२
पैगंबरा नमाया जाती मक्केस जे मुसलमान,
त्यांतें लुटी नृपोत्तम यवनांचा छेदण्या दुरभिमान. ३३
खदिरांगार तसा हें ऐकुनि औरंगझेब कोपतसे,
न उपेक्षावा रिपु हा धार्मिक यवनांस फार पीडितसे. ३४
प्रेषी मग सेनेसह रणशूर दिलेलखान जयसिंह,
समरांगणीं वरी जो मृगयूथीं जेंवि नित्य जय सिंह. ३५
हिंदुयवनसेना ती पाहुनि भूपा पडे मनिं विचार,
हिंदुनृपाशीं करणें वैर नसे हा खरा सदाचार. ३६
स्वप्नीं दर्शन देउनि देवी सांगे नृपा ! गुणग्रामा !
विजयश्री वरिल तया हिंदुनृपाशीं करीं न संग्रामा. ३७
यास्तव जयसिंहाशीं भेटुनि त्यासह करीं त्वरित साम,
न वरीं खेद मनीं लव सत्वर पुरतील सर्व तव काम. ३८
श्रीची आज्ञा परिसुनि युद्धकथा टाकुनी सकल राय,
घेउनि परिमित सेना जयसिंहा भेटण्यास मग जाय. ३९
प्रेमालिंगनपूर्वक भेटे तो करुनि बहुत सत्कार,
जरि यवनसेवनीं रत तो स्वजनीं प्रेमभाव धरि फार. ४०
सल्ला करुनि तयासह दिल्लीपा भेटण्या नृप निघाला,
न कळे कापट्य तया योजी खल घालण्यास तो घाला. ४१
घेई संभाजीतें संगें मित दुर्मति प्रमुख भृत्य,
दुर्दैवें न समजलें दिल्लीपतिचें तया कपटकृत्य. ४२
जातां सभेंत त्याचा करि दुर्मति पादशाह अपमान,
बोले दुरुक्ति खल तो भेदी हृन्मर्म जी पविसमान. ४३

तें पाहुनि भूप वरी निदाघमिहिरासमानसंताप,
परि कोप न प्रकटवी कीं देइल दुष्ट बुद्धि बहु ताप. ४४
कपटपरायण दुर्मति दावी वेगें नृपास तो कारा,
नि:शंक वचन भंगुनि दुर्जन करिती परास अपकारा. ४५
होई हतबल ज्यापरि मृगाधिपति सांपळ्यांत सांपडला,
झाली गति तीच खरी नृपवर तो घोर संकटीं पडला. ४६
कपटपरायण रिपुशीं कापट्याचरण मूढ जो न वरी,
आदरि तयास लोकीं सोत्कंठा अवदशा खरी नवरी. ४७
बंधविमोचन व्हाया कापट्याचरण भूप योजि निकें,
धूर्तशिरोमणि तज्जन त्यापुढती बादशाह काय टिके. ४८
गुणगणहीन असे तरि कपटकलानिपुण फार दुर्मति तो,
बंधनविमुक्त व्हायां भूपां बहुविध उपाय तो कथितो. ४९
दुष्कर्ममार्गनिरतां विदित तयां स्वामिभक्ति ती कुठिल ?
कपटपरायण वागे स्वार्थावरि दृष्टि ठेवुनी कुटिल. ५०
स्नेह करी दरबारी असती जे मुख्य मुख्य सरदार,
झाले मोहित यवनहि पाहुनि भूपाल तो महोदार. ५१
देहास्वास्थ्यमिषें मग मरणोन्मुखसा पडे विकल काय,
होय बरा ह्मणुनि सुखवि फकिर मग न विप्रही सकल काय. ५२
धाडी सुहृज्जनातें नित्य मिठाई भरूनि पेटारे,
याचक लोकां वांटी किति भूपा धन्य वदति जन सारे. ५३
सावधपणें नृपाळें क्रमिले तेथें कितीक दिवस असे,
मग एकदा सुतासह गुप्तपणें त्यामधें स्वतांच बसे. ५४
भूपतिचा पेटारा दुर्मति घेवून मस्तकावरती,
सावधपणें तयातें ने जरि सर्वत्र यवन वावरती. ५५
नगराबाहेर सुखें येउनि अश्वावरी बसुनि भूप,

संभाजी दुर्मतिसह आला देशीं वरुनि यश अमूर. ५६
संकटपरंपराहत झाला मार्गात फार लोकपती,
दुर्मतिसह सेवकजन सर्वहि सावधपणें तया जपती. ५७
औरंगझेब दचके पाहुनि हस्तांतुनी रिपु निसटला,
दिधलें पद यच्छिरिं तो महाहि अक्षत करांतुनी सुटला. ५८
येऊनिया स्वदेशीं जमवि शिवाजी समस्त पर्वबल,
गांठी यवनां समरीं पळती खल दशदिशेस नष्ट-बल. ५९
तो न्यायनीतिनें मग राज्य करी धर्म-रामचंद्र-सम,
करितां अपराध, सुतां तेंवि परां करि नृपाल दंडसम. ६०
कपट-परायण दुर्मति तरि ही सेवा करी विपत्काळीं,
ह्मणुनी नृप लोभ करी कार्यकरा तो सदाहि सांभाळी. ६१
आधारभूत होता भद्रांचल दुर्ग राज्य--वृद्धीतें,
दुर्गाधिनाथ तेथें नेमी भूपाल दुष्टबुद्धीतें. ६२
स्वातंत्र्य विभवलक्ष्मी नच होई लोकिं केवि विष यातें,
आनंदाद्रि शिरावरि चढुनि सदा सेवि दुष्ट विषयातें. ६३
जाधवराय--सुता जी कमला कमलाच होय जगिं अन्या,
ती पूर्वपुण्य--योगें दुर्मतिला प्राप्त जाहली धन्या. ६४
मर्कटकरीं गवसली अनर्घ्यमणिमालिका जशी विमला,
राहु--मुखीं विमलसुधा त्यापरि मूर्खास लाधली कमला. ६५
चातुर्यपरमसीमा लावण्योदक तटाकिनीच खरी,
इच्छा प्रबल परस्त्रीप्राप्तीविषयीं तरीहि दुष्ट धरी. ६६
स्वैराचार करितसे मदांध होऊन तो सुरापानें,
न्याय--पथानें वागुनि जोडियलें यश कधीं सुरापानें. ६७
आधिं चपल यौवन हें त्यांतहि वैभवसमृद्धि अनिवार,
इंद्रिय--सुख--सेवन--रत दुर्जन काय न करील अविचार ? ६८

विट चोर जार बहुविध निजहिततत्पर खलाग्रणी जमती,
नाचविती विषयनिरत नीचा मर्कटसमान कुटिल--मती. ६९
कितिएकांचें धन हरि कितिएकांच्या स्त्रियाहि हा नीच,
सारासार विचार न करि इच्छी लोक त्यास हानीच. ७०
लावण्यवती वनिता पाहुनि तो होय दुर्जन सकाम,
कामासम नच बुडविति या लोकीं रिपुसहस्त्रहि निकाम. ७१
प्राशुनि मदिरा अन्य स्त्रीसंगें घालवी पहा रजनी,
दाविल नरकपथा नच केंवि पर सती जनापहार जनीं. ७२
दीनजनांची यापरि विपद्दशा काय सज्जन वदावी,
दिसती विकल सकलही वनस्थलीं जेंवि दग्ध नव दावीं. ७३
विश्वास कन्यकेनें केला जो आपला तिरस्कार,
तो स्मरुनि सर्वदाही इच्छी करण्यास तीस अपकार. ७४
वृत्त तिचें जाणाया उत्सुक होऊनिया दुराचार,
पुष्पपुरीतें वेगें गुप्तपणें पाठवी कुटिल चार. ७५
जाउनि पुष्पपुरीतें वृत्त सकल आणिलें मग तयानें,
वदला खलास सकलां झाली सन्मान्य ती स्वविनयानें. ७६
निज विमल वर्तनें ती झाली सर्वांसही प्रिया फार,
भरलें जगीं यश तिचें तातातें तीच जीविताधार. ७७
प्रेमें वरिती झाली कुशावतीचा नृपाल वीरमती,
जो धीरवीरवर्गीं हीरकसा यद्गुणीं कवी रमती. ७८
संप्रति तनयेसह ती करि सुमती तात–मंदिरीं वसती,
जाईल अल्प कालें निज सदनातें कुशावतीस सती. ७९
ऐकुनि सुयश सतीचें दुर्मति खल पावला परम ताप,
भ्रष्ट करीन तिला मी निश्चय हा करितसे महा पाप. ८०
आपत्काळीं पाळी स्नेहें जो आपणा तनयसाच,

तत्कन्येतें अपकृति इच्छी न खला मनांत नय साच. ८१
पतिसदनीं जातां पथिं अवरोधुनि तज्जनास वीरमणी,
मी निज बळें करिन ती हस्तगता सुललिता नवी रमणी. ८२
ऐसा पापखनी तो धरीतसे दृढ मनांत कुविचार,
उत्तेजन देत तया तत्सम तद्दुष्ट–मित्र--परिवार. ८३

श्लोक.

उत्तेजिता यापरि त्या खलातें,
शठाग्रणी सज्ज करी तयातें.
वेगें पुढें पाठवि धूर्त चार,
निघे स्वयें मागुनि दुर्विचार. ८४

सर्ग ६ वा समाप्त.

————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## ऋतुसौंदर्य*.

### ग्रीष्मऋतु.

श्लोक.

विघ्नराजपदाब्ज, विघ्न विनाशनास्तव वंदुनी,
बुद्धिजाड्यविनाशका मग शारदा स्तवुनी मनीं.
कालिदासकवीकुलाग्रणि चिंतुनी कविसज्जना,
प्राकृतीं ऋतुभाग्य हें कवि वर्णितो बुधरंजना. १
विश्वोत्पत्तिलयस्थितिप्रद महा भूतादिकोज्जीवना,
वंद्या जी निगमागमा निरुपमा दक्षस्वभक्तावना.

---

* कालिदासकृत ऋतुसंहाराचें हें मराठी भाषांतर आहे. आजच्या अंकांत सर्ग १ ला ( ग्रीष्मऋतुवर्णन ) दिलेला आहे. यापुढें प्रत्येक अंकांत एक एक सर्ग प्रसिद्ध होईल. पुष्कळ वर्षांपूर्वी रत्नावलींत गोपाळ गोविंद टिपणीसकृत याच काव्याचें भाषांतर प्रसिद्ध झालें आहे.

पर्यायें ऋतुषट्प्रकाशितजगत्सौंदर्य रूपोज्ज्वला–
ऐशी ती जगदंबमाय कमला देवो सदां मंगला. २

तेजें सूर्य महा भयंकर, शशी इच्छाचया सुंदर,
झाली क्षीण जलाशयें, जन सदां स्नानामधें तत्पर,
संध्या ही रमणीय, काम शमला सर्वत्र जो वाढला;
तो हा ग्रीष्मऋतू पहा प्रियतमे ! आतां असे पातला. ३

चंद्राच्या किरणें मनोहर अशा त्या सोज्वला शर्वरी,
कांहीं कृत्रिमशीं विचित्र रचिलीं धारागृहें साजिरीं;
लेपा चंदन, चंद्रकांतमणिचीं वक्षस्थलीं भूषणें,
ग्रीष्मीं हीं जनसेवनीं बहुपरी येती कुरंगेक्षणें. ४

सद्गंधोदक शीत सौधतल तें चित्तासि वेधीलसें,
उच्छ्वासें अतिकंपिताधरमधू कांताधरींचा तसें,
कामोद्दीपक गायनें मधुर जी वीणाध्वनी सुस्वरें,
कामीं मध्य निशींत हीं अनुभवी ग्रीष्मीं सदां आदरें. ५

कांची आणि दुकूल शोभति अती ऐशा नितंबस्थलें,
वाहे फार सुगंध वाशितजलस्नानादशा कुंतलें.
हारालंकृत चंदनार्चित अशा वक्षस्तनालिंगनीं,
ग्रीष्मीं कामुकताप तो शमविती त्या सुंदरा कामिनी. ६

लाक्षालेप सुरंग दाट विलसे ज्या कोमलाग्रस्थलीं,
ऐशा नूपुर मंजुला रमणिच्या त्या रम्य पादावली;
जातां मंदगती पदोपदिं अती हंसध्वनीगायनीं,
लोकांच्या मतितें सकाम करिती तात्काल आकर्षुनी. ७

ज्या ठायीं विलसे तुषारधवला मुक्तावली साजिरी,
ऐशीं चंदनलेपशीतल अती नारीस्तनें त्यापरी.

कांची हेममयी विराजित जिथें ऐशी नितंबें जनीं,
कोणाचें करितील चित्त नच तें सोत्कंठसें वेधुनी. ८

उष्म्यानें अतिघर्मगौरतनुच्या संधीप्रती दाटतां,
पुष्टोत्तुंग घनस्तना तरुणशा लीलावती योषिता.
पूर्वीचीं अति दाटशीं सुवसनें टाकोनिया सांप्रतीं,
उंची नाजुक कंचुकीवसन तें वक्षस्थलीं सेविती. ९

चंदनोदक सेचिल्या अति शीतल व्यजनानिलें,
मौक्तिकावलिपुष्पहारविभूषितस्तनमंडलें.
तंतुवाद्यकलामनोहरसूक्ष्मगायनसुस्वरें,
ग्रीष्मनिद्रित मन्मथा स्मृतिबोध कां जणु सादरें. १०

चंद्रमा रजनींत शीतल शुभ्र सौध सुखासनीं,
गाढनिद्रितसुंदरीवदनारविंदविलोकनीं;
दर्शनोत्सुक फार जो चिरकाल लोभुनी गुंतला;
लाजुनी अरुणोदयें जणु काय पांडुर जाहला. ११

महावातें पृष्ठावरि तरत छत्रापरि धुळी,
तशी तप्ता झाली प्रखर किरणीं भूमि सगळी !
पहायाही कांताविरहदहनें दग्धहृदयी--
प्रवासी साहेना. विरह सखिचा ग्रीष्मसमयीं ! १२

चंडांशूच्या प्रखर किरणें तापुनी कावलेले,
ज्यातें तृष्णा विकल करितां कोरडें टाळु झालें.
वारी हेंची गणुनि नभ तें कज्जलश्याम कांती,
सेवायातें पळत हरिणें काननें आक्रमीती. १३

वक्रावलोकन विलोल विलास लीला,
मंदस्मितादि करुनी प्रमदा स्मराला.

पांथाचिया हृदयिं चेतविती त्वरेनें,
जेवि प्रदोषशशिसुंदरभूषणानें. १४

तेजस्वी रविरश्मिनें चहुकडे अत्यंत जे तापले,
जातां तप्त धुलीवरूनि सहसा मार्गांतही पोळले.
धापे देत अधोमुखें बहुपरी जे वांकडे धांवती,
ते सौख्यार्थ पहा भुजंगशिखिच्या छायाश्रयें लोळती. १५

शौर्योद्योग मुकोनि खिन्न बसले तृष्णातिरेकें अती,
भारी तोंड घडी घडी पसरुनी अत्यंत जे धांवती.
जिव्हा चंचल रक्तवर्ण, हलती ज्यांचीं जटाग्रें अती,
ते पंचानन सन्निधस्थकरिही आतां न संहारिती. १६

तापें विव्हल होउनी प्रखरशा दैदीप्य भानूचिया,
आकर्षी वदनीं तुषार सुकल्या कंठीं त्वरें यावया,
वारी वांछित वाढतां बहु तृषा व्याकूळ जे जाहले,
सिंहासन्निध पावले तरि करी हे निर्भयें राहिले. १७

प्रदीप्ताग्नी साम्य प्रखरतर चंडांशु तपतां,
शिखी ते संतापें तनुमनबलें म्लान बनतां.
फिराया आलेले नच रगडिता सन्निध फणी,
पिसारीं घालोनी बसति अपुलें तें मुख झणी. १८

तडागीं मोथा तो चिखल सुकतां शोधुनि अती,
मुखें गोलाकारें जुळुनि परिघानें उकरिती,
जणो वाटे ग्रीष्म प्रखर रविनें तापुनि मती.
वराहाच्या पंक्ती धरणिजठरीं काय दडती. १९

रवि प्रखर कांतिनें विलसतां नभाभ्यंतरीं,
गढूळ नटल्या सरोवर जला त्यजोनी वरी.

उडोनि तृषिताहिच्या वदनछत्रछायाश्रया,
तदा विकल भेक ते दडति ताप वारावया. २०

मृणालांचें जाळें समुळ वरि फेकोनि दिधलें,
विपत्ती मीनातें, भिउनि दडलीं सारस कुलें.
भिडोनी अन्योन्या सतत तुडवीतां गजकुलें,
पहा कैसें झालें कलुषमय कासार सगळें. २१

ज्यांचीं रत्नें शिरींचीं रविकरनिकरें टाकिती तीव्र कांती,
श्वासोच्छ्वासा मुखीं जे पवनचलितशा दोन जिव्हांनि घेती.
दावाग्नी सन्निधासी, गरल हृदयिंचा सूर्यसंताप यांहीं,
झाले संहारिनासे तृषित भुजग ते ठाकल्या मंडुकांहीं. २२

ज्यांचीं कां मुखसंपुटें चघळतां विस्तीर्ण फेसाळशीं,
काळ्या उर्ध्वमुखांत रक्तरसना बाहेर लोंबे तशी.
तृष्णेनें अति पीडितां गिरिगुहा त्यागोनिया सांप्रतीं,
कांतारीं महिषीकुलें सलिल तें शोधावया धांवती. २३

वेगें सोसाट वारा उडवुनि उधळीं शुष्कपर्णें दिगंतीं,
मोठ्या दावाग्निदाहें अतिशय सुकलीं वृक्षसस्यांकुरें तीं.
तैसें वारीसमूह प्रखररविकरें क्षीण ज्या आसमंतीं,
धैर्यानें उच्चभागावरुनि निरखितां तीं वनें भीति देती. २४

पक्षी पानें गळाल्या तरुवरि समुहें धांवती बैसुनीया,
संतापें म्लान होतां पळति कपिकुळें शैलकुंजीं लपाया.
आलस्यातें त्यजोनी शरभखगकुलें कूपिंचें वारि पीती,
सैरावैरा गव्याचे कळप चहुकडे वारिशोधार्थ जाती. २५

सिंदूर स्वच्छकांती अभिनव फुलल्या त्या कुसुंभापरी ती,
आलासे वेग ज्याला परम जवनशा वातवेगें वनांतीं.

जो वृक्षाग्रें लताग्रें करित निकटिचीं विव्हलालिंगनांहीं,
दावाग्नी तो प्रतापें त्वरित करि पहा दग्ध दिक्प्रांत भू ही. २६
जो वेगें गिरिकंदरीं पसरला वाऱ्यांनिं पेटोनिया,
नाना शब्द करीत जो उजळला बेटांत वेळूचिया.
येतां वाढ तृणस्थलीं पसरला सर्वत्र जो तत्क्षणीं,
तो घायाळ करी वनानल मृगा चोहीकडोनी झणी. २७
नानारूपें स्फुरे जो प्रगट बहुपरी सांवरीच्या वनांत,
हेमाच्या गौरकांतीपरि झळकतसे जो तरूकोठरांत.
जो शाखापक्कपर्णें उडवित उधळीं उच्च वृक्षासवें तीं,
वातें चांचल्य येतां अनल चहुकडे फाकलासे वनांतीं. २८
अग्नीनें अति तापतां तनु तदां दंती गवे केसरी,
सारे टाकुनि वैरभाव जमुनी एकत्र आप्तापरी.
तात्काळ त्यजुनी अति प्रखरशा दावाग्निखेदें गुहा,
ते विस्तीर्ण नदीजलांत शिरले वेगें मिळोनी पहा. २९
पद्मांनीं व्याप्त वारी, परिमल विखुरे पाटलीचा अपार,
स्नानें सौख्योदकांचीं विहित सुखदसें चांदणें पुष्पहार.
ऐसा तो ग्रीष्म जावो परम ललितशा गायनें सौधिं रात्रीं,
उत्साहानें तुझा गे ! तरुण सखिसवें क्रीडतां चारुगात्री. ३०
केलें जें कालिदासें सुरुचिर ऋतुसं--हार काव्य प्रसिद्ध,
तट्टीका प्राकृतार्थी विबुधमतवरा अर्पितों सार्थ सिद्ध.
विद्वद्विख्यात सिंदेकुलजनितनतश्रीनिवासें प्रमोदें,
साग्र ग्रीष्माख्य सर्ग प्रथम नटविला पूर्ण त्या श्रीप्रसादें. ३१

——— श्रीनिवास नारायण शिंदे.

## प्रेम.

आर्या.

विधिनें लीलेनें या नरनारी बाहुल्या करायास–
आरंभिल्या तधीं दे, अनुपम ठेवा स-रंक-रायास. १
प्राण दुजा प्राणासम सूज्ञ जन प्रेम त्यास ह्मणतात,
प्राणाविण देह जसा तैसा यावीण साच गणतात. २
वससी प्रेमा कोठें ? ठाव तुझा नच जनास सांपडला,
तुज शोधितां सुकविजन सुसंभ्रमीं सतत फारसा पडला. ३
तत्व तुझें जाणाया बुधजनही नच समर्थ गुरुसम जे,
मी मंदबुद्धि हा किति ? काय मला अल्पमात्र तें समजे. ४
तदपि न मन हें राहे वर्ण्य विषय अधिक काय तुजपरिस,
बालिश वच जरि वदलों स्वस्थमनें करुनि सर्व हें परिस. ५
हर्षति होतां दोहद देत असे सुख विशेष सुतजनन,
तें वर्णवे न कवितें स्वर्गसुखा त्यापरी गणी जन न. ६
रांगू लागे जैसा बोले मृदु मधुर बोबडे बोल–
परिसुनि भव–ताप क्षण विस्मरती, त्यास ना जगीं मोल ! ७
माता चुंबन घेई ! जंव चाले स्व--कर धरुनि तो बाळ,
तैसाच तो पिताही चुंबी जरि होत बालकाबाळ ! ८
एवं स्वसुतें केली केली ती पाहुनी ह्मणे माय,
मी धन्य धन्य लोकीं वंध्या हें सौख्य जाणते काय ? ९
मधुरवचन बोलुनिया रात्रंदिन पुरवि सुत जिचें कोड,
लोकीं ती भाग्याची त्या मातेच्या सुखास नच जोड. १०
गृह--धन--पति--नष्ट तरी पुत्रातें पाहुनी निवे नारी,
झिजवी कलेवरातें, पोसाया भोगि यातना भारी. ११

कष्टानें वाढविला सुत तो अस्वस्थ पाहताच जरा,
शोक करी रात्रंदिन माता त्याला नसेच अन्त खरा. १२
भावी सुत--सौख्याची चिंता ती जीस लागली परमा,
यत्नें सुत--हित करिते, प्रार्थी ही व्हावया प्रसन्न रमा. १३
कोणें एके कालीं खल तो मारावया तिला धांवे,
विसरुनि अपराध तिचे वेडें मन तद्धितींच वेधावें ! १४
स्वसुतासाठीं यापरि चिन्तानलिं दग्ध होतसे माय,
कारण शोधुनि पाहे, लाभ तिला दुःख सोसुनी काय ? १५
संयोगीं सुख दे जें शतगुणितें ताप दे वियोगीं तें,
मोल कळे तैं याचें ! साचें चित्तास प्रत्यया देतें. १६
नाथ विदेशीं जातां खिन्नमुखीं सर्वदां मनीं झुरते,
विरहाग्नि जाळि तीतें कपोलतळिं लव न रक्तता उरते. १७
हृत्सागरांत तीच्या उठती निरवधि विचारकल्लोल,
होय क्षीण पतीही प्रियजनसंगमसुखार्थ अतिलोल. १८
जीतें विवाहसमयापूर्वी कधिं देखिलें न नयनांहीं,
ती मूर्ति मनीं ठसली प्रिय कांहीं तिजपरी जनीं नाहीं. १९
जी थोर जन्मदात्री तीचाही विसर सर्वथा पडला,
परि नवल काय हें तरि नर दयिताप्रणयबंधिं सांपडला. २०
तो जन्म घेइ कोठें ? बाला ती जन्म पावली कोठें ?
प्राणासम परि तिज तो प्रिय झाला नवल काय हें मोठें ! २१
ऐसे अन्योन्यचि ते झाले कीं प्रेम--शृंखलाबद्ध,
याहून अन्य नाहीं कारण त्यां व्हावयास गा रुद्ध. २२
विधु कोठें जलधि कुठें ! अंतर तें सान काय ? मोजाया,
शक्य असे जरि खवळे दाटुनिया शशिकडे निघे जाया. २३
ऐशा सरित्पतीचें नातें तरि काय ? त्या निशा--पतिशीं,

घडलें सख्य कसें ? तरि वदवे ना गूढ त्या बृहस्पतिसी. २४
एक वसे महिवरती, दुसरा तो अंबरीं सदा राहे,
कैसें घडे असें हें ! प्रेमा तव तत्व वाटतें आहे. २५
देखुनि बलाहकातें हर्षें शिखि गातसे कसा पाहीं,
परिसूनि मुक्त-कंठा गानातें, डोलिजेच सापांहीं ! २६
नाचे आनंदानें पाहुनि गगनीं घनावलिस मोर,
नृत्य करी ज्यापरि ती रंभा नाकीं शचीपतिसमोर. २७
घन-भार काय देतो ? मयुरातें मोद व्हावया चित्ता,
प्रेमाचा खेळ असे ! ब्रह्मांडाचाहि देव वर्तविता. २८
मंजुळ गायन ऐकुनि दुष्टपणा सांडि सत्वर भुजंग,
तृणकवळ धरुनि वदनीं राहे तैसाच निश्चल कुरंग. २९
गानप्रिय खर ह्मणती विधिची करणी कळे नच कुणाला,
तोच जगत्कर्ता या प्राण्यांना देइ बहुविध गुणांला. ३०
जेव्हां वसन्त येई कान्तारीं आम्रवृक्ष नव पिकतो,
तेव्हां बसुनि तयावरि कर्णमनोहर करीत रव पिक तो. ३१
अन्य तरूस न सेवी हाच तया काळ उचित कां गमला ?
ईशें प्रेमा दिधला त्या गाल्या बोल काय ? सांग मला. ३२
इतिहास-शोध-चक्षू मनिं येत्या संभ्रमास वारीती,
बुध-मत असेचि ह्मणुनी, दावी प्रेमा तुझी कशी रीती. ३३
हृदयस्थ देवता जी इंदुमती पावतांच ती मरण,
होई अजराजाला या लोकीं शोक एकला शरण. ३४
ऐश्वर्य महेंद्रासम दशरथसम असुनिही कुमारमणी,
गेला परलोकाला शोधित अपुली मनोरमा रमणी. ३५
नरवीर शूर भूपहि सुविचारी करुनि आपला दास,
प्रेमें प्रभाव अपुला दाखविला सकल सूज्ञवृंदास. ३६

अश्वपती रायाची कन्या गेली स्वयें वरायास,
वरिल्या ब्रह्मर्षि ह्मणे अल्पायु कुमार नच वरा यास. ३७
रुचलें तें रुचलेंची कांहीं केल्या न निश्चया फिरवी,
यम आला भी नच मी गेला जरि येथचा कुठेंहि रवी. ३८
अनुसरली शेवटिं ती वर्षायू सत्यवान् पतीला हो,
दीर्घायु सद्वराचा काय निमित्तें त्यजी सती लाहो ? ३९
दृढनिश्चयें स्वतांच्या प्रेमांकित होउनी जना कळवी,
साध्वीनों मच्चरितें तरि समजा प्रेम हें कसें वळवी ! ४०।
गौरी हरास भुलली पाहुनिया रूप काय कोमळ तें,
शक्रादि सुरा सोडुनि कां ? प्रेम न रूप पाहुनी वळतें. ४१
मृगयार्थ भूप गेला अवाचित दुष्यंत कण्वउटजाला,
कण्व--मता--दुहिता ती रुचिर सुचिर पाहुनी बहू धाला. ४२
वदला तीस तदा तो गजगामिनि होइ गे ! प्रिया माझी,
भूपतिकरगा झाली स्वमतानें तीहि आश्रमामाजी. ४३
कुल कैचें त्या स्त्रीचें, शील तसें जाणलां न तो राजा,
कामी--जन--सम होउनि स्पष्टपणें हो कसा ह्मणे भाजा. ४४
कुल--शील पाहिलें नच, अन्योन्यीं इष्ट काम लाभानें,
प्रेमाचें तत्वचि कां ? दृष्टीनें हृत करी भला भानें ! ४५
कुल--शील--रूप--कांती--ज्ञातीही पाहतें न विभवास,
राव असो रंक असो समदृष्टी उच्च नीच भावास. ४६
काळ्या कुट्ट तमातें नच भीतें तें यमासम नरास,
जलसंचय वन्हीसहि हटवील तसें विषासहि खरास. ४७
यमपाश विकट ह्मणती तो काय मृतास मात्र आकर्षी,
या प्रेमरज्जुपुढती परि हतबल देवदैत्यनाकर्षी. ४८

———————— विष्णु व्यंकटेश कुळकर्णी.

## माझे दशावतार.

पद.

धाव परेशा अनन्यपुरुषा आशा तव बा मला
धाव रे धाव विभो प्रेमला ॥ धृ० ॥
जननीजठरीं मत्स्य जसा मी करचरणांवांचुनी
रक्षिसीं मज तेव्हांपासुनी
कच्छच झालों गर्भीं लघुतर करचरणां पावुनी
नटलों वराह मी वाढुनी
॥ चाल ॥ नर असुनी केली सिंहासम मी कृती
बाहेर पातलों भेटुन स्तंभा[1]प्रती
नरसिंह जाहलों विमुक्त मी संप्रतीं
गेलों विसरुन दया तुझी ती मोह मला झोंबला
कशाचा ओळखितों मग तुला ? १
वामनमूर्ती गोजिरवाणी नयनीं मम पाहुनी
लोभले वडिल सदा लालनीं
तेव्हां नाहीं तुजला स्मरलों सरलों बाल्यांतुनी
गज मी शिरलों यौवनवनीं
॥ चाल ॥ मग स्वाभिमान हा परशू मीं घेतला
मज भासे तेव्हां परशुराम मी भला
हा काळ परी मम लौकर गत जाहला
गृहदारासुतविषय पसारा हर्षभरें कर्षिला
खरोखर कृष्णपणा[2] ये मला २

---

१ अटकाव करणारें जें तें, किंवा खांब. २ कृष्ण ( कृष्×नक् )= ओढून घेणारा.

जग ओळखिलें राम होउनी रमलों एक्या स्थलीं
मला मग धर्मनीति सूचली
गेलें वय हें अनुभव आला वृद्धपणीं बुधपणा
पावलों त्यजिला मीं मीपणा
॥ चाल ॥ तुज शरणागत मी तार तार ये मला
मी पुरता कल्की[1] अगा प्रणतवत्सला
ये पतितपावना पाव अशाही खला
व्यर्थ पसारे सारे तुजविण बोध अतां जाहला
धाव रे धाव विभो ! वत्सला ! ३

टिळक.

## हंत हा ! ! !

### श्लोक.

परम पूज्य जगास जगद्गुरू, । शकति अज्ञजनांप्रति उद्धरूं.
बनुनि पोपट पोटभरू पहा, । त्यजिति धर्मनयाप्रति, हंत हा ! १
बघुनि कांचन चंचलचित्त जे, । परत संसृतिबीज मनीं रुजे.
ह्मणति लोक अशास, महंत हा, । बुडवितो, बुडतो, परि, हंत हा ! २
स्वजन दुःखविमुक्त करावया, । सकल भारतदैन्य हरावया.
ह्मणति बांधव, सत्वर एक व्हा, । अलग राहति ते परि, हंत हा ! ३
भरतखंड अखंड सुखी करूं, । पतित लोक--समाजहि उद्धरूं.
वदति वीर अनेक महा महा, । कृति नसे तिळ, जल्पति हंत हा ! ४
पडुनिया उपवास मरे जरी, । स्वजनवर्ग, दया नच अंतरीं.
सधन ते करितां परकीय हा ! । नयन कां मिटितां बुध ? हंत हा ! ५

---

१ "कल्कः पापाशये पापे दंभे विट्किट्टयोरपि;" कल्क ( पाप ) × इन्
कल्की= पापी.

विकत घेउनि वस्तु घटोत्कची, । पुरविती किति आपुलिया रुची.
समजुनी करिती निज घात हा, । ह्मणुनि ते अधमाधम; हंत हा ! ६
जगिं जुन्यास सुधारक हांसती, । बवुन वीट तयांस जुन्यांप्रती.
करुनिया नसता मतभेद हा, । उभयतां फसले परि, हंत हा ! ७
मिळविण्या पदवीस हपापले, । दुखविती किति ते जन आपुले.
मिळविल्या पदव्या नुसत्या दहा, । जन तयां नच मानिति, हंत हा ! ८
धरति देशसमुद्धरणीं रती, । परि न अल्पहि दाखविती कृति.
ह्मणति देशहितार्थ धना वहा, । कृपणता पदरीं परि, हंत हा ! ९
खडबडोन उठा निजतां किती ? । सकल लोक तुह्मांप्रति हांसती.
त्यजुनि आळस, काळ कसा पहा; । न तरि जीवित निष्फळ हंत हा ! १०

——— विष्णु बळवंत थोरात.

Mrs Browning's
Sonnets from the Portuguese.
IV
"Thou hast thy calling to some palace floor"

## फिरंग्याचें संगीत*.

चाल-- "चंद्रकांत राजाची कन्या सगुण रूपखाणी."
तव कंठांतुन दिव्य काव्यरस वाहे निर्झरसा,
हे गंधर्वा, वाग्देवीचा तूं रे मित्र असा ! ॥ धृ० ॥
राजमंदिरीं कार्य तुझें, जा ! गा जाउन तेथें !
करील नर्तन ऐकुन गायन हर्षानें जें तें !
तुझ्या सदासंपन्न मुखांतुन काय निघे सहसा,
तें बघतांना नर्तनिं करितिल भलत्या विन्यासा ! १

* गेल्या ५ व्या अंकांत तिसरें गाणें आलें आहे. १ पाऊल टाकणें ( नाचतांना )

खरोखरीं तूं घर चुकलाशी ! नच उघडीं दारा,
तुझ्या करांना विटाळ होइल ! जा जा माघारा !
कसा ओतिशी दारीं माझ्या अनुपम गानरसा ?
ये शुद्धीवर, विचार कर " मी झालों भ्रांत कसा ! " २

एकवार तरि पाहुन घेई घर माझें पुरतें,
मोडकळीला आलें, दिसतें क्षणामधें पडतें !
उलूक[1], जतुका[2] विहार करिती येथें पाहिं कसा !
तव सारंगीवरीं झिल्लिका[3] गाते नादवशा ! ३

थांब थांब रे ! नको प्रतीती आणिक तूं पाहूं !
विविक्ततेच्या[4] प्रतिध्वनीला नको पुढें बाहूं[5] !
एकाकी तूं दूर जाउनी गाशिल कोकिलसा,
अन्तर्वाणी करी शोक हा ! ऐकशील कितिसा ' ४

टिळक.

## एका अनाथ तरुणीचे दुःखोद्गार.

चाल– जिवलगे ग०

दिवस सुखाचे तारुण्याचे
दुःख वितरितिल मम शिरिं साचे !
यापुढें १

मंगल ह्मणुनी तनु मिरवावी,
अमंगला ती ह्मटली जावी !
यापुढें २

१ घुबड. २ पाकोळ्या. ३ रातकिडा. ४ उदासवाण्या स्थितीच्या. ५ बोलावूं.

प्रीतिधृतीच्या सुरम्य खाणी
जातिल माझ्या त्या हरपोनी !
यापुढें ३

रंगमहाल मजसाठीं साचा
निर्मियला हा अंधाराचा !
यापुढें ४

मांडियला मज तेथें मंचक
मृत्यूशय्या श्रमपरिहारक !
यापुढें ५

अन्नत्यागाची मम भालीं !
पथ्यें विधिनें ऐका लिहिलीं !
यापुढें ६

तेणें विरहव्याधी--निरसन
होउनि घडेल प्रियकर--दर्शन !
यापुढें ७

दाह करिल पतिविरहानल
वसन विरल हें त्यातें शमविल !
यापुढें ८

सामुग्री हिम उपचारांची
अश्रुजलानें होते साची !
यापुढें ९

पांडुरता जी शरीरीं आली
चंदन--उटि ती जणुं लावियली !
यापुढें १०

हृद्भेदक वच आप्तजनांचे
सडे पडति शिरिं ते कुसुमांचे !
यापुढें ११

आधिव्याधी ह्या मम दासी
करितील छळ तें सांत्वन मजशीं !
यापुढें १२

विलापरव जो निघे मुखांतुनी
विनोद तो मम ठेवा ध्यानीं !
यापुढें १३

मृत्यु हेंची ध्यान सख्याचें
एकाग्रमनें करीन साचें !
यापुढें १४

स्वर्गीं प्रसन्न होउनि जिवलग
अग्निरथ झणी पाठवील मग !
यापुढें १५

ज्यांत बसोनी भेटायाला
जाइन लगबग स्वर्गीं त्याला !
यापुढें १६

—.———राजहंस उर्फ एंजिनियर वावीकर.

## ओंवाळणी.

श्लोक.

प्रियभगिनी,

भाऊबीज उद्यां तुझी; प्रमुख हा दीपावळीचा दिन,
आनंदोत्सवपर्व हें भगिनिला, जो हा सुखाचा सण.

माझी त्या समयीं कदाचित तुला होईल वाटे स्मृती,
सध्यां भेट अशक्य; पूर्ण करुनी घे प्रेमरूपेंच ती. १

ऐशा या समयीं स्वसा निज गृहीं आणोनिया आदरें,
कोणी दे करुनी सुवर्णनग त्या वा द्रव्य वा अंबरें,
सेवाया सहवाससौख्य अथवा ठेवून घेती घरीं,
या रीतीं करिती हंसून रमुनी ते पर्वणी साजरी. २

मी तों बंधु तुझा अकिंचन सये! तैशांत दूरस्थही,
शुद्ध प्रेमचि एक ज्यास सगळी लोकांत संपत्ति ही.
कैचे त्याजवळीं तुला नग धनें वस्त्रेंहि द्याया तरी!
कैसी त्याजकडून सांग तव ती व्हावी मनीषा पुरी! ३

द्रव्याचें परि काय होय अधिक प्रेमाहुनी मोल तें?
आनंदें जग आज हें सकल ज्या एकामुळें डोलतें.
तें माझ्याजवळीं असे विपुल घे हें पाठवीतों तुला,
दृष्टीला जरि तें न गोचर तरी हो प्रीतिच्या हेतुला. ४

प्रेमाच्याच ह्मणून पांच पुतळ्या प्रेमें करें ओतुनी
प्रेमाशिर्वचनें चिरस्थिर तशीं त्यांच्यावरी खोदुनी.
प्रेमाचा गुण त्यांत ओंवुन तया माळ स्वयें गुंफुनी,
प्रेमाची तुज धाडितों करुन घे ही गोड ओवाळणी. ५

ठेवो तुला ईश सुखी सदैव,
येवो पतीचें सुफलास दैव.
सौभाग्य नांदो सदनीं अखंड,
प्रेमांत येवो न कधींहि खंड. ६

नारायण.

# काव्यरत्नावलि.

अंक ७ वा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ७ वा.

निशाकालवर्णन. सुशीला युद्धांत पडली अशी बातमी समजल्यामुळें प्रतापराय शोक करितो. शोकामुळें प्रतापराय मूर्च्छित पडतो. सुशीला त्याला सावध करिते. सुशीलेचा वृत्तांत. शत्रू सुशीलेवर छापा घालतात. त्यांचा पराजय. सुशीलेचा विलक्षण पराक्रम. प्रतापरावाचा आनंद.

श्लोक.

शशी भुवन--दीप तो उगवला नभो--मंडलीं
तमःप्रकर नाशुनी धवल चंद्रिका शोभली
दिवाकरकरानलें परम तप्त ही अन्तरीं
गमे जणु नहातसे वसुमती पयःसागरीं १

प्रफुल्लतिकाप्रियातिथि वहात मंदानिल
सभाग्यजनदाह तो हरि उशीरसा शीतल
ज्वलज्ज्वलनसा गमे विरहिणीजनांतें परी
प्रियाकुमुदनायकां व्यजनिं वीजि दिक्सुंदरी २

मनोज्ञशुचिदीप्तिमद्भगण--भूषणालंकृता
प्रियागमनहर्षिता धवलरम्य--वस्त्रान्विता

ग्रहप्रचुरदीपिका गगनमंदिरीं लाउनी
विलास करिते शशीसह विलासिनी यामिनी ३

विलोकुनि दयाकरां प्रभुवरां प्रजा ज्यापरी
बघून शशि हर्षती सकल ओषधी त्यापरी
अपार धन अर्पुनी निजजनांस भूपाग्रणी
मृगांक सुखवी तसा तरुलता सुधासेचनीं ४

सहास दिसती जलाशयिं कुमुद्वती पुष्पिता
पतीस जणु पाहती स्तिमित--लोचना योषिता
परागकण चोरसा हरि निशीथ--वायू खरा
हळूच शठ चुंबितो मधुर रम्य वामाधरा ५

सुधाकर करी करीं अमृत--वृष्टि सौधावरी
स्त्रिया विहरती पतीसह सलील मंचावरी
उरस्थलिं उटी गळां असति मालिका शोभना
विहार करिती परोपरि मदालसा अंगना ६

प्रशान्त जग जाहलें क्षिति समस्त निद्राकुला
दिसे विजनवीथिका विरत--सर्व--कोलाहला
कृताभिनवमंडना प्रियसमुत्सुका सुंदरा
अहा ! निघति जीवितेश वसतीस बिंबाधरा ७

किती पथिक योषिता चिरवियोगदुःखातुरा
पतीस मनिं चिन्तुनी करिति शोक बिंबाधरा
करी सुतनु जर्जरा मदन पंचबाणाहता
शशी विखरितो ज्वलच्छिखि--तुषार हा सर्वतां ८

प्रशान्तसमयीं अशा बसुनि रम्य सौधावरी
स्खलद्वचनपंक्ति हा तरुण शोक येथें करी

अस वदन जाहले दिवसधूसरेंदू परी
नवाश्रुसलिलें करी सतत सेक अंगावरी ९
पुसोनि नयनां वदे सकरुणा गिरा यापरी
" मला असुखसागरीं सुदति लोटिलें कां तरी
अहा पसरली निशा चहुकडे महादारुणा
मनस्तिमिरनाशिनी--तिमल--चंद्रिके त्वद्विना १०
मही खचित जाहली सकल निष्फला लोक ही
अहा ! अतुल लोपली नयनचारुता सर्वही
अनंगरसनिम्नगा सुभग आटली सर्वथा
अहा हरपली खरी युवतिरत्नभूषा तथा ११
सखे मजवरी तुझा प्रणयभाव तो आगळा
असे विदित त्यापरी हृदयवृत्ति ती कोमळा
कसें त्यजुनि या जनां असुखसागरीं सुंदरी
सुरेशनगरी खरी अहह सेविली यापरी १२
नसेच दुसरी तुझ्यापरि पतिव्रता कामिनी
उगाच तुज दूषितों खचित दुष्ट मी मानिनी
पथीं बहुलसंकटीं गवसलीस तूं तत्करीं
कशी अधम मच्चमू पळुनि जाय वेगें दुरी १३
जरी कुसुमकोमला तरिहि तूं महाशूर गे
मृगेंद्र करि मर्दिलें तुजपुढें न कोणी तगे
वनीं त्वरित वेढितां समय साधुनी शत्रुनीं
शुभांगि करणार तूं अहह काय एकाकिनी १४
अनार्य रिपुनीं जईं विजन काननीं वेढिलें
सुगात्रि असशील तूं प्रियजनांस या चिन्तिलें

तुला समरभूवरी मरण ये यदा कोमले
मला स्मरुनिया नवाश्रु असशील तूं ढाळिलें १५

अनार्य रिपुच्यासवें करुनि युद्ध मोठें रणीं
तुवां त्वरित ठेविला विमल देह युद्धांगणीं
परी किमपिही न तूं मळविलें सखे सत्कुला
अहा कुचरिताहुनी मरण गोड वाटे तुला १६

मला तुजविणें जगीं जगुनि लाभ तो कोणता
सखे खचित जाहला विफल जीव हा सर्वथा
तुझें चरित निर्मल स्मरुनि कंठ हा दाटला
नवाश्रुजलपूरही रडुनि सर्वथा आटला १७

सखे निघशि जेधवां स्वजनकासवें तद्गृहा
“ अहा निकटवर्तिमद्विरहतापसंतप्त हा ”
असें समजुनी मनीं गुरुजनान्तिकें तूं तदा
हळू मजकडे सखे करिशि दृष्टि सौख्यप्रदा १८

अलों तुजसवें सखे नगर--बाह्य--देशान्तरीं
तुला तव पित्यासवें सुमति पोंचवाया दुरी
निरुद्धजल--लोचनीं मजकडे तुवां पाहिलें
कसें विसरवेल तें मजशि जाळि दीप्तानलें १९

तदा तुजसवें अहा हृदय--शान्तता चालली
त्वदीयमुखदर्शनासहित मत्सुखें लोपलीं
तमःप्रसर मन्मनासह दिगंतरातें भरी
जहालि सखि शून्यवत् क्षिति मदीय दृष्टीपरी २०

त्यजून अलसा जशी त्वरित सिद्धि जाई दुरी
तशीच मज सोडुनी अहह जाशि तूं सुंदरी

समुत्सुक पहावसे सुमति जोंवरी दृक्पथीं
परी न दिसतांच तूं सकल नष्ट होई धृति २१
गमे सदन पूर्वि जें मज सुखप्रद स्वर्गसें
स्मशानसम सर्वदां परम भीति तें देतसें
तुझी मुखशशिप्रभा परम देत शोभा जयां
दिवारजनि ही भरी तिमिरपंक्ति सांद्रा तया २२
खरें बहु अभागि तूं गमसि मंदिरा मन्मनीं
अहा हरपली गड्या तव विलासिनी स्वामिनी
तिच्या मधुरगायनें विलससी सदां स्वर्गसें
सदाहि मम रोदनें भयद तूं न होशी कसें २३
तिच्या मधुरगायनें परम लज्जिता कोकिला
तटस्थ मन होतसें परिसुनी स्वरां कोमलां
गमे वरुनि काय ही उतरली जगीं अप्सरा
शशी अचल होतसे श्रवुनि रम्यगीतस्वरां २४
शची विलसते जशी अमरनाथसद्मान्तरीं
कधीं विहरशील तूं परत येउनी त्यापरी
अशी बघतसे तुझी सतत वाट सोत्कंठ हा
परंतु तुज दंशिलें सुमति कालसर्पें अहा २५
त्वदीयमुखदर्शनोत्सुक नियोग आटोपुनी
गृहीं त्वरित येतसें मनिं अपार आनंदुनी
परिश्रम निवारिसी मधुर भाषणें बोलुनी
प्रतप्त तनु शीतला करिशि गाढ आलिंगुनी २६
दिसे सदन काननापरि परंतु ते संप्रतीं
ह्मणून नच राहवें क्षणहि एक येथें सती !

फिरे नगरिं होउनी परम मूढ चोहीकडे
पथीं धडपडे पडे हृदय हें भ्रमे बापडे ! २७

सखे तुजसवेंच ती त्यजुनि जाय निद्रा मला
प्रजागर सुमित्र हा मज अहा भला लाभला
क्रमी रजनि लोळुनी विरहतप्त--शय्येवरी
कदा नच सरे गमे अदय--कालरात्रीपरी २८

मही सकल निद्रिता दिसति शान्त दाही दिशा
वसे अचल सर्वही भयकरी प्रवर्ते निशा
अशाहि समयीं अये ! हृदयवर्तिनी ! देवते !
उभी मजपुढें सदा तव मनोहरा मूर्ति ते २९

सखा गमसि तूं मला परम चक्रवाका पहा
तुझ्यापरिच पातली विरहयातना दुःसहा
प्रिया हरपतां करीं तुजपरीच मी शोक रे
तवासुख सरें दिनोदयिं कधीं न माझें सरे ३०

प्रिये उदक घालुनी बकुल वाढवीलास हा
सुतापरि तयावरी विमलभाव तूझा पहा
प्रफुल्ल बघ जाहला परिमलें भरी क्ष्मातला
करून सुममालिका कवण घालि आता गळां ३१

भ्रमिष्ट जरि जाहलों तरिहि वेंचुनीया फुलें
तुझ्यासव सखे अहा रुचिर हार मी गुंफिले
विदग्धरचना तुझ्यापरि मला कशी ये तरी
त्वदर्थ परि सर्वही जपुनि ठेविलें सुंदरी ३२

गळ्यांत निज घालुनी कुसुम--हार जे राजसे
निशीथसमयास तूं विहरशील लीलारसें

तशी सुखविशील या प्रियचकोरका चंद्रिका "
मनांत धरिलें असे सखि ! मनोरथ व्यर्थ का ३३

शुकास सखि ! घालुनी मधुर दाडिमें पाळिलें
झुरे मजपरीच तो तव वियोगदुःखानलें
तुवां शिकविलें तया सतत तो वदे शब्द ते
तयास शिकवील हा ! ललितनृत्य गे ! कोण तें ३४

" प्रमुग्धवदना तव प्रतिकृति प्रिया बालिका
दिसेल कधिं आमुची हृदयबंधनग्रंथिका
अहर्निशि वदूनिया मधुर शब्द जी बोबडे
मनस्तम निवारिते कधिं हंसे कधीं आरडे ३५

निजांकिं तिस घेउनी मधुर भाषणें बोलुनी
प्रमुग्ध मुख पाहुनी मग पुनःपुन्हा चुंबुनी
परिश्रमनिवारिणी वचनपंक्ति ती ऐकुनी
क्रमूनि दिनयामिनी कधिं पळापरी मानिनी " ३६

मनोरथपरंपरा निरसि दैव ही मानिनी
नभीं पवन ज्यापरी सजल नील कादंबिनी
मधुच्छ्वसित–भूत ती हरपली प्रिया कोमला
खला अदय अन्तका ! त्वरित कां न नेशी मला ३७

बसे निकट मंचकीं उगवला नभीं चंद्रमा
प्रशीतल निजप्रभा विखरितो हरूनी तमा
गळां रुचिर मालिका विलसली बघोनी तिला
असें वचन बोललों सुमति एकदां मी तुला ३८

तुझ्यापरि मनोहरा सुगुण–शालिनी शोभिनी
स्मरज्वलन–संतत–ज्वरज–दाह–विध्वंसिनी

रजःकुसुमशोभिनी उचित कंधरालिंगनीं
सखे कुसुममालिका तुजसमा गमे मन्मनीं ३९

मनोनयनतोषिणी सुविमल–प्रभा–शालिनी
मनस्तिमिरनाशिनी अविरतामृतस्यंदिनी
स्मरज्वर–दव–ज्वलत्तनु–लतैकसंजीवनी
सखे धवलचंद्रिका तुजसमा गमे मन्मनीं ४०

परी वचन सर्व तें वितथ वाटतें अन्तरीं
अहा ! कुसुममालिका मम तनूस जाळी खरी
करी धवलचंद्रिका प्रखर अग्निवर्षाव ही
सखी हरपतां मला अहह ताप दे सर्वही ४१

तुवां रुचिर बाग हा विरचिला गृहाभोंवती
दिसे विजनकाननापरि शुभांगि तो संप्रतीं
न तूं निकट वत्सला खचित मातृतुल्या तया
ह्मणून बघ जाहल्या तरुलता विपर्यस्त या ४२

तुवां स्वतनयापरी सखि अशोक हा पाळिला
विलोकि मजसारिखा बहु सशोक तो जाहला
त्वदर्थ कुसुमच्छलें अविरताश्रु गाळीतसे
तयास अवलोकितां हृदय भिन्न हें होतसें ४३

मनोज्ञगुणरत्नभू ललितरूपसीमा खरी
जिला बघुनि लाजती सुरविलासिनी अन्तरीं
अनंगरसनिम्नगा नयनचंद्रिका निर्मला
प्रिया असुखसागरीं त्यजुनि हाय ! गेली मला ४४

न धीर मनिं राहिला गलित होय उत्साहही
दिसे विफल सर्व हें विजन शून्य सारी मही

भरी परमसांद्र हा तिमिरभार नेत्रां अहा
तनू विकल जाहली अहह चालला प्राण हा " ४५
असें वदुनि जाहला विकल भूप—चूडामणि
नसे जवळ कोणिही उठविण्यास त्याला क्षणी
परी नवल वर्तलें गुणवती तयाची प्रिया
प्रवेशुनि अचिन्तिता त्वरित सांवरी ती तया ४६
तया व्यजनिं वीजुनी परम मंद मंदानिल
सुगंधि जल शिंपुनी तनुवरी तसें शीतल
क्षणांत करि सावध प्रियपतीस ती सुंदरी
नृपाल बघुनी तिला चकित जाहला अन्तरीं ४७
" अहा त्वरित काय ही गिरिसुताच ये भूवरी
फिरे सतनु काय वा सुकृति मामकीना खरी
मदीय कुलदेवता विहरते गृहीं कां स्वतां
दिसे निकट काय ही प्रियसखी पुनर्जीविता ४८
अहा ! नयनचातकप्रणयपूर्ण कादंबिनी
मनःकुमुदचंद्रिका प्रणयनिम्नगा शोभिनी
सदा हृदयवर्तिनी विकलगात्र--संजीवनी
मदीय सुखवर्धिनी खचित तीच ही मानिनी " ४९
प्रियेस मग तो धरी त्वरित गाढ आलिंगुनी
पिऊन अधरामृता सुख नितान्त पावे मनीं
वियोगविकला तनू सपदि जाहली शीतला
निजांकिं मग घेउनी वदतसे असें तो तिला ५०
" मृतास उठवावया त्वरित येइ संजीवनी
तृषार्त फिरतां वनीं अमृत वर्षि कादंबिनी

अहा ! परम निर्धना सुरलताच कीं लाभली
मिळालि सुकृतें पुन्हा अतुल दृष्टि अंधा भली ५१
तुझें अशुभवृत्त जें परिसिलें सखे ! मी खरें
असें वितथ काय तें सकल सांग बिंबाधरे !
अहा सहज धीरता त्यजुनि शोक केला महा
जरी न दिसतीस तूं तरि न राहतां प्राण हा ५२
वनांत रिपुंनीं तुह्मां त्वरित वेढिलें सर्वतां
ससैन्य समरांत तूं शिरुनि युद्ध केलें स्वतां
परी न जय लाभतां तनु रणांत तूं ठेविली
अशी अशुभ बातमी सुदति आज मी ऐकिली ५३
निशा परम घोर ही सकल निद्रिता मेदिनी
प्रशान्त समयीं अशा प्रगटलीस एकाकिनी
निरभ्रगगनोदरीं प्रकट होय विद्युत् जशी
तशीच सखि ! येशि तूं नवल वाटतें मानसीं ५४
दया करुनिया सदा विनतसाधुवृत्तांवरी
अकार्य परि कल्पिती खल तयांस जो संहरी
महाभय निवारिलें खचित त्याच ईशें पहा
ह्मणून दिसला तुझा वदनचंद्रमा आज हा ५५
सखे ! तुजविणें निशा परम दीर्घ होई खरी
प्रतप्ततनु लोळुनी सकल घालवी जागरीं
विलाससुख सेवितां तशिच दीर्घ होईल कां
अशीच सुखवील कां अमृतवर्षिणी चंद्रिका ५६
तुझा वदन--चंद्रमा विमल चंद्रशोभा हरी
मनोज्वर निवारुनी अमृतवृष्टि सांद्रा करी

करी विशिखवृष्टितें मदन सर्वदा क्रूर हा
तुला बघुनि सेवितों सभय केंवि आह्मा पहा ५७
सखे तुजविणें दिसे विकल शून्य शय्या खरी
परंतु अजि जाहली परम धन्य ती सुंदरी
निशा अजवरी मला बहुत होय दुःखास्पदा
न होय काशि संप्रतीं सुमति तीच आनंददा ५८
परिश्रमनिवारिणी विविध रम्य लीला करी
वदून वचनावली मधुर ताप सारा हरी
प्रमुग्ध--रुचिरानना सुदति सांग कोठें सुता
तिचें मुख पहावया हृदयवृत्ति उत्कंठिता " ५९
" न व्हा सभय वर्तलें किमपिही न अत्याहित
असे सकृप ईश तो करिल काय दुष्टाहित
पथीं बहुलसंकटीं व्यसन जें उदेलें महा
निवेदन करील तें सकलही विशालाक्ष हा " ६०
असें परिसुनी वदे नृपवरास तो यापरी
" सतीवरि कुणी महाकुमति पापदृष्टी धरी
कुकर्म अधमेंच त्या खचित हें गमें योजिलें
परंतु करि शासन प्रभु तयां खलातें भलें ६१
कुशावतिस लक्षुनी बहुत मार्ग उल्लंघुनी
सहानुचर चालतां गहन अद्रिमार्गांतुनी
प्रनष्टपथ पर्वतीं पथिक एक आह्मां दिसे
अह्मांस अवलोकुनी निकट सत्वरीं येतसे ६२
" कुशावतिस चालतां निबिड घोर या काननीं
चुकून पथ मी फिरें कुटिल या विमार्गांतुनी

क्षुधार्त फिरतां वनीं बहुत भागलों मी अहा "
असें वदतसे मला खलजनाग्रणी तो महा ६३
तयास मग मी वदे त्वरित चाल आह्मांसवें
सदा परिचितांसही सुकर मार्ग वा हा नव्हे
असें विदित सर्वही परिजनांस तो आमच्या
महाकुटिल तो निघे परिसुनी अशा मद्वचा ६४
जरी पथिकसा दिसे वरुनि तो महादुर्जन
तदीय हृदयीं तरी विष वसे महादारुण
क्षणोक्षणिं इतस्ततां निरखि चोरुनी शंकित
असे क्षुभित जाहली हृदयवृत्ति ती संतत ६५
नगामधुनि मज्जन क्रमुनि दुष्पथा चालला
श्रमातुर तयापरी तपन जाइ अस्ताचला
" पुरी निकट पातली झडकरी चला शूर हो
निशा प्रकटली वनांतरिं उशीर आह्मां न हो " ६६
असें वदुनि सत्वरीं निज हयास मी प्रेरिलें
समस्त करिती त्वरा मम निदेशवर्ती भले
परी दिसतसे पुढें पथ महा दुरारोह तो
लतातरुपरंपरा सकल मार्ग आच्छादितो ६७
नभीं उगवुनी शशी सुधवला करी मेदिनी
शिरे किरण एकही परि न वृक्षराजींतुनी
तमःप्रकर दाटला परम सांद्र चोहीकडे
दिसें न नयना तदा किमपि मार्ग ना सांपडे ६८
हळूहळु पुढें पथःक्रमणिं सर्वही लागलों
हयांसह त्रिमार्गि त्या बहुत चालुनी भागलों

परी परम कर्कशा पथिक शीळ घाली खरी
निनाद करुनी महा वनिं दिगंतरीं ती भरी ६९

जवें पसरतांच तो प्रतिनिनाद त्या काननीं
बहू गलबला उठे भयद होय शस्त्रध्वनि
सवेग पिहितानना प्रकट—कृष्णवेशा महा
अह्मां रिपुपताकिनी चहुंकडून वेढी पहा ७०

बघून रिपुसैन्य तें चकित जाहले सज्जन
शिवेल परि कां रणीं लवहि भीति वीरां क्षण
पथ क्रमुनिया जरी जन समस्तही भागले
रिपूसह भिडावया त्वरित सज्ज ते जाहले ७१

महासमर त्या स्थलीं मग परस्परीं माजला
मनीं कुपित होउनी भट भटावरी लोटला
न अल्प तिमिरीं दिसें पडति वीर वीरांवरी
हयास हय ताडिती भट भटां विदारी करी ७२

उठे परम शान्त त्या स्थलिं विशाल शस्त्रध्वनि
भटांस भट गाठिती समरिं सिंहसे गर्जुनी
परस्पर विदारिती प्रखरशस्त्रघातें परां
गतासु पडती किती करुनि युद्ध—सीमा परा ७३

मुहूर्तभरि यापरी तुमुल युद्ध तें जाहलें
सुवीर पडले रणीं दल समस्तही आटलें
महाबल रिपू करी गलितधैर्य अस्मद्दला
सती हतबला दला बघुनि होय कोपाकुला ७४

करीं सदसि घेउनी सशर चापही त्यापरी
दलास निज देतसे समरिं धीर ही सुंदरी

बघून तिजला रणीं सकल सैन्य धैर्योत्सवें
पुन्हा लढतसे जणों दल सहाय आलें नवें ७५
जशी महिषमर्दिनी दिसत घोर रक्षोगणीं
सती तशिच शोभली रिपुदलांत आयोधनीं
धरून करिं शूल ती जशि विमर्दि रक्षोगणां
सती तशिच संहरी सदसिनें खलां दुर्जनां ७६
रणांत चमके सती गगनिं जेंवि सौदामनी
रणीं विचरतां परां न बघतें तिला लोचनीं
जयावरि पडे तयां करि तडिल्लता दग्ध ते
रणीं शशिमुखी तशी परदलास संहारितें ७७
असें अतुल शौर्य तें बघुनि शत्रु भ्याले मनीं
वनोपवनिं धांवती समर सत्वरीं सोडुनी
भयार्त अहिताग्रणी त्वरित धांवला जों दुरी
प्रहार असिनें करी कुपित त्यास ही सुंदरी ७८
असें बहु सकोप ही स्वरिपुचें करी कंदन
न येच पुढती कुणी करिति भूमितें वंदन
किती समर सांडुनी सभय सेविती कानन
श्रमार्त अनुधावनां न करितीच अस्मज्जन ७९
परांस रणिं मर्दुनी वरुनि सद्यशां निस्तुलां
सती परतली जनां सुख गमे क्षतव्याकुलां
उशीर बहु जाहला ह्मणुनिया निघालों झणीं
हळूहळु समस्तही स्वजन येति हो मागुनी" ८०
वदे सुमति मत्स्तुति प्रियतमा करी हा वृथा
स्ववीरजनिं जिंकिलें अधम शत्रुतें सर्वथा

कुठें प्रबल सैन्य तें अबल ही कुठें एकटी
असें सकृप ईश तो ह्मणुनि वांचलों संकटीं ८१

सतीस मग तो वदे शठमती असे कोण हा
करीन सखि ! सत्य त्या नरपशूस शिक्षा महा
कधीं शलभ वांचला शिउनिया प्रदीप्ता शिखा
न काक कलहंसितें अभिलषून पावे सुखा ८२

असे जगतिं एकला परम भाग्यवान् मी खरा
महागुणवती प्रिया मजशि लाभली सुंदरा
मनीं वसतसे सदाहि अधिदेवतेसारखी
मदीय सुकृतें अहा ! दिसलि तीच साक्षात् सखी ८३

सदा धवलचंद्रिका अमृत वर्षि वर्षो शशी
शिखी स्वयुवतीसवें रत असोत लीलारसीं
करोत वनिं पंचम—स्वर मदोद्धता कोकिला
सखी निकटवर्तिनी भय नसेच आतां मला ८४

नसो कधिंहि ठाउका सखिवियोग यानंतर
विलासरससेवनीं बहुपरी असों तत्पर
प्रियाविरहदुःख हें कधिं मदीय चित्तीं न हो
करीं विनति सर्वदां प्रभुवरास मी हीच हो ८५

तिजसह रत झाला केलिमाजी नृपाल
वदुनि विविध गोष्टी घालवी शीघ्र काल
अनुपमविषयांचा स्वाद घेतां सदांही
नच कळत तयांतें यामिनी केंवि जाई ८६

सर्ग सातवा समाप्त.

————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## सद्बोधशतक*.

### श्लोक.

एवंच कीं रतिहता लतिका–धरा या,
दोघी समान बहुधा बघ मित्रराया !
जें प्रेममर्म दिसलें मज यांत साच;
त्याचा अतां उलगडा करितों तसाच, ७६

ही प्रीति अंध तिजला नच नेत्र पाहीं,
भीती गमे न लव, वा तशि न त्रपाही.
सत्कीर्तिनें परि गड्या ! नच वामना ही,
नेमें करी अचुक जें रुचतें मनाही. ७७

दासा स्वकीय तशि ही कधिं वाम ना कीं,
नेई तया महिवरी अथवा सु–नाकीं;
रानीं जळीं अनळिं ही अथवा तमांत
त्याशीं अहा ! फिरविते बघ काय मात ! ७८

चित्तीं पटेल नर तो इजला पसंत,
त्याचीच पाठ पुरवी नच घे उसंत;
विद्याविहीन असुनी जरि ना कुलीन,
त्याचे पदीं असत ही परि नित्य लीन. ७९

नाहीं स्वरूप न गृहीं जरि संपदाही,
निंदोत त्यास अथवा जगिं लोक दाही;
लोटो दुरी ढकलुनी तिज तो पदांहीं,
त्याच्या पदीं विनत कीं परि बा सदा ही. ८०

---

* ह्या शतकाचे ७५ पर्यंत श्लोक अंक ५ यांत आलेले असून ह्या अंकांत हें शतक समाप्त झालें आहे.

लेखो तिचा दयित तीस तृणासमान,
दे ती प्रभूसम परी बघ त्यास मान;
बा तो तिच्या न पुरवो कधिं वासनाही,
त्याच्याविणें परि दुजा तिज वास नाहीं. ८१

हे ! प्रीतिदेवि न तुझा कधिं पार लागे,
देवादिकांस; मग तोहि कसा मला गे !
लीला महा तव तरी न जगांत माये,
वानूं विमूढ तुज मी वद केंवि माये ? ८२

अज्ञेय हें सुरति-मर्म गड्या जगांत,
तें बोधिलें लवभरी तुज गात गात;
एवंच राग ह्मणजे कल हा मनाचा,
लावाल जेथ तिकडे वळतोच साचा. ८३

देवोनि कर्ण मन त्या विबुधोपदेशीं,
होतोंचि खेळत सुखें पुलिन-प्रदेशीं;
हातीं सुरेख सिकताकण म्यां धरावे,
त्यांनीं करांतुनि हळूं हळुं कीं गळावें. ८४

जो शोभतो खचित खेळहि लेंकरातें,
म्यां खेळतां सुहृद तैं धरि मत्करातें;
बोले पुन्हां मज ‘ गड्या बघ वालुका ही,
देई जना तरि कशी वर--बोध कांहीं. ८५

जैसी करांत धरितां सिकता न राहे,
तैसा सुखक्षण गळे न कळे नरां हें;
गेला सुटोन करिंचा तव काल जो रे !
हातीं न ये पुनरपी धरितांहि जोरें. ८६

गेली घडी न कधिं दृष्टिसही पडे ना,
तैसा गतप्रहर तो कधिं सांपडेना;
जाती तुला त्यजुन जे दिन मास वर्षे,
येती न ते; मग सुखें नयनाश्रु वर्षे. ८७

काळाविषीं करिसि तूं जरि बा तमा न,
तोही तुझी न करि; ही नच बात मान;
ये या दया न; धरितांहि शिखींत मान,
देतांचि ये परि तया स्वमनांत मान. ८८

कंठीं फणीस धरवें अथवा स्वहस्तीं,
होई प्रयत्न करितां पदिं लीन हस्ती;
तो श्येनही मिरवितां करिं ये तसा रे!
काळाविना वश गड्या जगतींत सारें. ८९

यत्नें विशुष्क सखया करवें नदी न,
होई तसा भयद सिंहहि कां ? न दीन;
पृथ्वी ख वारि अनिलानल पंचभूतें,
केलीं न वश्यहि बळें वद काय भूतें. ९०

यत्नें सुसाध्य सरिता--गति--रोध राया,
तैसी न काळगति ये कधिं कीं धराया;
देईल हा सु--सिकता--कुल--बोध खास,
तूतें मनांत धरितां अति कीं सुखास. ९१

गेलें निघोन तव बाल्य पहा अतां बा !,
मार--ध्वजा तरुणता तव घेइ ताबा;
कृत्या--जरा मग सुखें तुजला स्व--कंठीं,
घालोनि मारिल मिठी तव वक्र कंठीं. ९२

होईल रम्य वपुची मग या कमान,
हालेलही लुकलुका तव तेंवि मान;
नेत्रें थिजून सखया बधिरत्व कर्णा,
येईल; ऐकुं नच ये मग तोहि कर्णा। ९३

होतांचि लाळ गळुनी मुख दंतहीन,
धि:कारुनी जन तुला गणतील हीन;
जातां कपोलहि तदा तव हे बसून,
दारा न ये निकट; काय पुसेल सून. ९४

हातांस कंप सुटुनी सुटतां पदांस,
नासानना मुरडुनी तुज ताप दास;
देतील; ना तुजकडे बघतील कोणीं,
देतां न ‘ ओ ’ तुजसि ते बसतील कोणीं. ९५

कोणीं स्थितींत असल्या सखया पुसे ना,
येईल धांवत गृहीं यमराज--सेना;
नेतील ओढुनि तुला मग ते स्वलोकीं,
होईल अंतिं असली गति बा विलोकीं. ९६

मित्रा ! वृथा ह्मणुनि तूं पळही न वेंची,
सूक्ष्मावलोकन जरी करिशी; नवेंची
लोकीं दिसेल तुजला विपळापळाला,
वाटे न दु:ख मग काळ जरी पळाला. ९७

तात्पर्य काय पुढतीं दिसतें तुला हें,
तें सर्वही बघ सख्या ! गुरु--नाम लाहें;
तैसें तुला सुगुरु जो जग दे कराया,
प्रेमें स्तवी सतत त्या जगदेकराया. ९८

जेव्हां मिळेल तुजला पल एक राया !
तेव्हां चुके न हरिच्या स्तवना कराया;
सोडी न तो विपदिं बा निज--किंकरातें,
दावी सुमार्ग नियमें धरुनी करातें. ९९

हें मुख्य गा निजमना शुचि नित्य राख,
अंगीं नसेल जरिही मग सत्य राख;
तेंवी जटायुत तुझें नसतां कपाल,
रक्षील धांवुनि तुला भुवनैकपाल. १००

मित्रा ! कुठेंहि जरि बा तुज काम नाहीं,
वाचीं सुखें शतक हें तव कामनाही;
वाटे करील परिपूर्णहि, आवडीतें--
याच्यावरी धरीं; न घालवि बा ! घडीतें. १०१

अनंततनय.

---

## पूर्णिमेचा संध्याकाळ.

### श्लोक.

नित्य क्रमें क्रमुनि अंतर अंतरालीं
आरक्त हो श्रमभरें रवि संधिकालीं
उत्तुंग त्या हरितपल्लवयुक्त वृक्षीं
विश्रांति घे निमिषमात्रचि सर्वसाक्षी १

क्रीडाभरें पवन चंचल शीत, साचें
मागें पुढें हलवि पल्लव पादपांचे
आंदोलनीं रति धरूनि जणूं मनांत
आरूढला तरुशिरावरि लोकनाथ २

आटोपुनी दिनकरें धरिलें कराला
नेत्रां अदृश्य अमुच्या निमिषांत झाला
हो रक्तवर्ण रमणीय दिशा प्रतीची
वर्णूं कशी परम सुंदर कांति तीची ३

बाला स्वकांत--मुख--दर्शन--कामुका ती
तद्दर्शनें करित धारण रम्य कांती
तैशीच ही पतिमुखा निरखूनि झाली
लज्जेमुळें धरि कपोल सुरम्य लाली ४

जाती उडून खग हे घरट्यासि नाना
गाती मुखें मधुर मंजुळ रम्य गाना
जाती घरा परत संघ जनावरांचे
येती अनेकविध नाद मिळूनि साचे ५

पुच्छें करूनि वर धांवति रम्य गाई
हो पाडसां निरखण्याप्रति त्यांस घाई
गोपालवृंद--मुरली--रव चाललाहे
तो शांत गंधमय चंचल वायु वाहे ६

तों ही चमत्कृति पहा इकडे अपूर्व
चंद्रोदयें परम हर्षित होय पूर्व
झालें प्रफुल्लमुख हास्य तिथें विराजे
चोहींकडे परम शांति अखंड साजे ७

आधीं सुधाकर निशापति मोददायी
त्यांतूनि ये परम सुंदर पूर्णिमा ही
तैशांत सौख्यद शरदृतुकाल साचा
आनंद काय पुसतां मग मन्मनाचा ८

ओढा निसर्गरमणीय सुरम्य वाहे
तेथें प्रसन्नमनसें कवि पातलाहे
वाहे पहा झुळुझुळू मनसोक्त रीती
स्वच्छंदवृत्ति धरि संतत अंतरीं ती ९

सच्चंद्रिका धवल तज्जलपृष्ठभागीं
नाचावयासि सजली जणुं रम्य जागीं
तें चंद्रबिंब रमणीय जलांत हाले
तद्दर्शनें परम हर्षित चित्त झालें १०

दोहोंकडे हरित तीं कुरणें तृणाचीं
शोभा दिसे रुचिर त्या स्थलिं गालिचाची
शोभे तशीच बहु सुंदर वृक्षराजी
दोहीं तटीं; बघुनि हो कविचित्त राजी ११

चोहोंकडे पसरली वनिं दाट झाडी
ओढा तयांतुनि धरी गति नागमोडी
ओढा नव्हेचि पडला जणुं हा भुजंग
चोहोंकडे पसरुनी निज भव्य अंग १२

वृक्षांवरी करुनि रातकिडे ध्वनींतें
तें भंगिती सकल शांति पहा वनीं ते
ग्रामस्थ रम्य सुर--मंदिर--दुंदुभीचा
गंभीर नाद पवनासह येत साचा १३

खद्योत ते चमकती निज अल्पतेजें
ती वृक्षपंक्ति रमणीय तयें विराजे
हे काजवे नच, परंतु सुरम्य रत्नें
ईशें जणूं जडविलीं तरुंतें प्रयत्नें १४

दाऊनि अल्प निज तेज, परप्रकाशी
चंद्रासि हांसति करूनि फजीति खाशी
ईशें प्रकाश दिधला, उसना न, देखा
प्रौढी तुझी मग कशासि बरें मृगांका ? १५

घेऊनि तेज रविचें उसनें नभांत
तूं व्यर्थ रे ! मिरविशी, न तुझ्यांत अर्थ
होतें उणें अधिक तेज तुझें पहा रे !
आह्मी स्व--कांतियुत शोभत निश्च सारे १६

ऐसें ह्मणूनि उपहासिति ते शशीला
आहे किती तरि अगाध रमेश--लीला
हे क्षुद्र कीटक परी किति गर्व त्यांचा
हेवा कसा करिति थोर निशा--धवाचा १७

ही सृष्टि हें सकल विश्व अनंत सारें
हा चंद्रमा गगन सूर्य समस्त तारे
तैशा अगम्य किति ह्या ग्रह--सूर्य--माला
सर्वांस ह्या जनक कोण ? पुसा मनाला १८

सामर्थ्य वैभव पराक्रम वीर्य थोर
कैसें कळेल मनुजा प्रभुचें अपार
तो आदिकारण असे सकलां नियंता
व्हावें सदैव मनिं लीन तया अनंता १९

हे काजवे शशिपुढें हततेज जैसे
हे कःपदार्थ जगिं मानव जाण तैसे
ईशापुढें; सरि तयासि नसे नखाची
प्रौढी उगी मिरविती जगतीं स्वताची २०

ज्ञानी विशालमति थोर सुधारलेले
तें ज्ञान गूढतम सर्व अह्मांसि झालें
गर्वोक्ति यापरि वृथा नर बोलताती
खद्योत ते विभुपुढें मज भासताती २१

ही सृष्टि नैकविध सुंदर ईश्वरानें
चातुर्य खर्चुनि पहा रचिली करानें
आह्मी सदा तदवलोकन--लुब्ध व्हावें
वंदूनि नित्य चरणीं प्रभुनाम गावें २२

——— कै. नारायण श्रीनिवास निपाणीकर.

## सुभाषित.

### श्लोक.

सुभाषितसुधा नसे लवभरीहि ज्याचे मुखीं,
करील समयीं कसा सुवचनें जनां तो सुखी ?
सभेंत जरि तो करी गमन बुद्धिवंतांचिया,
गमेल तरि मृत्तिकाघटितमूर्तिसा तो तयां. १

जिंकाया त्रिपुरा शिवें, बळि छळें बांधावया विष्णुनें,
शेषें भूशिरिं घ्यावया, जग करें व्हाया सरोजासनें,
गौरीनें महिषासुरास वधितां, सिद्ध्यर्थ सिद्धीं, स्मरें--
विश्वा मोहवितां, गणेश नमिला. त्या मी नमीं आदरें. २

शोभे पूर्णविधूदयें शरदिं जी ती यामिनी यामिनी;
जी सौंदर्यगुणान्विता पतिरता ती कामिनी कामिनी;
जी श्रीरामकथामृतें रसवती ती माधुरी माधुरी;
दे जी ऐहिकपारलौकिकसुखा ती चातुरी चातुरी. ३

भृंग.

# काव्यरत्नावलि.

अंक ८ वा.


## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ८ वा.

दुर्मति पराभव पावून पळून जातो. सुशीलेला हरण करण्याचा त्याचा पुन्हा बेत. वसंतागमन. वसन्तवैभववर्णन. प्रतापराव क्रीडा करण्यास उपवनांत जातो. जलक्रीडावर्णन. दुर्मति अकस्मात् छापा घालून प्रतापराय व सुशीला यांना कैद करितो. व त्यांना भद्रांचलास नेतो. हें वर्तमान विश्वासरायास कळतें. सिताबाईचा शोक. विश्वासराय शिवाजीच्या भेटीस निघतो.

श्लोक.

सोडुनी मग पराजिता दला । पावला त्वरित तो निजस्थला
जाहली तनु नितान्त विव्हला । अंतरीं परम ताप पावला १

जे सदांहि निजशौर्य वानिती । ते तदीय खलमित्र दुर्मती
सोडुनी द्रुतगती रणांगणा । सेविती परम घोर कानना २

सावकाश मग त्यास भेटले । अंतरीं किमपिही न लाजले
वानिती बहुत दुष्ट आपणां । दूषिती इतर सर्वही जनां ३

भ्याड सर्वहि कशास जन्मलां । कासयां वदन दावितां मला
स्त्रीजनां भिडनि सेविलें वना । लाज कैंवि नच वाटली मना ४

भर्त्सना करि परोपरी अशी । दुर्जनां तिळ न लाज मानसीं
बोलुनी कुटिल गोड भाषणां । युक्तिनें करिति चित्त सांत्वना ५

जातसे बहुत काल यापरी । दुष्कृती सतत दुष्ट आचरी
मूढ तो विसरला पराजया । इच्छि तीस फिरुनी हरावया ६
पावला जरि कुबुद्धि शासना । सर्वदां करि कुमार्ग–सेवना
पथ्य टाकुनि अपथ्य तो वरी । वासना अशिव सर्वदां धरी ७
तीस शासन, करीं न मी जरी । दुर्भगा मम विमानना करी
रूपगर्व धरुनी निजान्तरीं । हांसतील मज सर्वही तरी ८
पावलों परिभवा तिच्या करीं । याहुनी अयश कोणतें तरी
ना करी जरि तदीय निष्कृती । भीरुता पदरिं येतसे अती ९
भंगिना जरि तदीय सद्व्रता । मत्प्रसू प्रसवली मला वृथा
युक्तिनें धरुनि, तीस या स्थलीं । आणुनी, वश करीन मी बली १०
यापरी करि कुवृत्तनिश्चया । मित्र देति अनुमोदना तया
स्वार्थबुद्धि हृदयानुवर्तिनी । वृत्ति सेविति न अप्रिया कुणी ११
धूर्त चारतति शाठ्यतत्परा । धाडिली मग कुशावतीपुरा
वृत्त सर्व कळवी तयास ती । आक्रमा समय योग्य पाहती १२
यापरी समय अल्प जातसे । तों सुखाकर वसन्त येतसे
होय जी शिशिर–कालिं निद्रिता । सृष्टि ती खचित होय जागृता १३
आलिसे तरुलतांस पालवी । मंद मारुत तयांस पालवी
पावला नव रसाल मोहरा । पांघरी जणु पटां मनोहरा १४
शोभती कुसुमिता लतावनीं । जेंवि भूषणवती नितंबिनी
ये वसन्त ऋतुराज त्यास या । उत्सुका नटुनिया पहावया १५
पाहुणा गृहिं वसन्त पातला । सृष्टितें परम हर्ष वाटला
सिद्धता करुनिया परोपरी । आदरी सुमभरें तयां खरी १६
चित्रवर्ण नवशाल नेसुनी । कंठिं रम्यसुमहार घालुनी
लावुनी तिलक षट्पदावली । स्वागता करित सृष्टि शोभली १७
पूजिले मधुसुमार्घ साधनीं । तोषवी मधुफलां समर्पुनी

गंधदान करि पुष्पवाटिका । हर्ष कां ऋतुवरा न हो निका १८
नर्तनीं कुशल या लतांगना । नाचुनी करिति चित्त--रंजना
वायु नृत्यगुरु ताल हा धरी । दाविती विहग गान--चातुरी १९
ऐकुनी मधुर रम्य गायना । वाटला परम तोष तन्मना
गान तें सहज हो न शिक्षित । दिग्वधू व्यजन वीजि सस्मित २०
हा विलाससुखसेवनोचित । पातला ऋतु वसन्त निश्चित
हा समस्त जनखेलनीं रत । यापरी परभृता पुकारत २१
सर्व लोक रमती परोपरी । जाउनी उपवनीं कृशोदरी
जाहल्या प्रणयकेलितत्परा । अन्त या नच खरा सुखाकरा २२
जातसे उपवनीं महोत्सवें । राव केलिपरही सखीसवें
मांडिले नवविलास सुंदर । जे खरें सहज सौख्यमंदिर २३
घेउनी नव रसाल--मोहरा । निर्मुनी मदन तीव्र तच्छरां
ऐकती न जन जे स्वशासन । त्या जनां करि कठोर शासन २४
जाइजूइ निशिगंध शेवती । मोगरी बकुल कुंद मालती
शोभती कुसुमिता वनीं लता । सौरभें भरिति भूमि सर्वतां २५
शाखि सर्व फलनम्र शोभती । भाग्यकालिं नर जेवि सन्मती
भक्षुनी मधुफला खगावली । गात सुस्वररवें सुखावली २६
मंदमंद पवनानता लता । चोरिती मधु अशेष जे स्वतां
षट्पदां हलवुनी शिरांप्रती । या न सन्निध ह्मणून सांगती २७
गोडसा सुमपराग सेवुनी । गुंजती मधुप मत्त होउनी
ऐकुनी गमतसे जनांप्रती । देवता करिति माधव--स्तुती २८
एक टाकुनि लता दुजीप्रती । आश्रयार्थ अलि जात निश्चिती
सर्वही परि विमानिती तया । याचना जगीं खरी निराश्रया २९
लंघुनी गगनमार्ग दुश्चर । जाहला बहुत जो श्रमातुर
वल्लरी--ललित--नृत्य--विभ्रमा । पाहुनी पवन घेत विश्रमा ३०

लाउनी नभिं अशोकतोरणा । रक्तवर्ण--सुमवस्त्र--शोभना
मार्जुनी धरणितें समीरणीं । वन्यभू रत वसंत--पूजनीं ३१
दीर्घिका परम रम्य त्या स्थलीं । हेमवर्ण--कमलांहिं शोभली
स्त्रीजनां विहरण्यास योग्य ती । पोंचलें जल उरस्थला--प्रती ३२
सेउनी कमलनालकेशरां । प्राशुनी मधुरसां सुखाकरां
त्या सुधा--मधुर दीर्घिका--जलीं । क्रीडती मधुप--सारसावली ३३
शोभती कमलिनी समुन्नता । दीर्घिका--जलिं नवप्रफुल्लिता
उन्मुखा जणुं कुतूहलान्विता । माधवोत्सव पहाति देवता ३४
कामिनी विहरती समुत्सुका । दाविती बहु विलासकौतुका
ताडिती निजकरीं सरोजला । सर्वतां मधुरनाद ऊठला ३५
भृंगपंक्ति मकरंद--कामुका । सोडुनी स्फुटित आम्रवृक्षकां
मानुनी कमलिनी तयां निकी । घालिते फसुनि झेप तन्मुखीं ३६
पाहुनी युवतिनेत्रविभ्रम । होतसे जनित हा मनीं भ्रम
मीन काय फिरतात चंचल । उत्पलां हलवि कां सुखानिल ३७
घेत वस्त्र हरुनी बळें पहा । स्पर्शितो मग तनूस वात हा
चुंबितो शठ हळू स्मिताधरा । कामुका--परि कृती करी खरा ३८
कामिनी तनुवरी रिघे जल । स्पर्शितें हळुच तें उरस्थळ
तत्स्तनीं विरचि हार शीकरीं । घेत विश्रम सुनाभि भीतरीं ३९
रक्त होय जल कुंकुमादिकीं । जेंवि हेम अभितप्त पावकीं
होय अंबर दिनोदयीं जसें । जाहलें सरहि तें तदा तसें ४०
यापरी जलविहार सुंदरी । जाहल्या करुनि खिन्न अंतरीं
दीर्घिकेंतुनि निघूनि सत्वर । कामिनी करिति वेष सुंदर ४१
षड्रसान्न मग गोड सेवुनी । तोषती सकलही विलासिनी
मांडिती मग सुरम्य खेळ ते । खेळतां बहुत सौख्य वाटतें ४२
यामिनीसमय होय तोंवरी । खेळती सुखभरांत सुंदरी

क्रीडुनी बहुत राव कष्टला । त्या स्थलीं सपरिवार राहिला ४३
क्रीडनास नृप जातसे वना । वृत्त हें समजलें असज्जनां
योग्य हा समय वाटला तया । ती सती सपतिका धरावया ४४
दुर्मती बहुत सैन्य घेउनी । पातला त्वरित गुप्त त्या वनीं
अग्रतां कुटिल चार धाडिले । सर्व ते कथिति वृत्त वर्तलें ४५
शांतता पसरली चहूंकडे । जाहले विजन मार्ग रोकडे
अंबरीं विलसला सुधाकर । जो सुधा अमित वर्षि भूवर ४६
घेउनी कुमति सर्वही दला । पावला त्वरित गुप्त त्या स्थला
सर्वतां उपवनास रोधिलें । सर्व रक्षकजनांस मारिलें ४७
सर्वही चिरविहार--निद्रित । कोणिही उपवनीं न जागृत
व्याघ्रसे त्वरित ते प्रवेशले । दुर्जनीं नरपतीस वेढिलें ४८
ऐकुनी गलबला बहूपरी । होय जागृत नृपाल सत्वरीं
सर्वतां उठुनि जों विलोकिलें । कालदूतसम दुष्ट देखिले ४९
लेशही भय शिरें न तन्मनीं । धांवला अरिवरी नराग्रणी
शस्त्रहीन परि काय तो करी । बद्ध ते करिति त्यास सत्वरीं ५०
सांपडे रिपुकरीं सतीहि ती । एकटी करिल काय संकटीं
होउनी विजयशालि दुर्मती । जात सत्वरगती गडाप्रती ५१
धाडुनी दल कुशावतीवरी । तीसही करगता करी खरी
नेतसे हरुनि सर्व संपदा । वाटला परम हर्ष दुर्मदां ५२
या--परी करुनि घोर दुष्कृती । मानि मंदमति आपणां कृती
भ्रष्ट मी करिन तीस सत्वरीं । दुष्ट ही मनिं कुवासना धरी ५३
ठेवि भूपतिस गाढबंधनीं । पीडिलें अति तयास दुर्जनीं
घालुनी चरणिं लोहशृंखला । बंधनीं मग तयास रक्षिला ५४
बाग एक रमणीय गडावरी । ठेवि त्या स्थलिं सतीस सत्वरीं
तन्मनां वश करावया झणी । ठेविल्या तिज--समीप कुट्टिणी ५५

जें असें सकल वृत्त वर्तलें । तत्पित्यास मग सत्वरीं कळे
साध्विची प्रियसुता कुमुद्वती । मातृतातसदनास जाय ती ५६
येइ तें व्यसन घोर ज्या क्षणीं । दाइच्या करिं असे सुहासिनी
झांकुनी मग मुलीस सत्वरीं । पातली झडकरी पुरा खरी ५७
शोधिती बहुत तीस दुर्जन । रक्षिती परि तिला सुहृज्जन
धाडिती मग भिऊन त्या खलां । गुप्त पुष्पपुरितें झणी तिला ५८
वृत्त तें भयद ऐकुनी खरी । माय मूर्च्छित पडे महीवरी
राव सत्वर सतीस सांवरी । माउली परम शोक ती करी ५९
दाखवा झडकरी सुता मला । काय हा समय घोर पातला
व्याघ्रहस्तिं पडली मृगी खरी । सत्वरीं तिज विमुक्त करा तरी ६०
दुर्मती शठमती अकारण । तीस तो बहु छळील दुर्जन
व्याघ्रहस्तगत धेनु एकटी । बापुडी करिल काय संकटीं ६१
होय मी जगिं अभागिनी खरी । भोगिते अवदशा परोपरी
प्राणभूत मम एक कन्यका । तीसही विधि न देतसे सुखा ६२
टाकिलें सुदृढबंधिं तत्प्रियां । दुष्ट सत्य वधितील ते तयां
सोडवा त्वरित त्यास जाउनी । अन्य शक्य न उपाय याहुनी ६३
यापरी करि विलाप ती सती । लोकही सकल अश्रु ढाळिती
प्रेयसी परम जी तयां असे । दुर्गता तिज विलोकवें कसें ६४
पाहुनी परम निंद्य ती कृती । कोपला नृपतिही मनीं अती
इच्छि त्यास करण्यास शासना । यापरी वदतसे सुहृज्जनां ६५
" पाळिलें स्वतनयापरी जयां । दुष्ट तो त्यजुनि सर्वही नया
नेतसे हरुनि मत्प्रिया सुता । काय ही निरुपमा कृतघ्नता ६६
घालुनी पय भुजंग पाळिला । पालकां परि कृतघ्न चावला
त्या[illegible] अधम हा करी कृती । दंडयुक्त नच काय त्याप्रती ६७
श्रे[illegible] नेमिलें खलां । पाहुनी नवल हें गमें मला

होय भूपति गुणज्ञ तो खरा । फत्तरां गणितसे कसा हिरा ६८
यास्तव त्वरित घेउनी दला । दंड योग्य करुनी तयां खलां
सोडवीन दुहितेस मी ह्मणी । अन्य युक्त न उपाय याहुनी " ६९
यापरी करि नृपाल निश्चयां । आप्त इष्ट परि बोलती तया
आपला श्रुत जगीं पराक्रम । भ्याड होय अति तो नराधम ७०
तो असे परि महाशठाग्रणी । मंत्र–तंत्र–कपटादि–साधनीं
पाडिल व्यसनिं सत्य आपणां । काय हो जगिं अशक्य दुर्जनां ७१
वार्धकीं रणकथा न ती बरी । प्रार्थना ह्मणुनि एक ही खरी
योग्य योजुनि उपाय दूसरा । बंधमुक्त निजकन्यका करा ७२
ख्यात जो शिवनृपाल भूतलीं । यद्यशें धवल भूमि जाहली
सद्गुणाकर असाधु–भंजक । न्यायनीति–रत दीन–पालक ७३
आर्यभू यवन–ताप–पीडिता । तीस मुक्त करण्यास सर्वथा
देह तो झिजवितो परोपरी । जन्मती नृप असे कधीं तरी ७४
सोडुनी नयपथा असज्जन । दुर्बलास छळिती अकारण
त्यांस अंतकसमान दंडितो । स्वप्रजेपरि जपे प्रजांस तो ७५
दुष्ट वर्तन तयास सत्वर । जाउनी श्रुत करा सविस्तर
योग्य शासन करूनिया तयां । सोडवील अपुली सुताप्रिया ७६
ऐकुनी उचित आप्तवैखरी । वाटली हितकरा नृपा खरी
सोडुनी सकल युद्ध–कारणां । चालला शिव–नृपाल–दर्शना ७७
भेटला मग नृपास जाउनी । वृत्त सर्व कळवी मुळीहुनी
ऐकुनी खल–कृतघ्नता करी । कोपला परम भूप अन्तरीं ७८
बोलला शिवनृपाल भूवरां । काळजी न लवही मनीं धरा
दंडुनी शठमतीस सर्वथा । सोडवीन अपुली प्रियासुता ७९

केव्हां आतां विषमनियति व्यक्तरोषा हंसेल
केव्हां माझी प्रियकरसुता प्राणभूता दिसेल

आपत्तीचा सकल कधिं हा काल जाईल आतां
ऐशी चिन्ता–विकलहृदया दुःखिता फार माता ८०

——————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## ‘ भ्रमरशी नर–जाति जगीं भली ’

श्लोक.

उपवनीं पवनीं बहु डोलतां । सुमभरें नव–जाति नता लता
परिमलीं रमली मति तेधवां । जशि रमे रमणी बघतां धवा १
विकसलीं कसलीं सुमनें महा । पसरि त्यांवरि भृंग निजा–महा
मज गमे सुलतेप्रति वानित । ‘ मज पहा जप हा ’ करि वा नित २
तिजवरी करुनी मधु–झंकृती । रमविण्या तिजला करि ही कृती
ढकलि ती प्रसहें जरि त्या खला । परि तिचाहि तयें मध चाखला ३
पुनरपी अलि तो भुलवावया । तिज वदे सखये नच वाव या
तुजविणें वद गे मधु--बोल ते । उचित हें तुज ना ? सुखदा--लते ४
किति सुरम्य तुझीं हिरवीं दलें । बघुनि तीं मन हें मम विंधलें
हरितवर्णि गमे जणु पातळ । कशि दया वद केलिस पातळ ५
सितसुमें तव या वसनावरी । बघुनि मौन सखे रसना वरी
भ--युत हें रव; तुला काशिदा नवा । विणुनि सृष्टिच दे पट--दान वा ६
अरुण--पल्लव हे तव हालतें । अधरसे गमतीं अहहा ! लते
बघुनिया मन हें अति कीं रमे । झटति चुंबन दे मजला रमे ” ७
मधुवचें वदुनी वच षट्पदें । तिजवरी धरिलीं निज षट् पदें
परि तया स्वशिरा हलवून ती । दुर करी जरि तो पदिं घे नती ८
परतला रतला स्तवनीं तिच्या । पुनरपी अलि ही मग नीतिच्या
बहु कथा कथुनी तिजला वदे । ‘ कृति तुझी मज दुःख अतीव दे ९
अरुणनूतन हीं बघुनी दलें । तव गडे; जरि तूं मज निंदलें

तुजवरी रत हा अति बंभर । परम गे रमवीत तुझा भर १०
अलि तुला पति गे जगिं येकला । विधुविणें निशिला कशि ये कला
' रसिकजातिलते ! कवि लापती । ' भ्रमर एकचि हा तुजला पती ' ११
असित--देह--घना चपला जसी । तशिच तूं मजला उगि लाजसी
मधुऋतूंत पिकाच्युत--मंजरी । तशिच तूं मजला स्मरमंजरी ! १२
न रमणी रमणीं कधिं कोपते । विदित कां ? तुजला नच हे लते
नच खरा सखये तव कोप हा । प्रणय--कोप गमे मजला पहा १३
फणिवरा गमते जशि केतकी । जलद--भा अथवा मयुरास कीं
मजसि तूं गमशीहि तशी लते । न रमणा त्यजणें तव शील तें १४
तुज न कां ? गमतो अनुरूप गे । मधुप हा; बघ कीं मम रूप गे
घनसम द्युति ही किति उत्तम । मजपुढें पडतेंच फिकें तम १५
कमलिनी मलिनी; मधुमालती । नच रुचे स्वकरीं जरि माल ती
मज समर्पि तरी दयिते तुला । तिजसवें तुलितां नच ते तुला १६
सुलवली लवली जणु वृद्धशी । मज गमे परि तूं न लते तशी
तरुण मी तरुणी तशि तूं सये । मम दयाहि कशी नच तूंस ये १७
तशि जुई तगरी नव--शेवती । बकुल वा सखये मधुरेवती
तुजहुनी निरसा मज भासती । न रति त्यांवरिही लव गे सती १८
वद कशी बनशी सखये जड । तुजविणें असु हे गमती जड
कवळिते सरिताच नदीन ही । धरि तसा हृदयीं अलि दीन ही १९
उचित हें स्थल कां न रमावया । उघडुनी नयना बघ या वया
तरुणता सखि ! ही तुज लाभली । पुनरपी न मिळेल कधीं भली २०
विजनिं या सजणे कुणि ही नसे । करिसि वर्तन कां ? मग हीनसें
उचित ना ! धरणें इथ लाज गे । तुजविणें अलि हा कसला जगे २१
रमवि गे रसिके रसिकास या । धरिसि मौन गडे वद कासया
झडकरी सखि दे परिरंभ या । उगिच कां धरिसी स्वमनीं भया २२

किसलयाधर तो तव चुंबु दे । विनवितों दयिते सु--दयांबु--दे
सदय तूं सखि हें तव मौनता । खचित दर्शविते बघ या नता " २३
अलिकृत--स्तवना पारसून या । हरिखली सुलता; करि ही नया
मुरडली हसली किति लीलया । अभिनया करुनी सुखवी तया २४
समुद त्यास तिनें कवटाळिलें । अलिवरेंहि तसें नच टाळिलें
उभयतां रमलीं रत--मानसें । विदित कां ? पुढचें रसिकां नसें २५
अवश जें प्रसह्य जगतावरी । मधुवचें परि तें मृदुता वरी
भयद--सिंहिण ही मग किंकरी । बनतसे; धरवें तशि कीं करीं २६
मधु--रवें धरवें धरणी--धरा । सुजन हो वच हें स्वमनीं धरा
उपशमेंहि तसें खल--अंतर । खचित या वचनीं नच अंतर २७
अलि--वचांतरि हाच सदाशय । अनुभवें जगिं व्हा गतसंशय
वरुनि साखर जे खल पेरिती । कुटिल ते हृदयीं जगिं ही रिती २८
परि असो इकडे निज--कामना । पुरवुनि भ्रमरें लतिका--मना
अमित सौख्य दिलें; नच वानवें । तरुण जाणति हें; नच वा नवें २९
तिजमधें नुरतांचि रसालता । त्यजियली मधुपें निरसा लता
उपजली न दया खलबंभरा । न करुणा कधिंही उदरं--भरा ३०
विरस--जातिपुढें दुसरी लता । विलसिता; रमला अलि पाहतां
उडुनि जाय तदा तिज--सन्निधीं । हरिखला; शशिसीहि जसा निधी ३१
सहज एक तिथें नव--यौवना । विचरली स्वधवासह त्या वना
भुवन--वैभव तें निरखावया । विमल शांत हवा तशि खावया ३२
सदय ती रमणी बहु जातिची । उपजली करुणा तिज जातिची
बघुनि हीन दशा तइं जातिची । वदन--भा पडली धवला तिची ३३
टपटपां गळलीं नयनासवें । मुळमुळू रडली नसतां सवे
चपल दृष्टि तिची लव ना हले । अरुण गाल तिचे जलिं नाहले ३४
गहिवरें बहु दाटलि कंधरा । वदनिं ना वदवें; वदनाधरा

अमित कंप सुटे नच बोलवे । वदविण्या जरि ही रसना ळवे ३५
नुचलती पदही मुख कोरडें । उडविले मधु--पें जणु कोरडे
तिजवरी मग ती गज--गामिनी । विचरली पुढती वर--कामिनी ३६
पुसुनिया नयनां वसनांचलें । पवन--धूत--कचा करिं सारिलें
गजगती जगतीवरि चालतां । पुनरपी वळुनी निरखी लता ३७
हळुच चावुनिया मग जीभली । 'भ्रमरसी नर--जाति जगीं भली'
वच असें वदली कथुं काय ती । रसिक इंगित यांतिल जाणती ३८

अनंततनय.

---

## ऋतुसौंदर्य.

### वर्षाऋतु.

श्लोक.

यत्सेनेपुढतीं तुषारघन हा उन्मत्त हस्ती महा;
गर्जे दुंदुभि वज्रघोष; तळपे विद्युत्पताका पहा;
जो कां कामिजना अतिप्रिय सदा; दैदीप्य जो अंबरीं;
वर्षाकाल नृपापरी सजुनिया हा पातला सुंदरी ! १
कांहींची दाट नीलोत्पलदलसम ती श्याम कांती विराजे;
कांहीं ते कज्जलाच्या सदृश विलसती नील अत्यंत कीं जे;
कांहींची गर्भभारान्विततरुणिकुचाग्रापरी कृष्ण कांती;
ऐशा साऱ्या ढगांनीं नभ चहुंकडुनी घेरिलेंसें समोंतीं; २
वारंवार तृषार्त चातकगणें प्रेमें जया प्रार्थिलें;
ज्याचे कर्णमनोहर ध्वनि बहू ओथंबला जो जलें;
वेगें वर्षतसे सदा प्रखरशा जो तोयधारा महा;
व्योमीं तो घनवृंद मंदगतिनें हा चाललासे पहा. ३

गर्जे दुंदुभि वज्रघोष--भयद स्वारीपुढें ज्याचिया,--
हातीं इंद्रधनुष्य सज्य विलसे सौदामिनी ज्या जया;
या तीक्ष्णाग्र सवेग दाट पडल्या पर्जन्यधाराशरें--
पांथांच्या हृदया विदीर्ण करितो हा मेघराजा त्वरें. ४

शोभे जी फार रम्यांकुरतृणनिकरें भिन्नवैडूर्यकांतीं;
तैशी ती कंदलींच्या विपुल उगवुनी व्यापिलेल्या दलीं ती;
शोभे श्रृंगारलेली जणुं नवयुवती नीलरत्नादिकांनीं.
तैशी ही शोभलीसे क्षिति बघ सखये ! इंद्रगोपादिकांनीं. ५

ज्यांचा विस्तीर्ण कांते ! सकल पसरितां शोभलासे पिसारा;
गाती केकाध्वनी जे मधुरतर; जयां उत्सवीं हर्ष सारा;
मेघाच्या गर्जनेनें परम विवश जे चुंबनालिंगनांत;
केकी ते दंग झाले निजकुलनिकरीं संप्रती नर्तनांत. ६

आलासे वेग मोठा कलुषमय जलें पूर येतां जयांतें;
तेणें ज्या पाडिताती सकल निकटिंच्या उच्च उच्च द्रुमांतें
क्रीडोनी स्वैरिणीच्या विविध कुटिलशा पूर्ण श्रृंगारलीला,--
त्या या स्वेच्छाविहारी झडकरि सरिता चालिल्या सागराला. ७

चित्रनीलमुखाचिया हरिणांगना चरल्या स्थलीं--
उद्भवोनि तृणांकुरें, नव पल्लवें, बहु शोभलीं;
ज्यांमधें अति दाट वृक्षलता विराजति संप्रती;
हीं अशीं रमणीय विंध्यवनें मनासि विमोहिती. ८

ज्यांचीं नेत्रोत्पलें तीं चकित निकटिंच्या भीतियोगें जहालीं;
त्यांहीं रेखीव ज्यांचीं सुरुचिरवदनें--भक्षितां थांबलेलीं;--
व्यापोनी वाळवंटें सहकुल बसती जे महारण्यदेशीं;
उत्कंठायुक्त होती रसिकजनमनें पाहुनी त्या मृगांशीं. ९

गर्जे मेघ जिच्यामधें हरघडी गंभीरघोष ध्वनी,
अभ्राच्छादित घोर त्या रजनिच्या गाढांधकारांतुनी,--
संकेतें अभिसारिका नव वधू कांतानुरक्ता पहा--
जाती सत्वर दूर दर्शितपथें विद्युत्प्रकाशें महा. १०

ज्याचा घोर महाभयानक तसा गंभीर घोषध्वनी,
त्या विद्युज्जलदास देखुनि मनीं उद्विग्न ज्या कामिनी,--
त्या ज्याचे अपराध फार असल्याही वल्लभातें झणीं--
प्रेमालिंगन गाढ देत रमल्या शय्येवरी तत्क्षणीं. ११

लाल जे नव--पल्लवाधर पक्वबिंबफलापरी,
श्यामलोत्पललोचनाश्रु गळोनि ते भिजले वरी;
भूषणें नव पुष्पहार सुगंधलेपन टाकुनी,
होउनी पथिकांचिया बसल्या हताश विलासिनी. १२

ज्यामध्यें तृण, आणि कीटक, धुळी; तैसेंच जें पांढरें;
ज्याची वक्रगती भुजंगसम ती; विस्तीर्ण जें वावरे;
होवोनी भयभीत दर्दुरकुळें ज्या पाहती वांकडे;
चाले तें नव नीर सन्मुखिंचिया त्या खोल जाग्याकडे. १३

पानेंही गळलीं जिचीं; त्यजुनिया विच्छिन्न ती पद्मिनी,
गातां हर्षभरें पहा मधुप ते ती कर्णमंजुध्वनी,
भ्रांतीनेंचि मयूर नृत्य करितां, त्यांच्या कलापीं झणीं--
उत्साहें नव पद्मिनीच गणुनी, घेती उडी तत्क्षणीं. १४

उन्मादें नवमेघघोष गणुनी अन्यत्र हस्तिध्वनी,--
स्पर्धेनें बहु गर्जनेस करिती मत्तेभ जे काननीं;
पाहें स्वच्छ सरोजकांतिसम त्या हस्तींद्र--गंडस्थलीं--
भारी वाहतसे मदोदक सदा; भृंगावली बैसली. १५

जेथें शुभ्र सरोजकांतिसम ती मेघावली टेंकली;
जेथें संतत निर्झरीं बहुपरी सर्व स्थलें व्यापिलीं;
होवोनी बहुहर्षनिर्भर शिखी ज्यांच्यावरी नाचती;
ऐसे पर्वत पाहतांच उपजे औत्सुक्य चित्तीं अती. १६

जो कां पुष्पित नीप, केतकतरू, सर्जार्जुनांचीं वनें,--
झाला डोलवुनी सुगंधित सदा त्यांच्या दृढालिंगनें;
आलिंगोनि तुषारवृष्टिजलदा जो जाहला शीतल;
अत्युत्कंठितसें कुणांस न करी हा रम्य मंदानिल ? १७

ज्या हारांचा तुऱ्यांचा परिमल विखुरे गुंफिलेल्या फुलांनीं,
त्यांहीं जे शोभताती कटितटिं रुळतां, दीर्घ त्या कुंतलांनीं;
जीं वासें युक्त ऐशा मधुयुतवदनीं; हारयुक्तस्तनांहीं;
स्वप्रीती कामुकांच्या मनिं उपजविती कामिनी ह्या उपायीं. १८

शक्राचें धनु तें विराजित, तशी दैदीप्य विद्युल्लता,
वारीसंग्रह, यामुळें विलसती जे मेघ ते तत्वतां;
ज्या कांचीमणिकुंडलीं विलसती त्या सोज्ज्वला सुंदरी;
हीं सारीं पथिकांचिया झडकरी आकर्षिती अंतरीं; १९

या कालीं नव नीपकेसरसुमें, तैशाच त्या केतकी,
माला गुंफुनि त्यांचिया सुललना त्या घालिती मस्तकीं;
तैशा अर्जुनमंजिरी सुरुचिरा त्याचेहि अत्यादरें--
कर्णीं ठेविति सुंदरी रचुनिया स्वेच्छेप्रमाणें तुरे. २०

यद्देहीं चर्चिलीसे अगरु मिसळुनी चंदनाची उटी ही;
केशीं वाहे सुगंध श्रवणिं रचियल्या कीं फुलांच्या तुऱ्यांहीं;
सायकालीं घनाची परिसुनि गगनीं गर्जना कामिनी या,--
जाती शय्यागृहासी श्वशुरगृह तदा सत्वरें त्यागुनीया. २१

जे नीलोत्पलपत्रकांति नटले; पूर्णोदकें वाकले;
जे कां चंचल होउनी हळुहळू मंदानिलें चालले;
ते हे मेघ सुरेंद्रचाप कसुनी, पांथांगनांचीं मनें—
घेती वेधुनि गर्जना करुनि; जीं कष्टी वियोगाग्निनें. २२

हीं वनें नववारिसिंचन लाभतां, शम पावुनी,
भोंवतीं फुलल्या कदंबमिषें जणू अति तोषुनी,
वातचंचल डाहळ्या डुलतां, मुदें जणु नाचती;
केतकीदलकंटकीं जणु कां सदोदित हासती. २३

पुष्पें काननिंचीं, कदंबकुसुमें, तैशा जुईच्या कळ्या,--
यांचे ठेवुनिया मनोहर तुरे कर्णांवरी भूषिल्या,
घालोनी नव मालतीबकुळिच्या त्या पुष्पमाला शिरीं,
वर्षाकाल पहा स्त्रियांस नटवी हा वल्लभाचे परी. २४

मुक्ताहार जिच्या सदा रुळतसे उच्च स्तनाग्रांवरी,
तैशीं पुष्टविशालशा कटितटीं सूक्ष्मांबरें पांढरीं,
त्या स्त्रीच्या अति सुंदर त्रिवलिनें गंभीर--रम्योदरीं--
शोभे मेघतुषारसिंचित कशी रोमावली साजिरी. २५

सेवितां कण वारिचे गगनींच शीतल जाहले;
पुष्पलीन लतातरूंप्रति डोलवूनि सुशोभले;
केतकीरज सेवितां अति गंध घेउनि वाहती;
ते मनोहर वात पांथिकचित्त लोभविती पथीं. २६

हे आह्मां जलभारनम्रजलदां आधार मोठे जनीं;
ऐसें जाणुनि वारिपूर्ण जलदें वारी बहू शिंचुनी,--
ज्वाला ग्रीष्मि वनाग्निच्या भडकतां जो जाहला विव्हळ;
पाहें सांप्रत आदरें सुखविला तो दग्ध विंध्याचळ. २७

सद्‌गुणें रमणीय जो अति; रंजवी युवतीमती;
निर्विकार, उदार, बंधु लता, तरु, द्रुम यांप्रती;
जीवजंतुंस, मुख्यजीवनहेतु जो वनभूतला;
तो सदा पुरवो घनागम इष्ट जें बहुधा तुला. २८

लोकीं जें कालिदासप्ररचित ऋतु–संहार काव्य प्रसिद्ध,
तट्टीका प्राकृतार्थी विबुधमतवरा अर्पितों सार्थ सिद्ध;
विद्वद्विख्यातसिंदेकुलजनित नत श्रीनिवासें प्रमोदें--
वर्षानामें द्वितीय प्रचुर नटविला सर्ग हा श्रीप्रसादें. २९

——·—— श्रीनिवास नारायण शिंदे.

## जातस्यहिध्रुवोमृत्युः

### पद.

ऐक मानवा ! नसे वानवा गोष्ट सांगतों खरी;
ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. ॥ धृ० ॥
मृत्युलोक हा, वसति एथली क्षणभंगुर निश्चयें;
असोनी मनीं कसें हें न ये ?
व्याध जसा संधान साधुनी पारध करितो वनीं;
श्वापदें वधी अचुक गाठुनी.
तसा कृतांतहि नश्वर नरवपु मानुनिया लक्ष्य तें;
शरांहीं करितो त्यातें क्षतें.
क्षणोक्षणीं सोडुनि खडतरशरां;
पहा रे ! काळ विंधितो नरा !
न येई दया तयाला जरा;
उग्ररूपधर तोचि आणितो विघ्नें नानापरी;
नराच्या आयुष्याभीतरीं.

उद्यम दैवाहुनी श्रेष्ठतम असें वर्णिती कवी;
          नसे ही आज माहिती नवी.
परंतु काळापुढां बापुडा उद्यम पडला फिका;
          जहाले प्रयत्न त्याचे फुका.
संहाराचा कार्यभाग जो स्वशिरीं घेई बळें;
          कसा तो उद्यमास आकळे ?

     करा कसेंही कालसमय नच टळे;
     वेळ टळेसें साधन न कुठें मिळे;
     अमितोपायीं घडी कदाचित ढळे;

पळ अर्धं पळ ढळतां होतें प्रथम मना सुख परी;
          फिरूनी अधिक दुःख नर करी.
ऐक मानवा नसे वान्चा गोष्ट सांगतों खरी;
          ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. १

संकटांतुनी पार पडावें यत्न करुनि फारसे;
          समज हा वृथा आपला असे.
झालेल्याला मरण आणखी जननहि मेल्या जिवा;
          असे हा सिद्धांत न वानवा.
यास्तव करितां प्रयत्न नेटें व्यर्थ होति आपुले;
          अचुक यम गांठितसे नाकळे.

     प्रयत्न व्हावे ह्मणुनि मनुज धडपडे;
     तशांतचि काळ–मुखीं तो पडे;
     लपंडाव नच चाले काळापुढें;

जसा पारधी फांस पसरुनी सहज सावजें धरी;
          काळही तद्वत जीवा हरी.

ऐक मानवा ! नसे वानवा गोष्ट सांगतों खरी;
ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. २
नाविक बैसे नौकेमाजी विहरे सागरीं मुदें;
तया ती स्थिति बहु संतोष दे.
ऐसें असतां एकाएकीं अब्धिराज खवळला;
प्रभंजन साह्य त्यास जाहला.
तरी डळमळूं लागे नाविक करी ईशचिंतना;
संकटीं रक्षीं करुणाघना !
गृहिं वाट पाहती माझी सुतकामिनी;
मजविण विरहीं कंठिति दिनयामिनी;
मुक्त करीं मज जगत्पते ! यांतुनी;
असें प्रार्थितां अल्पावधितचि जलधि शांतता वरी;
संकटां दुरी करी श्रीहरी.
ऐक मानवा ! नसे वानवा गोष्ट सांगतों खरी;
ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. ३
आला नाविक गृहीं भेटला दारापुत्रांप्रती;
भरे तैं मोदभरानें क्षिती.
निवसे सदनीं सुखें तोंच ये अनवर्षणदुःस्थिती;
सकल जन मृत्युपथा लागती.
यमसदनाला गेला नाविक अब्धींतुनि जरि सुटे;
तरिहि त्या कृतांत नेई हटें.
आगींतुनिया निघे प्रयत्नें जरी;
फोपाट्यांतचिं पुन्हां सांपडे तरी;
नसे सुस्थिती दुःस्थितिची हे परी;

तेणें केले प्रयत्न गेले वायां काळचि करीं;
तयाची अशी दुर्दशा पुरी.
ऐक मानवा ! नसे वानवा गोष्ट सांगतों खरी;
ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. ४

करा कितीही यत्न तयांहीं काळ न तो आतुडे;
तयाच्या पुढें सर्व बापुडे.
ध्यानिं आणुनी सार यांतलें हें काळापासुनी;
सुटावें नको आस ही मनीं.
दीनदयाळा श्रीरघुपतिची कीजे ही विनवणी;
अह्मां दे बळ या समरांगणीं.

काळ अतुळबळ शत्रू सन्मुख उभा;
शरां मुहुर्मुहू त्यजी वज्रसंनिभा;
सोसाया ते शक्ति तुझी देइं बा !

असो कसाही प्रबळ रिपू मग त्याजसवें संगरीं;
भिडतां हार न यों श्रीहरी !
ऐक मानवा ! नसे वानवा गोष्ट सांगतों खरी;
ठसो ती पुरी तुझ्या अंतरीं. ५

भृंग.

## मंदोदरी-विज्ञापना.

### आर्या.

" प्राणेशा ! असुरेंद्रा ! लंकानाथा ! करोनिया प्रणती
ही दीनदासि करिते कर जोडुनि एक अल्पशी विनती १
न रुचेल ती तुह्मांतें परि परिसा शांत करुनिया स्वमना
भाव्यसुखा वारायास्तव मज कथिल्याविना रहावेना २

निजभुजसामर्थ्यें जें मेळविलें थोर विभव या लोकीं
त्याशीं तुळवयातें योग्य दुजें सांपडेल नच नाकीं ३
युष्मत्सुयशातिक्रम करील ऐसा न आढळे अन्य
कीं या धरातलावरि संप्रति कोणीच हो नसे धन्य ४
अतुलप्रताप तुमचा त्रैलोक्यामाजि ठाउका अखिला
स्वर्गाधिपत्य साधी मघवा परि तोहि नत पदीं झाला ५
ऐसें असोनि केलें अकार्य नच उचित जें शठासहि तें
करितां न शंकिला लव वाटे आश्चर्य हेंचि बहु मातें ६
कापट्य वेष धरुनी आणियली जानकी महादेवी
जी निजपादरतातें माय सुता तेंवि नित्यशा सुखवी ७
जी सकळविश्ववंद्या वानी सप्रेम कीर्ति जन जीची
गमली हरणीय कशी कां केली हानि हो सुनीतीची ८
नाथा ! परस्त्रियेची धरिली वांछा न ती असे बरवी
वरवी कुकीर्तितें ती दुष्कृत्यें सुयशहानिकर करवी ९
मेले जन त्या न मिती धरितां परदार—काम निजचित्तीं
वरिलें जयें अभागी जाणुनि, मग केवि पाविजे सुगती १०
सुरराज सहस्रक्षत गौतम--पत्नीस वांच्छुनी झाला
ह्याचि महादोषें शशि धवलमुखी पावला कलंकाला ११
परयोषिताभिलाषी दुःख असें भोगिती महा थोर
सुयशा मळवुनि अंतीं पावति ते नरकयातना घोर १२
सीतेसि करा परती त्या श्रीरामा भजा मनोभावें
तत्पदनत—भक्तजना पीडाया पळ भयेंहि न शकावें १३
मागें हेंचि तुह्मांतें किंकरि ही दीन हात जोडोनी
मत्कर्तव्यचि; जेणें पायांचें अशुभ जाय सोडोनी १४

मधुप.

## काय करावें ?

श्लोक.

चित्तीं न केव्हांहि उदास व्हावें । कर्तव्यकर्मास मनीं धरावें
साधे न सत्कार्य उदास होतां । कर्तव्यकर्मा विसरून जातां १
आरंभिलें कार्य न तें त्यजावें । बुधें प्रयत्नें परि, चालवावें
येतां मधीं विघ्न तया न भ्यावें । हें सज्जनांचें व्रत आठवावें २
कोणी जरी दूषण दे स्वभावें । त्याच्यावरी व्यर्थ न रुष्ट व्हावें
विचारुनी स्वीय मनीं पहावें । असेल जो दोष तया त्यजावें ३
न दोष कांहीं दिसला स्वतांस । लाजूं नये मात्र पुसावयास
सांगेल कोणी तरि सत्य घ्यावें । परी सुकार्यीं गढुनी असावें ४
ठेवून कार्यावर सर्व लक्ष । व्हावें प्रयत्नांत सदैव दक्ष
याञ्चा न कोणापुढतीं करावी । किल्ली महत्त्वार्थ मनीं धरावी ५
सत्कार्य जें होइल तें करावें । मार्गे न सोडून तया फिरावें
विघात होतो सहजीं फळास । वाईट कित्ता दिसतो जगास ६
मुखें न केव्हां निजकृत्य गावें । बुधांवरी सोंपवुनी असावें
लघुत्व इंद्रासहि ये स्वभावें । चित्तीं कवीचें ह्मणणें ठसावें ७
एकाहुनी एक सुबुद्धि लोक । जगांत आहेत बघा अनेक
वाटे स्वतांला स्वमहत्व जैसें । दुजास केव्हांहि पटे न तैसें ८
जी आपली अल्प असेल शक्ती । वेंचा सुकार्यांत धरून भक्ती
थोडी ह्मणूनी न कधीं खचावें । देवावरी रुष्ट कधीं न व्हावें ९
केलें ह्मणूनीच घडून आलें । नाहीं तरी हें नसतेंच झालें
वृथा मला हा अभिमान वाटे । जाऊं नये यास्तव आडवाटे १०
केव्हां तरी यत्न दिसून येतो । लोकांमधीं गौरव थोर होतो
काळावरी ठेवुनिया स्वदृष्टी । कधीं न व्हावें स्वमनांत कष्टी ११

आरंभिलें कार्य जपून मोठें । तें चालवीतां भय काय कोठें ?
केव्हां तरी ये वर रूप त्याला । विचार ऐसा पटवा मनाला १२
कोणी न निंदा मग आपल्याला । घेतात सारे बरव्या गुणाला
तरी यशानें न कधीं फुगावें । कर्तव्यकर्मी रमुनी असावें १३
साधे न ऐसें न तरी रुसावें । फळावरी लुब्ध मुळीं नसावें
सत्कार्य सत्कार्य ह्मणून घ्यावें । संतोष तो प्राप्त असे स्वभावें १४
सत्कार्य झालें जरि अल्प हातें । संतोष चित्ताप्रति थोर देतें
तें व्यर्थ केव्हांहि न जाय जाणा । हा अर्थ चित्तांत सदैव आणा १५
वाईट कोणी ह्मटलें ह्मणून । सत्कार्य द्यावें न कधीं त्यजून
कडू कडू या बहु गर्जनेला । करूनिया आम्र कडू न जाला १६
गळ्यांत घंटा, बहु वाजवून । गुणी ह्मणूनी दवंडी पिटून
न निर्गुणालागिं गुणत्व येतें । चित्तांत ठेवा ठसवून यातें १७
गिरिप्रदेशांत वनस्पतींला । सांदींत कोंदींतहि जन्म आला
कोणी न त्यांला अगदीं पहाती । तरी न त्या खिन्न मनांत होती १८
ज्याच्या कृपेनें जनु हा मिळाला । जें स्थान त्याच्या रुचलें मनाला
तें थोर मानून सुखें रहाती । चित्तांत केव्हां न उदास होती १९
तेथेंच त्या वैभव दाविताती । पाहो न पाहो करिती न खंती
त्या वाढती पल्लवयुक्त होती । काळें फुलांनीं भरुनीहि जाती २०
सुवास तेथें सुटतो न राही । जरी न कोणीहि तयांस पाही
काळें फळें शोभवितात नाना । त्यांचा घडेना जरि लाभ कोणा ! २१
कालांतरें त्या सुकतात पाहीं । उदासवाण्या नसती कदाही
सद्बीज ठेवून लयास जाती । पुढें तशा अन्य तयार होती ! २२
काळें कधीं मात्र सुयोग येतां । त्या बैसती शीघ्र नृपालमाथां
लाधे तया गौरव या जगांत । त्यांना न वाटे परि हर्ष खंत २३
त्यांची स्थिती नित्य मनांत आणा । मानापमानास समान माना

करा सुकार्यास धरून बाणा । अपार सौख्या मिळवाल जाणा २४
सत्कार्य तें जाइल शेवटाला । केव्हां तरी येइल लौकिकाला
ही एक निष्ठा धरितां मनाला । संतोष कोणा न नरास झाला ! २५

मोरो गणेश लेंढे.

---

## निर्माल्याकडे पाहून जागृति !

पद ( राग—भूप )

प्रभु—पद--सेवेंत सकल
वेचुनिया आयु विमल,
कालवशें पडलीं हीं येथ येउनी
फुलें म्लान होउनी ! १

शिकवाया दिव्य तत्व
" क्षणिक--संसृति--मिथ्यत्व
जाणुनि, निजकर्तव्यीं दक्षता वरा;
असे मार्ग हा खरा ! " २

ज्यापरि आमोदजीव
गेला तरि हीं सजीव
राहतात तत्कृतिनें भरुनि दशदिशा,
तशी कीर्ति हो वशा ! ३

सोडुनियां मृत्युलोक
गेले जे पुण्यश्लोक
कर्तव्या करुनीयां, वसति अमर ते
तसे कीर्तिनें इथें ! ४

कर्तव्यीं दक्षपणा
ती आत्मोन्नतिचि खुणा !

यात्रा या भवनिधिची सुखद व्हावया,
गमे ती तरी ' जया ' ५

आत्मोन्नति सकलांची
उन्नति ती देशाची !
भक्ति तीच इशाची, ती कृतज्ञता,
तो जन्म हेतु तत्वतां ! ६

तयें कीर्तिलाभ होय
जोंवरि नभिं चंद्रसूर्य;
निरलस ह्मणें होउनियां ह्मणुनि ती करा,
इहपरत्र सुखकरा ! ७

युवतीचे रक्तगाल
पाहुनि मोहीं पडाल,
परि तत्स्थिति यांसम हें ओळखा मनीं;
जें स्वहितकर जनीं ८

काल असे पूर्ण अचल
गति अपुली अति चंचल;
परि मनुजें साधावा मार्ग हा बरा,
असे अगम तदितरा ! ९

निर्माल्यांचा संबंध
रचिला हा काव्यबंध;
पूर्वींहुनि मधुर गंध येइ याप्रती,
अह्मां देत जागृति ! १०

——————राजहंस उर्फ एंजिनियर वावीकर.

सपटेंबर १९०६ वर्ष १८ वें.

# काव्यरत्नावलि.

## अंक ९ वा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य

### सर्ग ९ वा.

उपवनवर्णन. कमलेचें लतेला उद्देशून भाषण. दुर्मतिचें आगमन. कमला दुर्मतीला उद्देशून बोधपर भाषण करिते. कुसंगनिंदा. सुरापान निषेध. सत्संगप्रशंसा. परदारापहार निषेध. कमला सुशीलेला मुक्त करण्याविषयीं विनंती करते.

श्लोक.

तरुवरां फुटते नव पल्लवा । उपवनीं सुखदानिल पालवी
सकल ताप परिश्रम घालवी । सुजनसें जनसेवन चालवी १

मृगकुळें सगळें भय टाकुनी । विहरती जिकडे तिकडे वनीं
खगतती फिरती प्रणयान्विता । स्थिरमती रमती मग सर्वतां २

बकुल चंपक किंशुक मालती । कुटज गंधवती मधुमालती
सकलही कुसुमानत वल्लरी । न लवली लतली कुठली तरी ३

जलतुषार अपार सुखाकर । सकलही हरिती श्रम सत्वर
परिमलासह ते भरिती अहा । उपवनें पवनेरित ते पहा ४

उपवनीं रमते नवसुंदरी । स्मरमहीरुह—कोमलमंजिरी
युवति—रत्नशिरोमणि मानिनी । गजगती जगती—तल—शोभिनी ५

प्रकटली जगतीं शिवसुंदरी । विहरते अथवा रति भूवरी

अकमला कमला जणु दूसरी । नलसती लसती अथवा खरी ६
मधुरशी सुमनें बहु वेंचिते । करुनि हार गळां मग घालिते
सुखदसा सहकार विलोकि ते । सुनयना नयनां वरि फेकिते ७
परम रम्य तिला दिसली लता । तरुवरास रसें कवटाळितां
मदनताप गमे बहु दुःसह । परम ते रमते पतिच्यासह ८
अभिनवप्रणय स्वपतीवरी । सतत ती धरि कोमल वल्लरी
विरहकातर ती सुदृढ प्रिया । धरतसे रत सेवनिं निर्भया ९
बघुनिया लतिकातरुदंपती । बहुत विस्मित होय मनीं सती
वचन सप्रणया वदते तिशीं । सविलास विलासवती कशी १०
“ सुतनु हा तव भाव पतीवरी । जगतिं अश्रुतपूर्व खराखरी
बघुनि विस्मित तो मम मानस । पसरलें सरले ! जगीं सद्यश ११
तव पति प्रणयी तुजसारिखा । कपटभाव तयां नच ठावुका
सकल वृक्षगणीं बहु उत्तम । न जगती जगतीं नरसत्तम १२
परम भाग्यवती जगतीवरी । खचित तूं असशी प्रियवल्लरी
नच कुणी रमणी सुखिनी अशी । रुचिरसेंचि रसें सुख सेविशी १३
दिसतसे सुखि वृक्षसमूह हा । नय–परायण निष्कपटी महा
धरि सुनिर्मल भाव परस्परीं । सकल हा कलहां न कधीं करी १४
पुरुषजाति सखे कलहप्रिया । बलवती लव तीस नसे दया
सुखपरा अबलाजन निष्टुरा ! वसुरता सुरतासव तत्परा १५
त्यजुनिया कुमती सकला नयां । करिति संतत निर्भय दुष्क्रिया
युवतिवंचन–पीडन तें तसें । सतत यांत तया सुख होतसे १६
परम चंचल तन्मन तें असें । विमलभाव न माहित त्या असे
सुखकरा गमते परकामिनी । स्वरमणी रमणीय जरी गुणीं १७
अनुदिनीं असुखें बहु भोगितें । सकलही विनता परि सोशिते
प्रियतमां सुमती सुखती खरी । निज गती जगतीं नच दूसरी १८

खचित गे अबला हतभागिनी । अवदशा-वश त्या दिनयामिनी
तुजवरी पति भाव सदा धरो । विहर तूं हर तूज सुखी करो १९
पतिपदीं रति मी धरिते जरी । तरि न तो प्रणया मम आदरी
सतत ही बहु विव्हल मन्मती । वदव तूं दवतुल्य दशा न ती " २०
अविरता जलवृष्टि करी भली । रचितसे नवहार उरस्थलीं
वदुनिया मग राहतसे स्थिरा । सकरुणा करुणामय ही गिरा २१
अनुपमा वदनच्छवि लोपली । अरुणनेत्र दिसे जणु कोपली
उठुनि भिन्न विचार निजान्तरीं । खवळली वळली मग सुंदरी २२
उपवनीं रमुनी नर चालला । तिजकडे मग सत्वर पातला
प्रियतमां बघतां गुणसुंदरी । सुवसना वसनांचल सांवरी २३
वदत तो सखितें वच यापरी । " विमनसा दिससी सखि कां तरी
मलिन कां दिसता मुखचंद्रमा । सुवदनें वद ने दुरि या तमां २४
सुनयनांमधुनी जल जें गळे । पुसुनि सत्वर तें वसनांचलें
वदतसे मग सन्नय निष्टुरा । पर सती रसती विनयें गिरा २५
" निजसुखां सुख मी न गणी स्वतां । परवती अबला विपदा हता
खर चिते रचिते परिभाविनी । अहह ! ते दहते परि भाविनी २६
वदत अप्रिय, ना मितभाषिणी । परम जी अभिमान धरी मनीं
युवति ती कुटिला जगिं सर्वथा । कुलवती लवती पतिदेवता २७
पतिपदप्रणता प्रियभाषिणी । प्रणयभाववती गुणशालिनी
हित कथी व्यसनीं दिनयामिनी । न असती असती हितवादिनी २८
शठमती अनियंत्रित जे कुवी । नच रुचें अनुशासन त्या कधीं
गमतसे हितही गरलापरी । नरमणी रमणी-वच अन्तरीं २९
जडमती अबलाजन मूढ हा । समजती खल यापरि ते पहा
सुजन आदरि कामिनिची भली । तशि शुची शिशुची वचनावली ३०
कटु गिरा स्वसुहृज्जन बोलती । हितकरा खरि ती परि शेवटीं

अतगणी तिजला न सुधी खरा । मधुर साधुरसा विरळा गिरा ३१
वचन जें वदतें नरसत्तम । नच खरोखर तें हृदयंगम
अतदशा परि जी तव भाविनी । सजविते जरि ते मज बोधनीं ३२
मन नियोजि असत्पथिं सर्वदा । उपजती हृदयान्तरिं संमदा
बुधहि यत्प्रभवें अधिं रंगतो । अहितसा हित सांडि कुसंग तो ३३
सुखकरा विझती सुखदीपिका । सकल लुप्त करी शिव–चंद्रिका
शिवयशोद्युति जो दुन भंगतो । अहितसा हित सांडि कुसंग तो ३४
अपहरी सकला धनसंपदा । प्रसवतो विविधां जगिं आपदा
व्यसन ओढि कुसंग बुधावरी । जन वरी नवरी कुदशा खरी ३५
वदुनियां 'खल हे मधुरा गिरा । फसविती कपटें सरलां नरां
व्यसनिं गोंवुनि त्यांस परोपरी । खल पती! लपती मग हे दुरी ३६
स्वजनही पडतां व्यसनान्तरीं । अधम ते हंसती अहितापरी
हरुनिया सकला धनसंपदा । विहरती हरती मग तत्पदां ३७
वधुनियां कपटें अबलां जनां । पिशुन ते हरिती सुभगांगना
न करि शासन त्या अधमाधमां । वसुमती सुमती सतनु क्षमा ३८
करुनि दंश परा अपरा वधी । सविष तद्रसना कुटिला कुधी
गमतसे मज निर्मि महाद्भुता । प्रभु जगीं भुजगीं परमार्थता ३९
कठिणसें वदती वच तें खरें । गरल त्याहुनि वाटतसें बरें
असुख दुःसह दे विष एकदा । पर चिते रचि तें वच सर्वदा ४०
सुरवरां असुरां भय दे अति । विवशदास करी जरि त्याप्रती
तरि हरून असू, मरणावरी । न नर कां नरकांत सुरा भरी ४१
त्वरित दग्ध करी तनुवल्लरी । अयश–धूम दिगंतरिं ती भरी
न मदिरा खदिराग्निशिखाच ते । कुलवना लव नाथ न सोडिते ४२
करितसे विधता नव सुंदरी । शिशुजनां बुडती असुखान्तरीं
नच मधू स्ववधूजन दैन्य हो । नियम हा यम हानि करील हो ४३

विनति ही विनता करिते पदीं । प्रियकरा मदिरा न शिवा कधीं
वचन मान्य करा मम हें असें । अशिव तें शिवतें मग हो कसे ? ४४
वळवितें हृदयाप्रति सत्पथीं । निरसती कुपथी सकला रति
वसुमती–तळिं सज्जनसंगती । सम हिता महिता तरि कोण ती ४५
सुपथ दाखविते व्यसनान्तरीं । पसरितें सुयशा जगतीभरी
वितरिते समता हृदयां खरी । सुजनता जनताप सदा हरी ४६
हरितसे मरणास सुधा खरी । सुजनवाक् जननां मरणां हरी
अनुपमा मज ती गमते खरी । नव सुधा वसुधा--प्रभवा खरी ४७
मलिनता हरुनी हृदयस्थिता । शुचितमा कथुनी विविधा कथा
निरसुनी कमला प्रभतां मदां । कविनयां विनयां शिकवी सदा ४८
ह्मणुनियां चरणीं करि ते नति । अनुचिता अपणां खलसंगती
वळवुनी अपुलें मन सत्पथीं । मृदुरवा दुरवा तरि दुर्मती ४९
परम ही प्रबळा स्मरलालसा । निजबळें हरितें जनमानसां
गमतसे मजला रजनीचरी । कविबुधां विबुधां वश ही करी ५०
विषसमा समजा परकामिनी । विनति ही अपणां दिनयामिनी
परसती नच दीपशिखा खरी । खल कढेल कढें शलभापरी ५१
विधिसुतेस छलें उपभोगिलें । ऋषिवरें कुपितें गम शापिलें
परम लज्जित होउनिया मनीं । हरिहि वारि–हिवांत लपे वनीं ५२
जनकजा हरिली कपटें खलें । अनुचिता करुनी करणी बळें
ह्मणुनि दाशरथि–प्रभु संगरीं । असुरपां सुरपालक संहरी ५३
द्रुपदजा छळिली समदें खळें । ह्मणुनि पांडव–मानस कोपलें
धरुनिया रहसी विजयाग्रजें । कुमतिला मथिला पवनात्मजें ५४
त्यजुनियां विनयां अभिलाषितां । गुरुसती रुसती गृहदेवता
मलिनता वरि ओषधि–बांधवां । हिमकरां मकरालय--संभवां ५५
परकुल क्षय ही करिते कदा । परि हरी नरजीवितसंपदा

परसती अणितां सदनाप्रती । विचकवीच कवीसही दांत ती ५६
गुणवती निज मातुल--कन्यका । अवचिता हरिली तरि, आयका
भागिनिशी करुनी अशि दुष्कृति । न नर कां नरकां वरि दुर्मति ५७
खचित ती वसुधा--तळिं इंदिरा । प्रकटली भरली स्वयशें धरा
बघुनि लज्जित तीस महासति । वदुं सरी दुसरी तरि कोणती ५८
अचलही पडतां स्वशिरीं जरी । खुपशिली हृदयीं निशिता सुरी
पतिपरायण शुद्धिमती सती । नरक--दार कदा न वरी कृती ५९
जरि सदा व्यसनें छळितीं तयां । न ढळती तिळही दृढ निश्चया
कठिण तें बनतें नगसें जरी । सुमनसां मन साच हरी तरी ६०
तनयसें अपणां प्रियमातुलें । धरुनिया ममता प्रतिपाळिलें
कृति सदा करि जो करुणाकरा । जनकसा न कसा अपणां खरा ६१
गुणवती हरुनी दुहिता प्रिया । रिपुसमान तयां छळिलें प्रिया
अनुपमा प्रिय तत्कृति सर्व कां । विसरला सरला उपकारिका ६२
करि अपाकृति जो उपकारकां । नर खरोखर तो अहिसारखा
सुकृत जो स्मरतो नच अन्तरीं । असुर तो सुर तो असला तरी ६३
सपतिका तिजला तरि सोडुनी । प्रियतमा मिळवा यश या जनीं
सकलही दवडा दुरि दुर्जनां । अशिव तें शिवतें नच सज्जनां ६४
वच हितावह हें वदतें प्रिया । किमपिही न तुम्हां दुखवावया
जडमती जगतीं बहु मी खरी । समजतें मज तें वदलें तरी ” ६५
वच न तें सतिचें रुचलें खलां । निजमनीं तरिही नच कोपला
मग तिला वदला खल, “ ही भली । सुवचना वचनामृत वर्षली ६६
वचन जें वदसी मज लाडनी । बहु हितावह तें गुणशालिनी
हृदय दुष्पथिं हें रमतें तरी । समजतें मज तें जरि सुंदरी ६७
परम ही प्रबला स्मरलालसा । वश करी खरि ही जनमानसां
बघुनिया प्रमदा बहु सन्मती । घसरले सरले मग मी किती ६८

नियमुनी मन हें तरि सुंदरी । कुपथसेवन मी न कदां करी
खचित हें हृदयीं समजोनि घे । सुनयने ! नयनें तरि पूस गे " ६९

दिंडी.

नाथवचनें पाउनी समाधान
चालली ती मंदिरा गुणनिधान
असे सुमतीचा निर्मळ स्वभाव
विदित तीतें नच कदा द्वैतभाव ७०

—————श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## आर्यभूदेवीमहिमा.

### प्रथमोद्गार.

सांप्रत भारतवासी जन ज्या आर्यभूमातेचा ' वंदेमातरं ' या श्रुतिमधुर उच्चारानें सर्वत्र जयजयकार करितात; तिचे गुणानुवादानें पवित्र होण्यासाठीं हें एक वेगळ्या दिशेचें अनुकरण केलें आहे.

श्लोक.

आर्ये ! देवी ! सुभगयुवती ! हे ! पुराणी ! पुरंध्री !
माते ! हे त्वत्तनय नमिती सर्वभावें त्वदंघ्री;
स्वातंत्र्यश्रीतिलक तुझिया भूषवी भव्य भाला;
अंबे ! पादीं प्रणति करितों सन्मती देइं बाळां. १

साक्या.

' भरतखंड आमुचा स्वदेश ' प्रेमें असें वदावें;
या भाग्यानें भाल कुणाचें अलंकारिलें देवें ? २
भरतभूमिला मातृस्थानीं मानण्यास अधिकार—
घाया हरि शिरिं धरी कुणाच्या अभिषेकाची धार ? ३
आस्वादुनिया बहु प्रमोदें सुधाऽधरु तत्स्तन्या,

ह्मणून जननी ! तीस, कुणाच्या रसना झाल्या धन्या ? ४
भाग्यवंत आह्मीच ह्मणतसों ' भरतखंड निजदेश; '
आमुच्याच भूषवी ललाटा या भाग्यें परमेश ! ५
मातृस्थानीं भरतभूमिला समजण्यास अधिकार--
आह्मांसचि दिधला जगदीशें करुनि थोर उपकार ! ६
आमुच्याच जिव्हाही धाल्या प्राशूनि तिचें स्तन्य !
एवंच श्रीरामकृपेनें आह्मीच जगीं धन्य ! ! ७
स्वदेशबांधव सर्वहि आह्मी मुलें, आमुची माता--
भरतभूच ती, तीच पाळिती, थोर तियेची ममता. ८
पूर्वज, आह्मी, वंशज, सारे तिच्याच मधुर स्तन्यें--
थोर जहाले, झालों, होतिल, तेणें तसे न अन्यें. ९
परमेशें तें दुग्ध तियेच्या अंगीं आह्मांकरितां--
निर्मियलें; या ईशदयेचें माप न येई करितां. १०
इतरांची त्या दुग्धावरती नसे किमपिही सत्ता;
आह्मांतें ते मात्र मिळाली आहे निसर्गदत्ता. ११
तीस कोटि हीं तीस अपत्यें त्यांहीं पुत्रवती ती,--
लालनपालन करूनि, आह्मां दावी सुखप्रतीती. १२
क्रीडार्थ मुलें दुज्या स्त्रियांचीं येती आह्मासंगें;
त्यांशीं आह्मी सर्वहि रमतों निष्कपट अंतरंगें. १३
त्या परकीयां हटें आमुच्या जरिहि करुनि मनधरणी,
क्षणभर ती ओसंगीं बसवी द्रवुनी अंतःकरणीं;-- १४
तरि तें केवळ औदार्य--नव्हे वात्सल्य तिचें ऐसें,
सुतवात्सल्यें जननीलागीं प्रेम न उपजे कैसें ? १५
अमुच्या मातेवरती नाहीं सत्ता ही दुजियाची;
आह्मी असतां पुत्र तियेचे ती न आणिकां याची. १६

निगमनुता जी होय पुराणी—अनुभववृद्धा—तीच;
पुरंध्रीहि ती वेदवर्णिता सौंदर्यें युवतीच. १७
निसर्गदेवी प्रसन्न होउनि तिस जें दे ऐश्वर्य,—
तें रक्षाया सिद्ध सदोदित दिक्पाळ अमितवीर्य. १८
सुंदोपसुंद इत्यादिक जे दानव तिहीं तियेला--
त्रास न द्यावा ह्मणुनि सतत ते रक्षिति अष्टदिशांला. १९
भूप प्राचीन चीनचा जो बांधुनिया तट तेणें,--
बळकट केला स्वदेश, मनिं हा गर्व वृथा न वहाणें; २०
स्वयें उत्तरेकडे जियेला रम्या निसर्गदेवी--
अजस्र दुर्भेद्य तट करुनिया हिमालयाचा ठेवी. २१
प्राक्प्रतीच्यवाचींस रक्षितो विस्तीर्ण समुद्र जिला;
आर्यभूमिरक्षणार्थ खंदक जणूं विधीनें सृजिला. २२
स्थलजलाधिदेवता जियेला रक्षिति अशा क्रमानें;
निसर्गरम्या भारतमाता ती नमिली सन्मानें. २३
वात्सल्याची पुतळी आहे साची भारतभू ही;
मूर्तिमती कीं प्रेमलताही असे अन्यथा नाहीं. २४
तीस कोटि या तनयांवरती असे तियेची ममता;
समता सर्वांविषयीं ठेवी, तिळहि न मनीं विषमता. २५
धर्मपंथ हे वेगवेगळे असतां, अमुकाचि मार्गें--
जाच, सोडुनी स्वमार्ग, ऐसें कोणास ती न सांगे. २६
सगुणमूर्तिला पूजोनि कुणी आळवोत विष्णूला;
भजोत कोणी एकनिष्ठता धरोनि मनिं बुद्धाला; २७
निजोपासना करुनी कोणी ईशा ह्मणोत अल्ला !
किंवा अन्य स्तवोत कोणी भावें खिस्तगुरूला; २८
धर्मस्थापक नानक ह्मणुनी ध्यावोत कुणी त्याला;

याविषयीं ती उदारचरिता न धरीच आग्रहाला. २९
सुवर्ण एकचि, परंतु त्याचे अलंकार बहुवस ते;
तत्त्व पाहतां सर्वांमाजी एकचि सुवर्ण असतें. ३०
सरिता नाना, उद्गम दिसती नाना स्थळीं तयांचे;
पयीं निपजती, पयींच मिळती, एकचि तत्त्व पयाचें. ३१
एका परमेश्वरेंचि सृजिले तसे धर्म हे नाना;
निजधर्माचारांहीं लाधे अंतीं तोचि जनांना. ३२
असती हिंदू जसे तिला प्रिय, तैसेचि मुसलमान,
बौद्ध, ख्रिस्ती नानकपंथी, सगळेहि समसमान. ३३
' जय वंदेमातरं ' असा हा मधुरस्वर श्रुतीतें--
तिच्या तोषवी, तदा नावरे तिचा प्रेमभर तीतें. ३४
जिच्या प्रसादें लाधे आह्मां ही प्रेममयी आई;
कैसें व्हावें चिच्छक्तीचें त्या आह्मी उतराई ? ३५
व्हाया प्रभुगुरुकृपा नमन ही युक्ति एक बुधमान्या;
ह्मणुनी नमिली प्रेमपुरःसर चिच्छक्ति असामान्या. ३६
तदनंतर वंदितों प्रमोदें आर्यभूमिजननीशी;
निजात्मजां जी देते भजतां सौख्यकीर्तिधनराशी. ३७
असो हिंदमातेचा अमुच्या सदैव जयजयकार;
सर्वहि भारतवासिजनांचा तच्चरणिं नमस्कार. ३८

श्लोक.

रम्ये ! होशी अवनितलीं या तूं स्वभावें सुरम्या;
मर्यादांहीं विभुकृत सदा रक्षिते ! तूं असाम्या;
सर्वद्रव्ये ! तुज वसुमती नाम हें योग्य होय;
अंगीकारीं अयि ! सुफलिते ! वंदना अस्मदीय. ३९

प्रथमोद्गार समाप्त. चंद्रकांत.

## शेतकऱ्याचे उद्गार.*

### श्लोक.

प्रयत्नानें होतो ह्मणति नर नारायणसम,
परी घेताती ते न परिगणनीं दैव विषम;
चढाया दुःखाचे धडपडतसों दुर्गम कडे,
तळीं लोटी, देई फिरफिरुनि दुर्दैव हिसडे ! १
हिरा शाणोल्लेखें अधिकचि झळाळी प्रकटतो,
परी होतो रक्षा भिडुनि लसदग्नीनिकट तो.
ज्वलज्ज्वालांगारा परिमितच लोखंड सहतें,
तदाधिक्यें जातें दृढहि विघरोनी अहह ! तें. २
अहा ! कैंचे आले चहुकडुनि हे योग जुळुनी,
विपज्ज्वाळासंघें बहु विव्हळतों होरपळुनी;
बळावे हा ग्रंथिज्वर, अधम हे टोळ टपती,
विटंबूनी वंची विविधपरिनें मेघनृपती ! ३
श्रमूनी अंगानें, खपवुनिहि हे दीन वृषभ,
बियें रोपें केलीं, जमिन कशिली, याचुनि शुभ;
पुढें ऐत्यावेळीं जरि धरिल पर्जन्य नरडें
तरी दुःखोद्वेगें कृषिक दुबळा कोण न रडे ? ४
अवृष्टीनें सस्यें मृदु उभिंच तापें फिकटतीं,
दिसे सृष्टिश्रीची रखरखित मुद्रा बिकट ती !
कशी साधीं भोळीं कृषिकरकुळें हीं फटवलीं ?
कशी येई आह्मांवर अशुभ संक्रान्त टवळी ? ५

---

* आर्द्रा नक्षत्रापासूनच अवर्षण पाहून भाविदुष्काळाचें चित्र ज्याच्या डोळ्यांपुढें आहे अशा शेतकऱ्याचे हे उद्गार आहेत.

पहा, वर्षामध्यस्थित ठळक हा श्रावण कसा
निरभ्रत्वें लावी विवश कृषिकां दुर्धर कसा ?
मधूनी आशेतें वळति चळवाया घन घन,
परी अस्मद्धैर्यासह वितळती ते झपकन ! ६

मघांचें ना वर्षे टिपुसभरही गर्भवाणि तें,
वृथा ज्योतिर्ज्ञांचीं सकळ ठरलीं हाय ! गणितें.
महीभंग क्षेत्रीं बघुनि सहसा चित्त तडके,
त्वरें अन्तर्वन्ही बळबळिस खायास धडके ! ७

पुढें त्या पूर्वांनीं तुरळक कुठें वर्षुनि जलें,
मृतांना स्नेहानें तिळजळ भलें काय दिधलें !
न हस्तींनीं केलें प्रकृतिसलिलप्रेम उघडें,
निसर्गाला ऐशी उलट गति कां सांप्रत घडे ? ८

न वर्षन्मेघांनीं सुखद घडले दुर्दिन कधीं,
परी चिंताव्याधी घडवितिल ते शाश्वदवधी !
पयोधारासारें न शरशतदीर्णा वसुमती,
परी दुर्दैवास्त्रें विहत अमुची मात्र सुमती ! ९

प्रचंडांशू तापें प्रखर, गमतो ग्रीष्म दिवसा,
अहां सस्यासंगें करपवुनि दे कांप हिंवसा !
निशीं या नेत्रांना भ्रमवुनि सुधांशू धवळवी !
स्फुटज्योत्स्ना शीता मन तिमिरतापें कवळवी ! १०

पयःपूर्णा, भंगप्रचुर, मृदुपंका, सुचपळा,
नदद्गीतासक्ता, तटतरुलतासंश्रितजळा,
अशा कोठें गेल्या मधुपरिमळा सुंदर नद्या ?
जलस्रोतःस्थानीं उपलगण हो ! दर्शन न द्या. ११

सरीं ज्या सांचावें विमळजळ वर्षांत अमित,
रजोरागें पद्में सुरुचिर खुलावें कुसुमित,
मरंदीं सद्गंधीं अलितति असो ज्यांत रतती,
तिथें सद्यःपंकीं लुडबुड करी दर्दुरतती ! १२

मुलांनों ! पूर्वीच्या रुचिकर शिदोऱ्यांस विसरा;
फळें पुष्पें गेलीं, सुकुनि पडला पर्ण कचरा !
कशाच्या ओंवाव्या सुबकमृदुमाळा शिशुगणें ?
लताकुंजीं आतां कुठुनि रुसणें आणि फुगणें ? १३

गुरांना चाराया मुळींच नलगे आज कुरणीं !
रिकाम्या या डेऱ्या, ठणठणति सारीं विरजणीं !
कुठें भाजीपाला, गहु, हरभरा, तूर, हुलगा ?
वटारोनी डोळे उदकपति देई जरि दगा. १४

तृणें पोषी जी भू ठणठणित ती कातळ जसा !
अशी वाटे नाहीं अधममतिही शुष्क निरसा !
वखाली पोटाच्या पडुनि फिरती तीव्र भुकीं
प्रभो ! छाती फाटे निरखुनि गुरें दुर्बळ मुकीं. १५

गुरांनों ! बाबांनों ! कठिण तुमची भाविकुदशा,
परी आह्मांहूनी शतपट सुखी भासत असां !
भविष्याचा तूह्मां प्रभुवरकृपेनें समज न,
स्वबुद्धीनें आह्मीं तळमळतसों पामरजन ! १६

कृषी श्रेष्ठा ऐशा स्थळ सदभिमाना न गवसे,
सदा दुष्काळाचा कृषिकजनचित्तीं नग वसे !
स्वबंधूंचा टेंका डळमळित, नाहीं भरवसा,
ह्मणोनी दुर्दैवी कमकुवत हा वर्ग शवसा. १७

क्षुधाग्नी दाहें ने प्रबळ जठराग्न्यांस विलया,
यमाचीही मुद्रा कठिण न तदा त्रासविल या.
असे देवा ! ह्रास प्रखर सहण्या कोण शकले ?
बरीं वज्राघातें सपदि उडलीं देहशकलें ! १८
ह्मणे ' दंडस्वार्थे न करिं धरिं मी ' भूतळपती,
वृथा ही तत्प्रौढी, जरि गुण न कृत्यें तळपती.
जरी थापाथापी करुनि शमतीं क्षुब्ध जठरें,
तरी अस्मद्राष्ट्रप्रतिम सुखभाक् अन्य न ठरे ! १९
नसे दाणा गेहीं, बहुत वसतें गोत पदरीं;
भरूं कांटे किंवा उपलकण दुष्पूर उदरीं ?
कसा पाही ईश क्षतनतजनांच्या कवतुका ?
धरी एकाएकीं पविसदृश काठिण्य विभु कां ? २०

——————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## ऋतुसौंदर्य.

### शरदृतु.

#### श्लोक.

साजे जी स्फुटरम्यपद्मवदनें, काशांबरें नेसुनी;
पायीं मंजुल नूपुरेंहि जिचिया उन्मत्तहंसध्वनी;
साळीचीं पिकलीं वनें विपुल ही काया जिची साजिरी;
आली कीं सजुनी शरत्तरुणि ही लीलावती सुंदरी ! १
कासारादिक ते प्रफुल्ल कुमुदीं; हंसीं नदीजीवन;
पुष्पांनीं लवल्याहि सातविणिच्या वृक्षात्रलीनें वन;
काशांच्या कुसुमांमुळें वसुमती; चंद्रांशुंनीं शर्वरी;
जाईनीं बघ जाहलीं उपवनें; सर्वत्र हीं पांढरीं. २

तीरीं ज्या बकहंसपंक्ति बसल्या त्या शुभ्र हारावली;
तैशी चंचल रम्य मीनचि जिला कांची बहू शोभली;
मोठें तीर जिचा नितंब विलसे; त्या या नद्या सागरीं--
जाती सांप्रत जेंवि मत्ततरुणी चाले हळू त्यापरी. ३

कांहीं शृंखमृणालरौप्यनिभ जे त्यागोनि सारें जल,
झाले पांडुरवर्ण, रिक्त, हलके, वेगानिळें चंचल;
ऐशा त्या शतशा अपार जलदीं आकाश हें सांप्रत--
ज्याच्या मस्तकिं चामरें तळपती त्या भूपसें शोभत. ४

भिन्नकज्जलराशिचे परि कांतिनें नभ सुंदर;
तेंवि सुंदर--पद्ममंडित वप्रभूमि मनोहर;
तांबडी नटतां गळोनि दुपारिचीं कुसुमें मही;
कोणत्या तरुणास उत्सुक अंतरीं करिती न हीं ? ५

शेंड्याच्या डाहळ्या त्या अतिलघुपवनें व्यग्र झाल्या डुलोनी;
ज्याचीं तीं पल्लवाग्रें लवति मृदुलशीं पुष्पभारें फुलोनी;
पीतां उन्मत्त भृंग प्रबल मधु गळे सर्वदा जेथ पाहे;
कोणाचें कांचनें त्या हृदय वद सखे ! भेदिल्यावीण राहे ? ६

जी तारागणमौक्तिकादिमणिचीं सद्भूषणें लेवुनी,
शोभे आस्यशशी विमुक्तचि जिचा मेघावरोधांतुनी;
तोषें निर्मल चंद्रिकावसन तें नेसोनि ही शर्वरी,
वाढे सोज्ज्वल; ते जशी प्रतिदिनीं तारुण्य बाला वरी. ७.

पंक्ती भेदियल्या जिथें लहरिच्या कारंडवांनीं मुखें;
दाटीनें कलहंस सारस तटीं क्रीडा करीती सुखें;
झाल्या पद्म--रजींचि ताम्र; करिती यत्तीरिं हंस ध्वनी;
ऐशा सांप्रत या नद्या जडविती प्रीती जनांच्या मनीं. ८

जो वर्षे अति थंडशा जलकणा, जो रंजवी लोचना,
ज्याचे ते कर मोहितात हृदया, आल्हाद दे जो मना,
तो इंदू रमणींचिया तनुलता संतापवीतो झणीं;
ज्या कां व्यग्र पतीवियोगगरळव्याप्ताग्रबाणव्रणी. ९

साळीच्या फलभारनम्र असल्या पंक्तींस जो कांपवी;
पुष्पांनीं लवलेलिया तरुवरा अत्यंत जो नाचवी;
वेगें पुष्पितपद्ममंडित जलीं जो डोलवी पद्मिनी;
तो हा शीत सुगंध वात तरुणा चांचल्य देतो मनीं. १०

जे कां साजति फुल्ल निर्मल अशा राजीवनीलोत्पलें;
पंक्तीनें लहरी जिथें उसळती मंद प्रभातानिलें;
जोडीनें फिरतां मराळगण ते जे शोभले भोंवतीं;
उत्कंठा सहसा मनीं जडविती कासार ते संप्रती. ११

पहा न तळपे तशी गगनकेतु विद्युल्लता;
तशा न उडती कधीं गगनिं त्या बलाका अतां;
सुरेंद्रधनु लोपलें सहज तेंवि मेघोदरीं;
न ऊर्ध्ववदनें शिखी नभ विलोकिती सुंदरी! १२

नृत्योत्साह विरोन खिन्न बसल्या मोरा त्यजोनी पहा,
क्रीडे मंजुळ गायनांत गढल्या हंसावरी काम हा.
टाकोनी नव नीपशालकुटजां, तेंवीं कदंबार्जुनां,
पुष्पश्री खुलवोनि सातविणिच्या आतां विराजे वना. १३

निर्गुंडीच्या फुलांच्या मधुर परिमलें जे सदा शोभवीती;
बैसोनी स्वस्थ पक्षी मधुरव करितां, ते जिथें भोंवताती;
बाह्यांगीं पद्मनेत्रा चपळ मृगवधू बैसती स्वस्थ जेथें;
अत्युत्कंठा नराच्या मनिं जडविति ते सर्व आराम कांते! १४

वेगानें कांपवोनी घडिघडि कुमुदां पद्मकल्हार ह्यांला,
जातां, आलिंगुनी जो, परम मधुरसा शीत भारी जहाला;
जो पानांच्या कडेला पतित दहिंवरा सर्वदा कांपवीतो;
तो हा वायु प्रभातीं हळुहळु फिरुनी फार औत्सुक्य देतो. १५

साळीचीं रम्य शेतें अतिशय पिकुनी, जेथ आच्छादिलेलीं;
तैशीं तीं स्वस्थचित्तें विपुल विलसती गोकुळें बैसलेलीं;
हंसांचे, सारसांचे प्रतिरव भरुनीं नांदलीं जीं तयांहीं;
शेतें सीमांतरींचीं प्रमुदित करितीं तीं जनांतें सदा हीं. १६

हंसांनीं अतिमंद सुंदर अशी नारीजनांची गती,—
तैंवी तन्मुखचंद्रकांति हरिली फुल्लोत्पलांनींहि ती;
लीलामत्तकलाविलोकन तसें विस्तीर्ण नीलोत्पलें,—
तैशा सुंदर सूक्ष्मशा लहरिंनीं भूविभ्रमा जिंकिलें. १७

पुष्पांनीं लवलीं जिचीं किसलयें, वाघाटिची ती लता—
रत्नालंकृत बाहुची हिणवितें कांति स्त्रियेच्या अतां;
स्वच्छेंदूपरि शुभ्र सुस्मित अशी दंतप्रभा साजिरी,—
तीतें मालतिपुष्प कुंदकलिका हीं निंदिती सुंदरी ! १८

काळ्याभोर विशाल दाट रुळल्या वक्राग्र केशांतरीं—
संतोषें नवमालतीकुसुम तें त्या घालिती सुंदरी;
मोठें श्रेष्ठ सुवर्णकुंडल डुले ज्या रम्य कर्णावरी--
तेथें ठेविति त्या प्रफुल्लित अशीं इंदीवरें साजिरीं. १९

मौक्तिकावलि तेंवि चंदन लेवुनी कुचमंडला,--
तेंवि सुंदर मेखलाहि विशालशा कटिमंडला,--
मंजुलध्वनि नूपुरीं पदपंकजास तसें प्रिये !--
तुष्टमानस सुंदरी शरदांत भूषविती स्वयें. २०

दाटलीं कुमुदें विकासुनि, राजहंस विराजले,
पाचुच्या रमणीयकांतिपरी जिथें जळ भासलें;
त्या जलाशय–कांतिला धरुनी नभोंऽगण साजले–
जें निरभ्र तसें जिथें शशितारकागण दाटले. २१

या काळीं मंद वायू लगटुनि कुमुदां शीतल स्वच्छ वाहे;
अभ्रें निर्मूल होतां सुरुचिर गमती सर्व दिग्भाग पाहें;
जावोनी पंक सारा अवनिहि सुकली; शीत वारी पवित्र;
तैसें आकाश साजे विमलकरशशीतारकांनीं विचित्र. २२

जीचा कांतकरीं करांबुज, जिणें आस्यें शशी जिंकिला,
कामोद्दीपक जी रतिप्रिय अशा संभाषणें व्याकुला,
त्या कोणी तरुणी सजोनि बहुधा जाती स्वयें लौकरी--
पुष्पांनीं रचिल्या सुगंधित अशा शय्यागृहाभ्यंतरीं. २३

इच्छा फार जया विलासरतिची त्या सुंदरी गौरवें–
प्रेमें कामविनोद तो सुचविती सन्मैत्रिणींच्यासवें;
तैसा श्रोणिमध्यें विनोद करितां त्या मुख्य सांगातिणी,
या काळीं तरुणस्त्रिया सुचविती आल्हाद तो तत्क्षणीं. २४

प्रात:कालिं रवीकरें फुलुनियां अत्यंत जीं शोभलीं,–
पद्में ती वरसुंदरीवदनिंच्या कांतीपरी भासलीं;
अस्तातें विधु पावतांच कुमुदें तीं म्लान झालीं जशीं,
या काळीं पथिकांचिया तरुणिचीं हास्यें विरालीं तशीं. २५

नेत्रांची श्यामकांति स्मरुनि रमणिच्या रम्य निलोत्पलांहीं,
तैसा तो स्वर्णकांचीरव अठवुनियां मत्तहंसस्वरांहीं,
कांती ती सुंदरीच्या मृदुल अधरिंची बंधुजीवाग्रत्रासी–
पाहोनी, आठवोनी स्वसिसिस रडतो भ्रांतचित्तें प्रवासी २६

अर्पुनी विमलेंदुकांतिस सुंदरीसुमुखावरी,
बंधुजीवकपुष्पसुंदरता तशी मृदुलाधरीं,
ठेवुनी मधुहंसगायन—माधुरी मणिनूपुरीं,
ती शरत्कमला कुठें दडलीच कां जणु सुंदरी ? २७

प्रफुल्लकमलानना, रुचिरलोचनेंदीवरा,
कसोनि विलसे कशी धवलकाशपुष्पांबरा ?
सुरम्यकुमुदप्रभा तरुणमत्तनारीपरी,
प्रसन्न तुजला करो हृदयिं ही शरत्सुंदरी. २८

काव्य श्रीकालिदासें विरचित ऋतु--संहार रम्य प्रसिद्ध;
तट्टीका प्राकृतार्थी विबुधजनमनोरंजना श्लोकबद्ध—
विद्वद्विख्यातसिंदेकुळजनित नत श्रीनिवासें प्रमोदें,
या सर्गी गुंफिलासे--'तृतिय--वर--शरद्वर्णन'--श्रीप्रसादें. २९

——————— श्रीनिवास नारायण शिंदे

## समुद्र.

श्लोक.

समुद्रा तुझ्या दर्शनें हर्ष झाला । जसा मोर नाचे बघोनी घनाला !
तृषाक्रांत जैसा नदीतें बघोन । कवी हा तसा जाहला हीन दीन १
विशालत्व देखोनिया सागराचें । गळे गर्व हा, अंतरीं शांति नाचे
कवीकल्पने जोर आला उडाया । अजाचे पदीं जाउनीया भिडाया २
तुझी थोरवी वर्णवेना स्वचाचे । खरें वस्त्र तूं आमुच्या मेदिनीचें
तुवां सर्व नांवें तुझी सार्थ केली । तुला देखतां भ्रांति माझी उडाली ३
शिवाचें असे आठवें रूप तूंची । गुणें तूझिया वृष्टि होते जलाची
अभावें तुझ्या सर्व--लोकांत हाय ! । ह्मणूनी निधे ! पाहिजे त्वत्सहाय. ४

तुझ्याची मुळें वांचती जीवजंतू । हरीसी कृपेनें जनांचेहि मंतू
अहा, सर्व तीर्थें तुझीं हीं अपत्यें । सुनामें तुझीं तीर्थराजादि सत्यें ५
तुवां लक्ष्मि ही निर्मिली हेंहि सत्य । तुझी कन्यका बोलती ना असत्य
बळें मारुतें घूसळोनी तुला हे । असंख्यात देशाहुनी आणिली हे ६
घना कांचनाचे गिरी आर्यभूत । तुवां आणिले रत्नराशि प्रभूत
तुवां धान्यशाका इथें निर्मुनीयां । बहू आणिल्या दूर देशाहुनी या ७
रजत्स्वर्ण मोत्यें, प्रवालादिरत्नें । तुवां अर्पिलीं स्त्रीजनालागिं यत्नें
ह्मणोनीच रत्नाकरा ! सार्थ तूझें । प्रभो, नांव हें सूचवी चित्त माझें ८
नद्यांचा पती तूं, जलांचा निधी तूं । मना वाटतें तूंचि गा स्वर्गसेतू
तुझें स्नानसानिध्य रोगा हरीतें । असें पंडितीं बोधिलें, ऐकिलें तें ९
नसे कर्दमाचा तटीं लेश देवा । तुझे स्नानपानीं न कोणी शिणावा
ह्मणोनी जणों वालुका संग्रहास । मनौदार्य तूझें दिसे या जगास १०
तुझ्या ऊपकारास सीमा न कोठें । उंसाच्या रसाहूनि ही तीर्थ मोठें
तुझे देवराया, करी रोगहानी । प्रभो श्रेष्ठ तू ऐकिलें हें स्वकानीं ११
तुझ्यापासुनी देव धन्वंतरी तो । असे जन्मला सत्य तो बोल होतो
अनेकोषधी निर्मुनी तूंचि देवा । स्वयें वैद्यकार्यें करीसी सुदैवा १२
तुला निर्मिलें आर्यभूरक्षणास, । शिवानें परी सोडिलें त्वां व्रतास
पर स्कंधदेशीं बळें वाहुनीया । इथें आणुनी सोडिलें तूं चराया १३
हिमाद्रीबळी पाळितो त्या व्रतातें । कथी कां तुवां सोडिलें सत्य त्यातें
परांनीं तुला बांधिलें वाटतें त्या । तुवां आर्यभूमींत आणीयलें त्या १४
तुवां फार कल्याण केलें तयांचें । कुबुद्धी परी लोक ते जाण साचे
तुला बांधुनी ठेविलें रज्जुपाशीं । । तसा भारसंदेशवाही उपाशी १५
बलिष्ठांस बापा करीशी सहाय । अहां दुर्बळां कां करीसी अपाय
श्रमानें भरीली तुवां आर्यभूमी । कशाला करीशी पुन्हा ही रिकामी १६
तुझा देह सुकूतला हाय आतां । कशाला असा शीणसी व्यर्थ ताता

तुझा काय आह्मी असा दोष केला । ह्मणोनी तुला आमुचा रोष आला १७
प्रभावें तुझ्या औषधीवृक्ष होती । तुझें तीर्थ नेतांहि मोठी फजीती
तुझें आमुचें सख्य तोडोनि हानी । अहो, थोर केली असे ही परांनीं १८
फिरे जेधवां धाम वासेहि त्याचे । फिरों लागती, वाक्य हे प्राकृतांचे
तसा आर्यभूमीवरी श्रीमहेश । असे कोपला, देखुनी कां नदीश १९
हरोनी बळें येथुनी धान्यराशी । कसा ठेविसी आर्यलोकां उपाशी
मला पाहतां जासि कां मागमागें । जयें दोष केला गमे त्यास वागे २०
तुझें देखिलें कृत्य सारें अतां तें । प्रतीचीकडे लाट तुझी वहाते
तुझी लाट वाहे, तिथें सर्व थाट । भरीसी तिथें नेउनी श्री अफाट २१
तुझ्या कन्यकेचा न हेवा अह्माला । पिता तूं तिचा, योग्य वाटेल त्याला
भली देउनी, धन्य मानी मनांत । कलंकी परी जाहलासी जनांत २२
असो सर्व हे भाबडे बोल माझे । असे माय तूं बा तुला सर्व वोझें
असोनी तुला आमुची काळजी ही । कलीकाल जिंकावया भीत नाहीं २३
अतां हाय रे ! वृष्टि ना योग्यकाळीं । पिकें जाउनी होय सर्वस्व होळी
असंख्यात रोगीं इथें वास्ति केली । सहस्रावधी माणसें स्वर्गिं गेलीं २४
तुझ्यासारखें भोगणें प्राप्त झालें । अहा कष्ट मोठे कपाळासि आले
प्रमादें तुझ्या जाहली आर्यहानी । तुझ्या लंघनीं दोष आतां न मानी २५
कृपा तूं करोनी पुन्हा आर्यलोकां । करा देउनी पोंचवी उच्च टोका
असें प्रार्थितों हा कवी मीनदीन । प्रभो दाखवी आर्यभूला सुदीन २६

अहा वरुणदेव तूं तव उपासना सोडिली
ह्मणोनि अमुची अशी अदय खोड कां मोडिली
क्षमस्व परमेश्वरा सकल दोष पोटीं धरीं
अजाण निजबालकां स्थितितुनी अशा उद्धरीं २७

——— पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर.

## " मायाजाळ "

पद. चाल ( नृपममता रामावरती० यासारखी )

निर्मिली प्रभूनें माया । जी जगीं सकल भरली या ॥ प्रियसखे० ॥
वेदाची थकली वाणी । ठेविते कर श्रुति श्रवणीं
जी अगम्य गुरुवांचूनी । दावितों तुला ती नयनीं
चाल प्रियसखे, सुगुणकेतके, चित्तहारिके, पहा ही माया ॥ जी जगीं० ॥ १
हा वसंत येथें फुलला । गुंजारव करण्या आला ॥ भ्रमर हा ॥
अति सुंदर पुष्पीं रमला । तेथुनही बघ तो उठला ॥ भ्र० ॥
आवडे नित्य नव त्याला । पुष्पचि कीं वाटे मजला
चाल भ्रमर हा, शोषितो पहा, कमलिनी अहा ! हीच गे माया ॥ जी० ॥ २
हा करी मीपणें डोले । स्वस्त्रीशीं हितगुज बोले ॥ वाटतें ॥
वाटतें शिरीं जें धरिलें । पत्र तें छत्र परि झालें
पाहुनी नवल कां झालें । मंद स्मित वदनीं केलें
चाल तें शिरीं, पत्र जें धरी, ताप कां हरी ? हीच गे माया ॥ जी जगीं० ॥ ३
ही धेनु पहा ह्या स्थानीं । संचरे वत्स घेऊनी ॥ कामिनी ॥
हे पक्षि परस्पर वदनीं । घालिती वदन प्रेमानीं
वाटतें तुला तें बघुनी । काय गे विचारीं स्वमनीं
चाल कामिनी कीं, गजगामिनी, मधुर भाषणीं हीच गे माया ॥ जी जगीं० ॥ ४
चालशी मंद गति कां गे । सोडिशी धीर कां सांगे ॥ जिवलगे ॥
कां झालिस विगलित अंगें । ये ऐशी माझ्यासंगें
ही पहा येथ बसली गे । माया जी जगभर वागे
चाल जिवलगे, भीति सोडिं गे, मनीं उमज गे, हीच ही माया ॥ जी जगीं० ॥ ५
हा पहा अज्ञजन दिसला ? । अति शोकें व्याकुळ झाला ॥ सुंदरी ॥
सुतविरह छळी मातेला । कांतेवरि घाला पडला

अंतरे पिता पुत्राला । मायेनें गोंधळ केला

चाल सुंदरी, जीव यापरी, नष्ट हो जरी, रडविते माया ॥ जी जगीं० ॥ ६

संपत्ति मिळाल्या हंसतो । झालिया नष्ट तो रडतो ॥ जीव हा ॥

संसार गळीं आडकतो । मायेच्या जाळीं गुततो

जीव हा मीन जणु गमतो । मायेच्या योगें फसतो

चाल जीव हा, मूढ किति अहा, त्रास सोशि हा, सोडिना माया ॥ जी० ॥ ७

गुरु विवेक सांगे माया । दाविली तुला या समया ॥ सुंदरी ॥

वल्लीनें वेष्टित काया । वृक्षांची तशि ही माया

जीवांसि सकल व्यापी या । हो सोडुनि सावध माया

चाल सुंदरी, प्रेम अंतरीं, सदोदित धरीं, भूतमात्रीं या

जा शरण प्रभूचे पाया ॥ सुंदरी ॥ निर्मिली० ॥ ८

गणेश हरी मोकाशी.

## कवि आणि पक्षी

आर्यार्ध.

" अरसिक तेचि जयांना काव्यामृत-सेवनीं नसे गोडी "

दिंडी.

कवी होता बैसला असा गात । त्यास वदले जन पुरे करा मात
निघुनि जावें येथुनी त्वरित आतां । पुरे झाली तव दिव्य वस्तु-गीता १
अह्मी ऐहिक गोष्टिच्या विचारांत । दिव्य गोष्टी बैसलां तुह्मी गात
विहग येथें गातसे मधुर फार । त्यांत भरलेलें असें सर्व सार २
कवन तुमचें निःसार पुढें याच्या । व्यर्थ नादीं लागलां गावयाच्या
गान सोडुनि कवी रडायास लागे । विहग गातां थांबला जाय मार्गे ३
" अहा विहगा तव गोड कुठें वाणी । अतां गेली " जन पुसति दीनवाणी

“ दिव्य गातां कवि, गावयास स्फूर्ती । मला होई आतां न तीच मूर्ती ४
मला त्याविण नच सुचे गावयास । दिव्य कवि तो जरि नसे आसपास
मधुर त्याच्या कवनांत सर्व कांहीं । तया इहलोकीं जोड मुळीं नाहीं ५
कवन सोडुनि जो कवी निघुनि गेला । दूर देशीं एकटा तो निमाला
विहग तैसा मागुनी तया गेला । आर्तरव तो काढीत मरुनि गेला ६
जयीं आलों मी सहज तया ठायां । सर्व गेलें वाटलें मला वाया
दिव्य कविचा ध्वनि मात्र घुमत राही । विहग शब्दाचा थांग कुठें नाहीं ७

विद्यावनविहारी.

## व्यवहारनीति.

### श्लोक.

असो स्वल्प किंवा महत्कार्यभार । कराया त्वरें त्या असावें तयार
भया टाकुनी भूवरी वांवरावें । अशा ‘ केसरी ’च्या गुणांतें वरावें १
नरें इंद्रियांच्या समूहां दमावें । सदा नेत्र लावोनि जागीं बसावें
स्वकीयाहिता अप्रमादें झटावें । तुवां या बकाच्या गुणांतें वरावें २
रणीं शूरता स्वामिसेवा करावी । उठावें त्वरें अल्पसंतुष्टि व्हावी
बहू नीज घ्यावी अती अन्न खावें । अशा ‘ कुक्कुरा ’च्या गुणांतें वरावें ३
अविश्रांततेनें भरातें वहावें । तसें उष्णशीतादिकांतें सहावें
सदा मोदवृत्तीस चित्तीं धरावें । अशा ‘ रासभा ’च्या गुणांतें वरावें ४
गृहीं गुप्ततेनें स्त्रियांशीं रमावें । प्रमादा त्यजावें श्रमांतें करावें
रणीं धीट व्हावें न मित्रा ढळावें । अशा ‘ वायसा ’च्या गुणांतें वरावें ५
प्रभातीं उठावें रिपूशीं भिडावें । स्वकीयांसवें भोजना आदरावें
सदा सुभ्रुला संकटीं वांचवावें । अशा ‘ कुक्कुटा ’च्या गुणांतें वरावें ६

दंडी.

# काव्यरत्नावलि.

अंक १० वा.

श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

## सर्ग १० वा.

दुर्मतीचें दुराचरण. कुशावतीवर घाला. कुशावतीचा विध्वंस. प्रजेची विपन्नावस्था. विशालाक्ष लोकांना आवेश आणितो. दुर्मतीचा पराजय व पलायन. शूरसेन भद्रांचलावर चाल करितो. शिवरायवर्णन. प्रजेची दुःखावस्था पाहून शिवाजी कष्टी होतो. दुर्मती मुसलमानास साहाय्यास बोलावितो.

श्लोक.

मृगाक्षिची अर्थवती गिरा ते । जे ऐकतां डोलविजे शिरातें
वाचस्पतीनें, परि अल्पही न । विचारि तो तीस विचारहीन १
मृगाक्षिच्या त्या हितभाषणातें । विमानिती दुष्ट जसा तृणातें
अनर्घ्यमाला जशि वानरातें । हितोक्ति तैशी खरि पामरातें २
हितोक्ति ऐशी कुपथप्रलीन । धिःकारुनी कर्म करी मलीन
सेवी सदा दुष्ट असज्जनातें । दुष्कारणां सोडुनि सज्ज नातें ३
दुर्वृत्त जें जें कथिती तयातें । तें तें करी सोडुनिया नयातें
परांगना पाहुनिया सुशीला । हरी बळें रूपवती अशीला ४
हरी दुरात्मा परसंपदेतें । न तन्मनां दुष्कृति कंप देतें
केले किती खून नराधमानें । धिःकारि साधूक्ति मदांध मानें ५
विश्वासजा वीरमती सुशीला । विमानि त्यातें बहु शुद्धशीला

महा कुधी तो खल पापराशी । कशी न धिःकारिल खापराशीं ६
उपाय जो जो सुचला तयातें । साध्वीस त्या भ्रष्ट करावयातें
तो तो करी दुष्ट सती परी ती । सेवील कैशी तरि पापरीती ७
तिरस्कृतीनें अनिवार साच । तो कोपला दुष्ट विखार साच
परी बलात्कार करावयाला । न धैर्य होई मुळिंही तयाला ८
इच्छी वधाया मग तत्पतीतें । परी निवारी कमला सती तें
दुर्मित्र तन्मित्र परी सतीस । सन्मानिती देविपरीस तीस ९
योजी दुरात्मा दुसरे उपाय । प्रतापराया करण्या अपाय
परी सदा सावध ती सतीही । न लोक कां वर्णिल तीस तीही १०
हताश होता खल यापरी तो । भुजंगसा कोप महा वरी तो
अंगारसा धूमित सर्व-दाही । जळे कुधी अन्तरिं सर्वदाही ११
प्रतापरायास महापकार । करावया योजि नवे प्रकार
निस्तेज राजा घनबंधनांहीं । ताराप जैसा घन-बंधनांहीं १२
लिप्त सदा यन्मति वासनांहीं । जेथें भयाचा मुळिं वास नाहीं
खलाग्रणी तो करि घोर काम । भीती जयानें उपजे प्रकाम १३
तों सिद्ध केली मग सर्व सेना । जीच्या मनीं लेश दया वसेना
कुशावती लक्षुनि तो निघाला । घालावयाला रजनींत घाला १४
प्रवेशुनी त्या पुरिं तो अकर्मा । यथेच्छ तेथें करि घोर कर्मा
पुरांगना भ्रष्टविल्या तयानें । पळे प्रजा घोर वनीं भयानें १५
सिद्धीस नेण्यास महापणातें । विध्वंसि तो दुष्ट महापणातें
धरून लोकांशिं महत्तरांशीं । हरी दुरात्मा बहु वित्तराशी १६
जेथें गळां घालुनि रम्य हार । स्त्रिया सुखानें करिती विहार
मनोहरा त्या विततां विशाला । विध्वंसिल्या सर्वहि चंद्रशाला १७
होई दिवा संचर सारिकांचा । तसाच रात्रौ अभिसारिकांचा
त्या राजमार्गीं न दिसे दिवाही । तेथें शिवा संचरती दिवाही १८

जेथें वसे सुंदर इंदिरा ते । पाडी कुधी सुंदर मंदिरातें
झाली पुरी जीर्ण वनासमा ती । दिसे सभोतीं नयनास माती १९
विलासिनी मोहक वर्तनानें । हरी मनें सुंदर नर्तनानें
भालू तया स्थानिं अहा भुकेली । इतस्ततः ही करि घोर केली २०
दुष्कर्म ऐसें पिशिताशनाचें । करूनिया तो पिशिताश नाचे
खलाग्रणी यापरि उच्च भारी । नभीं अकीर्तिध्वज तो उभारी २१
जुलूम ऐसा बघुनी नितान्त । वाटे जनांतें खल तो कृतान्त
सोडून वेगें सदनां धनांतें । ते सेविती निर्जन कानना तें २२
" वृथा छळी हा खल दुःस्वभाव । निघेल कैसा अमुचा निभाव
मेले किती सज्जन हाय ! हाय ! । कोणी नसे दीनजनां सहाय २३
करी कुधी हा धुळधाणलोकीं । विपद्दशा ही अमुची विलोकी
स्वनेत्र देता मिटिसी कसा रे " । आक्रंदती यापरि लोक सारे २४
सोशी असे हाल बहु प्रजा ती । संपीडनें त्रासुनि सर्व जाती
इच्छा प्रतीकार करावयाची । धरी न ती भीति मरावयाची २५
होता सदाही अनिवार ताप । दावी स्वयें जन्तु निजप्रताप
सक्रोध होता अपुला प्रभाव । दावी परां हा पुरुषस्वभाव २६
विपद्दशा ही बघुनी तयाची । वेगें विशालाक्ष तयास याची
बोले तयातें अति निंद्य वाणी । " रुचे कशी ही स्थिति निंद्यवाणी २७
जो मूर्तिमान् होय जगीं प्रताप । तो आपला श्रेष्ठ नृप प्रताप
वृथा तयांते करि दुष्ट ताप । हें पाहुनी काय तुह्मां न ताप २८
जगांत साक्षात्कमलेसमान । नाहींच जीतें इतरोपमान
जिच्यापुढें त्यक्त निजाभिमान । विलासिनी वांकवितात मान २९
साध्वी शिरोरत्न खरी त्रिलोकीं । देवीपरी जीस सदा विलोकी
ती चोरिली त्या अधमाधमांनीं । तन्नाथ तो दुष्ट मदांध मानी ३०
करा न शिक्षा खलनायकांतें । कां हांसतां हो मग बायकांतें

दिला तुह्मां जन्म वृथा प्रसूनीं । तुह्माहुनी स्थैर्य बहु प्रसूनीं ३१
आतां मनीं निश्चय हाच साच । रणांगणीं जाइन मी असाच
मारीन शौर्यें खलनायकातें । भुजंग भीती न विनायकातें " ३२
वीरोक्ति ही ऐकुनिया अशेष । आवेश येई सकलां विशेष
गाठावयाला रिपुतें अधीर । युद्धां निघाले रणरंगधीर ३३
जिवावरी होउनिया उदार । धि:कारुनीया गृहपुत्रदार
विमानुनी संसृतिचा पसारा । युद्धां निघाला मग लोक सारा ३४
ठेवीयले रक्षक जे अपार । दिला तयांतें अनिवार मार
कुबुद्धिचें धैर्य रणीं गळालें । रणांगणां सोडुनि तें पळालें ३५
जे जे पळाले रिपुचे शिपाई । मार्गामधें ते पडले अपायीं
न कोणिही देइ तयास ठाव । पथीं स्त्रियाही करिती उठाव ३६
विध्वंसिलें यापरि सैन्य कांहीं । मार्गांत कोपाकुल बायकांहीं
पुरें तयां शासन तें मिळालें । दुष्कर्म त्यांचें अचिरें फळालें ३७
गडास हें जाइ अनिष्ट वृत्त । भ्याला मनीं दुर्जन तो कुवृत्त
सेना सवें सर्वहि घेउनीया । निघे रिपूंचा पथ लक्षुनीया ३८
सुरारता भीरु मदांध सेना । भिडावया ती रिपुंशीं धसेना
निरीक्षि जैसा हरि वारणातें । निघे विशालाक्ष निवारणातें ३९
दोन्ही दळें तीं करिती शिकस्त । न कोणिही खाइ रणांत कस्त
परी विशालाक्ष पराक्रमानें । युद्धांत संहारि परां क्रमानें ४०
दुर्वृत्त तो घेउनि जीव धांवें । परी तयातें न कुणी वधावें
जीवन्त आणा धरुनी खलास । आज्ञा करी यापरि तो दलास ४१
परंतु तो सोडुनिया रणांते । धावे दुरी शत्रुनिवारणातें
प्रेरी त्वरेनें स्वतुरंगमातें । टाकून मागेंच विहंगमातें ४२
पराजिता ती सकलारिसेना । पळावया मार्ग तिला दिसेना
स्वाधीन झाली मग शत्रुहस्तीं । मृगेंद्रपार्श्वागत जेवि हस्ती ४३

स्वराज्य दावून अतिप्रभाव । जिंकी विशालाक्ष महानुभाव
चोहींकडे सत्वर शान्ति झाली । वैराग्निची दीप्त शिखा विझाली ४४
ठेवी प्रजा त्यावरि पूर्ण भाव । निघेल त्यावीण कसा निभाव
परी तया शल्य मनांत डाचे । फोडीन केंव्हां तट ते गडाचे ४५
कारागृहीं श्रेष्ठ नृप प्रताप । परोपरी भोगि असह्य ताप
तन्मोचनां देउनि शूरसेना । तो पाठवी सत्वर शूरसेनां ४६
भूपाल लोकप्रिय जो शिवाजी । ज्याची सदाही करणी शिवा जी
अन्याय ज्याला न खपे कदाही । लोकीं खरी यत्स्मृति ताप दाही ४७
विश्वास लोकाधिप बोलला जे । ऐकून ते गीष्पति बोल लाजे
कसें न ते मानवती नृपातें । द्रवे सदा जो स्वजनाश्रुपातें ४८
ऐकून तीव्रां जन दुःख झालां । न खेद वाटे तिळमात्र ज्याला
त्याला कसें भूप असें ह्मणावें । प्रजाजनीं शत्रु तयां गणावें ४९
रक्षी अपत्यापरि तो प्रजेला । प्रजाहितांतें न कदा निजेला
तत्खड्गधारा रत दंडनीं ती । जे वागती सोडुनि दंडनीति ५०
ऐकोन दुर्वर्तन दुर्मतीचें । सक्रोध झालें मन भूपतीचें
संताप आला नृपमंडनातें । स्वयें निघाला खलदंडनातें ५१
घेई सवें तो निज पेशवाही । जो शासिता भू, नच लेश वाही
पराभिमर्शी कर दुर्जनाचा । हव्यास ज्याला खलभंजनाचा ५२
प्रख्यात सेनापति जो प्रताप । असह्य ज्याचा यवनां प्रताप
लोकां गमे शत्रु करींद्र–सिंह । म्लेंच्छासुरां होय खरा नृसिंह ५३
तो घेतला भूपतिनें तसाच । सेना तशी मागुनि नेत साच
तिघेहि ते घेउनि अन्य वेश । परप्रदेशीं करिती प्रवेश ५४
" आक्रंदती पीडित लोक सारे । न हाल ईशा बघसी कसा रे
आव्हेरि मीनां जरि तो नदीन । जातील कोठें तरि दीनदीन ५५
ऐकोन ही यापरि दीन वाणी । पाहून त्यांची स्थिति दीनवाणी

चित्त द्रवे फार तया शिवाचें । न बोलवे अल्प तयासि वाचें ५६
पाहून ती रम्य पुरी विशाला । कुशावती ध्वस्तविशाराबाला
अत्यन्त वाहे नयनाश्रुवारी । खळेचि ना तें जरि तो निवारी ५७
प्रताप तेव्हां मृदु गोड बोले । "द्यावें जसें चोरकरीं डबोलें
तसाच दुष्टास महाधिकार । कीशां शिखा तत्सम हा प्रकार ५८
खलाग्रणी ही करि भस्म शेषा । स्वराज्यभूषा नगरी विशेषा
स्वबांधवांशीं करुनी लढाई । मानी दुरात्मा बहु हा बढाई ५९
हा साधुवृत्तां करुनी निरोध । स्वबांधवांशीं करितो विरोध
वैरानलां पेटवुनी अभंग । सुशान्ततेचा करि दुष्ट भंग ६०
अत्यन्त जो लोकहितास जागा । सन्मान्य ही योग्य तयास जागा
मदांध हा गर्हित सज्जनांहीं । खरोखरी योग्य न योजना ही ६१
साधी सदा भूपहितां तसाच । गमे जनां जो प्रियतात साच
तो कार्यकर्ता अनुजीवि लोकीं । धिक् जो सदा आत्महिता विलोकी ६२
निर्देश हा भूपतिचा न मानी । पीडी प्रजा दुष्ट महाभिमानी
करी कुधी दुष्कृति हा उदंड । याला प्रभो योग्य अखंड दंड" ६३
परस्परीं ते करिती विचार । दिले पुढें लाउनि धूर्त चार
ते गुप्तवेशें फिरती तिघेही । सर्व स्थिती पाहुनि भूप घेई ६४
जिंकावयातें समरीं तयास । करी विशालाक्ष महाप्रयास
संतप्त तेजस्वि करी न काय । विमानुनी मंदिर-सौख्य-काय ६५
उत्साह त्याचा नृपती विलोकीं । बोले "महाशूर खराच लोकीं
स्वबांधवोद्धार करावयाचा । प्रयत्न लोकोत्तर होय याचा" ६६
जे भ्याड यद्वर्तन शूरसें न । ते शत्रु मर्दी पार्थिं शूरसेन
गडावरी सत्वर चाल केली । सचिन्त तो सोडुनि दुष्ट केली ६७
उध्वस्त झाली निज सर्व सेना । सुरक्षणोपाय बरा दिसेना
तेव्हां वरी भीति खल प्रभूत । पाचारिलें दर्जन मित्रभूत ६८

कोणी वदे सोडुनि सर्व लाज । " नाहींच आतां दुसरा इलाज
झाला बहू क्रुद्ध नृपाळ साचा । प्रसंग हा होय न आळसाचा ६९
म्लेंच्छाधिपाचे धरि शीघ्र पाय । न याहुनी अन्य बरा उपाय
स्वाधीन त्याचा गड हा करावा । स्वरक्षणाचा पथ आदरावा ७०
म्लेंच्छांसवें सख्य करा करा हो । सुमित्र हो अन्य विचार राहो
सहाय होता रणिं आपणां ते । मर्दीन दुष्टां करितों पणातें " ७१
ऐकून त्याची अहिता गिरा ते । दुर्वृत्त ते डोलविती शिरांतें
उपाय तो होय अपाय नाहीं । खलांस याची लव कल्पनाही ७२
जो शूर मोठा बहिलोलखां तो । केला तयांनीं अपुला सखा तो
निघे सवें घेउनि शूर सेना । जिंकावयाला रणिं शूरसेनां ७३
असे सदा सावध शूरसेन । तयास हें वृत्त कळें कसें न
सुरक्षिता पाहुनि शीघ्र जागा । झुंजावया त्याशि सदाहि जागा ७४
" घेऊनिया म्लेंच्छचमू समस्त । रणास येई बहिलोल मस्त
शिरून तो दुर्मतिशी कटांत । घालील सेना निज संकटांत " ७५
विचार ऐसा करुनी मनाशीं । आला विशालाक्ष रणांगणांशीं
जों पातले म्लेंच्छ न तों शिपाई । गडाकडे धांवति सर्व पायीं ७६
हें वृत्त सारें कळलें नृपास । जो गुप्त राहे वनिं आसपास
भूपाल तें ऐकुनि वर्तमान । संतापला ग्रीष्मरवीसमान ७७
" गडांत हा श्रेष्ठ खराच याची । सरी न अन्यां कधिं यावयाची
आधार राज्यास खरा विराजे । पाहून जो भीति अमित्र राजे ७८
सेनापते शीघ्र करा त्वरा हो । स्वसैन्य युद्धास तयार राहो
लागेल किल्ला जरि तत्करांशीं । महापदेच्या पडतील राशी ७९
तयार ठेवा तरि मज्जनांतें । करावया युद्ध निमज्जनातें
करोनिया जृंभण विक्रमाचें । रणीं हरावें यश विक्रमाचें " ८०
तेव्हां स्वयें वीरवरप्रधान । करी तयारी मग सावधान

आवेश आला सकळां अपार । चिरावया ते यवनां तयार ८१

तेथें जें जें जाहलें वर्तमान
ऐका हो तें होउनी सावधान
वीरश्रीनें व्यापिले वीर थोर
वेगें आतां युद्ध माजेल घोर ८२

नारायणसुत.

## आर्यभूदेवीमहिमा.

### द्वितीयोद्गार.

श्लोक.

सौभाग्याचें भुवन सुभगे ! सत्य तूं मृत्युलोकीं;
पुण्यें तोयें ह्मणति तुजला सर्व तूतें त्रिलोकीं;
रत्नांची तूं सुरुचिर खनी हे ! सुवर्णे ! सुरत्ने !
माते ! तूतें प्रणति करितों स्वीकरीं आदरानें. १

साक्या.

त्रिभुवनसुंदर तुहिनमहीधर सौभाग्याचा राशी,–
तुजसि भूषवी तेणें दिसशी अधिकचि मनोहराशी. २
जगन्मंडलीं सहस्त्रावधी भूभाग वितत असती;
त्यांत परम रमणीय कोणते आर्यभूमिसम दिसती ? ३
नगाधिराज हिमालय ऐशी स्पृहा मानसीं धरुनी,
सर्व महीमंडळा न्यहाळी स्वशिखर वर करुनी. ४
विश्वांतिल भूप्रदेश सारे दिसतिल, इतुका उंच--
होउनि, तो निरखिता जहाला; तरिहि हेतु न पुरेच. ५
ऐश्वर्यालंकृता सुरम्या भारतभूसम त्याला--

भूलोकीं एकही दिसेना यास्तव निराश झाला ! ६
स्वर्लोकीं तरि असेल कांहीं आर्यभूमिसम रम्य;
ह्मणून तेथें प्रेक्षूं इच्छी; द्युलोक असनि अगम्य ! ७
भूतलिं विजयी हिमनग मग तो उत्साहें भरभरला;
स्वर्गाचीं उघडुनी कपाटें सहज त्यामधें शिरला. ८
तोही श्रम जाहला तयाचा वायां जननि ! परंतु;
तुजसम तेथेंही नाढळली दुजी मनोरम वस्तु ! ९
साम्य राहिलें दूर ! पण पहा कौतुक दुजेंच झालें !
आर्यभूयशा विस्ताराया दिविषदहि इथें आले ! ! १०
पाहुनिया हिमगिरीश्वराच्या विशाल सोज्ज्वल आंगां--
हिमधवलशिरां--चित्तीं प्रीती कवणा नुपजे सांगा ? ११
दिव्यकांति निरखुनि हिमगिरिची सुरांगना गडबडती;
सुरेंद्र सुरपुर सांडूनि, गळां नगेंद्राचिया पडती ! १२
तेव्हांपासुनि हिमगिरिवारि त्या स्वैर करिति केलीला;
आर्यजननि ! ही तुझ्या यशाची अप्रतिम असे लीला ! १३
यापरि परिसुनि गिरियश गिरिजा आश्चर्यभरित जाली;
निजरमणहरासह त्या गिरिवरि बसावयाला आली ! १४
त्रिजगज्जनकें महेश्वरें जो निजवासें शुचि केला,
हिमगिरि तो करितो भूषित अयि ! तुज भरतभूमिकेला. १५
सकल नगांवर वरचढ व्हाया जो शिखरांसि उभारी;
सहस्रकरमार्गाही रोधी ऐसा वाढे भारी; १६
अगस्त्यमुनिगुरुपदारविंदा वंदायाला लवला;
अझुनि ह्मणुनि दंडवत पसरला, सहसा जो खालवला; १७
महानुभावें विंध्याद्रीनें त्या तूं अन्वित असशी;
स्वभावसुंदर अधिकचि तेणें जगिं शोभिवंत दिसशी ! १८

रायगड दुजा सिंहगड अशीं रत्नें ज्याच्या कळसा;
बळसागर जो, जळसागरसम रत्नाकर सोज्ज्वळसा. १९
स्वतंत्रतादेवीपुण्यास्पद सह्याद्री जो ऐसा,
अलंकारितो तोही तुजसिच आर्यजननि ! आपसौ. २०
हिमधवलाकृति मुकुट मनोहर हिमालयाचा तुजला;
तशी रुचिर कांची सहजचि तो स्वयें विंध्यनग सजला; २१
सुरम्य पदभूषणें विलसती सह्याद्रीचीं चरणीं;
ऐशा तुज वंदितों बाळकें हे ! जननि ! असुखहारिणि ! २२
नरांहुनी त्रिभुवनीं सुरांची सर्वस्वीं विख्याती;
ते सुरवरही महेश्वराला ईश्वर ह्मणुनी ध्याती; २३
महेश्वरेंही त्या आदारिली गंगा स्वमस्तकीं जे,
विमलौघें ते पूत करी तुज; कवणें वर्णन कीजे ? २४
सिंधु, नर्मदा, यमुना, गोदा, ब्रह्मपुत्रनद, कृष्णा,
इत्यादिक सरिता करितातो जलें दूर जनतृष्णा. २५
जलौघ नच हे आह्मांसाठीं जननी ! सुधारसाचे--
वाहविसी तूं लडिवाळपणें अखंड निर्झर साचे ! २६
लक्ष्मी लक्षित योग्य निवासा इतस्ततः बहु फिरली;
प्रफुल्लपंकजलक्ष्मी लक्षुनि जेथें अंतीं स्थिरली; २७
कनकहंस जेथील जेविती कनकारविंदवृंद;
फलाहार सारिती भक्षुनी अति मृदु मृणालकंद; २८
सुप्रसन्न, रमणीय, विलसतें सज्जनमानस जैसें,
सौम्य, सुजल, सम, पवित्र, शोभे जें ह्रदमानस तैसें; २९
सरोवरांहीं अशा बहुतशा असशी सुशोभिता तूं
कुणा वर्णवे त्वद्यश ? बांधी कोण अर्णवीं सेतू ? ३०
भांडारें तुजमाजि असति जीं अमूल्यमणिकनकाचीं,

सरती न रतीभर तीं, भरितां नौका करुनि जगाची ! ३१
यापरि अपरिमितें कनकें जी विलसे विभूषिताशी;
बहुत सुरत्नीं तेजोमय जी; नमन तिच्या चरणांशी. ३२
तपोनिधानें विश्वामित्रें तपोनिधि यदा केला,
धाकेला दिवि सुरपति कथि तो मग मंत्र मेनकेला;-- ३३
देवि ! सुरुचि ! मेनके ! अप्सरे ! जाउनि भूलोकीं तूं,
तपोभ्रष्ट तो करुनि तपस्वी, पूर्ण करीं मम हेतू. ३४
तिणें घेउनी साह्य जयाचें, केला तो च्युत संत;
तो सुरुचिर ऋतु आर्यमहींतचि होतो योग्य वसंत. ३५
हरितसस्यतृणवती वसुमती पाहुनि ऐसें वाटें,--
हिरवा शालू जणूं नेसली अभिनव युवती थाटें ! ३६
कृपा अपारा अशी जयाची वारिद वर्षतू तो,--
यथोक्तकालीं यथास्थित असा आर्यमहींतचि होतो. ३७
द्रवतो जेणें अमृत अमृतकर तो सुखकर शरदृतुही,--
आर्यमहींतचि नियमें होई; इतरत्र असें नाहीं ! ३८
आम्र, पनस, जंबीर, कदली, नारिकेल, तरु सारे,--
द्राक्षादि लता, डुलतात जिथें ओथंबुनि फलभारें; ३९
कल्हारें, मोगरे, मालती, शेवती, जुई, जाई,
फुलती; खुलती उपवनराजी जेथिल सुरभि सुमांहीं; ४०
उपवनिं विखरे सुरभि मनोहर सुमनांतिल मकरंद;
उडती तत्पानार्थ लगबगें सुरसज्ञ भृंगवृंद; ४१
मधुपानें मधुप ते होउनी संतुष्ट, ‘ गुङ्’ ख्यातें--
श्रुतिमधुर अशा करिती; स्तविती जाणों रमाधवातें ! ४२
सप्त सूर नीरसति ज्यांपुढें जनिं गायकादिकांचे,
नैसर्गिक सुश्राव्य असति ते मधुरालाप पिकांचे. ४३

यशोगान यन्मुखें व्हावया जणूं दाशरथिरामें--
कीर्तिश्री मिळविली विक्रमें अपूर्व रणसंग्रामें; ४४
ऐसे पिक, राजहंस, सारस, चक्रवाक, शुक, मोर,
चातकादि खग जिथें विहरती निजभरतभूसमोर. ४५
अशी ऋतुमती विविधविहंगा कोण असे हो ! अन्या ?
मातें गमतें, एक आर्यभू क्षितिमंडलांत धन्या ! ४६
भारतीय विस्तीर्णकुटुंबा--आम्हां--जिच्या प्रसादें--
अनादिकालापासुनि अनुपम जीवनशक्ती लाधे. ४७
अनंतकालावधि त्यापरि ती जिच्या दयेनें साची--
मिळेल; ती ही भारतमाता जननी दयारसाची. ४८
सस्यशालिनी भूमि जेथली डुलते धान्यभरानें;
नव्हे धान्यमुष्टीच भरुनि ती दावितसे स्वकरानें. ४९
सर्व जनांच्या योग्य क्षेमा मी आर्यभू समर्थ;
आश्वासन हें जणू करें ते देते जनां यथार्थ. ५०
सस्यशालिनी भूमि; जलाशय फुल्लारविंद जेथें;
धेनु सवत्सा जेथिल देती जनां सदोदित दुभतें; ५१
वाजी श्रीकृष्णजीकडोनी जेथिल पवित्र होती;
ऐशी सुजला, सुफला, सुभगा, भारतभूमिच हो ! ती. ५२
बहुविध असती देश महीतालिं, परमेश्वरें तयांला--
असेल दिधलें जरी अंशतः निसर्गसौंदर्याला; ५३
निसर्गनिर्मित पदार्थसंग्रहभुवन तथापि इथेंच;
अद्वितीय निरुपम सद्वस्तुस्थल अन्यत्र नसेच ! ५४
गिरी उंच तो कुठें विराजे, कोठें न टेंकडें ही,
कनकखनि कुठें, दुज्या स्थळीं तर नसतात कोळसेही; ५५
भूमि सस्यशालिनी कुठें तर कुठें असे तुहिनमयी,

कुठें वृष्टि अतिशयित होय तर कुठें न इच्छितसमयीं; ५६
कोठें रक्षण अर्णव करितो, कोठें नच तो ठावा,
अल्पांशचि हा ईशदयेचा ! कैसा, किती, वदावा ? ५७
तैसी नोहे भारतभू हे, हींत सर्वसुससमृद्धि;
एथें प्रभुच्या पूर्ण कृपेनें राबति ऋद्धी, सिद्धि ! ५८
उदात्त जें, जें अभिलषणीयहि, अभीप्सितहि तैसें जें,
तें सर्वहि--वस्तुमात्र--एथें नैसर्गिकचि विराजे ! ५९
यथार्थोक्ति ही अतिशयोक्ति नच मनिं शोधून पहावें.
करस्थ कंकण बघावयाला दर्पण कशासा हावें ? ६०
अन्यत्र असे गिरिवर कोठें हिमगिरिपरि सुसमृद्ध ?
प्रसवे कोठिल खनि दिव्यमणी कोहिनूरहि विशुद्ध ? ६१
अघभंगा गंगासम तटिनी आहे जगांत कोठें ?
अंतर्वेदीसम क्षेत्रही कोठें सुफलित मोठें ? ६२
आमूल्यहीनबहुमूल्य अशी सर्व खनिज संपत्ती,--
यांच आर्यभूदरीं भरलीसे; अशी इयेची महती ! ६३
एथें नाहीं अशी एकही वस्तू जगांत नोहे,
नसे मात्र अन्यत्र कुठें जें तेंही इथेंच आहे ! ६४
उंच उंच बहु सुरम्य गिरिवर; अगाध सुजला सरिता;
विस्तृत सुफलित भूप्रदेशही; खनि धातुरत्नभरिता; ६५
सुरस, सुगंधित सुमनें अगणित सुंदर विहंगराजी;
अर्णवही विस्तीर्ण; वनश्रीं जगिं दृङ्मनोहरा जी; ६६
रुचिर सरें, पुष्करिणी, वापी; सुंदर तरुवर नाना;
एवंविध भौतिकसंपत्ती जेथें सुलभ जनांना; ६७
कृपापात्र जी परमेशाचें सदैव होउनि राहे;
निसर्गदेवीसही प्रिया जी स्वगुणेंचि होत आहे; ६८

जिच्या अद्वितीय चारुतेनें दिपती समस्त वस्तु;
तस्यै तुभ्यं वैभवशालिनि ! मातर्नमोनमस्तु ! ६९

( श्लोक )

होती सारे ऋतु ऋतुमती ! या तुझ्या पृष्ठभागीं;
नाना पक्षी विविधविहगे ! राहती याच जागीं;
नाना वल्ली. तरुहि, सुलते ! तेंवि पुष्पें समस्ते,--
होती एथें; विकसितसुमे ! आर्यमातर्नमस्ते ! ७०

द्वितीयोद्गार समाप्त.

चंद्रकांत.

---

## ऋतुसौंदर्य.

### हेमंत--ऋतु.

श्लोक.

धान्यें सुंदर पोसलीं; प्रगटते वृक्षां नवी पालवी;
लोधांचे फुलले तरू; पिकुनियां शाली विराजे नवी;
पद्में सर्वहि कोमलीं; हिम गळे सस्यद्रुमाग्रांवरी;
ऐसा सुंदर पातला बहुगुणी हेंमत हा सुंदरी ! १

भासते पिवळीच जी अति लागतां उटि केशरी;--
चंद्र कुंद तुषार यांपरि मौक्तिकावलि पांढरी--
केंवि शोभवि ती तया रमणींचिया कुचमंडला !--
ज्या मनोहर उच्च पुष्ट पयोधरीं रुचिरोज्ज्वला. २

नवें वसन रेशमी मुळिं न आवडे सेवनीं;
तशीं विरल कंचुकी सुख न देइ पुष्टस्तनीं;
न घालिति सुरत्नकंकण, तसेंच केयूर तें,--
विलासवति सुंदरी रुचिर आपुल्या बाहुतें. ३

जीं कां हंसध्वनीचेपरि रुणझुणती, साजिरीं नूपुरें तीं--
तेजस्वी पद्मकांतीसम पदकमलीं सेवनातें न घेती;
रत्नांच्या कोंदणांनीं परम रुचिर ज्या हेम--कांची, तयांहीं--
या हेमंतीं कटीतें सुतरुण रमणी भूषवीती न पाहीं. ४

देहालागुनि पीत चंदन मुदें चर्चोनियां सत्वरीं,
रेखोनी वदनांबुजीं मृगमदें पत्रावली साजिरी,
केशा देउनियां सुगंधित अशी कृष्णागुरूची धुरी,
उल्हासें सुरतोत्सवार्थ नटती नाना परी सुंदरी. ५

जाहलीं सुरतश्रमें वदनें जिचीं कृश पांढरीं;
त्या पहा तरुणी प्रमोदित होउनी त्दद्यांतरीं,
कोमलाधर चुंबितां पतिदंत ते रुतले अति--
त्या स्थलीं सलतें; ह्मणोनि विलोकुनी नच हांसती. ६

विशाल हृदयीं जिथें परम कांति पुष्टस्तनीं,
तिथें बघुनि कष्ट ते रमणमर्दनालिंगनीं,
तृणाग्रिं गळतें तया दंवमिवें विषादें पहा--
जणों रडत आंसवें ढळवितोच हेमंत हा. ७

पाहें जीं नुकत्याचशा प्रसवल्या शालींमुळें व्यापलीं;
उल्हासें हरिणी--समूह फिरतां अत्यंत जीं शोभलीं;
रम्य क्रौंच--विहंग गात बसता नादावलीं भोंवतीं;
देती उत्सुकता सिमेमधिल तीं रानें मना संप्रती. ८

उन्मादें कलहंस ते विहरतां अत्यंत जीं शोभलीं;
जीं कां भासति रम्यशीं विकसल्या संपूर्ण नीलोत्पलीं;
साजे स्वच्छ सुशीतलोदक पहा जेथील कीं संप्रती;
ऐशीं रम्य सरोवरें नरमती तत्काळ आकर्षिती. ९

विपुल दहिवराच्या थंडिनें पक्क झाली;
सतत पवनवेगें डोलतां भागलेली;
रमणविरहिणी ती जेंवि निस्तेज पाहीं--
धवल दिसत तेंवी वल्लि गोविंदिनी ही. १०

ज्यांची फार सुगंधयुक्त वदनें पुष्पासव प्राशितां,
उच्छ्वासें भरला सुवास बहु ज्या देहाप्रती तत्त्वतां,
झाले व्याकुळ तीव्र मन्मथशरें अत्यंत जे अंतरीं,
ऐसे लोक परस्परा चिकटुनी निद्रा करीती घरीं· ११

अधर विकल ज्यांचे तीव्र दंतव्रणांनीं,
हृदय कुच कराग्रें मर्दितां तन्नखांनीं,
बघुनि तरुणि ऐशा वाटतें सुप्रभातीं,--
प्रबल सुरतलीला सारिली निर्दयें ती. १२

हातीं दर्पण घेउनी तरुणशा कोणी स्वयें सुंदरी,--
तोषें भूषविती मुखांबुज तदा सूर्योदयीं सत्वरीं;
दंतांचे व्रण पाहती निरखुनी हस्तें धरोनी वरी,
जेथींचा मधु चाखिला प्रियतमें निःसार त्या स्वाधरीं. १३

ज्यांचीं जागरणेंकरूनि तटलीं आरक्त नेत्रोत्पलें;
अस्ताव्यस्त सुटोनि कुंतल तसें स्कंधाग्रीं विस्तारलें;
ज्याचे देह रतिश्रमें विरमले; कोणी अशा कामिनी--
प्रातःकालिक भानुनेंचि निजल्या संतापुनीयां मनीं. १४

पुष्टोत्तुंग पयोधरीं तनुलता ज्यांची नता, साजिरी;
ज्यांच्या नील विशाल कुंतल शिरीं; ऐशा दुज्या सुंदरी--
गेला रम्य सुगंध, फार सुकली; त्या पुष्पमालेप्रती--
टाकोनी शिरिंच्या, स्वयें सुचतुरा वेणी पुन्हा गुंफिती. १५

काळ्या वक्र विशाल रम्य अलकीं आकुंचल्या लोचनीं--
कांतानें उपभोगिल्या स्वतनुला रेखोनियां पाहुनी;
तांबूलारुणितधरा तरुणशा कोणी स्त्रिया संप्रती--
संतोषोनि नखव्रणांर्त हृदयीं ती कंचुकी सेविती. १६

सतत सुरतलीलाकष्ट होतां विराल्या;
परम शिथिल देहें खिन्न चित्तीं जहाल्या;
उठति पुलक ज्यांच्या सुस्तनोरुस्थलतें;
कारिति नव वधू त्या कोणि अभ्यंजनातें. १७

नारीचित्त विलोभवी बहुगुणीं अत्यंत जो सुंदर,
ग्रामासन्निध दाटल्या पिकुनि ज्या; त्या शालिंनीं जर्जर,
भासे सुंदर सर्वदा विलसता जो क्रौंचपंक्ती वनीं,
देवो सौख्य तुह्मां सुसंमत असा हेमंत हा कामिनी ! १८

जावोनी जलपंक, मार्ग सुकले; ग्रामांतरीं पाहुनी,--
झाले पर्यटनें बहु व्यथित जे; त्या स्वप्रियालागुनी--
कष्टी होउनियां कुरंगनयना कांतानुरक्ता अती,--
वाटे जाणवितात काय अपुल्या कामाभिलाषाप्रती. १९

काव्य श्रीकालिदासें विरचित ऋतु--संहार नामें प्रसिद्ध;
तट्टीका प्राकृतार्थी विबुधजनमनोरंजना श्लोकबद्ध;--
विद्वद्विद्दपात शिंदेकुलजनित नत श्रीनिवासें प्रमोदें--
चौथा हेमंत नामें सुरुचिर रचिला सर्ग हा श्रीप्रसादें. २०

श्रीनिवास नारायण शिंदे.

## मृत्यूस आव्हान.

### श्लोक.

यदा सृष्टिच्या घेत भानू निरोपा
नभीं घालिती घूक वाघूळ खेपा

दिनांतीं अशा मी उदासीन चित्तीं
चढे पर्वतीं उंच, टाकोनि भीती १

तमें व्यापिलें जों वरी मेघ--पंथा
हृदीं दाटली घोर संसार--चिंता
जिनें दीन केले किती बुद्धिवंत
विना--स्वांत वाटें हिचा हो न अंत २

असें स्वास्थ्य कां ? या मना सौख्य कांहीं
मिळे वस्त्र कां ? वेळचे वेळिं देहीं
पुरें काय ? पोटा मिळें अन्न जैसें
तरी वांचुनी हीत तें काय ? कैसें ३

असे काय ? कां या मनोरम्य जाया
जिची प्रेम--माया पुरी हो जगाया
असें सौख्य कोणा ? जनापासुनी या
गमें वांचणें व्यर्थ माझे जगीं या ४

कुणा ? जिंकवें विक्रमें बद्ध--हस्तीं
असें शौर्य कां ? नाचवायास हेति
वडे जन्मभूची तरी काय ? सेवा
गुलामें जगावें कसें व्यर्थ देवा ५

नव्हे गम्य लीला तुझी मंदधीला
अशीं ? फेंकिलीं दिव्य रत्नें नभाला
मला एक देतां धरी मी न लोभा
तरी वांचतों पाहण्या सृष्टि--शोभा ६

अनंतीं किती गोल निर्मी अनंत
असंख्यांत प्रत्येकिही अंतवंत

नरापासुनी तों क्रमें जीव--जंतु
कुठें ? एक हा तूटतां देह-- तंतु ७

मनोरे तुझे उग्र धूसूर झाले
ध्वजा रंग गेले लया गीत गेलें
निशा राक्षसी ओरडे घोर धांवे
असे चांगली वेळ कां ? मीं जगावें ८

खरे क्लेश नाना जगीं यातनांचे
मुळीं सौख्य ना फक्त तें कल्पनांचें
यदी अल्प तें, कीं कडू दुःख--गोळी
वरी जेंविं ती शर्करा वैद्य चोळी ९

अहा ! एक येथें परी सौख्य रंगें
तयापासुनी मुक्तता मृत्युसंगें
बरा मृत्यु तो मृत्युलोकापरीस
पुन्हां त्रास ना, एकदां दे जिवास १०

तरी मुक्ति--दात्या अरे मृत्यु मित्रा
त्वरें येउनी भेट दे तूं पवित्रा
कडा तूटला उग्र खालीं दरी ही
मुखा वासुनी फार आक्राळ पाही ११

अशा या ठिकाणीं उभा राहिलों मी
तुझ्यावीण कोणी न यो येथ कामीं
कशी ! वेळ एकांत हें स्थान शोभे
अरे तिष्टतों मी तुझ्या प्रेम--लोभें १२

निजांकीं शिशू घेउनी माय कोणी
बघे चुंबुनी दीन केवीलवाणी

नको ओष्ठ चुंबू तिच्या त्या मुलाचे
अरे ते न जैसें रसें या कवीचे १३

विलासी कुणी दंपती कीं महालीं
असू दे सुखी या जगीं सर्व कालीं
फटींतून पाहे न मृत्यो ! तिथें तूं
कवी पूरवी हा तुझे सर्व हेतू १४

कुठें वा पती रुग्ण शय्येवरी हो
सती चूरितां पाद घे दृष्टि--लाहो
नको रे नको बैसुं त्याच्या उशाशीं
कवी--संगती जोड रे मृत्यु ? खाशी १५

दिसे वा कुठें झोंपडी ती भिकार
बहू माणसें तीं भुकें दीन फार
तयांच्या मुखींचें न तूं अन्न काढीं
तुला पाहिजे तें कवी येथ वाढी १६

न जा दारु--बाजासवें मद्य--शालीं
त्वरें सज्जनानांहि जी भूल घाली
कसा ? दक्ष कार्यीं निशा--धुंद होतां
तरी ऐकण्या ये कवी--बोल आतां १७

जरी पूर्ण तल्लीन युद्धांगणीं वा
हुतूतू पहाण्यांत त्या शौर्य--भावा
तिथें काय ? ती मौज एका रसाची
कवी संगतीनें चवी घे नवाची १८

नको घेउं हातीं सुरी खाटिकाची
अफू ना कुणा दीस दे पावलीची

नको दाखवूं रे कुणाला विहीर
कवी बैसला येथ अंधारिं घोर २०

अरोळ्या किती हिंस्र या श्वापदांच्या
फुटे घोर वाचाळ घूकास वाचा
न जा सागरीं भग्न तारू पहाया
कवी इच्छितो रे कडेलोट व्हाया २१

पूरक.

" अशा उच्च अद्रीं कशी नीच आस
" सुटे भोग कां ? जाहल्या देहनाश
" नसे जन्म कां ? तो, तसें कर्म पाठीं
" नव्हें इष्ट कां ? वाचणें हीज साठीं " २२

अशी गोड मंजूळ ही प्रेम वाणी
बघें भोंवतालीं पिवोनी स्व–कर्णीं
दिसें तों नभीं चंद्रिका--हास्य--वक्त्र
मना शांतवी तें करोनी पवित्र २३

सत्यमित्र.

---

## ‘ जग हा पाण्याचा बुडबुडा ! ’

[ वीरा भ्रमरा. ]

विश्वपसारा मिथ्या सारा
सावध होरे जरा,
भुलसी कां त्या, वेड्या नरा ! ध्रु.
वाहसि घोरा बाइल पोरां–

माजी रमुनी, गड्या,
देसी निशिदिनिं त्यास्तव झड्या !
विसरलासि त्याच्या चिंतना
चुकवि जो जन्ममृत्युयातना,
तोडुनी दुःसह भवबंधना,
मार्ग सुखाचा त्यजुनी साचा
व्यर्थ तुझ्या धडपडा,
' जग हा पाण्याचा बुडबुडा ! ' १
गेले रावण कर्ण सुयोधन
सगळे बा मातिंत,
मोठे अहंकारपर्वत !
तत्त्वज्ञानी वीरशिरोमणि
वैद्य शास्त्रपंडित
झाले मृत्युपुढें कुंठित !
तर्पणें करिसी तू हीं किती,
तत्त्व न कळलें परि तुजप्रती !
वाटतें खचित याची क्षिती;
आणुनि चित्ता क्षणभंगुरता
झडकरि घेईं धडा,
' जग हा पाण्याचा बुडबुडा ! ' २
सुखदुःखानें रडणें हसणें
हें इंद्रियवंचन
जन्मलें अज्ञापणापासून !
झालें तेंची मति जगताची
भुलवाया कारण,

पाडी भवचक्रीं दारुण !
कीर्ति, प्रीति, विभव, यौवन,
पसरलें अवघें मृगजीवन,
सत्सुख लाभ न ज्यापासून !
लक्षुनि तत्त्वा या मिथ्यत्वा
भुलूं नको रे जडा,
' जग हा पाण्याचा बुडबुडा ! ' ३

——————— राजहंस ऊर्फ एंजिनियर वावीकर

## जीवितकर्तव्य !

[ अभंग. ]

झाले आजवरी । बहु साधुसंत
दावाया सत्पंथ । जनालागीं,
पुस्तकविस्तार । कोट्यावधि केला
जेणें हेलावला । ज्ञाननिधी,
त्यांतील तत्त्वार्थ । सुचवितों दिव्य
जीवितकर्तव्य । नाम जया ! १

विवेककवच । सुदृढ लेवोनी
वावरावें जनीं । मुमुक्षूनें;
न घडे कदापी । तेणें स्तुति हेवा
जीवात्म्याशीं दावा । तैसा कधीं,
मग भवभीति । विलय पावेल
मोक्ष तो येईल । सहज हातीं ! २

मनोविकारांचें । न गणीं प्राबल्य

मानोनी दौर्बल्य स्वतःचें
तेणें कीर्तिपाश । किंवा लोकनिंदा
करील न बाधा । लव त्यासी,
सायं मेघावरी । रंग जो सुंदर
त्यापरी अस्थीर । असतीं जीं ? ३

सत्याचें सातत्य । मनासी बाणावें
शील तेंची व्हावें । निदानींचें;
मग मायापाश । कोठोनी जाचील
चरिता लागेल ! डाग तैसा ?
सुखदुःखादिक । इंद्रियांची सारी
फसवणूक बरी ! उमगेल ! ४

रात्रंदिन भाव । ईश्वराचे पायीं
ठेवोनियां राहीं । शुद्ध पूर्ण;
तयानें होईल । फलाशेचा त्याग
तोचि सुविराग । स्तवितात,
जेणें निर्बंधत्व । येईल आत्म्यास
पुनर्जन्म खास । चुकेल तो ! ५

जन्मवरी ऐसें । राहोनीया शुद्ध
मरणासी सिद्ध । व्हावें प्रेमें;
तेंची एक आहे । सत्य दिव्य शांत
अशाश्वत अंत । करणारें,
कल्पना प्रभा ही । उजळो अंतर
ह्मणे कविवर । " राजहंस " ! ६

———— राजहंस ऊर्फ एंजिनियर वावीकर.

# काव्यरत्नावलि.

## अंक ११ वा.

## श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

### सर्ग ११ वा.

सह्याचलवर्णन. भद्रांचलवर्णन. सुशीला दुःखित होऊन शोक करिते. दासी तिचें सांत्वन करिते. मनांत दुष्ट हेतु धरून दुर्मति येतो. सुशीला त्याचा धिःकार करिते. दुर्मति तिजवर बलात्कार करण्यास धांवतो. विशालाक्ष भद्रांचलावर हल्ला करितो. दुर्मति युद्धास निघतो.

श्लोक.

आहे सह्याचल पसरला हा प्रतीग्भागिं थोर
व्यापी ज्याची शिखरसरणी उच्च आकाश घोर
वाटे लोकीं अगणितभुजाधारि हा ईश आला
प्रायः अंभोनिधिपरिवृतां भूस आधार झाला १

जागोजागीं वनतरुलता लागल्या दाट भारी
एकाकी भूरुह शिर बृहत्काय कोठें उभारी
त्याली तेथें प्रकृतिसुभगा सृष्टि ही शुद्ध-वेश
हा ! हा ! तेथें परि न कधिंही मानवांचा प्रवेश २

कोठें मोठी भयकर दरीं विस्तृता खोल फार
मध्यान्हींही वसति करितो जींत घोरांधकार

प्रावृट्कालीं धरि निजशिरीं जें महामेघमाला
ऐसें कोठें शिखर दिसतें भेदि जें अंबराला ३

जंबू कुंजप्रतिहतरया निम्नगा उच्चभागीं
धों धों शब्दें मधुरसलिला वाहती जागजागीं
दिग्भागातें भरि घनरवें थोर कोठें प्रपात
कोठें कोठें गहनकुहरीं होय त्यांचा निपात ४

दावज्वाला करि तरुलताराजि भस्मावशेषा
कृष्णा सांद्रा गगन भरितें धूमलेखा विशेषा
कोठें झंझानिल बहु जवें वृक्ष अत्युच्च पाडी
तीव्राघातें करि वनतरुस्कंध उन्मत्त ताडी ५

जंबू निंबामलक बदरी केतकी देवदार
नीपाशोक प्रचर बकुलाशोकही कोविदार
यांची कोठें अविरल खरी गुंफणी होय फार
ज्यांच्यामध्यें वसति करिती घोर मोठें विखार ६

सिंहव्याघ्रद्विप निवसती स्वैर कोठें दरींत
ज्यांचा घोर ध्वनि परिसुनी चित्त भीती वरीत
होई कोठें अविरत महायुद्ध--संमर्द त्यांचा
होई तेणें दणदण असा घोर आवाज सांचा ७

राज्याधारां गड कितितरी त्यावरी जागजागीं
मोठे मोठे शिवनृपतिनें निर्मिले उच्चभागीं
किल्ला भद्रांचल परि खरा भव्य मोठा विराजे
पाहोनी जो विगलितभय प्रायशः सर्व राजे ८

मार्गामध्यें भयकर कडे लागले भूधराचे
जे पाहोनी हृदय दचके धैर्यशाली पराचें

जागोजागीं वनतरुलता--कुंज मार्गी निरोधी
कोठें मोठे वनपशु तसे मानवांशीं विरोधी ९

शोभे भद्रांचल गिरिशिरीं दुर्ग मोठा कराल
आहे त्याचा बळकट तसा कोट मोठा विशाल
धैर्यध्वंसि प्रबल रिपुतें तो दुरारोह साल
जो दुर्भेद्य प्रगट समरीं ये जरी मूर्त काल १०

त्या किल्ल्याचा अधिपति नृपें नेमिलें दुर्जनाला
झाला कालापरि भयद जो सर्वही दुर्बलांला
दुष्कर्मानें बहुपरि जनां पीडिलें निर्दयानें
अन्यस्थानीं किति पळुनियां लोक गेले भयानें ११

श्रीविश्वासप्रभवरसुता साधुवृत्ता सुशीला
ती दुष्टानें कपटकृतिनें आणिली पुण्यशीला
कारागारीं अनकृतिविना लोटिलें तत्पतीतें
पाहे दुष्टाधम अनुदिनीं भ्रष्टवायां सतीतें १२

होतें मोठें उपवन मनोहारि तेथें सतीतें
दुष्टात्म्यानें बहुत जपुनी ठेविलें धीमतीतें
ठेवी तेथें परमकुटिला त्यापरी धूर्त दासी
साध्वीतें ज्या सतत झटती दुष्पथीं न्यावयासी १३

रात्रीचा तो समय रजनी--नाथ अस्तास जात
औदासिन्य प्रभुसम जगीं राज्य भोगी सुखांत
त्या उद्यानीं विकल बसली कोण ही घोर रात्रीं
दासीपाशीं अहह करिते शोक ती चारुगात्री १४

दुःखावेगें परम विकला जाहली गात्रयष्टी
वीतच्छाया बहु कृशतमा पांडुरा फार कष्टी

राहुग्रस्ता रुचिर गगनीं ज्यापरी चंद्रलेखा
त्यकालीं ती वरतनु अहा ! जाहली तेंवि देखा १५
वारंवार स्मरुनि पतितें ती करी बाष्पवृष्टि
बाष्पोद्रेकें हरिणनयना जाहली मंद दृष्टि
बाष्पोत्सेकां पुसुनि पुसुनी होय वस्त्रान्त ओला
पावे वाचा स्खलन बहु ती पांडुता ये कपोलां १६
शोकावेगें वरतनु वदे " पातला काल काय
मत्प्राणेशाविण विकल हा जाहला सर्व काय
पाहूं कोठें कमल मुख तें होय ही शून्य सृष्टि
हा हा ! प्राणेश्वर नच करी सांद्र ती प्रेमवृष्टि १७
हा दुर्दैवा अनुचित दशा काय आह्मांस आली
पूर्वीचीं तीं अनुपम सुखें सर्वही नष्ट झालीं
केलें आह्मी प्रभुवर असें कोणतें घोर पाप
आह्मातें हा ह्मणुनि सदया यापरी देशि ताप १८
प्रासादीं जो कुसुमशयनीं लोळतां दुःख पावे
त्यानें कष्टें क्षितिवरि असें हाय आतां निजावें
शीतच्छेदा तनुवरि धरी जो महाही दुकूलां
दैवें आतां अहह परि ता आश्रयीं शीतभूला १९
भक्षायातें निकट असती मिष्ट पक्कान्न--राशी
कारागारीं अहह निजतो नाथ आतां उपाशी
सोत्कंठा मी दिनरजनि यत्पादसंवाहनासी
आतां त्याला अहह परि ती शृंखला होय दासी २०
विद्वानांशीं सतत करि जो सत्य तत्वानुवाद
तेथें आतां श्रवण करितो मद्यप्यांचे विवाद

प्रात:कालीं परिसुनि शुभा गीति जो होय जागा
हा ! हा ! आतां मशकरव ती व्यापि सर्वाहि जागा २१

कारागारीं प्रियतम अशी भोगि आपत्ति थोर
दुष्टात्मा तो अनुदिनिं तया यातना देइ घोर
दुःखें ऐशीं सहन करितो नाथ माझा अभागी
आनंदानें परि वसतसें रम्य उद्यान--भागीं २२

नाथासाठीं करिं अविरला मी सदा बाष्पवृष्टि
कां सोडीना अधम परि हा सर्वथा जीवसृष्टि
अव्यापन्ना मरणसम ती यातना मी विलोकीं
स्त्रीजातीही कठिणहृदया निष्ठुरा सत्य लोकीं २३

नाथा होतां विरह अपुला या जनां अल्पमात्र
हा जाईल त्वरित विकल प्राण सोडून गात्र
नाथा तूह्मां कपटपटु मी मोह पाडावयातें
ऐके कालीं वितथ वदलें सोपचारां गिरा ते २४

जाती रात्री दिवसहि तसे चालले एक एक
होई तूह्मां अनुदिनिं खरा नाथ तापातिरेक
कारागारीं परम छळिलें आपणां दुर्जनांहीं
हा ! हा ! कैसा परम कपटी प्राण हा जात नाहीं २५

धात्यानें हें हृदय रचिलें काय माझें शिलांनीं
किंवा त्यानें दृढ जखडुनी बांधिलें शृंखलांनीं
हा हा किंवा तनुस शिविलें वज्रसारां गुणांहीं
ज्या योगानें फुटुनि शतधा भिन्न हें होत नाहीं २६

" जाई माझी क्षणभर जरी दूर ही चंद्रकोर
हा हा ! होई परम हृदयीं घाबरा हा चकोर

जेव्हां माझ्यावरि न करिशी सांद्र ती प्रेमवृष्टी
होई तेव्हां कमलनयने निष्फला सर्व सृष्टि" २७

ऐशी वाणी अवितथ खरी बोलला प्राणनाथा
देहातें या विरहसमयीं शीघ्र सोडून जातां
माझ्यासाठीं अधम जगतीं राहिला प्रेमशीला
प्राणापेक्षां प्रियतम खरी आपणां ही सुशीला २८

कोठें प्राणेश्वर अविरतस्यंदि तो प्रेमपूर
कोठें माझें खल हृदय हें वंचना–मात्र–शूर
कोठें तैशी सरल विशदा निर्मला चित्तवृत्ति
कोठें माझी कपटचतुरा ही निजार्थ–प्रवृत्ति २९

माझ्यासाठीं प्रियतम सदा भोगितो यातनातें
नाहीं त्याचा परि किमपिही खेद या मन्मनातें
उद्यानीं या परि अनुदिनीं भोगितें मी सुखातें
हा हा ! लोकीं परम अधमा सत्य धिःकार मातें ३०

जो शूरांचा समरशिरसीं सर्वदां होय नेता
होई तैसा रणिं निजबळें दुर्जनांचा विनेता
तैसा कर्णापरि सकलही याचकां वित्तदाता
कारागारीं अहह ! पडला नाथ तो सत्य आतां ३१

उद्यानीं त्या कपट करुनी येउनी रात्रिं गुप्त
एकाकी हा खल रिपुजनीं बद्ध केला प्रसुप्त
जाते कैसे निकट खल हे नातरी पापराशी
स्पर्शी कैसा तृणनिचय तो दीप्त वैश्वानराशीं ३२

रानीं दूर श्रवण करुनी घोर हुंकार ज्याचा
भीतिग्रस्त प्रबलहि करी सोडिती प्राण साचा

दुर्दैवानें जरि गवसला सिंह तो पंजरांत
हा ! हा ! त्याला नृपपथिं खडे बालही मारितात ३३

ज्योत्स्नाधाराधवलितनिशाकालिं जी सत्य केली
कैशी प्राणेश्वर विसरलां सौख्यदा चारु केली
तैशी गाढप्रणयसरसा शोभना गोड वाणी
गाढोत्कंठाजनक सुभग प्रेम निस्यंदि गाणीं ३४

प्रेमोत्साहें स्फुटितकुमुदापीड मी कंठिं घाली
त्वकंठींही सुभग दुसरा त्यापरी गंधशाली
प्रातःकालीं सुकुनि अपुला जाहला बद्ध--कोश
राहे माझ्या अभिनव तसा गंधशाली अदोष ३५

" आहे याच्या निकटगत हा चंद्रमा पूर्ण कान्ते
सांगें प्राणेश्वरि मग वरी म्लानता त्यास कां ते "
ऐशी वाणी परम रुचिरा बोलुनी हास्य केलें
ईषलज्जावलितवदनां या जनां चुंबियेलें ३६

गेला गेला क्षणसम खरा सर्व तो सौख्य--काल
कारागारीं मरणसम हे भोगितों फार हाल
वेणातीरीं अनुपम सदा भोगिले जे विलास
नाथा आतां स्मृतिगत अहा ! जाहले सर्व खास ३७

या दीनांतें अधम करितो सर्वदा हा अपाय
दैवा ! कैसें नच तुज दिसें झाकिलें नेत्र काय
साधूंना जो कुमति छळितो दंडिसी तूं तयातें
ज्ञाते ऐसें सतत कथिती सर्व मिथ्याच कां तें ? ३८

रात्रौ जैशी विरहविधुरा ती झुरे चक्रवाकी
हा हा ! तैशी प्रियपतिविणें मी सदा दैन्य भाकीं

भेटे प्राणप्रिय परि खरा तींस होता सकाळ
हा हा मातें विरहशिखि हा जाळितो सर्वकाळ ३९

पाहूं कोठें नयनसुभगा मूर्ति ती प्राणनाथा
ऐकूं कोठें श्रवणमधुरा ती गिरा हाय आतां
कोठें आतां अमृतमसृणाश्लेष तो ताप--दाही
हा हा दैवा कधिं तरी सरे यातना तापदा ही ४०

रम्योद्यानीं कुसुमसुरभी वात हा मंद वाहे
कासारीं या कुसुमितलता--वृंद हा नाचताहे
उद्यानश्री परम नटली नेसुनी रम्य शाल
हा ! हा ! सारे परि मम मना ताप देई कराल. ४१

झाली काया विकल तिमिरव्याप्त ही होय दृष्टि
हा ! हा ! तैशी विजनविपिनप्राय ही शून्य सृष्टि
नाहीं आतां मजशिं उरली अल्पही जीवनाशा
देवा आतां उगिच बघसी वाट कां जीव--नाशा ४२

कोठें आहे प्रियकर--सुता जीविताधारभूता
या चित्तातें रुचिरवदना सौख्यदा जी प्रभूता
उत्संगीं या बसुनि वदुनी शद्व अव्यक्त गोड
वेळोवेळीं पुरवि मनिंचें प्रेमला सर्व कोड ४३

दुर्भाग्या मी बहु असुखदा जाहलें सत्य ताता
माझ्यासाठीं परम विपदा भोगिते नित्य माता
दुःखाचा हा अविषह खरा वार्धकीं त्यास घाला
हा दैवा ! कां अशुभ जन हा व्यर्थ जन्मास आला ४४

झाली सीमा मज न धरवें अल्पही धीर आतां
दुःखावेगें विकल बहु हा चालला प्राण नाथा !

एकाएकीं अहह ! नयनां व्यापि घोरांधकार
झाली काया जड खचित, हें मस्तक भ्रान्त फार " ४५

झाली मूर्च्छागत सुनयना गाढतापाकुला ते
धांवे दासी त्वरित जवळीं सावरी तीस हातें
तन्वंगीच्या तनुवरि करें शिंपुनी शीत वारी
घालोनी त्यापरि अनिल ती ताप सारा निवारी ४६

जातां कांहीं समय उघडी, पद्मिनी कोश जैशी
प्रातःकाळीं, हळुहळु सती पक्ष्मलां सत्य तैशी
बोले तेव्हां स्खलितवचना यापरी सारसाक्षी
" दुःखावस्था अहह न बघे काय ही सर्वसाक्षी " ४७

दुःखावस्था बघुनि मग ती बोलली बोल काय
" बाई आतां करशिल किती शोक हा हाय ! हाय !
सच्चारित्र्यव्रत सतत तूं आपलें नीट राखीं
आपद्ग्रस्तां सुचरितपरां काय तो ईश टाकी ४८

श्रीसावित्री—द्रुपदतनया—जानकी--ब्रह्मकन्या
वानी ज्याची त्रिभुवन सदा कीर्ति चारित्रजन्या
केली त्यानीं सहन विपदा थोडकी काय बाई ?
देवातेंही नियति न खरी सोडि सर्वंकषा ही " ४९

साध्वीचें यापरि करितसे जों समाधान दासी
आला तेथें अधम मनिंचा हेतु साधावयासी
मित्रासंगें प्रखर मदिरा दुष्ट आकंठ प्याला
आला अंगीं मद बहु मनीं काम--संचार झाला ५०

कारागारीं बहुत छळिलें सर्वदा आपणातें
झाली कोपाकुल परम ती पाहुनी त्या खलातें

एकाएकीं मग उठुनियां चालली दूर बाला
नाहीं भ्याली कमलनयना अल्पही त्या खलाला ५१

जाई वेगें निकट खल तो लक्षुनीयां सतीस
लज्जा सारी त्यजुनि मग तो बोलला नीच तीस
" लावण्याची ललित–लतिका सत्य तूं सुंदरा ही
आलिंगी या नरतरुवरां शीघ्र शाखाकरांहीं " ५२

ऐकोनी ती बह अविनया यापरी नीच वाणी
व्याघ्री जैशी अपकृत तशी ती दिसे रूप--खाणी
झाली बाला परम कुपिता नेत्र आरक्त झाले
कांपे काया थरथर तसा ओष्ट अत्यन्त हाले ५३

" बोले वाणी अविनयपरा नीच जो सर्वदांही
त्याची जिव्हा अहह शतधा होइ ना भिन्न कां ही ?
मर्यादातिक्रम करुनि जो सज्जनां फार कोंडी
देवा ! त्याच्या अविरत किडे कां पडेनात तोंडीं ५४

दुष्टा नीचा प्रकृतिकुटिला ! प्राप्त होईल काय
माझा शश्वत्कुपथनिरता हा तुला शुद्ध काय
मूढा ! हंसा त्यजुनि कधिं ती स्वर्गगंगानिवासी
हंसी विष्टानिरत मलिनां आदरी वायसासी ? ५५

कोठें माझा प्रियकर धराधीश कामाभिराम
कोठें दुष्टा ! विकृत भणगातुल्य तूं दुष्टकाम
कोठें त्याचा त्रिभुवनतल--व्याप्ति पुण्यप्रताप
कोठें तूं हा भिउनि पळसी स्त्रीसही भ्याडपाप ५६

दुष्टा झाला जरि मम शिरीं घोर विद्युन्निपात
किंवा कोणी करि तनुवरी मर्मभिच्छस्त्रघात

ग्रासायातें मुख पसरुनी मूर्तिमान् काल आला
सच्चारित्र्यव्रत तरि कदा सोडि ना दुर्गपाला ५७

आता काळें वदन अपुलें तूं करी शीघ्र पापा
ताताची तूं अपकृति बरी फेडिली दुष्ट सापा
दुष्कर्में जीं अनुचित सदा योजिसीं नीच काक
दुष्टा ! भोगीं सुचिर नरकीं घोर त्यांचा विपाक ५८

आपत्कालीं तुज निजगृहा आणुनी मत्पित्यानें
तूतें पुत्रासम समजुनी पाळिलें सत्य त्यानें
केली त्याची खचित उचिता फेड दुष्टा तुवां ही
लोकीं दुष्टा सकलही खरें शक्य शंका न कांहीं ५९

ह्न्मर्मच्छित् परिसुनि अशी तीव्र धिःकार–वाचा
दुष्टात्मा तो बहु खवळला व्यालसा शीघ्र साचा
आवेशानें मग तिजवरी धांवला दुर्विचारी
संतापानें वचनगरलां ओकला ताप–कारी ६०

" दुष्टे ! नीचे ! प्रकृतिकुलटे ! मत्त झालीस फार
चेष्टा ऐशा ह्मणुनि करिशी सोडुनी तूं विचार
बोलोनीयां परुषवचनां ताप देई सदाही
ती ही जिव्हा प्रखर असिनें छेदितों शीघ्र पाहीं ६१

जिंकोनीयां तव पति रणीं मी तुला केलि दासी
त्वद्देहाचा समज मनिं हा स्वामि आता विलासी
आता वेगें त्वदधरसुधास्वाद घेऊन साच
या उद्यानीं अनुपम सुखां स्वेच्छ भोगील हाच ६२

त्या भ्याडाचें यश मजपुढें वानिशी व्यर्थ भारी
कारागारीं विविध विपदा भोगितो तो भिकारी

स्वेच्छेनें ज्यावरि बहुपरी गृध्रमाला रमेल
मुख्यद्वारीं शिर तुज उद्यां सत्य त्याचें दिसेल ६३
आनंदानें तरि मम करीं मान्य अभ्यर्थना ही
या देहाची मग तुजविणें स्वामिनी अन्य नाहीं
रम्योद्यानीं तुजसह सखे ! रम्य नानाविलास
भोगोनी मी क्षितितलिं खरा धन्य होईन खास ६४
आतां ही तूं करशिल जरी सत्य धिःकार याचा
कारागारीं अविरत महाताप हा भोगिं साचा
एकान्तीं या तुजवरि बलात्कार आतां करीन
पातिव्रत्य-व्रत तव खरें सत्वरीं मी हरीन " ६५
आलिंगाया पसरुनि भुजा दुष्ट तो धांव घेई
एकाएकी सुमति हिसडा थोर ती त्यास देई
त्या योगानें अधम पडला पालथा सत्य खालीं
भ्याला चित्तीं परि नच मुळीं भोगतृष्णा निमाली ६६
" दुष्टा नीचा वदसि भलतें केंवि जिव्हा गळे ना
पापेच्छेनें बघसि अधमा ! दृष्टि कां ही जळे ना
एकाएकीं तव शिरिं खळा वज्र कां आदळे ना
पापा तूतें पसरुनि मुखां कुंभिनी कां गिळेना ६७
प्राणेशातें विगणुनि अहा ! प्रेमधाराधराशीं
सेवूं कैशी प्रकृतिकुटिलां मी तुला खापराशीं
स्पर्शो माझ्या विमल तनुतें कोण तो पापराशी
दुष्टा कैशी हुतवहशिखा जाळि ना कापराशीं ६८
दुर्धर्षा जों नच निरखिली मूर्ति पंचाननाची
कान्तारीं तों-वरि बहुपरी वल्गना जंबुकाची

मन्नाथाचें विमल यश हा सर्वही लोक वानी
मातें स्त्रीतें भिउनि अधमा तूं पळालास रानीं ६९

नीचा कां रे वितथ वदसी जिंकिलें प्राणनाथा
पाहोनी त्या समरचतुरा भीति वाटे कृतान्ता
वेढी जेव्हां तुज रणशिरीं तो विशालाक्ष गाढा
तेव्हां कां रे त्यजुनि समरा तूं पळालास भ्याडा ! ७०

दासी मातें ह्मणसि अधमा लाज नाहीं तुला का
मिथ्या कां रे मज बहुपरी दाविशी व्यर्थ धाका
भोगीं दुष्टा भयद नरकीं दुष्कृतीच्या विपाका
मारो कान्ता प्रियकर तुझी सर्वदा थोर हाका ७१

हा हा ! साध्वी सुमति कमले हें तुझें काय दैव !
दुःखावस्था मजपरी खरी भोगिशी तूं सदैव
दुर्दैवानें कपिकरिं पडे हाय ! ती रत्नमाला
किंवा लाभे नवशशिकला सिंहिका–बालकाला ७२

मत्ता ! लोकीं खचित न बरा अन्यदार--प्रमाथ
या योगानें किति तरि लया पावले भूपनाथ
अन्यस्त्री ही हुतवहशिखा होय दुष्टा ! निकाम
तत्स्पर्शानें मरति शलभातुल्य पापी सकाम ७३

ज्यानें सारे सुरवर रणीं जिंकिले स्वप्रतापें
भीतीनें हा थरथर जयां सर्वही लोक कांपे
ज्याची सेवा करि अनुदिनीं अप्सरावृंद फार
गेला तोही दशमुख लयां चोरितां रामदार ७४

घालोनीया सुखकर गळां रक्तपुष्पोपहारां
घेवोनीया प्रियतम सखी शूरसेनासि धारा

भालू जेथें भयकर सदा मांडिती गान फार
दुष्टा ! वेगें करिं चिर रणान्त:पुरीं तूं विहार " ७५

क्रोधानें तो मग करकरां चाउनीया रदांसीं
धांवे वेगें तिजवरि वदे माजली फार दासी
साध्वी तीही मग निजकरें दुर्जनां दूर लोटी
झोंबाझोंबी क्षणभर अशी चालली फार मोठी ७६

एकाएकी तंव चहुकडे घोर कल्लोळ झाला
" धांवा धांवा खल रिपुजनीं घातला थोर घाला "
गर्जे किल्ल्यावरि भयकरी युद्ध-भेरी विशाला
जों तों धांवे त्वरित तिमिरीं घेउनी ढाल-भाला ७७

" आला आला रणपटु तुझा तो विशालाक्ष काल
युद्धांमध्यें करिल तुमचा पूर्ण आतां निकाल
होतां वेगें रुचिररणभू नेसुनी रक्त शाल
आलिंगोनी तदसिवनिता नीज तेथें खुशाल " ७८

येवोनीया भट उपवनीं शोधिती दुर्गपालां
साध्वीतें त्या त्यजुनि मग तो दुष्ट बाहेर आला
युद्धाची ती परिसुनि कथा अन्तरीं फार भ्याला
घेवोनीया दल मग सवें दुष्ट युद्धा निघाला ७९

सर्व सैन्य तें हताश
पाउनी रणीं विनाश
दुष्ट तो पडो रणांत
इच्छि ती सती मनांत ८०

नारायणसुत.

————

## आर्यभूदेवीमहिमा.

### तृतीयोद्गार.

श्लोक.

सत्वाची तूं असशि जननी आर्यभू ! सत्वराशि;
धर्माचीही भजशि गमशी एक तूं मूर्ति खाशी;
हे ! तत्वज्ञे ! नमन तुजला सर्वशास्त्रप्रवीणे !
देवी ! दावीं सुपथ तनुजां दिव्य रूपच्छवीनें. १

साक्या.

नैसर्गिक सौंदर्य असो तें; तेणें विशेष कांहीं—
तिच्या गुणांचें यथायोग्यसें अनुमान होत नाहीं. २
गुणनिधितिल कण तिच्या असे हा नैसर्गिक सौंदर्य;
जाणावें यावरुनि तियेच्या गुणनिधिचें ऐश्वर्य. ३
स्वाभाविक सुंदरता देणें निसर्गदेवीहातीं;
पूर्वसंचितें ज्याच्या त्याच्या लाभे जशी तशी ती. ४
स्वभावसुंदरता दर्शक जरि पूर्वसंचिताळागीं,
सद्यःकर्तृत्वद्योतकता तरि न तियेच्या आंगीं. ५
स्वरूपसुंदर असुनि करी नर कर्तृत्व जरि गरिष्ठ;
तरि तो कर्तव्यशून्य सुंदर मनुजाहुनी वरिष्ठ. ६
नसेल सुरुचिर रूप नसो, पण कर्तृत्व योग्य ज्याचें;
तोचि खचित होतसे जगतिं या भाजन महायशाचें. ७
कर्तृत्वशून्य जो नर त्यातें काय होय लावण्य ?
जन्मांधा आकर्णनयन कीं, क्लीबाला तारुण्य ! ! ८
असो प्रभूनें करुनि कृपेला, जरि भरतभूमिकेला—
सौंदर्याचा अनुपम ठेवा असला अर्पण केला;— ९

तरी तिचें माहात्म्य न कळतें अंशतःहि इतुक्यानें;
निजकर्तव्यें स्वतां मिळविजे सद्यश ज्यानें त्यानें १०
या दृष्टीनें बघतांहि तिचें पूर्वीसम यश वाढे,
धन्य धन्य ती जिच्या यशाचे विस्तृत असे पवाडे ! ! ११
उत्तम सरिता तीच, जियेचें वारी मधुर, पवित्र;
धान्यभरें जें सदैव डुलतें, तेंच उत्तम क्षेत्र; १२
उत्तम तरु तो, फळें जयाचीं सुमधुर आणि रसाळ;
उत्तम कवि तो, कविता ज्याची प्रासादिक बहुसाळ; १३
तसा देशही श्रेष्ठ तोचि कीं, ज्यांतील मनुज सारे–
निपजति कर्तृत्ववंत, झडती तत्कीर्तिचे नगारे. १४
जनता करिते सुकृत्य जें जें, शतपट अधिकचि तेणें–
देशभूमिसौंदर्य विराजे; जणूं सुरूपा लेणें १५
सूर्यचंद्रही विप्रभ होतिल पाहुनि यशें जयांचीं,
हीच आर्यभू प्रसू असे हो ! अशा सुगुणितनयांची. १६
वीरमातृतेमाजि भारतभू भूलोकाशीं काय--
पण सूर्यचंद्रलोकांशींही तुळितां वरिष्ठ होय ! १७
अमेरिका, इंग्लंड, जपानहि, चीन, वगैरे देश;
अर्भकेंचि हीं यांशीं तुळितां महती नसे विशेष ! १८
अगाध हा काल--समुद्र असे अपरिमित पसरलेला;
तत्तीरींचा सिकताकणही त्यांहीं न पाहियेला ! १९
ऐकूं नव्हतें येत जेधवां नांव रोमचें; किंवा--
ग्रीसामध्यें प्रथम वसतिही झाली नव्हती जेव्हां; २०
अधिक काय मिश्रादिदेशची जेव्हां मानवजाती--
रंग लावुनी अंग आपुलें मुदें शोभवित होती; २१
तेव्हांपासूनि ही आर्यभू आहे सर्व जगांत--

मनुजसमाजाधिदेवताशीं वीरांबाशीं ख्यात. २२
जगतिं इतर भाषांत जेधवां नव्हते शब्दहि पुरते;
भाषाकोविद कुठुनि तेधवां असतिल अग्रेसर ते ? २३
तेधवांच भारतिं ऋषिवृद्धीं संस्कृत संस्कृत केली;
सूक्ष्मविचारप्रवीणताही तिजलागिं अर्पियेली. २४
हेंहि असो छंदोबद्धहि त्या करुनि दिव्य भाषेतें,
लीलानर्तन करावयाला तयीं लाविलें होतें ! २५
इतिहासाचा प्रदीप जेथें प्रवेशतां मालवतो;
दंतकथा तीव्रासिही जिथें परजाळितांच लवतो; २६
अशा प्रलयकालापासुनिही जेथें प्रसिद्ध, आर्य,
मंत्रद्रष्टे, तपी, चिरायू, विलसति महर्षिवर्य. २७
सहस्रावधी वर्षांपासुनि ज्या शुचि वसुधरेंत--
वेदघोष गंभीर निरंतर ऐकूं येताहेत; २८
त्या भूमीच्या बहु भाग्याचें येइल साम्य कुणाशी ?
सांगा तुळिजे गिरिवर कैसा लघुतम रजःकणाशीं ? २९
अपौरुषेयहि वयोवृद्ध तो ऋग्वेद सुत जियेचा,
वीरमातृता धर्महि तेणें सहजचि सिद्ध तियेचा. ३०
रति प्रबळ ऐहिकीं वैभवीं, यास्तव तत्त्वज्ञान--
पुरतें न कळे ज्यांस, अझुनि जे त्याविषयीं अज्ञान; ३१
अशीं कुठें पाश्चात्य अर्भकें, कोणीकडे महर्षी ! !
दशसहस्रवर्षांपूर्वी जे विख्यात तत्त्वदर्शी ! ३२
अशा थोरशा ऋषीश्वरांच्या सुविमल तपोवनांहीं--
भारतभूमातेविण दुसरा पूतप्रदेश नाहीं ! ३३
मुनिवर वासिष्ठवामदेवमुख अभिषिंचिति सुजलाला;
तेणेंही ह्या आर्यमहीचा पृथुदेह शुद्ध झाला. ३४

होमहवनशुभसमयीं एथें निघती अग्निज्वाला;
त्यांच्याचि मिषें सर्वदेवतातोष व्यक्त जहाला. ३५
होमदग्धघृतसुगंधमोहित इंद्रवरुणमुख सुर ते--
याच महीवरते बहु वेळां जाहाले अवतरते ! ३६
वीर्यवंत, तत्त्वविद, मुनींच्या समिती जेव्हां एथें--
ब्रह्मज्ञानार्थ करित होत्या बहु वादविवादांतें; ३७
परिस्फोट होईल तेधवां निजगौप्याचा, ऐसें--
वाटुनि, स्वतां परब्रह्महीं चिंता करीत बैसे ! ! ३८
ऋक्सामयजुरर्थव वेद हे या पुण्यभूमिचेच;
उपनिषदें, ब्राह्मणेंहि, सारे सद्ग्रंथ हे तिचेच. ३९
तत्त्वज्ञानसुरधुनीजननहि तच्चरणांबुजिं झालें;
परब्रह्मवेत्ते शुकादिही इथेंच जन्मा आले. ४०
गर्ग, आंगिरस, याज्ञवल्क्य, हीं ऐकुनि मुनिवरनामें,
उदात्तता मनिं नये कुणाच्या तत्कृतसुकृतिप्रेमें ? ४१
मायौपाधिक जगद्ब्रह्म जें त्याचेविषयीं विरति--
उपजे तत्क्षणिं ह्या नामांहीं; परब्रह्मिं तेंवि रति. ४२
कुशीं जियेच्या जन्म पावले ऐसे तत्त्वज्ञानी,
धन्य ती न कां ? कां न वर्णिजे स्तविजे तिस सुज्ञांनीं ? ४३
न्यायशास्त्रसांख्यशास्त्रकर्ते जे जगतीं सन्मान्य;
थोर जहाले तेहि भक्षुनी याच भूमिचें धान्य. ४४
अप्रबुद्ध सर्वत्र जेधवां होती मानवजाती;
अंधासम जैं गेल्यामागें सकळहि मानव जाती; ४५
तेधवांचि धिक्कारुनि जेणें अंधकपरंपरेला,
जयजयकार विचारशक्तिचा प्रथमचि अमूप केला; ४६
सांख्यशास्त्रजनक कपिलमुनिही ते ह्या महीस आई !--

ह्मणून, वंदन करीत होते ! ऐशी हिची नवाई. ४७
अद्यापि जगद्वंद्य महामुनि कपिलहि हर्षें जीतें--
आई ! ह्मणुनी वंदित होते; ऐशी कोण दुजी ते ? ४८
भूलोकीं तर नसेच, तरि पण असेल जर आकाशीं,--
ग्रह हो ! तुमच्या लोकीं-- सांगा एकादी तरि ऐशी ! ! ४९
आर्यभट्ट, भास्कराचार्यही, वराहमिहिरहि यत्नें--
ज्योतिर्भूगोलगणितशास्त्रां शोधिति भारतरत्नें. ५०
दशांशगणित, गुरुत्वाकर्षण, भूमिति, यांचे शोध--
प्रथम एथ लागले; अशी ही जननी अनुभववृद्ध ! ५१
आद्या जननी पराक्रमाची जी वीरपुरुषवंद्या--
प्रथम तीहि एथेंच वाढली शस्त्रास्त्रधनुर्विद्या. ५२
द्विज 'शापादपि शरादपि' असे; क्षत्रियहि शौर्यशाली;
जगद्वंद्य एथेंच जन्मले, पूर्वी एका कालीं. ५३
यज्ञवेदिकांतून पावली त्रिकोणमितिही जनना;
हिच्याच कोमल कंठापासुनि उद्गम सप्त सुरांना; ५४
उत्पत्ती एथेंच जाहली प्रथम मत्स्ययंत्राची;
हिनेंच दिधली जगा देणगी व्याकरणसुशास्त्राची; ५५
शास्त्रसिद्ध आद्यलिपी, तैशी जी आद्य वर्णमाला,
ह्यांचा ह्या भारतीवसुमतीमध्येंच जन्म झाला; ५६
सुवर्णमणिगणखचितचि अतिशय अघटित रचना जीची,
जिला पाहतां जळस्थळांचा बोध मनांत नयेचि; ५७
फसला बघतां जीस सुयोधन, कृष्णा तयास हसली,
मर्मीं शर त्यापरि ती गोष्टी हृदयीं त्याच्या बसली; ५८
कलिमूर्तीनें मग त्या क्रोधें जे दुर्धर प्रसंग--
ओढविले; वर्णन त्यांचें मज करवे न यथासांग ! ५९

सार हेंच भारता जीमुळें आलें स्वरूप सारें,
युधिष्ठिरसभा मयें निर्मिली ती शिल्पकलाधारें. ६०
आद्य जनक त्या शास्त्राचाही भरतखंड संपन्न;
नाट्यवैद्यशास्त्रेंही झालीं प्रथम इथें उत्पन्न; ६१
कणाद, भास्कर, वाग्भट, पाणिनि, गौतम, कपिलमहात्मा,
वराहमिहिरहि, आर्यभट्ट, जगीं विख्यात विश्वकर्मा, ६२
स्वतंत्रशास्त्रप्रणेते असे तेजोमार्तंड जिथें-
झाले आविर्भूत; ह्मणावें वीर्यवती कां न तितें ? ६३
अहो ! तत्त्वविज्जनहो ! करितों वंदन तुह्मांस भावें;
घ्यावें परिसुनि; विनयें कथितों जें मज गमे स्वभावें. ६४
सत्य सत्य आहां आपण जरि ललामभूत जगा या;
तरि याविषयीं गर्व नसावा भवन्मानसीं वायां. ६५
तुह्मांहुनीही विशेष ज्यांना या त्रिभुवनिं मानीती;
काव्यामृतरसनिर्झर ज्यांच्या वदनांतूनि वहाती; ६६
ते आद्यकवि तुह्मांसम निपजवि आर्यभूमि निज उदरीं;
स्वगर्व सोडा; कवीश्वराची नयेचि कोणास सरी ! ६७
सुपदन्यासा, सालंकारा, सरसा, सुवर्णमूर्ति,
कविता ज्यांची परिसतां क्षणीं तल्लीन होय वृत्ति; ६८
ते वाल्मीकिमुनिहि अवतरले आर्यमहीचे पोटीं;
ऐशी आहे या जननीची जगतीं महती मोठी ! ६९
आद्यकवी वाल्मीकि धन्य तो ! वंदन तयास माझें;
स्वर्गमृत्युपाताळीं ज्याचें विस्तृत सुयश विराजे. ७०
रामकथामृतरस त्या मुनिनें भजकजनां चाखविला;
नव्हे चुकविला कृतांत किंवा तन्मस्तक वांकविला. ७१
रामायणसम सरस, महीवर असें कोणतें काव्य ?

उदात्तचरितें क्षणोक्षणीं जें नव्य, भव्य, सुश्राव्य. ७२
रूपानें बादरायणाच्या नारायण अवतरला;
ज्याच्या कासेलागुनि मानव बिकट भवार्णव तरला; ७३
' सर्वं व्यासोच्छिष्टं जगदिति ' यत्कीर्तीचें गीत;
तो भगवान् व्यासोनारायण जन्मे याच महींत. ७४
" व्यासवचन हें विमल सरोरुह, गीतार्थ ज्यांत गंध,
नानख्यानें तंतु ज्यांतले, श्रीहरिकथा मरंद, ७५
अहर्निश प्राशिती जयाशी सुरसिकभक्तमिलिंद,
अनर्थकर विषयार्थ सांडुनी, रमति ज्यांत सानंद; " ७६
ऐसें भारत रचिलें जेणें तो श्रीव्यासमहात्मा--
भरतभूविणें इतरत्र कुठें येईल काय जन्मा ? ७७
प्रचलित असती जगतिं जेवढीं शास्त्रें आज समस्त;
एकदांच तीं जरी कदाचित सर्व पावलीं अस्त;-- ७८
तरिहि एकटें भारतचि जनां शिकवील सर्व शास्त्रें;
अशीं अपूर्व पर्वें ज्याचीं असति विविधें अजस्त्रें ! ७९
नीतिशास्त्र पाहिजे काय ? तरि पहा भारतालागीं;
तत्त्वज्ञानहि असे बिंबलें त्यांतचि जागोजागीं; ८०
कवित्व व्हावें काय ? तर पहा महाभारतीं, शोधा,
काव्यसुधामाधुरी करी हो ! वास्तव्य तिथें बहुधा; ८१
सृष्टिवर्णनें, इतिहास तसा अन्वर्थ, भारतींच;
ग्रंथमिषें गमतें अवतरली क्षितिवरति भारतीच ! ८२
रामायण, भारत, शाकुंतल, उत्तररामचरित्र,
इत्यादिक हे ग्रंथ आमुचे रसपात्र अतिपवित्र. ८३
ह्यातिल एकाच्याहि संग्रहें मिळती महती जगतीं;
सर्वसंग्रहें किती धन्यता असे आमुची मग ती ? ८४

ग्रंथ नव्हत हे गमति मानसा मूर्त क्षीरनिधीचि !
हे असतां, कोण रसिक इच्छिल वसति क्षीरनिधीची ? ८५
वसे क्षीरसागरीं नारायण, लक्ष्मीकांत, अनंत;
परंतु आह्मी भारतवासी त्याहुनिहि भाग्यवंत ! ८६
अमुच्या कवितादेवीमध्यें मूर्त श्री वास करी;
भगवंताच्या लक्ष्मीमध्यें कविता न वसेच परी ! ८७
कवितादेवीकंठमणिकवी वाल्मीकि, तसे व्यास,
कालिदास, भवभूति, वंदितों त्यांस जगत्सेव्यांस. ८८
या सर्वांना जिच्या कृपेनें दिव्यप्रतिभास्फूर्ति--
झाली; त्या आर्यमहीलाही असो आमुची प्रणति. ८९
परंतु ही प्रतिभास्फूर्तीही काव्यांत मात्र झाली;--
असें नसे हो ! धर्मास्तवही ती उपयोगा आली. ९०
कोणत्याहि धर्मीं असतिल जर उदात्त ऐशी तत्त्वें;
श्रेय तयांचें तरी असे या भरतभूस मुख्यत्वें. ९१
मुख्य धर्म वेदप्रणीत तो इतर तयाचीं बाळें;
परंपरा सर्वहि धर्मांची अशी प्रकटली काळें. ९२
वैदिक धर्मांतिल सारांशें बौद्धधर्म संभवला;
स्वरूपांतरें बौद्धांतुनिया ख्रिस्तधर्म उद्भवला; ९३
ख्रिस्ती धर्मांतुनी अवतरे महंमदाचा धर्म;
त्यांतुनि नानकपंथ निघाला निवडूनि मुख्य वर्म; ९४
नानकपंथें पुन: जोडिली गेली परंपरा ही;
अशी आर्यभू सर्वहि धर्मा जननी बनुनी राही. ९५
स्वप्राणचि गणितसाल धर्मा; श्रद्धा असेल धर्मी;
भ्रष्ट जहाले नसाल आणिक धर्मापासूनि तुह्मी; ९६
तर तो स्वप्राण दिला यास्तव वंदा भारतभूला;

स्वस्वधर्मजनसमाज हो ! मग व्हाल प्रिय प्रभूला. ९७

वेदप्रणीत धर्म तर असे या भूमीचा प्राण;
त्या धर्माचें देह झिजवुनी जे करिति परित्राण; ९८

ते श्रीमच्छंकराचार्यविभु, रामानुज, मध्वहि ते,--
वल्लभादि धर्मवीर अवघे आले जन्मास येथें. ९९

वीर्यवंत तूं धन्य ! जपाना ! ध्वजा तुझ्या सुयशाचा-
महीमंडळावरी फडकते नभोमंडळी साची ! १००

वीर्यहीन पौर्वात्य न, त्यांची अतिशय अघटित करणी;
धरणीवरि ते प्रबळ रिपूसहि लोळविती सहज रणीं. १०१

हें त्वां केलें सिद्ध; बलाढ्यहि रशिया जर्जर केला !
अगस्त्यमुनिकृत समुद्रशोषचि जगतास दावियेला ! १०२

भाग्यवंत तूं खरा, परि असे एक उणीव तयांत;
ईशेच्छा ही ! तुझा नसे बा ! दोष किमपिही यांत. १०३

बलाढ्य रिपु शतदाहि जिंकिला तरि जें तुला न सांधे,--
महद्भाग्य; तें ईशदयेनें या आर्यभूस लाधे ! १०४

धर्मनिष्ठ तूं, प्राण तुझा जो विख्यात बौद्धधर्म;
शर्मप्रद जो आचरितांना, श्रितमनुजदेहवर्म; १०५

त्या धर्माचा उत्पादक जो गौतमबुद्ध महात्मा,--
तोही घेई पहा अहाहा ! पुण्यार्यभूत जन्मा ! १०६

अल्प काय हें भाग्य ? सांग गा ! या आर्यवसुमतीचें.
तूंही असशी पात्र नमाया पदपद्म या सतीचें. १०७

असो अशा या धर्ममयी जननीचा जयजयकार.
तत्पदारविंदा दासाचा सप्रेम नमस्कार. १०८

श्लोक.

श्रीरुद्रादि त्रिदश तुजला रक्षिताति स्वशक्त्या;
श्रीव्यासादि स्तविति हरिखें, नारदादि स्वभक्त्या;
शत्रुध्वंसा करिति सुभट श्रीशिवादि प्रभू ते;
ऐशा तूतें नमन जननी ! सर्वदा आर्यभूतें. १०९

तृतीयोद्गार समाप्त.

चंद्रकांत.

---

## काव्यमय सृष्टी.

अंजनीगीत.

काव्य कवीचे परिसुनि कानीं । अथवा एकांती ते वाचुनि
हृदयीं ठेवावें साठवुनी । ऐसे जरि वाटे १
वाल्मीकीची रुचिर सरलता । कविकुलमणिची चेतोहरता
भवभूतीची प्रसादमयता । अनुभविली हृदयें २
दैववशे विस्मृति ही यांची । होइल काल करिल या नष्टचि
निसर्ग कविता या सृष्टीची । होइ न नष्ट कधीं ३
वसंत सरता कोकिलगान । श्रवणिं न येई निराश ह्मणवुन
न हो खळखळा निर्झर वाहुन । रंजवि रसिकांतें ४
श्रांत पांथ ये चालुनि तरूतळिं । ओढ्यावरती निदाघकाळीं
वंशी वायू वाजवि मुरली । ओढितसे चित्ता ५
शिशिर ऋतूंतहि हिमालयावरि । सकल शांतता नांदे ज्या स्थळीं
भागिरथीचें घों घों वारी । वाहुनि सुखवि मना ६
निर्धन, अरसिक, अंध, पंगुला । कविकृतिचा जरि लाभ न घडला
निसर्ग कविता अमर जगाला । रंजवि ईशकृपें ७

वनवासी.

---

# काव्यरत्नावलि.

अंक १२ वा.

स्थळप्रत

## सालअखेर.

### वाचकांस संपादकाची विनंती.

मंदाक्रांता.

त्रैलोक्याचें कुशल वसतें यत्कृपावीक्षणांत,
तर्कींना जें मनुज, घडवी तें यदिच्छा क्षणांत,
विश्वाधर प्रभु बहुविधा दावुनी तो स्वलीला
फेरे अष्टादश करवुनी रक्षि रत्नावलीला १

भाषाभूषा प्रिय रसिक हो! ही तुह्मीं मानिलेली
अव्हेरावी नच, जरि जरा यौवनें मंद गेली
तें मंदत्व स्खलनहि नव्हे दोष रत्नावलीचा
जें श्रोण्यादी अवयव करी पीन, त्या यौवनाचा २

पूर्वींचें तें लघु चपलसें, वर्षिं अष्टादशात्रे
वाढे स्त्रीचें वपु, नवमदें मांद्य आलस्य पावे
येई तेणें अनियतपणा वर्तनीं अल्प काळ;
कोणाला हे नव युवतिचे सौख्य देती न खेळ? ३

तैशी रत्नावलिहि जन हो! दावि तारुण्यलीला;
लावी, प्रेमें लपुनि विजनीं, ही तुह्मां शोधण्याला
कांहीं शंका मनिं धरुं नका हा न अत्यंत लोप;
उत्तेजाया रुचिस तुमच्या हा तिचा प्रीतिकोप ४

" लोपे प्रीती विरहिं ह्मणती, सांगतों सत्य रीती;
भोगाभावें अधिकचि चढे इष्ट वस्तूवरी ती "
ऐसें यक्षाकडुनि वदवी कालिदास स्मरा तें;
प्रीती चित्तीं शिथिल न करा प्रार्थना ही तुह्मा तें ५
योजी जें जें, जरि सकल तें साधतें मानवास,
पाणी होतें अमृत: घडता भूवरी स्वर्गवास;
एरंडद्रू सुरतरु, गिरी क्षुद्रही मेरु होता;
थारा नाहीं ह्मणुनि वरिती नित्य चिंतेस चिंता ! ६
थोडी रत्नावलि न तुमच्या भेटिला उत्सुका ही,
सेवेमाजी चुकुनि न असे लज्जिता, हें न कांहीं;
कालाची दुर्गम गति परी तद्गती लागि रोधी,
ज्याच्या ओघा हटवु न शके पंडिताचीहि बुद्धि ७
चाले मोठी अहमहमिका प्लेग दुष्काळ यांची
संपादाया सचिवपदवी, भारती ह्या, यमाची;
झाली दीना समयिं असल्या भारतीही कवींची
आहे सेवारत मति तरी काव्यरत्नावलीची ८
नाना विद्यायुत कविजन प्राण रत्नावलीचे
प्रेमें शक्ती चढवुनि नवी पोशिती गात्र तीचें.
वाली ऐसे असुन मग ती दीन होईल कां हो ?
वर्षा मेघाश्रित मयुरिका फोडिते काय टाहो ? ९
दैवें कालासह न घडुनी चाल रत्नावलीची
मंदाक्रांता बहुतचि करी ही निराशा जनांची;
ती साहोनी इजवरि जसें ठेविलें प्रेम त्यांहीं,
तैसें राहो पुढतिहि, जगच्चालका प्रार्थना ही. १०

विहंगम.

---

# श्रीछत्रपतिशिवाजीमहाराजकाव्य.

## सर्ग १२ वा.

मध्यरात्रवर्णन. विशालाक्षाचा भद्रांचलावर हल्ला. युद्धवर्णन. शत्रूंचा पराभव. भद्रांचल हस्तगत होतो बहिलोलखान चाल करून येतो. पुन्हा युद्ध. विशालाक्षाचा विलक्षण पराक्रम. बहिलोलखानाचा पराजय व पलायन. तो शिवाजीच्या स्वाधीन होतो. शिवाजी प्रतापराय व सुशीला यांस बंधमुक्त करितो. दुर्मतीला शासन. शिवाजीचे आवेशयुक्त भाषण. भरतवाक्य.

### श्लोक.

गगनपथिक जाई चंद्र अस्ताचलातें
तिमिरनिकर घोर व्यापि पृथ्वीतलातें
अचल सकल भासे जाहली मध्यरात्र
न पथ दिसत नेत्रां काननीं अल्पमात्र १

त्यजुनि विरहदावीं नाथ जाई प्रवासा
ह्मणुनि विकल चित्तीं यामिनी कृष्णवासा
नयनसलिल गाळी ही तुषारच्छलानें
गगन भरुनि टाकी स्रस्तनेत्रांजनानें २

तरुवरलतिकांहीं व्यापिला प्रान्त सारा
तृणदलकुसुमांचा माजलासे पसारा
वट बकुल नभातें चुंबिती मस्तकांहीं
करिति पथनिरोधा शाखि मार्गस्थकांहीं ३

निबिडतरुनिकुंजीं व्याघ्रसिंहादि घोर
करुनि घनरवातें देति हे भीति थोर

क्षुधित किति वनान्तीं भक्ष्य शोधार्थ जाती
स्नुतमद जलरेखा क्रीडती भद्र जाती ४

करि वनिं चहुभागीं शान्तता पूर्ण वास
तरुवरि विहगाली भोगि निद्रा–सुखास
परम अधम वृकव्राज दुष्कर्मकारी
कपटपटु पहा हा सुप्त--काकांस मारी ५

करुनि वरि फणातें नाग हे स्वैरचारी
सुखितहृदय येथें डोलती भंयकारी
श्रवण करुनि कर्णी घोर फूत्कार त्यांचा
सभय दडुनि राहे संघ हा दर्दुरांचा ६

करि टप टप ऐसा शब्द कोठें तुषार
सर सर रव होई चालतांना विखार
करि धड धड शब्दां घोर कोठें प्रपात
कड कड कड कोठें होतसे वृक्षपात ७

हिमकर नृप जातां अस्तमानां विशाल
तमनगकुहरीं जें गुप्त राहे कराल
बघुनि समय ऐसा योग्य बाहेर येतें
करुनि करगता भू भोगि साम्राज्य येथें ८

भयकर समयासी या अशा एक--सेना
नच किमपिहि जीच्या भीति चित्तीं वसेना
हळु हळु हळु लंघी मार्ग भद्रांचलाचा
बघुनि नवल वाटे थोर आवेश साचा ९

क्रमण करुनि मार्गा श्रान्त झाले सुवीर
परि गहन पथींही सोडि कोणी न धीर

न गणुनि हृदयीं ते अल्पही युद्धखेदां
भयविरहित सारे चालले दुर्ग--भेदां १०

जातां सैन्य बळें न त्या पथ कळे घोरांधकारामुळें
थोडें लक्ष्य चळें तरी पद ढळे खांचेमधें आदळे
शौर्याचे पुतळे खरेच सगळे यालोकिं ते आगळे
त्यांचें धैर्य ढळे न, हें जरि पळें आकाशही कोसळें ११

कोणी वीर पडे पथीं धडपडे दुर्मार्ग ते वांकडे
सेना ती रखडे पदोपदिं अडे आधार ना सांपडे
भारी उच्च कडे तसे चहुकडे वाटेंत कांटे खडे
जाती सर्व सडे सुधीर निधडे सोत्कंठ किल्ल्याकडे १२

तेजानें तरणीसमान करणी जो दावि युद्धांगणीं
जातांना चरणीं न लेशहि गणीं ते क्लेश वीराग्रणी
चिन्ती वीरमणी निजप्रहरणीं मर्दून दुष्टां रणीं
मी शौर्यादिगुणीं भरीत धरणी निःशेष ही या क्षणीं १३

कोठें भूधरमालिका दिसतसे अत्युच्च अभ्रंलिहा
कोठें भूमितलां भयानक दरी भेदोनि जाई पहा
कोठें पुण्यनदी सुवासितजला धों धों रवें वाहतें
कोठें सर्व दिशा प्रपात भरिती मेघापरी झांकतें १४

जाती सर्व असे मृगाधिप जसे जिंकावयाला ससे
चित्तीं भीति वसे न धैर्य विलसे अंगामधें फारसें
जाती उत्सुकसे पुढें जसजसें किल्ला तसा येतसें
धीरोत्साह--रसें तदा वदतसे तो वीर त्यांना असें १५

“ योषिद्रत्न खरी वसे क्षितिवरी जीची न अन्यां सरी
साक्षात् श्री दुसरी तिला खल हरी भूपालही त्यापरी

याचा सूड जरी न घ्याल समरीं धिक् धिक् तुम्हांतें तरी
घाला आतमकरीं स्त्रियापरि बरीं तीं कंकणें साजरीं १६

किल्ल्यामध्यें जाहलें सर्व शान्त । निद्रासैख्यां लोक भोगी नितान्त
झालें स्तब्ध व्योम तैसें अशेष । औदासिन्या आदरी तें विशेष १७

मार्गींतूनी हिंडती चोर जार । दुष्कर्मातें योग्य हा काल फार
जीं ऐकोनी वाटते भीति थोर । कृत्यें ऐशीं योजिती ते अघोर १८

होई त्यांचा फार संचार गुप्त । मार्गीमध्यें श्वान जे अर्ध--सुप्त
येतां कानीं अल्प चाहूल यास । तेव्हां सारे भुंकती आसमास १९

होती कोठें यामघंटानिनाद । तैसे कोठें मद्यप्यांचे विवाद
घाली तेव्हां गस्तही कोतवाल । कोणी जातां त्यास बोले सवाल २०

निद्रेमध्यें मग्न सारे शिबंदी । तेव्हां तेथें त्या करी कोण बंदी
हल्लयाची त्या तेधवां अल्प नाहीं । गुर्गीमध्यें शत्रुतें कल्पनाही २१

त्याकालीं वीर कांहीं भय विदित कधीं अल्पही ज्यास नाहीं
मोठें दुर्लंघ्य तेही तट चढुनि वरी पोचले शीघ्र पाही
तेव्हां त्या रक्षकांहीं बघुनि रिपुजनां ठोकिल्या भेरि दाही
जागे झाले शिपाई ढकलिति मग ते त्यास खालीं कराहीं २२

मोठा कल्लोळ झाला वदति रिपुजनीं घातला थोर घाला
तेव्हां बाहेर आला शठमति खल तो अन्तरीं फार भ्याला
घेवोनी शीघ्र ढाला प्रखरतम असा कोणि हातांत भाला
कोणी घेती मशाला मग रिपुवरि तो दुष्ट वेगें निघाला २३

मुख्यद्वारीं परम भयकरी जाहली युद्धभेरी
सेना सारी त्वरित रिपुवरी धांवली शस्त्रधारी
मारामारी करिति बहुपरी घोर त्या अंधकारीं
इषा मारी स्मृति न तनुवरी कोण देहां विचारी २४

युद्धाची शर्थ केली हरिशरभ जणों मांडिती युद्ध--केली
किंवा रागावलेली कलह करितसे व्याघ्रजाती भुकेली
अंगीं ईर्षा उदेली समरशिरिं उभीं निर्भया पूर्ण ठेली
सेना तेथेंच मेली परि नच इतरां एकही हार गेली २५

घेवोनी ढाल हातीं करुनि रिपुपुढें आपली ताठ छाती
युद्धाचें गीत गाती कुपित करकरां वीर ते दांत खाती
रक्तानें सर्व न्हाती परि नच हटती एकमेकां अगाती
स्वर्गा कित्येक जाती वरिति सकलही कीर्ति जी निस्तुला ती २६

गर्दी अत्यन्त झाली पडति किति तरी वीर नष्टासु खालीं
वीरश्री फार आली नच गणिति जरी अंगिं रक्तें निघालीं
रक्तानें पूर्ण न्हाली वसुमति वरिते सत्य अत्यन्त लाली
अंगें सचूर्ण झालीं तरि न विरमती वीर ते वीर्यशाली २७

झालें असें युद्ध मुहूर्त एक। मेले महावीर रणीं अनेक
गेली विशालाक्ष--चमू न हार। शत्रूवरी घोर करी प्रहार २८

सोडून युद्धां मग दुष्ट--सेना। जाते जयाशा लवही दिसेना
मागें पळाली हतवीर्य साची। सांडून आशा सकलां यशाची २९

स्वाधीन होतां मग तें ठिकाण। तेथें तयांचें फडके निशाण
सेना अशी ती जयशालि झाली। नाहीं परी युद्धशिखा विझाली ३०

मोठा पल्ला मारुनी शीघ्र फार। गांठी किल्ला म्लेंच्छ--सेना अपार
केला हल्ला क्षिप्र सक्रोध खानें। अल्लाअल्ला नाम गर्जे मुखानें ३१

पाहुनी दल असें यवनाचें। शूरसेनदलही रणि नाचे
धांवलें यवनसैन्य अपार। मार तें करितसे अनिवार ३२

माजलें समर त्यास्थळि थोर। गर्जती रणमदें भट घोर
लोटला भट भटावरि रागें। झुंजतो बहु परी नच मागे ३३

गर्जतां धडधडा रणभेरी । सिंहसा प्रतिभटां भट हेरी
घेउनी निजकरीं तरवार । त्यवरी प्रखर तो करि वार ३४
फोडिती सदसिनें अरि-भालां । सत्वरी खुपसिती उरिं भाला
होतसे नच दलांत विघात । घालिती भट परावरि घात ३५
वीर ते रगडिती निज दाढा । दाविती मग पराक्रम गाढा
होय ती असिलता न भुजंगी । माजली परम ती रणरंगीं ३६
रेटिती भटभटां रणधीर । हालती न लव ते परि वीर
माजली रणधुमाकुळ भारी । होय कत्तल महा भयकारी ३७
अन्तरीं न इतरांस विघात । मारुताहि मिळे नच वात
एक वीर पडतां रणिं जागा । घेत तीं भट दुजा मग जागा ३८
यापरी भट भटास विमर्दी । धांवती तरिहि युद्ध-विमर्दी
झुंजतां भय नसें मरणाचें । मृत्यु आ करुनिया रणिं नाचे ३९
होय विक्षत जरी जखमांनीं । वीर तें नच तरी लव मानी
जाहले रणशिरीं किति गर्द । साहसी रणविशारद मर्द ४०
होतसे खणखणा असि-शब्द । जाहला दणदणा पद-नाद
दाविती पटह गर्जुनि धाक । फोडिती भयकरी भट हाक ४१
पाहुनी खगकुलें बहु भीति । तेधवां उडुनि जाति नभीं तीं
धांवती वनपशू दुरि सारे । भीतिनें सकल भूमि थरारे ४२
यापरी रणमदें बहु मस्त । झुंजती करिति वीर शिकस्त
तों निशा सरुनि होय विभात । शोभलें तपन--तेज नभांत ४३
अंबरीं प्रकटतां रविकान्ति । भ्यासुरा समरभू नच कां ती
वाहती भयद शोणित--पूर । मोजवे न पडले किति शूर ४४
जाहली सकलही क्षिति लाल । टाकिला जणु उमोप गुलाल
नेसली अरुण रम्य विशाल । चित्रवर्ण अथवा नवशाल ४५
रोधिती खल जसे सुजनातें । त्यापरी जलद हे तपनातें

नाशि तो परि तयांस विलोकी । पावती जय महाजन लोकीं ४६
शून्य सर्व अवनीतल भासें । कंजपंक्ति न सरोवरिं हांसे
जाहल्या दशदिशाहि उदास । व्यग्रता करि जनां निज दास ४७
माजला बहुत युद्धविमर्द । आटले सकलही रणिं मर्द
सर्वतां परचमू जरि घेरी । अल्पही तरि गणी नच येरी ४८
यवन ते असती बलवान् परी । विचरती समरीं गृहिं ज्यापरी
चरचरां चिरिती रिपुचीं शिरें । भय न तद्हृदयीं लवही शिरें ४९
रणि निशाचरसे अनुधांवती । अनुचिता कृतिनें सुख पावती
प्रकटुनी समरीं बळ आपलें । पळविलीं अवघीं रिपुचीं दलें ५०
बघुनिया रिपुचा बहु विक्रम । परतले अपुले भट–सत्तम
त्वरित तो स्वजनां मग सांवरी । दलपती वदुनी वच यापरी ५१
“ मळवुनी निज पूर्वयशां कसें । सकलही भटहो पळतां असें
प्रथित वीरजनां नच सर्वथा । अहह ! ही उचिता वचनीयता ५२
जगिं अवश्य असें मरणें जरी । मग किमर्थ अहो पळतां तरी
न दुसरें अयशस्कर याहुनी । खचित तें गमतें मजला जनीं ५३
मिळविलें समरीं यश आगळें । चरचरां चिरुनी रिपुचे गळे
मळवुनी यश तें अपुलें असें । न मरणाहुनि निंद्य जिणें कसें ५४
उचित जी भट हो निज विक्रमा । कृति करा असलीच महत्तमा
जरि पळाल रणांतुनि या क्षणीं । तरि पडाल खरे दृढबंधनीं ५५
अशी बोलुनी वीर तो वीरवाणी । अरातीवरी धांवला शस्त्रपाणी
कृतान्तापरी मारिली घोर हाक । परातें मनीं वाटला थोर धाक ५६
विराजे करीं शस्त्र तें घोर भारी । तयानें परांतें रणीं तो विदारी
तडिद्गोल जैसा दिसे अंबरांत । तसा शोभला वीर तो त्या दलांत ५७
जरी घालिती वीर त्याला गराडा । तयाचा स्वखड्गें करी तो चुराडा
फिरे भोंवतीं चक्रशी शस्त्रधारा । तयानें परांतें करी थोर मारा ५८

समीपस्थ ज्याचा असे अन्तकाल । करी त्याकडे वक्रदृष्टी कराल
रणीं वीर जो जो दिसे अग्रभागीं । तयाचा करी चूर तो त्याच जागीं ५९
जशी चंड--काली रणीं शूलधारी । तशी खड्गवल्ली भटध्वंसकारी
नभीं जेवि विद्युल्लता दुर्निरीक्ष्या । तशी संगरीं होय ती अन्यपक्ष्यां ६०
जणों नागिणी कालरूपा खरी ते । भटप्राण शोषावयां धांव घेते
रणीं ओकुनी ती विषज्वाल घोर । करी शत्रुसैन्यांत संहार थोर ६१
कसा शोभला वीर तो शस्त्रधारी । रणीं जेवि रक्षोगणीं कैटभारी
भयें वीर कोणी न शस्त्रां उभारी । रणीं जाहला शत्रु--संहार भारी ६२
पळों लागले शत्रुचे सर्व वीर । नसे राहिला त्यांस युद्धांस धीर
“ पळा रे पळा पातला वक्र काल । गिळी म्लेच्छ--वीरांस हा क्रूर काल ६३
असा तेधवां होय कल्लोळ भारी । रणीं वीर कोणी न वीरां विचारी
पळे प्राणभीतीमुळें वीर जो तो । मराया वृथा कोण हो सिद्ध होतो ६४
जरी खान देई तयां धीर भारी । तरीही तयातें न कोणी विचारी
पळे मांडुनी युद्ध जो तो भयानें । बरा सेविला मार्ग तो शीघ्र खानें ६५
पराभूत सेना जरी ती पळाली । न ती शत्रु हस्तांतुनी मुक्त झाली
महा सैन्य हल्ला करी अग्रभागीं । विशालाक्ष--सेना तशी जागजागीं ६६
दवाग्नी कुरंगी दुरी धांव घेई । तिला व्याध मार्गामध्यें आड येई
तशी जाहली बापुडीची अवस्था । सुटायास तीतें नसे अन्य रस्ता ६७
शिवाची चमू होय ती शूर धीर । असे पाहुनी घाबरे म्लेच्छ–वीर
अकस्मात् निरोधी तिला भूपसेना । पळाया तिला मार्ग कोठें दिसेना ६८
विशालाक्ष साश्चर्य अत्यन्त झाला । ह्मणे घातला हा दुजा कोणि घाला
पुढें धांवला तोंच वेगें नृपाल । गमे जो रणीं शत्रु सैन्यास काल ६९
नृपाधीन तो खान झाला हताश । तशी म्लेंच्छ सेनाहि ती सावकाश
विशालाक्षही भेटला भूमिपाला । तयां पाहुनी राव संतुष्ट झाला ७०
ह्मणे धन्य तू वीर होशी जगांत । त्रिलोकीं तुझें थोर सामर्थ्य गात

खरा या जगीं योग्य तूं स्वामिभक्त । प्रतापें तुझ्या राव केला विमुक्त ७१
मिळालीं दलें दोन तीं; थोर हल्ला । करोनी नृपें घेतला शीघ्र किल्ला
रणीं ध्वस्तधैर्या चमू दुर्जनाची । नृपाधीन झाली स्वयें क्षिप्र साची ७२
करी यत्न तो गुप्तवेशें पळायां । दुरात्मा परी सर्व तो होय वायां
नृपाच्या करीं सांपडे पापबुद्धि । सुहृद्वर्ग त्याचा तसा तो कुबुद्धि ७३
करी बंधमुक्त प्रतापप्रभूतें । नृपें अर्पिलीं त्यास वस्त्रें प्रभूतें
करी योजना त्याच जागीं खलाची । तशी सर्व त्याच्या कुमित्रादिकांची ७४
करी शान्तता शीघ्र तेथें नृपाल । जयातें प्रजा वानिती सर्वकाल
खलानें अहा गांजिलें लोक सर्व । तयांतें तदा वाटलें हर्षपर्व ७५
स्त्रियांची खरी ईश्वरी होय लोकीं । सुशीला जिची कीर्ति वानी त्रिलोकी
तिला मुक्त केलें स्वयें भूवरानें । पतीतें सती भेटली ती सुखानें ७६
प्रजा ती गुड्यातोरणांतें उभारी । समस्तांसही वाटला हर्ष भारी
खरा तातसा होय जो आपणांतें । प्रजा हृष्ट सत्कारिती सर्व त्यांतें ७७
दिलें दुःख जें जें खलानें जनातें । नृपें सर्वही दूर केलें तदा तें
प्रजा स्वप्रजा निर्विशेषा नृपातें । कसें पाहवे दुःख त्यांचें तयातें ७८
असा सौख्यकारीं समाचार झाला । सवें सर्व विश्वास--भूपां कळाला
निघे शीघ्र साध्वीसवें तो गडातें । न त्यांचा अहा ! वर्णवे ह[illegible]ातें ७९
पित्यातें तदा भेटली हो सुशीला । तशी शीघ्र मातेसही शुद्धशीला
तदा लोटल्या सत्य आनंदराशी । नसे अन्त त्या पूर्ण सौख्याकराशीं ८०
नराधमें जे अपराध केले । नृपासवें कैतव योजियेलें
तदर्थ शिक्षा करण्या तयांतें । निमंत्रिलें सर्व सुहृज्जनांतें ८१
नृपाल सिंहासनिं फार साजे । तसे तया सन्निध अन्य राजे
विशिष्ट शोभे दरबार फार । पहावया सोत्सुक तो प्रकार ८२
पयोद–गंभीर–रवें शिवाजी । वदे तदा “ सज्जन आयका जी
खलाधमें सोडुनियां नयातें । अपार पीडा दिधली प्रजांतें ८३

परांगनाचा अभिलाष केला । सदा दुरात्मा विषयां भुकेला
विमानुनी हा मम शासनातें । करी सदां दुष्पथ--सेवनातें ८४
पतिव्रता भूषणभूत पाही । नृपाल विश्वास सुता अहा ही
तिला अकस्मात् हरिलें छलानें । तसें प्रतापप्रभुतें खलानें ८५
करून मैत्री यवनाधमांशीं । विरोध मांडी स्व--सुहृज्जनांशीं
तरी शिरच्छेद करा खलाचा । तयास हा दंड यथार्ह साचा " ८६
प्रताप तेव्हां वदला तयातें । " विनंति ही एक असे नृपातें
खलाग्रणी दुर्जन हा नृपाला । यथार्ह हा दंड खरा तयाला ८७
परी सती वर्गविभूषणा ही । सरी जिची सत्य रमेस नाहीं
पडेल ती दुर्गतिमाजि राया । विचार हा पीडि मना खरा या ८८
किती सतीनें उपकार केले । महा अनर्थीं मज रक्षियेलें
असे खरी ही खनि सद्गुणाची । जगीं रमेची प्रतिमाच साची ८९
तरी न याला नृपते वधावें । सतीस या अल्प न दुःख द्यावें
परोपकारव्रतिं पूर्ण जागो । सतीस वैधव्य-शिखा न लागो " ९०

वदे तेव्हां राजा " जगिं असपि धन्य प्रभुवरा
दयावान् तूं मोठा नच तव सरी सत्य इतरां
करी जो दुष्टात्मा तुजशि परि पीडा बहुपरी
दया सौहार्दानें करिशि नृपते त्यावरि खरी ९१

जरी याला शिक्षा परम उचिता हीच गमते
कशी धिःकारावी तरिहि तव विज्ञप्ति नृपते
वसो दुष्टात्मा हा तरि सुचिर कारागृहिं सुखें
जरी या पापाला परम लघु हें शासन निकें ९२

विशालाक्षानें जी उपकृति नृपा केलि अतुला
किती ती वर्णावी विदित खरि ती सर्वहि तुला

महास्वामीभक्तप्रचुरगुणवान् होय जगिं हा
करी तुह्मांसाठी प्रकट समरीं साहस महा ९३

गुणाधिक्यें यानें मज बहुत भूपा सुखविलें
प्रतापानें तैसें सकल भुवनानें भारियलें
तरी या दुर्गाचा अधिपति असो हा नृपवरा
रणीं सेतो आह्मां यवनदलविध्वंसचतुरा ९४

अहा ! हा विश्वास प्रभुवर महात्मा चरचरा
प्रतापानें युद्धांगणिं चिरुनि टाकी खलशिरा
महौदार्यें ज्यानें बहु सुखविले भूसुर महा
तया दुर्दैवानें बहुत छळिलें वार्धकिं अहा ९५

परी त्या दुःखाचें शमन करुनी सत्वरिं खरें
सुखाचा हा ऐसा समय अणिला त्या प्रभुवरें
शिवो ईशेच्छेनें कधिंहि न विच्छेश अपणां
सदैव प्रार्थीं मी सविनय असें ईश-चरणां ९६

स्वधर्मातें आली अवनति महा दैवगतिनें
प्रजा ही दुष्टांनीं बहुत छळिली दुष्टकृतिनें
स्वधर्मोद्धारा मी करिं परम यत्नां अनुदिनीं
करा मत्साहाय्या नरपति तुह्मी सर्व मिळुनी ९७

महासाध्वीश्रेष्ठा जगिं खरि सुशीला शुचितमा
जशी सीतातारा तशिच गमते ही अनुपमा
हिनें सच्छीलानें अतुल यश लोकीं प्रकटिलें
तसें चारित्रानें सकल अबलातें दिपविलें ९८

जरी दुर्दैवानें बहुपरि सतीतें छळियलें
तरीही साध्वीनें नच सुचरितातें मळविलें

सदा धैर्योत्साहें प्रकट करि सत्कीर्ति विमला
खरें आहे ईचें अतिकथमहौदार्य मजला ९९

पडे दुर्दैवाचा इजवरति घाला जरि महा
अहा केली त्यानें उपकृति विशेषा तरि पहा
जगीं आपत्कालीं प्रगटति जनाचें सुगुण ते
तसें चारित्र्याचें बळ अतुलही सत्य कळतें १००

जया देशीं साध्वी सुचरितपरा सत्य वसती
तशी चारित्र्याची परम महती सर्व गणती
वसे लक्ष्मी तथें अतुल विजयश्री तशि सदा
नसे लोकां तेथें विदित कधिंही अल्प विपदा १०१

स्त्रिया सच्चारित्र्य–व्रतनिरत जेथें निवसती
प्रजा धीरोदात्ता विविधगुणशाली निपजती
स्वदेशोत्कर्षातें झिजविति तनूतें सतत ते
अहा होई विद्या–बहुविध--कलांचें सदन तें १०२

अशा साध्वी येथें निवसति सदा पुण्य–चरिता
ह्मणोनी आह्मातें वरि विजय--लक्ष्मी अविरता
अशा या साध्वींचा छळ करिति जे दुर्मति महा
रणीं त्या म्लेच्छांचें कदन करण्या सज्ज असि हा १०३

अनाचारी जेथें सकलरमणी--वृंद निवसे
मिळे तेथें वीरां यश धवल शौर्योद्भव कसें
व्रतभ्रष्टा झाली अहह जइं जालधर--सती
तदा युद्धामध्यें वरि अयश रात्रिंचर--पती १०४

सुशीले सच्छीले असासि जगिं देवीपरि खरी
महापूज्या आह्मां नच तुजपरी कोणि दुसरी

स्वजन्मानें ताता सुचरितवती धन्य करिसी
तशी चारित्र्यानें उभयकुळलक्ष्मीच गमसी १०५
पडे दुर्दैवानें तुजवरि शुभे दुर्गति महा
दयार्द्रें ईशें ती परि निरसिली सर्वहि पहा
पतीसंगें आतां चिर अनुभवी राज्यविभवा
तुझी कीर्ति व्यापो भुवनवलयां सद्व्रत-भवा १०६
तुझें पाहोनी हें सुचरित महा आर्य--वनिता
सदाही सेवोत स्वपतिचरणां साधु--चरिता
पुन्हा स्त्रीजाती ही सकलगुणसंपन्न चतुरा
तशी आतां होवो विनति मम हीच प्रभुवरा १०७
सती तूतें होवो तनय गुणवान् वीरवर जो
बघोनी तच्छौर्या यवनदल सारें रणिं थिजो
स्वधर्मोद्धाराचें गहन बहु हें कर्म करुनी
भरो म्लेच्छ--ध्वंसें अनुपम--यशें सर्व धरणी १०८
जगीं सन्मार्गानें सतत जन जे वर्तति नृपा
हरोनी तत्तापां प्रभुवर करीं त्यांवरि कृपा
रमे सर्वेशाचें त्यजुनि भय जो दुष्पथिं सदा
दुरात्मा तो अन्तीं वरि खरि अवस्था असुखदा १०९
होवो ही पाकशाली वसुमति समयीं होउनी वारिवृष्टी
पावो आनंद शश्वत् तृणजलसुखिता सर्वही लोक--सृष्टि
नांदो स्वातंत्र्यलक्ष्मी भरतभुवि; वरो धर्म पूर्णोदयातें
आर्यस्त्रीजाति होवो सुचरितनिरता मान्य अन्यस्त्रियांतें ११०

बाराव्या सर्गानिशीं श्रीशिवछत्रपतिकाव्य समाप्त.

नारायणसुत.

# आर्यभूदेवीमहिमा.

## चतुर्थोद्गार.

### श्लोक.

श्रीभूमातेसमान त्रिभुवनिं बघतां देवता अन्य नाहीं;
नाहीं कोणी हिताचा तिजसम दुसरा या जगीं सद्गुरूही;
नाहीं भ्राताहि कोणी हितकर दुसरा भूमिवाचोनि सत्य;
भूमातेवीण नाहीं अवनहि; जन हो ! वंदिजे तीस नित्य. १

### साक्या.

निसर्गदेवी करी जियेला जगिं सुंदर अत्यंत,
स्वयें तीच ही वीरप्रसवा जगतांत भाग्यवंत. २
काव्यमयी ही तत्स्तुति नोहे, आहे सर्व यथार्थ;
वरी योजिली इतिहासाची दृष्टीच एतदर्थ. ३
दंतकथा पौराणिक गोष्टी विसरुनि, होउनि शांत,
पहा पहा हो ! आर्यमहीला इतिहासादर्शांत. ४
उपरि कथित बहु विभूतिसम जरि एकेक अन्यदेशीं--
उदया येती, तरि न गणवतें तद्भाग्यसंपदेशी ! ५
त्या मूर्तींच्या सत्त्वें होती ती भू क्षणिं निःसत्त्वा;
तशी नव्हे ही भारतभूमिका संतत समृद्धसत्त्वा. ६
दशसहस्रवर्षांपासुनि जी प्रसवे अगणित वीरां
नमस्कार त्या आर्यमहीला जी सत्त्वाढ्य, सुवीरा. ७
नररत्नें माननीय जैशीं, तैशींच स्त्रीरत्नें,
या मातृदरीं जन्म पावलीं प्रभुच्या पूर्ण कृपेनें. ८
ऋषिवरवृंदपरिषदीं वादीं जी ब्रह्मविचाराच्या--
तत्त्वज्ञानें तत्त्वज्ञांची करी कुंठिता वाचा;-- ९

ती गार्गेयी, अगस्त्यभार्या जिज्ञासु महासाध्वी--
लोपामुद्रा यांस जन्म दे हीच आर्यभूदेवी. १०
सती अहिल्या, तारा, मयजा, दमयंती, सावित्री,
कन्या ह्या भारतभूमीच्या; तीच यांस जनयित्री. ११
पवित्र होतिल पातकीहि ह्या एकेक नाममात्रें;
ऐशीं यांचीं असति चरित्रें जगतीं परमपवित्रें ! १२
या पावित्र्याविषयीं असतिल अझुनि संशयित कोणी,
त्यांहीं हें एकचि पुण्यप्रद नाम ऐकिजे कर्णी. १३
ज्याला उच्चारितांच आह्मी देशासहित सदैव--
पावन व्हावें; असें सांगतों परिसा आतां नांव. १४
निसर्गगंभीरता, सदयता, सुंदरताहि अपार,
पातिव्रत्यौदार्यधैर्यमुख गुणांस जें भांडार; १५
श्रीसीतादेवी ऐसें तें नाम, समस्त नरांनो !
परिसा प्रेमें भूतलीं; तेंवि स्वर्गी सर्व सुरांनो ! १६
भूमिसुता हें नाम जियेला यथार्थ लोकीं शोभे;
श्रीसीता ती जनका साक्षात् या भूगर्भी लाभे ! १७
आह्मी आणिक सीतादेवी झालों एका उदरीं !
कल्पनाच ही उदात्त सत्वर उदात्त चित्तास करी ! ! १८
याज्ञवल्क्यवामदेवमिथिलपगार्गीगिरसवसिष्ठ--
प्रभृती तत्त्वज्ञानी सारे जे जगतीं सुप्रतिष्ठ; १९
कणाद, भास्कर, कपिल, पाणिनी, भारत, वराहमिहिर,
आर्यभट्ट, वाग्भट, चरकादिक शास्त्रपारग स्थविर; २०
वाल्मीकि, व्यासोनारायण, कालिदास भवभूति,
इत्यादि सरस्वतीकंठमणि ज्या श्रेष्ठ कविविभूति; २१
आद्यशंकराचार्य, बुद्धगुरु, रामानुज, मध्व तसे--

वल्लभ, नानक, धर्मस्थापक सर्वहि महीमहितसे; २२
पुण्यश्लोक युधिष्ठिर भूपति, नलनृपति, श्रीराम,
यांसम रंजनशील भूमिपति बहु जनमनोभिराम; २३
नरनारायणकर्णादि महारथी अतिरथी लोक;
सम्राटहि चंद्रगुप्त, विक्रम, शालिवाहन, अशोक; २४
मूर्तिमंत सद्गुण अवतरले जे श्रीशुकयोगींद्र,
सत्त्वधीर गंभीर महात्मा तैसाचि हरिश्चंद्र; २५
गार्गेयी, सावित्री, सीता, मंदोदरी, अहिल्या,
लोपामुद्रा, तारा, जगतीं वद्य सती ह्या झाल्या; २६
विभूति ऐशा अगणित-रत्नें हीं नररूप अनंत;-
आर्यमहीचे भाग्याचा मग कैसा लागे अंत ? २७
आर्यावर्तेतिहास तरिहि न पूर्वींचा उपलब्ध;
लब्ध असे तेवढाहि न दिसे सर्वत्र सुसंबद्ध; २८
संकलित असे जितुका तितुका ग्रहण करायालाही--
ग्रहणशक्ति या मंदमतिप्रति ईशें दिधली नाहीं ! २९
ह्मणुनि उपरि निर्दिष्ट कथन हें, या टिट्टिभें स्वताचे-
चचुपुटीं उदक आणिलेंसे भारतमहे दधीचें. ३०
हीं सारीं वर्णिलीं तथापि प्राचीन मनुजरत्नें;
अर्वाचीन सुरत्नांचें पण आहे वर्णन करणें. ३१
सिंहगडाची दगड दगड; खडतर खिंड रांगण्याची;
पाणिपताची भीषणरणभू, श्रीपर्वती पुण्याची; ३२
चितूरचे सुप्रसिद्ध भूपति राणा प्रतापसिंह,
छत्रसाल बुंदेलखंडचे, अरिकरिवरास सिंह; ३३
बंगाल्याचेहि सर्व लोकां श्रुत प्रतापादित्य,
ग्वाल्हेरीचे महादजीही, पराक्रमें आदित्य; ३४

ग्लानी पावे धर्म जेधवां, होय अधर्मी जनता,
तेव्हां तेव्हां प्रभू अवतरे धर्मरक्षणाकरितां. ३५
या तत्त्वें श्रीमच्छत्रपती शिवराय शंकरांश—
अवतरले; निजयशेंचि ज्यांहीं विश्रुत केला वंश; ३६
परमेश्वरभजन, राजकारण, सावधपण सर्वत्र,
बोधसार हा असे जयाचा अमृतसमान पवित्र; ३७
प्रपंचि नसतां, प्रपंच आणिक परमार्थ सुलभ जेणें—
केला बोधें; आर्यमहीचें ते श्रीसमर्थ लेणें; ३८
करुनि यत्न जें शिवें मिळविलें भूजननींचें राज्य,--
त्यास रक्षिती पुढें पेशवे असती तेही पूज्य; ३९
ज्यानीं श्रीविठ्ठल वश केला करुनी सुरस अभंग,
तुकाराम तो भक्त हरीचा; ज्याची कीर्ति अभंग; ४०
अल्पवयांतचि ज्यांनीं केली टीका रसाळ, मोठी,--
गीतेवरते; ते ज्ञानेश्वर निपजति हिच्याच पोटीं; ४१
सांगावें किति, कसें, कोठवर, साद्यंत बुद्धिमदें ?
परंतु कथिलें अल्प व्हावया शुचि तद्गुणानुवादें. ४२
अस्तु-- अशा ज्या जगतिं विभूती असति वंद्य सकलांला;
नमस्कार हा माझा भावें त्यांच्या पदकमलांला. ४३
सर्वहि भारतवासिजनांना संप्रति त्या वंद्यांहीं—
वर द्यावा, ' कीर्तीनें तुमच्या उजळोत दिशा दाही. ' ४४
" आर्यमहीच्या माहात्म्याची गणना कोण करील ?
बांधाया अंबरीं अंबरा सुज्ञ न हांव धरील ? ४५
कनकगिरिपरिहि जरि संभवला विशाल कज्जलराशि;
महांबुधांचें वरी योजिलें मषीपात्र जरि त्याशी; ४६
तरुवर जो कल्पवृक्ष त्याची जरी लेखिनी म्हटली;

लेखपत्र व्हावया विस्तृता जरी मेदिनी नटली; ४७
मतिप्रदा शारदा स्वयें जरि घेउनि हें साहित्य,
लिहीत बसली वैभवगरिमा आर्यभूमिची नित्य; ४८
न लागतां पार तियेला होईल निश्चयें स्तब्ध !
'नेति' 'नेति' उद्गारें ब्रह्मीं स्थिरले जैसे वेद." ४९

( श्लोक )

हे ! माते ! आर्यभूमि ! क्षितिवरि असशी तूं समृद्धा, सुसत्त्वा,
अंबे ! जाणील कोण प्रथिततर तुझ्या सर्व लोकीं महत्त्वा ?
वंदोनी त्वत्पदांतें, तुजसि करितसें प्रार्थना एक माते !
देई या सद्गुणांचा लव तरि जननी ! बालकांतें अह्मांतें. ५०

आह्मापाशीं जरीही गुणनिवह असे माउली ! हा, परंतु—
झालासे जो दिशेचा बदल करविता व्यर्थ ता सर्व हेतु !
यासाठीं ही विनंती जननि ! झडकरी पुत्र लावीं दिशेला;
तेव्हां वाटेल मातें मग खचित तुवां हेतु हा पूर्ण केला. ५१

हे ! आर्ये ! त्वत्प्रसादें तव सकलसुतां थोर संपत्ति लाधो;
अंगींच्या शुद्धसत्त्वें जनिं तुजविषयीं सर्व कार्यार्थ साधो;
आह्मी श्रेष्ठ त्रिलोकीं निजसुगुणगणें यापरी हो महत्त्व;
त्वां 'वन्देमातरम्' हे ! त्रिभुवनजयिनि ! त्राहि पुत्रान् सदैव ५२

चतुर्थोद्गार समाप्त.

आर्यभूदेवी महिमा संपूर्ण.

चंद्रकांत.

## प्रार्थना.

### श्लोक.

प्रभो ! सकरुणा ! हरे ! भवभयार्त--कल्पद्रुमा !
पदीं नमन मी करीं चुरितसे जया श्रीरमा
तुझ्याविण दुजा जगीं नच समर्थ हे श्रीवरा !
हरीं व्यसन आमुचें उघडुनी दयेचा झरा १
सुमंगल तुझ्या कृपें उगवला नवा पाडवा
परंतु उगवेल तो कुठिल हर्ष चित्तीं नवा
मिळे न जल तें जरी लवहि वृक्षमूलाप्रती
कशी उदकसिंचनें तरु धरील भव्याकृती २
चहूंकडुनि लागली जनसुखाप्रती वाळवी
तयासि मग ये कशी सुखद सांग बा ! पालवी
प्रजासुखतरू तुवां तव करें पहा लाविला
सदैव अभिमान बा ! तरि रमेश ! त्याचा तुला ३
करें चुकुनि लाविला विषतरू नरानें जरी
कधीं स्वतरुहानितें करुं नये तयानें तरी
असें असुनि कां प्रभो ! मग तुझी अशी ही कृती
प्रजाऽवन करावया तव अलक्ष्य कां संप्रती ४
कृतांतसम दारुण प्रलय मांडितो प्लेग हा
अनर्थ उडवी बळें भयद रूप दावी महा
जनां अमित लोटितो व्यसनशोकदावार्णवीं
जनांसि रडवी किती स्वजन--दीप तो मालवी ५
कुठें सुख--नदी अशी परम थोर माता मरे
कितीक उघडीं पहा पडति दीन तीं लेंकरें

कुठें परम लाडकें रुचिर बाल मृत्यूमुखीं
पडे, जननि तो रडे धडपडे पहा सारखी ६

करूनि बहु कष्ट जो निज कुटुंब नानापरी
पिता सतत पाळितो परि तयासि मृत्यू हरी
कुटुंब उघडें पडे कुठिल अन्न तें खावया
न आप्तजन ये पुढें कुणिच साह्यही द्यावया ७

प्रपंचभर--योग्य जो चतुर शाहणा पंडित
सदैव जननी--पिता--वचन--दक्ष ऐसा सुत
कुठें मरण पावतो त्यजनि वृद्ध माता पिता
अहा! पडति भूवरी तरुलताचि उन्मूलिता ८

सुहास्यवदना सती रुचिरभाषिणी शाहणी
स्वकांतसुखदायिनी चतुर सौख्यदा कामिनी
पतीस विरहानलीं त्यजुनि हाय! जाई कुठें
प्रियानिधनहानिनें हृदय तें पतीचें फुटे ९

जिवाहुनिहि थोर तो परम सर्व सौभाग्यद
पति प्रिय कुठें अहा! हरित काळ हा निर्मद
प्रिया सतिस लोटितो विरहदुःखदावानलीं
विमुक्त तरुपासुनी जणु लता पडे भूतलीं १०

पुरें पतिमुखा न ही निरखिलें विवाहोत्सवीं
अशा विगतभर्तृका कितिक रोग हा तापवी
जिनें सतत खेळणें वसन भूषणें घालणें
असें वय जिचें तिनें व्यसन हें कसें साहणें! ११

सदोदित पदोपदीं कटु वचें तिला ताडिती
हिनेंच गिळिला पती ह्मणुनि ताडिती दुर्मती

कुणी न वदती तिला मधुर शद्बही तो कदा
अनेकविध भोगिते रडत बापडी आपदा १२

प्रभो ! अदय कां बरें सकरुणा तुह्मी जाहलां
बळेंचि कलुनी तुह्मी नयन झाकुनी कोपलां
समस्त अपराध ते उदरिं आमुचे घालुनी
क्षमा प्रभुवरा करा विनति हीच रात्रंदिनीं १३

अनेक अपराध ते घडति लेंकराचे जरी
तरी जननि तात ते सकल साहती अंतरीं
अह्मां जनक माय तूं शमवि दुःख सच्चित्घना
सदैव कवि हा करी तव पदाप्रती वंदना १४

———— कै. नारायण श्रीनिवास निपाणीकर

## भांडण साधेना.

### श्लोक.

वनीं निर्जनीं आशयीं पर्वताचे
नरा हे तुला पूर्ण मैत्रीस ज्यांचे,
असे राहती संत वर्षे अनेक,
कुडी दोन त्या वागवी जीव एक. १

ह्मणे एक "आला मला वीट साचा
सदा सारख्या आपल्या ह्या जिण्याचा;
नवें कृत्य कांहीं तरी आचरावें,
गमे कर्मवैचित्र्यरंगीं रमावें. २

होतों लहान मुलगा जइं मी सख्या रे,
तैं एकिलें जगति भांडति लोक सारे;

ये आज आपण करूं कलहास मित्रा !
तूं बोल ये मज ' खला ! अधमा ! अपात्रा ! '

सुहृद्विनोदार्थ मुनी दुजा ही
स्वजिव्हया ते अपशब्द वाही !
परंतु हासे वदतां तयांतें !
नसे हशाचें कलहाशिं नातें !

पुनः पुन्हा यत्न वृथैव गेले,
दोघे मनीं पूर्ण हताश झाले;
एके दिनीं त्यांतुन एक आला
पाहून गांवांतुन भांडणाला.

तो घेउनी एक करीं शलाका
बोले सख्याला ' दिसली तुला का ?
घे ओढुनी बोलुन ही मदीय,
आतां पहा भांडण शीघ्र होय. "

" माझी ! माझी ! " जाहलें सात वेळां !
त्या काडीचा जीव अर्धा जहाला !
गेले सारे यत्न ते व्यर्थ गेले !
नाहीं ! नाहीं भांडतां त्यास आलें !

न माडीकाडीनें अति कठिण शद्बें गदित वा,
मताच्या वैचित्र्यें कलह उठती हे न अथवा;
सदा ह्या स्वार्थाच्या नव नव महाभीषणमुखी,
उभ्या ज्वाला लोकीं निशिदिनिं जशा घोर नरकीं !

टिळक.